## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२५७

निर्णय दिनांक १६-०६-२००८

श्री. सुरेश नामदेव देठ, : अपिलार्थी
रा. तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेश नामदेव देठ (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. पोले लक्ष्मण साहेबराव, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद व त्रयस्थ पक्ष श्री. पी. जी. जगताप हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे किमान वेतन कायदा, सेवानिवृत्तांचे वेतन, कैलाबी विद्यामंदिर प्रशाला यांच्यासंदर्भात ०१ जानेवारी २००४ ते ३१ जानेवारी २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"I. किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी आपले कार्यालयाकडून व विशेषतः आपणाकडून काटेकोरपणे केली जाते काय ? आपले कार्यालयाकडून अहमदनगर जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना एकूण त्यांना मिळणा-या वेतनाच्या ३३.३३ % रक्कम त्यांचे बचतखात्यात वर्ग होतात काय ? प्रमाणित वजावट (Standerd Deduction) च्या व्यतिरिक्त अन्य कपाती ह्या जास्त होऊन कर्मचा-यांना ३३.३३ % पेक्षा कमी रक्कम त्यांचे बचत खात्यात जमा होतात काय ? अहमदनगर जिल्ह्यात असे किती शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत त्यांना त्यांच्या एकूण वेतनाच्या ३३.३३ % रक्कम त्यांचे दरमहाचे वेतनात उपलब्ध होत नाही. त्यांची तालुकानिहाय माहिती द्यावी. कर्मचा-यांचे नांव, यादी अर्जदारास अपेक्षित नाही. परंतु प्रत्येक तालुकानिहाय संख्या अपेक्षित आहे.

II. सेवानिवृत्त शिक्षकांना ते सेवानिवृत्त झाल्यानंतरही आपले कार्यालयाकडून सेवानिवृत्त शिक्षकांना पुढील महिन्यांचे वेतन (निवृत्तीवेतन (Pention)नव्हे) अदा केले जाते काय ?आपण अहमदनगरचा पदभार

स्वीकारल्यापासून केव्हा अशा प्रकारे वेतन अदा केलेले आहे काय ? केलेले असल्यास कोणत्या विद्यालयातील शिक्षकांना अशा प्रकारे वेतन अदा केलेले आहे त्या विद्यालयाचे नांवे व शिक्षकांचे नांवे द्यावीत त्याचबरोबर त्या शिक्षकांकडून सदरच्या वेतनाची भरपाई करुन घेतलेली आहे काय ? त्याचबरोबर वेतन तक्ता बनविणारा संबंधीत विद्यालयाचा लिपीक व मुख्याध्यापक यांचेवर काही कारवाई केलेली आहे काय ? नसल्यास कारवाई का केली नाही याबाबत सविस्तर अहवाल द्यावा.

III. कैलाबी विद्या मंदीर प्रशाला राहुरी येथील शिक्षणसेवक श्री. पी. जी. जगताप यांना आपले कार्यालयाकडून जा. क्र. का-६/माशिमा/कॅम्प लोणी/२००५ अ.नगर दि. ३०/१०/०५ आदेशान्वये नेमणूक आदेश जारी केलेले आहेत. सदर नेमणुक करतांना सेवक संच निश्चिती प्रचलित नियमानुसार केलेली आहे काय ? सदरची जागा भरतांना योग्य त्या जागेवर (उदा. D.E.d वा B.E.d) भरलेला आहे काय ? त्यासाठी कोणते निकष लावण्यात आले ? निकष लावतांना शासनाचे काही आर्थिक नुकसान झालेले नाही याची खातरजमा करुन घेतलेली आहे काय ? जर सदर नेमणुकीमध्ये शासनाचे आर्थिक नुकसान होणार असेल तर त्याची जबाबदारी कुणाची ?

IV. कैलाबी विद्या मंदीर प्रशाला राहुरी येथील किती शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे ३३.३३ % वेतन त्यांना उदरनिर्वाहासाठी त्यांच्या बचत खात्यात वर्ग होत नाही. त्यांची नांवे व किती महिन्यापासून ते उदरनिर्वाहासाठी आवश्यक असलेल्या वेतना-पासून वंचित आहेत याबाबत सविस्तर अहवाल द्यावा.

V  प्रशालेतील मुख्य लिपीक याचे अधिकार व जबाबदा-या द्याव्यात तसेच मुख्य लिपीक हा शिक्षकेत्तर कर्मचा-यांना मेमो व शोकॉज नोटीस देऊ शकतो काय ? त्यास तसे अधिकार आहेत काय ? मुख्य लिपीक व अधीक्षक यातील फरक काय ? अधीक्षक विद्यालयात केव्हा कार्यरत होऊ शकतो किंवा ते पद केव्हा निर्माण केले जाते याबाबत माहिती तसेच मुख्य लिपीकांस मेमो शोकॉज नोटीस देण्याचे अधिकार नसतील तरीही मुख्य लिपीक शोकॉज वा मेमो देत असेल तर त्यावर कोणती कायदेशीर कारवाई करता येईल याबाबत माहिती द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे दिनांक ०६-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही, मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांचे अपील अर्जासंदर्भात खालील प्रमाणे निर्णय दिला आहे.

“ संदर्भ : आपले दि. ६/४/०६ चे अपिल.  उपरोक्त संदर्भिय आपले अपिल या कार्यालयास प्राप्त झाले आहे.  सदर अपिलास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. अहमदनगर यांनी माहिती उपलब्ध करुन न दिल्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी

(माध्यमिक) यांचेकडे अपिल दाखल करण्यात यावे.  तरी आपले या कार्यालयास प्राप्त झालेले अपिल निकाली काढण्यात आले असून दप्तरी दाखल करण्यात आले आहे याची नोंद घ्यावी.  शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – १"

उपसंचालकाने सूचना दिल्याप्रमाणे अपिलार्थी हे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे गेले असता अपिलार्थीच्या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या कार्यालयाने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यास अपिलार्थीस नकार दिला.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली नसून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात परत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जे या प्रकरणी जन माहिती अधिकारी होते त्यांच्याकडे प्रथम अपील करण्याचे सूचविल्याचे नमूद केले आहे.  व अशा प्रकारे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील नियमबाह्य पणे निकाली काढल्याचे आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना आजपर्यंत त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या अर्जासंदर्भात काहीही कळविले नाही.  कोणत्याही प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नाही.  जर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळेत माहिती दिली असती तर त्यांनी या संस्थेतील कर्मचा-यांच्या विरुध्द दाखल केलेल्या खटल्यामध्ये संबंधीत कर्मचा-यांना अधिकची शिक्षा दिली असती.  त्यांची पत्नी, लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर, राहुरी, येथे लिपीक

या पदावर कार्यरत आहे. त्यांच्याशी गैरवर्तन केल्या प्रकरणी शिक्षण संस्थेच्या कार्यालयातील इतर दोन लिपिकांच्या विरुध्द त्यांनी फौजदारी गुन्हा दाखल केला होता व या गुन्ह्यामध्ये संबंधितांना तालुका न्यायालयाने शिक्षा ठोठावली असून जर त्यांनी मागितलेली माहिती या न्यायालयात खटला चालू असतांना मिळाली असती तर या आरोपींना जास्तीची शिक्षा मिळू शकली असती. त्यांनी त्यांच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अर्जास कोणताही प्रतिसाद न दिल्याने व त्यांना कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांना प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी अधीक्षक वेतन व भविष्यनिर्वाह निधी पथक अहमदनगर यांच्या कार्यालयाकडून मागविली होती. अधीक्षक वेतन व भविष्यनिर्वाह निधी पथक यांच्या कार्यालयावर प्रशासकीय नियंत्रण शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे असते. अधीक्षक वेतन व भविष्यनिर्वाह निधी पथक यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती उपलब्ध करुन सादर केली होती. तथापि कार्यालयीन कामकाजामध्ये व अनावधानामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना विलंब लागला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांच्या कडे आज तयार असून ते अपिलार्थीस ती विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांना एकूण ५ मुद्यावर माहिती विचारली होती. यातील मुद्दा क्रमांक ५ मधील – “ प्रशासकीय मुख्य लिपीक यांचे अधिकार व जबाबदा-या ” ही माहिती वगळता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात, त्यांचा

खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये “माहिती” या शब्दाची व्याख्या पुढील प्रमाणे स्पष्ट केली आहे.

**कलम २ (च)**

“माहिती” याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वरील व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकारी अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिका-याची या तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात भूमिका एका विश्वस्ताची आहे. त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या माहितीचे जतन करुन ज्या स्वरुपात ती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ही माहिती अपिलार्थीस देणे, हे माहितीचा अधिकार अधिनियमानुसार त्यांचे कर्तव्य आहे. त्यामुळे अर्जदारास कोणतीही माहिती नव्याने तयार करुन देणे अथवा त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर जादाचे स्पष्टीकरण, खुलासे अथवा मतप्रदर्शन जन माहिती अधिकारी यांनी करणे या व्याख्येमध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पाहता त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मधील वर नमूद केलेला भाग वगळता उर्वरित माहिती अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार देय ठरत नाही. एवढे असूनही

जन माहिती अधिकारी यांनी आज अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांच्याकडील माहिती तयार केली असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या मागणीचा वरील परिच्छेदामध्ये माहितीसंदर्भात ऊहापोह केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात दिलेल्या प्रतिसादाचे अवलोकन करता या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल न घेऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) चा भंग केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये त्यांना संबंधितांकडून ही माहिती दिनांक १८-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध झाली होती. या माहितीबरोबर त्यांना फक्त लिपिकवर्गाची कर्तव्ये संदर्भात अपिलार्थीस माहिती कळवावयाची होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीत महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ या छापील पुस्तकाच्या पृष्ठ क्रमांक ८८ ते ९१ च्या साक्षांकीत प्रती त्यांनी अपिलार्थीस काढून देणे एवढेच काम त्यांना होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे जर जन माहिती अधिकारी यांनी नीटपणे वाचन केले असते व माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत यथायोग्य कार्यवाही केली असती तर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळू शकली असती. आज रोजी आयोगासमोर दिलेल्या स्पष्टीकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन कामकाजामुळे व अनावधानाने विलंब झाला, असे आयोगासमोर लेखी कबूल केले आहे. त्यांच्या या वर्तनावरुन माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करणे हे त्यांच्या कार्यालयीन कामकाजामध्ये समाविष्ट नाही, असे त्यांना वाटत असल्याचे दिसून येते. येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहितीचा अधिकार अधिनियमातील

तरतुदीप्रमाणे प्राप्त झालेल्या अर्जावर करावयाची कार्यवाही, विहित मुदतीत करणे हा सार्वजनिक प्राधिकरणाचा दैनंदिन कर्तव्याचा एक अविभाज्य भाग आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास भेट दिली होती. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ४ ते ५ वेळेस भेट दिल्याचे आयोगास सुनावणीत सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही व माहिती देण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विलंब लावल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे संबंधीत वेतन पथकाकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त होऊनही, त्यांनी ती अपिलार्थीस विहित मुदतीत न कळविणे म्हणजे अपिलार्थीपासून माहिती दडविणे असा होतो. अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कोणतीही कार्यवाही अथवा यासंदर्भात, कोणताही पत्रव्यवहार न करुन, स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे जे संबंधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी

अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा,

सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास पाठवावा. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी वरील आदेश क्रमांक ३ चे अनुपालन होईल असे पहावे आणि याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास ऑगस्ट २००८ पासून सदर शास्तीची रक्कम भरणा होईपर्यंत आयोगास दरमहा नियमीतपणे पाठवावा.

औरंगाबाद<br>दिनांक १६-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>राज्य माहिती आयुक्त,<br>खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश नामदेव देठ, सोनारगल्ली, मु. पो. तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२५८

निर्णय दिनांक १६-०६-२००८

श्री. विलास साहेबराव गडाख, : अपिलार्थी
रा. मौजे सुकेणे, तालुका निफाड,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सचिव, कर्मवीर काकासाहेब वाघ
शिक्षण संस्था, अमृतधाम, पंचवटी,
नाशिक – ४२२ ००३

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
खरवंदा पार्क, नाशिक विभाग, नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस मुख्य लिपीक श्री. वडघुले मधुकर रामभाऊ, नाशिक ॲड मयूर परशुराम जाधव, ॲड नरेंद्र दौलतराव सोनवणे, जन माहिती अधिकारी तथा

सचिव, कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. विलास साहेबराव गडाख व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शिक्षण संस्थेसंदर्भात सन १९७० ते २००६ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

" अ) क. का. वाघ शिक्षण संस्था, नाशिक या संस्थेच्या नियम व नियमावली ची आज पावेतो दुरुस्तीसह नक्कल मिळावी.

ब) माहे जुलै २००६ मध्ये या संस्थेच्या झालेल्या जनरल मिटींगची नक्कल मिळावी.

क) सन २००५ / २००६ साठी दिनांक ३१/३/२००६ अखेरच्या प्रसिध्द केलेल्या अहवालाची प्रत मिळावी.

ड) या संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंत या संस्थेस निफाड सहकारी साखर कारखान्याकडून मिळालेली आर्थिक मदत, देणगी, याची तारीखवार माहिती मिळावी.

ई) आजपर्यंत संस्थेत सामील असलेले सामान्य सभासद, नाममात्र सभासद, देणगीदार सभासद व आजीव सभासद यांची यादी मिळावी.

फ) संस्थेत आजीव सभासद व सामान्य सभासद होण्यासाठी करावयाच्या अर्जाच्या नमुन्याच्या प्रती मिळाव्यात. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिल्याचे

दिसून येते.  सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः दिनांक ३०-०८-२००६ रोजी हस्तांतरीत केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.  तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २८-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २९-०९-२००६ रोजी पारीत केले.  या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील, अपिलार्थीने माहिती मागितल्याचे प्रयोजन न लिहिल्यामुळे फेटाळले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या अपील निर्णयावर आपले अभिप्राय व्यक्त करुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये माहितीचे प्रयोजन लिहिण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणूनही जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या मुद्दयाचा विचार केला नाही तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३६ वर्षाची माहिती पुरविणे शक्य नाही असे त्यांचे म्हणणे कायद्याला धरुन नाही, असे म्हटले आहे.

याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये त्यांच्या निर्णयाविरुध्द कोणाकडे अपील करता येईल याचा देखील उल्लेख केला नाही त्यामुळे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती

अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० इतकी शास्ती लावण्याचे आदेशीत करण्याची आयोगास अखेरीस विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तथापि त्यांनी त्यांचे म्हणणे आयोगास त्यांच्याकडील दिनांक १६-०२-२००८ रोजीच्या फॅक्सने पाठविले असून त्यामध्ये त्यांनी पब्लिक ट्रस्ट नोंदविलेल्या शैक्षणिक संस्था या कायद्याच्या अधिपत्याखाली येते काय व त्यांनी माहिती देणे बंधनकारक आहे काय, धर्मादाय आयुक्त नाशिक यांनी दिनांक २९-०९-२००६ रोजी दिलेल्या निकालपत्रात म्हटल्याप्रमाणे माहिती कशासाठी पाहिजे हे नमूद करणे गरजेचे आहे काय, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना अद्याप पुरविण्यात आलेली नाही व ती सत्वर पुरविण्या-बाबत आदेश व्हावे व माहिती पुरविण्यामधील उशिराबाबत प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे दंड करावा, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व्यक्तिशः मागितली होती ते त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः हजर झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२००६ रोजी व्यक्तिशः अपिलार्थीस माहिती पुरविली, त्यांच्या या विधानाच्या पृष्ट्यर्थ अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यासंदर्भात अपिलार्थीची पोचसही असलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत त्यांनी आयोगास दाखविली. अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक “ड” शी संबंधीत माहिती ही ३६ वर्षे या कालावधीशी संबंधीत असल्याने याबाबतची माहिती पुरविणे अवघड होईल, असे त्यांनी अपिलार्थीस कळविले होते. अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे असे अपिलार्थीने त्यांना कळविल्यास अपिलार्थीस ते ती माहिती देण्यास तयार आहेत. ज्या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने संस्थेच्या स्थापनेपासून ते दिनांक ३१-०७-२००६

पर्यंतच्या कालावधीमध्ये संस्थेस निफाड सहकारी साखर कारखान्याकडून मिळालेली आर्थिक मदत, देणगी, यांची तारीखवार माहिती मागितली आहे. १९७० ते १९७५ च्या दरम्यान संस्थेच्या इमारतीचे बांधकाम व निफाड कारखान्याचे बांधकाम चालू असतांना दोन्ही संस्थेमध्ये काही आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार होत होते. अपिलार्थीस सदर व्यवहारासंदर्भात माहिती हवी असेल तर सदर माहिती दाखविण्यास ते तयार आहेत. मात्र संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंत निफाड साखर कारखान्याकडून कोणतीही आर्थिक मदत देणगीच्या स्वरुपात मिळालेली नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा "ई" व्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, त्यांच्या संस्थेच्या घटनेमध्ये सामान्य सभासद, नाममात्रसभासद, देणगीदार सभासद व आजीव सभासद असे भाग पाडले आहेत. तथापि अशा प्रकारचे सदस्यत्व अद्यापपर्यंत कोणासही दिले नसून संस्थेमध्ये फक्त आजीव सभासद आहेत व त्यांची यादी अपिलार्थीस ३०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. अपिलार्थी यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केली माहिती हेतूपूरःस्सर दडविण्याचा त्यांचा कोणताही हेतू नसून संस्थेच्या लेख्याशी संबंधीत कागदपत्रे व इतर अभिलेखे अपिलार्थीस पाहण्यासाठी ते कधीही उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने संबंधीत संस्थेकडे केलेल्या दिनांक ०१-०८-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक "ड" व "फ" संबंधी या अर्जासंदर्भात भूमिका स्पष्ट केली आहे. के. के. वाघ शिक्षण संस्थेस निफाड

सहकारी साखर कारखान्याकडून अद्यापपावेतो कोणतीही आर्थिक मदत देणगीच्या स्वरुपात प्राप्त झाली नाही. मात्र संस्थेचे व कारखान्याच्या इमारतीचे बांधकाम एकाच कालावधीमध्ये चालू असतांना काही आर्थिक व्यवहार या दोन्ही संस्थेमध्ये चालू होते व सदर व्यवहाराची तपासणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्व लेखे, नोंदवह्या (कॅशबूक) अपिलार्थीस दाखविण्यास जन माहिती अधिकारी यांची तयारी आहे, तसेच या शिक्षण संस्थेच्या घटनेमध्ये जरी सामान्य सभासद, नाममात्र सभासद, देणगीदार सभासद व आजीव सभासद अशा प्रकारच्या सभासदांच्या नोंदणीची तरतूद असली तरी संस्थेने आजपावेतो सर्वांना आजीव सभासदत्व दिले आहे व त्यांची यादी अपिलार्थीस पुरविली आहे, हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून योग्य माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. फक्त या माहितीसंदर्भात त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती देणे गरजेचे आहे, जेणेकरुन अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळू शकेल. त्यांना आता अपिलार्थीस ही पुरवणी माहिती विनामूल्य पुरवावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. उपरोक्त प्रकरणी सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केल्याचे पत्र आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये उपलब्ध नाही. आयोगाच्या मते सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे फक्त त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहितीकरिता जन अपिलीय अधिकारी म्हणून काम करु शकतात. त्यांच्या कार्यालयातील कार्यालय अधीक्षक हे जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले आहेत त्यामुळे त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिल्या गेलेल्या माहितीवरच माहिती अधिकार अधिनियमातील प्रथम अपिलावर ते निर्णय देण्यास सक्षम आहेत, हे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत

आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस माहिती मागण्यासाठी माहितीच्या प्रयोजनाचा उल्लेख त्यांच्या अर्जामध्ये करण्याचे जरुरीचे आहे किंवा कसे याची विचारणा केली आहे. याबाबतीत असे स्पष्ट करण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (२) प्रमाणे अपिलार्थीस माहिती अधिकार अधियिमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिका-याकडे माहिती मागतांना या संदर्भातील कारणे नमूद करण्याची आवश्यकता नाही, हे पाहता व मूळात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयावर आयोग कोणतेही अभिप्राय व्यक्त करत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून हेतूपूरःस्सर कोणतीही माहिती लपविल्याचे अथवा असद्‌हेतूने टाळाटाळ केल्याचे दिसून न आल्याने त्यांच्यावर कारवाई बाबत कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात असे दिसून येते की, या संस्थेने त्यांच्या संस्थेच्या कार्यालया-करिता जन अपिलीय अधिकारी यांची अद्यापही नेमणूक केली नाही. सबब संस्थेच्या अध्यक्षांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे त्यांच्या कार्यालयाकरिता जन अपिलीय अधिका-याची नेमणूक त्वरीत करावी.

वरील विवेचनावरुन, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आता फक्त त्यांच्या मूळ माहितीपैकी पूरक स्वरुपाची उर्वरित अशी माहिती देणे बाकी आहे, ही माहिती त्यांना विनामूल्य देण्यास जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन खालील प्रमाणे आदेश

देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "ड" व "ई" शी संदर्भातील उर्वरित पूरक स्वरुपाची माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अध्यक्ष के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक यांनी त्याच्या संस्थेकरिता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांची नेमणूक हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी.

औरंगाबाद
दिनांक १६-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विलास साहेबराव गडाख, रा. मौजे सुकेणे, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.
२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था, अमृतधाम, पंचवटी, नाशिक – ४२२ ००३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, खरवंदा पार्क, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ अध्यक्ष, कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था, अमृतधाम, पंचवटी, नाशिक – ४२२ ००३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२५९

निर्णय दिनांक १६-०६-२००८

श्री. प्रेमचंद रुपचंद सुरवाडे, : अपिलार्थी
मु. खंडाळा, पो. मोंढाळा, ता. भुसावळ,
जि. जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तालुका कृषि कार्यालय,

अंमळनेर, जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप विभागीय कृषि अधिकारी,

अंमळनेर, जिल्हा जळगाव

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंमळनेर, जिल्हा जळगाव |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी अंमळनेर, जिल्हा जळगाव |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. दिलीप गणपत महाजन, जन माहिती

अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंमळनेर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दौलत भिका पाटील, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. प्रेमचंद रुपचंद सुरवाडे व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी अंमळनेर हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत केल्या गेलेल्या रो. ह. यो. च्या कामाची सन २००६ ते २००७ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> “ रोजगार हमी योजना - आपल्या अमळनेर तालुका कृषि विभागा-अंतर्गत तालुक्यातील माखळ, पांतोडा या मंडळात रोजगार हमीचे कामे कोणकोणत्या गावात व कोणत्या शेतक-यांच्या शेतात माती बांध असल्यास कोणत्या गावी कोणत्या शेतक-याच्या शेताजवळ गावाचे व शेतक-याचे नांव पत्ता मंडळ निहाय व गट नंबरसह तसेच सदर मातीबांध किंवा शेततळ्याचे खोदकाम कोणत्या गावच्या मजूरांकडून केले त्याचे नांव पत्ता कोणत्या मंडळात किती कोणत्या सुपरवायझरच्या अधिपत्याखाली व कोणत्या मंडळ अधिकारी मंडळात त्याचे नांव तसेच मजुरांना कशा स्वरुपात ही कामे दिली गेली (उक्त, घनमिटर, मिटर, रनिंग मिटर) सर्व तालुक्यात एकूण किती कामे केली व किती रुपये फंड खर्च केला तसेच किती कामे पूर्ण व किती अपूर्ण आहेत. अपूर्ण कामाचा फंड उचलला आहे का ? तसेच मजुरांनी सह्या केलेल्या रोजच्या हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स तसेच प्रत्येक मंडळातील केलेल्या कामाच्या एम. वि. रेकॉर्डच्या झेरॉक्स प्रती मंडळनिहाय द्याव्या. तसेच आपण सदर कामाच्या साईटवर कोणकोणत्या सुविधा पुरविल्या आहे का ?

असल्यास नमुद करावे तसेच या कामावर धान्य होते का ? असल्यास तालुक्यातील प्रत्येक मंडळातील कामनिहाय किती धान्य दिले गेले तसे नमुद करावे. तसेच तालुक्यातील कोणत्या मंडळात दगडी बांध केले गेले व कुठे ? एरियाचे व शेतक-याचे नांव नमुद करावे व मजुरांना ते कशा स्वरुपात मजुरी दिली गेली (उक्त, घनमिटर, मिटर, रनिंग मिटर) त्यांची नांवे पत्ता व सह्या केलेल्या रोजच्या हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती व एम. बी. च्या (रेकॉर्ड) झेरॉक्स प्रती द्याव्या. तसेच तालुक्यात आतापर्यत किती रुपये या योजनेवर खर्च झाला. होणार आहे ते नमूद करावे. मंडळनिहाय तसेच वर नमुद केलेली माहिती ही मंडळनिहाय शेततळे व मातीबांध, दगडी बांध यांची नमुद करावी व माहिती द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०९-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी अंदाजे ८ ते १० हजार रुपयापर्यत खर्च येण्याची शक्यता आहे असे कळवून अपिलार्थीस, त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे ही माहिती पुरविण्यासाठी अडचणी येणार असल्याच्या शक्यतेचे विवेचन केले आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील काही प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अपिलार्थीने उपविभागीय कृषि अधिकारी, उपविभाग अंमळनेर यांच्याकडे केल्याचे दिसून येत आहे. उपरोक्त प्रकरणी उपविभागीय कृषि अधिकारी हे अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-१०-

२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस या प्रकरणी संबंधीत तालुका कृषि अधिकारी हे जन अपिलीय अधिकारी असल्याचे अवगत करुन, त्यांच्या कार्यालयाशी त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात संपर्क साधण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने संबंधीत जन अपिलीय अधिकारी (तालुका कृषि अधिकारी अंमळनेर) यांच्या कार्यालयाशी कोणताही संपर्क न साधता सरळ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना उडवाउडवीची उत्तरे व दिशाभूल करणारी उत्तरे दिली गेली व जन अपिलीय अधिकारी यांचा पत्ता व दिनांक न दिल्याने ते आयोगाकडे हे व्दितीय अपील दाखल करीत आहेत असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

मध्यंतरीच्या कालावधीमध्ये दिनांक ३०-१०-२००६ रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून सदर माहितीच्या एकूण १०,६८४ पृष्ठांच्या माहितीपृष्ठ्यर्थ त्यांना रुपये २१,३६८ इतकी रक्कम त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि यावरही अपिलार्थीने कोणतीही कारवाई केली नसल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप विस्तृत प्रमाणात होते त्यामुळे सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना त्यांच्या कार्यालयातील साधन-सामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती, त्यामुळे सर्व प्रथम त्यांनी अपिलार्थीस

त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्तीची कल्पना दिली व दिनांक ३०-०१-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांना द्याव्या लागणा-या माहितीची पृष्ठ संख्या व रक्कम कळविली. यानंतर अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे विस्तृत प्रमाणात होते. अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना निश्चितपणे त्यांच्याकडील साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती. एवढे असूनही त्यांनी दिनांक ३०-१०-२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती तयार करुन ठेवली होती. त्यामुळे ते अपिलार्थीस निश्चित पृष्ठांची संख्या व माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना भरावे लागणारे शुल्क हे अपिलार्थीस कळवू शकले. आज रोजी त्यांनी अपिलार्थीस द्यावी लागणारी प्रस्तावित माहिती आयोगास दाखविली. यावरुनही अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड प्रमाणात होती याची आयोगास खात्री वाटते. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य त्या अपिलीय प्राधिकरणाचे नांव कळवूनही अपिलार्थीने त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर प्रथम अपील केले नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. सदर अर्जावर सुनावणी घेण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला आहे. सदर कालावधी व्यपगत झाला असला तरी या अपिलावर प्रथम सुनावणी घेणे गरजेचे असल्याचे आयोगास आवश्यक वाटत असल्याने या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच ३०

दिवसाच्या आत प्रथम सुनावणी घेऊन आपला निर्णय त्वरीत पारीत करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रथम अपिलावर निर्णय घेण्यासाठी लागणारा संभाव्य विलंब क्षमापित करण्यात येत आहे. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक ०७-१०-२००६ रोजीचा अपील अर्ज हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०७-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत निर्णय घ्यावा.

औरंगाबाद<br>
दिनांक १६-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रेमचंद रुपचंद सुरवाडे, मु. खंडाळा, पो. मोंढाळा, ता. भुसावळ, जि. जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंमळनेर, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी अंमळनेर, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२६०

निर्णय दिनांक : १७.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शशिकांत पेमराज चंगेडे,<br>अहमदनगर | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>जागतिक बँक प्रकल्प विभाग,<br>पुणे.<br>२ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>पुणे. | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. विलास अच्युतराव डांगे, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, पुणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. विवेक रामचंद्र नाईक, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,पुणे (यापुढे त्यांना जन अपिलीय

अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. शशिकांत पेमराज चंगेडे (यापुढे त्यांना अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १३.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-२००६ या कालावधीतील शिरुर-पुणे रस्ता बांधकामासंदर्भात खालीलप्रमाणे एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितली होती.

" १) ठेकेदारास अंशतः पुर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर राहिलेली कामे किती दिवसात पूर्ण करावयाची आहेत व याबाबत निविदा व कॉट्रक्ट (करार) मध्ये काय तरतुद आहे त्याची माहिती द्यावी.

२) निविदा/करारामध्ये टोल वसूलीसंबंधी व टोलवसूली नोंदी तपासण्याबाबत काय तरतुद आहे त्याची माहिती द्यावी.

३) निविदा/करारमध्ये टोल लेव्हल किती ठेवण्यात आली आहे. त्याची माहिती द्यावी.

४) टोल लेव्हल वाढविण्यात आली नाही तरी टोल वसूलीचे काम दोन्ही नाक्यावर कोणत्या आदेशानुसार चालू आहे, त्याची माहिती द्यावी व सदर आदेशाची प्रत द्यावी.

५) टोल नाक्यावर होणाऱ्या वसुलीचे अहवाल जागतिक बँक प्रकल्प ऑफीसवर द्यावयाचे आहेत परंतु हे अहवाल न देणे व टोल वसुलीची तपासणी न करण्याविषयी कोणाचे आदेश आहेत त्याची माहिती द्यावी व याबाबत तपासणी अहवाल का उपलब्ध नाहीत याची माहिती द्यावी.

६) टोल नाके निवेदेमधील तरतुदीनुसार आहेत या संदर्भात यावरील कार्यालयीन टिपण्या का उपलब्ध नाहीत याची माहिती द्यावी.

७) क्रस्ट थिकनेस अथवा रस्ता बांधकामातील उणीवा संदर्भात आपणाकडून कोणाकडे तक्रार करण्यात आली त्याची माहिती द्यावी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर रस्त्याची बांधकाम पाहणी करण्यात आली काय त्याची माहिती द्यावी आपल्या खात्यातर्फे या संदर्भात बांधकाम विभागाशी काय पत्रव्यवहार झाला याची माहिती द्यावी.

८) सदर रस्त्यावर पार्किंग लॉटस् ४ ऑक्टोबर, २००६ पर्यंत बांधण्यात आले नाही, याबाबत आपल्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराची व त्यावरील टिपणीची माहिती द्यावी.

९) पूल संपल्यावर ५० मीटर सरळ लांबी असावी अशी निविदेमध्ये तरतुद असतांना भीमा पुलावरील नगर बाजूस केवळ ३५ मीटर ठेवण्यात आला आहे. सदर बाबीमध्ये जो नियमभंग झाला याची जबाबदारी कोणाची त्यांची माहिती द्यावी व त्यासंदर्भात आपल्या कार्यालयाकडून केलेल्या पत्रव्यवहाराची व कार्यालयीन टिपणीची माहिती द्यावी.

१०) रस्त्याच्या कडेची १०४८ झाडे पुनर्स्थापित केली त्यांच्या लोकेशनची माहिती द्यावी.

११) वाहनाची डेन्सिटी ४०४९२ पी सी यु ही कोणत्या महिन्यातील कोणत्या वर्षातील आहे, याची माहिती द्यावी.

१२) आपल्या खात्याकडील रस्ता बांधकामाच्य नियमानुसार रस्त्याच्या मध्यापासून किती अंतरापर्यंत मोकळी जागा/अतिक्रमण विरहित असावी याची माहिती द्यावी व त्याची सत्यप्रत द्यावी.

१३) सदर रस्त्यासंदर्भात सर्व न्यायालयीन दाव्याच्या सत्यप्रती द्याव्यात तसेच सदर दावे कोणत्या न्यायालयात आहेत व खात्यातर्फे कोण वकील आहेत त्याची नावे व पत्ते द्यावीत."

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १६.१०.२००६ रोजी प्राप्त झालेला आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यापोटीचे शुल्क रु.३१०/- इतके त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि. २१.११.२००६ रोजी सदर शुल्क भरल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. २९.११.२००६ रोजी माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३०.११.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.१२.२००६ रोजी सुनावणी घेतली व या संदर्भातील आपले आदेश दि. ११.१.२००७ रोजी पारित केले. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा माहितीचा अर्ज हा स्वतंत्रपणे असल्याने त्यातील सर्व मुद्यांवर वेगळयाने माहिती देण्याची कार्यवाही माहिती अधिकारी यांनी तात्काळ करावी असे आदेश दिले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०१.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती व अपिलीय

अधिकारी यांनी त्यांना योग्य न्याय दिला नसल्याचे नमुद करुन, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यांनी त्यांचा लेखी युक्तीवाद दि. १७.०६.२००८ रोजीच्या त्यांच्या फॅक्सद्वारे आयोगाकडे पाठविला आहे. या लेखी युक्तीवादामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये १३ मुद्यांबाबत माहितीची मागणी लिखित दस्तावेज या स्वरुपात केली होती, तथापि सदर माहिती लिखित देण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या १ ते ४ मुद्यांवर उत्तरे दिली आहेत,याचा अर्थ माहिती देण्यास त्यांनी टाळाटाळ केली , माहिती देण्यास अप्रत्यक्ष नकार दिला व माहिती प्राप्त होण्यापासून त्यांना वंचित ठेवून सदर ठेकेदार यांना पाठीशी घातले आहे. या युक्तीवादामध्ये पुढे असे म्हटले आहे की, मुद्दा क्र.५ बाबत टोल वसुली तपासणी अहवाल उपलब्ध नाही, असे खोटे, दिशाभुल करणारे विधान जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केले आहे.ही माहिती देण्यापूर्वी त्यांनी कंत्राटदार यांनी सदर अहवाल सादर केले नाही,अशी माहिती दिली होती. मुद्दा क्र ६ बाबत टोलनाका निविदेमधील तरतुदीनुसार आहेत, याबाबत कार्यालयात टिपणी का उपलब्ध नाही, याबाबत सदर टिपण्या का करण्यात आल्या नाहीत, केल्या असल्यास त्या गहाळ झाल्या तर कोठे तक्रार करण्यात आली,असे प्रश्न उपस्थित होतात. परंतु माहिती अधिकारी यांच्याकडून ‘ माहिती उपलब्ध नाही’,असे परवलीचे उत्तर प्राप्त झाले आहे. मुद्दा क्र.७ बाबत रस्ता बांधकामातील उणिवासंदर्भात पहाणी सार्वजनिक बांधकाम विभागाची होती. याबाबत त्यांनी ही माहिती दडवण्याचा प्रयत्न केला आहे, तसेच मुद्दा क्र. ८ बाबतही पार्कींग लॉटस् ४.१०.२००६ पर्यंत कंत्राटदाराने केले नाहीत, त्याबाबत खात्याकडून स्वतंत्र टिपणी केली नाही , याबाबत

अत्यंत बेजबाबदार,मुर्खपणाची उत्तरे देऊन पूर्ण खात्याची लाज वेशीवर टांगलेली आहे.मुद्दा क्र.९ च्या बाबतही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उध्दट उत्तरे प्राप्त झाली आहेत. या पूलावरील काही काम २००८ मधील एप्रिल-मे मध्ये झाले आहे व इतर काम बाकी आहे. भूसंपादनाअभावी काहीच काम केले नाही. मुद्दा क्र.१२ च्या संदर्भात या रस्त्यावर या दृष्टीने काहीच केले नाही. म्हणून निश्चित उत्तर देता येत नाही, अशी चुकीची माहिती दिली आहे." त्यामुळे त्यांनी मागणी केलेल्या माहितीची कागदपत्रे देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेश द्यावेत, तसेच कंत्राटदाराकडून प्राप्त करुन घ्यावयाची कागदपत्रे देखिल संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अद्याप दिली नाहीत, ती देण्यात येऊन संबंधित दोषी व्यक्तींना नियमानुसार शास्ती लावावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. १३.१०.२००६ रोजीच्या अर्जास (जो त्यांच्याकडे दि. १६.१०.२००६ रोजी प्रत्यक्षपणे प्राप्त झाला) अनुसरुन अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस सदर माहिती दि. २९.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. यापैकी अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस दि. ७.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली होती, त्यामुळे त्या माहितीची द्विरुक्ती अपिलार्थीस दिलेल्या या पत्रामध्ये त्यांनी केली नाही.

मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात अपिलार्थीस शासनाची प्रचलित अधिसूचनेची प्रत दिलेली आहे.

मुद्दा क्र. ५ च्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले आहे की, टोल वसूली तपासणीची तरतुद कंत्राटदाराबरोबर केलेल्या करारामध्ये

नसल्याने, टोल वसूली तपासणी त्यांचे कार्यालयाकडून केली जात नाही. मात्र कंत्राटदाराकडून टोल नाक्यावर होणाऱ्या वसूलीचा अहवाल त्यांच्या कार्यालयाकडे कंत्राटदाराकडून नियमितपणे प्राप्त होत असतात.कंत्राटदाराने आतापर्यंत त्यांच्याकडे सादर केलेल्या टोलनाक्याच्या अहवालाची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे. अपिलार्थीने मागितलेल्या २००५-२००६ या कालावधीतील कंत्राटदाराने सादर केलेल्या अहवालाच्या या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्याचे त्यांनी मान्य केले.

मुद्दा क्र. ६ च्या संदर्भात अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या टिपण्या त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाहीत, असे त्यांनी सांगितले. या संदर्भात त्यांनी असे स्पष्ट केले की, सुरुवातीला निविदेत कंत्राटदाराने एकच टोलनाका प्रस्तावित केला होता, त्यानंतर निविदापूर्व बैठकीत ठरल्याप्रमाणे, शासनाकडून मान्यता घेऊन एकूण दोन टोलनाकी बसविण्यात आली, त्यामध्ये एक टोलनाक्यावर कराची रक्कम स्वीकारली जाते तर दुसऱ्या टोलनाक्यावर वाहन चालकाने कर भरला आहे किंवा कसे याची तपासणी केली जाते, त्याचे स्वरुप चेक पोस्ट सारखेच आहे. दोन्ही टोलनाकी शासनाच्या मान्यतेनंतरच बसविण्यात आली आहेत.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ७ संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती बरोबर आहे.

मुद्दा क्र. ८ च्या संदर्भात कंत्राटदाराशी पत्रव्यवहार चालू आहे. या मुद्यावर त्यांनी कार्यालयीन कोणतीही टिपणी तयार केली नाही वअपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ९ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस योग्य ती माहिती दिली आहे.

मुद्दा क्र. १२ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली असून ती पूर्णतः सत्य आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलाथीस त्यांच्या मुद्दा क्र. १,२ व ३ मध्ये स्पष्टपणे अलाहिदा माहिती देणे आवश्यक होते तथापि त्यांनी तसे केले नसल्याने, या मुद्याची नोंद घेऊन त्यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.११.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २६.१२.२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ११.१.२००७ रोजी पारित केले आहेत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा कोणताही उद्देश नाही. या प्रकरणासंदर्भात अपिलार्थी यांनी याच कामाशी संबंधित माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली केलेल्या वेगवेगळ्या अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस विस्तृत प्रमाणात माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंचा युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी एकूण १३ मुद्यांवर माहिती विचारली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे बहुतांश प्रश्नार्थक असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांना पूर्वीच दि. ७.८.२००६ रोजी पुरविल्याचे कळविण्यात आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रत्येक अर्जावर अर्जनिहाय स्वतंत्रपणे कार्यवाही करणे हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी, जरी अपिलार्थीस ही माहिती दुसऱ्या संदर्भाद्वारे दिली असली

तरीही आता ही माहिती त्यांना नव्याने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती आयोगास योग्य वाटते. मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात असे दिसून येते की, अपिलार्थीने टोल वसूलीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांना मागितला आहे व तो का उपलब्ध नाही, याची माहिती विचारली आहे. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने प्रश्न विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी उत्तर देणे, अशाप्रकारचा पत्रव्यवहार अपेक्षित नाही. मूळातच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मुद्दा क्र. ५ द्वारे विचारलेली काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा अपेक्षित करणारी असल्याचे दिसून येते. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. मात्र टोलनाक्यावर वाहनकर वसूलीचे अहवाल जन माहिती अधिकारी यांना कंत्राटदाराकडून प्राप्त होत असून ती माहिती त्यांनी अपिलार्थीस आता देणे त्यांना भाग आहे. टोल वसूलीची तपासणी करण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी व कंत्राटदार यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यामध्ये कोणत्याही प्रकारची अट नसल्याने अशा प्रकारची अपिलार्थीस अपेक्षित असलेली टोलनाक्याची तपासणी केली जात नाही, ही जन माहिती अधिकारी यांची माहिती वस्तुस्थितीवर आधारीत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.६ बाबत अपिलार्थीने टोलनाक्याच्या स्थाननिश्चितीबाबत कार्यालयीन टिपणीची जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केली आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या टिपण्या मूलतः जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरील कार्यालयामध्ये तयार केल्या जात नाहीत, त्यांच्याकडून फक्त या संदर्भात मूळ प्रस्ताव तयार केला जातो व या प्रस्तावाची छाननी अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता यांच्या स्तरावर होऊन त्यांचे

कार्यालयात कार्यकारी अभियंता यांच्या प्रस्तावावर टिपण्या तयार होऊन त्यावर निर्णय घेतले जातात, त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे सर्वसाधारण परिस्थितीत संभवत नाही. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांचे वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवून, त्यांना अपिलार्थीस टिपणीसंदर्भात माहिती देण्याची विनंती करुन, त्याची प्रत अपिलार्थीस देणे, या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील ६(३)(i) प्रमाणे अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ७ च्या संदर्भात रस्त्याचे बांधकाम चालू असतांना वरिष्ठांनी रस्त्याची पहाणी करुन त्यावर आपली टिपणी जारी केली असल्यास त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे अपिलार्थीस अभिप्रेत आहे. या मुद्याद्वारे वरिष्ठांनी या कामासंदर्भात जारी केलेल्या निरिक्षण टिपण्यांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस द्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचा याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाशी काय पत्रव्यवहार झाला, याची मागणी केली आहे. वास्तविकतः जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय हे सार्वजनिक बांधकाम विभाग या सार्वजनिक प्राधिकरणाचा एक भाग आहे, त्यामुळे अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे, याचा अर्थबोध होत नाही. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्यातील मुद्दा क्र.८ द्वारे अपिलार्थीस पार्कींग लॉटस् संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठांकडे सादर केलेले प्रस्ताव/पत्रव्यवहार व कंत्राटदारासमवेत केलेला पत्रव्यवहार आवश्यक होता. येथे देखिल जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे या विषयावर उपलब्ध असलेल्या सर्व पत्रव्यवहाराची माहिती अपिलार्थीस आता

विनामूल्य द्यावी लागेल आणि टिपणीबाबत सर्व टिपणीच्या प्रती अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन त्या अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. अशाच प्रकारचा युक्तीवाद मुद्दा क्र. ९ ला लागू आहे.या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, पूल संपल्यानंतर ५० मिटर सरळ रस्ता असावा, असे आय.आर.सी.मध्ये तरतुद असली तरी ती निविदेमध्ये आवश्यक ती जमीन शासनाच्या ताब्यात येईल या अपेक्षेने केली होती. तथापि अपेक्षित लांबीची जमीन त्यांना संबंधित जमीन मालकांकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी ३५ मीटर लांबी सरळ ठेवलेली आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूस स्मशानभूमी, मंदिर इ.बांधकामे असल्यामुळे त्यांना त्यांच्या अधिकार कक्षेमध्ये तांत्रिक बाबींमध्ये थोडीशी तडजोड करावी लागली. कंत्राटदाराबरोबर झालेल्या करारानाम्यामध्ये ही लांबी १५ मीटर इतकी दर्शविली आहे व कंत्राटदाराने करारनाम्यामधील तरतुदीनुसार काम केले आहे. त्यामुळे या प्रकरणी कोणावर जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्नच येत नाही. आय.आर.सी.मधील तरतुदी या मार्गदर्शक स्वरुपाच्या असून, या प्रकरणामध्ये, उपलब्ध जागेच्या आकारमानानुसार खात्याने प्रत्यक्ष काम केल्याचे दिसून येते. येथे असे लक्षात घेतले पाहिजे की, जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय हे प्रस्ताव तयार करणारे कार्यालय आहे. त्यांचे कार्यालयामार्फत सर्वसाधारण परिस्थितीमध्ये कोणत्याही प्रकारच्या टिपणी उपलब्ध असू शकत नाहीत. मात्र या प्रस्तावाची छाननी अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता यांचे स्तरावर होत असतांना, त्यांचे कार्यालयामध्ये अशाप्रकारच्या प्रस्तावाची छाननी करुन त्यावर टिपण्या केल्या जातात. या प्रकरणी अपिलार्थी यांनी ज्या-ज्या मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांचेकडून टिपणीच्या प्रतींची मागणी केली आहे,

ती बहुतेक सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे उपलब्ध असणे अपेक्षित आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सुरुवातीसच जर अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविली असती तर अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या टिपणीच्या प्रती त्यांना एव्हाना मिळू शकल्या असत्या. जी माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध नाही, परंतु त्यांच्या प्राधिकरणाचा एक भाग असलेल्या दुसऱ्या कार्यालयात उपलब्ध असली तर अशा प्रकरणात काय कार्यवाही करावयाची याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(i) मध्ये नमुद केलेले आहे.परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अर्थात, अपिलार्थीने मागणी केलेल्या टिपणीच्या प्रती ज्या वरिष्ठ कार्यालयात उपलब्ध आहेत, त्याच्या प्रती त्यांच्याकडून मागवून घेऊन त्या अपिलार्थीस आता त्यांना विनामूल्य पुरविणे भाग आहे. आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये वरिष्ठ कार्यालयाकडून अर्जातील सर्व मुद्यांशी संबंधित अशा प्रकारच्या टिपण्या प्राप्त करुन घेऊन, त्यांच्या प्रती अपिलार्थीस २० दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १२ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस बरोबर दिली आहे, असे आयोगाचे मत आहे. मुद्दा क्र.१३ संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पूर्वीच माहिती दिलेली आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित सर्व माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच २० दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्हेतुने टाळाटाळ केल्याचे अथवा

हेतुपूरःस्सर माहिती दडविल्याचे निःसंशयपणे आढळून न आल्याने त्यांच्यावर कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत. मात्र अपिलार्थीने आज आयोगासमोर सादर केलेल्या लेखी युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी "मुर्खपणाचे उत्तर प्राप्त झाले असल्याचे व पूर्ण खात्याची लाज वेशीवर टांगली असल्याचे" म्हटले आहे. या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी येथून पुढे सार्वजनिक प्राधिकरणाबरोबर होणाऱ्या पत्रव्यवहारावर अशाप्रकारचे अभिप्राय देण्याचे टाळावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच २० दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शशिकांत पेमराज चंगेडे, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जागतिक बँक प्रकल्प विभाग,पुणे-४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मध्यवर्ती इमारत, बी.जे.रोड,पुणे,रेल्वेस्टेशनजवळ पुणे-४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२६१

निर्णय दिनांक : १७.०६.२००८

१ श्री. शेख हुसेन शेख मोहंमद, : अपीलार्थी

रा. ता.मालेगाव जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालय,
जिल्हा परिषद, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे कार्यालय, जि.प.नाशिक

त्रयस्थ पक्षः श्री. अन्सारी मोहमंद मोहमंद हनीफ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. दिनकर तबाजी टेमकर,जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ), त्रयस्थ पक्ष हे श्री. अन्सारी मोहमद मोहंमद हनीफ

(यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. शेख हुसेन शेख मोहंमद (यापुढे त्यांना अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १७.०८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षासंबंधी सन १९८८-१९९४ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " सन १९८८ ते १९९४ या कालावधीत स्वीस प्राथमिक शाळा, मालेगाव यांचे मुख्याध्यापक श्री. अन्सारी मोहंमद एम.एच. यांनी घेतलेल्या वेतनाची वर्षनिहाय माहिती मिळणेस विनंती आहे."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती. सदर अर्जात अपिलार्थी यांनी ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमुद केले आहे.

अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.३१.०८.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना अपेक्षित असलेली माहिती त्यांनी प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, मालेगाव महानगरपालिका यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी, असे कळविले व सदर पत्राची प्रत मनपा शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी यांना दिली.

जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.०९.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दि.

२२.९.२००६ रोजी प्राप्त झाला.या अर्जास अनुसरुन जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नाशिक यांनी दि. २८.९.२००६ अन्वये परत प्रशासन अधिकारी महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दोन दिवसात देण्याचे सूचित केले व त्याची प्रत अपिलार्थीस पाठविली.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.११.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितांवर शास्ती लावण्याची विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यांनी आपला युक्तीवाद शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांच्यामार्फत त्यांच्याकडील दि. १४.६.२००८ रोजीच्या शिक्षणाधिकारी यांना उद्देशून दिलेल्या पत्राद्वारे सादर केला आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील चुकीने केले असल्याचे म्हटले असून, सदर अपील अर्ज मागे घेत असल्याचे त्यांनी शिक्षणाधिकारी यांना अवगत केले आहे. अपिलार्थीने जरी शिक्षणाधिकारी यांच्याकडे असा अर्ज केला असला तरी, अपिलार्थीचा अशाप्रकारचा अर्ज आयोगाकडे प्राप्त झाला नाही, त्यामुळे ही सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने स्वीस प्राथमिक शाळा, मालेगावच्या मुख्याध्यापक यांच्या वेतनाची वर्षनिहाय माहिती मागितली होती, स्वीस प्राथमिक शाळेवर शिक्षण मंडळ,

महानगर पालिका, मालेगाव यांचे नियंत्रण आहे व सदर शाळेचे मुख्याध्यापक हे सदर शाळेचे माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांचेकडे दि. २१.८.२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर शिक्षण मंडळाच्या जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांचेकडील दि. ३१.८.२००६ व २८.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले होते. त्याप्रमाणे अपिलार्थीस सदर माहिती स्वीस शाळेच्या मुख्याध्यापकाने साक्षांकित करुन त्यांच्याकडील दि. ९.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस दि. १६.११.२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थी यांनी त्यावर सही केली आहे. तसेच याच माहितीची दुसरी प्रत त्यांनी अपिलार्थीस दि. १०.६.२००८ रोजी पुरविली आहे.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांचा युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीसाठी चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथम अर्ज व अपील केले आहे. त्यासंदर्भात संबंधितांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना ज्या प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेता येईल, त्या प्राधिकरणाकडे म्हणजे प्रशासकीय अधिकारी, मालेगाव महानगर पालिका शिक्षण मंडळाकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडील दि. ३१.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविला आहे व अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीस संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांनी त्यांच्याकडील दि. ९.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस संपूर्ण माहिती

पुरविली. अपिलार्थीने मूलतः चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथम माहितीचा अर्ज व प्रथम अपील अर्ज दाखल केला असल्याने, अपिलार्थीस आता जरी संबंधितांकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली, तरी त्यास ते स्वतःच जबाबदार ठरत आहेत. हे पाहता व अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नाशिक यांना दिलेल्या दि. १४.६.२००८ रोजीचे पत्र पाहता अपिलार्थीस आता पूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे व अपिलार्थीस आता आयोगाकडे केलेले द्वितीय अपील मागे घेण्याची इच्छा असल्याचे दिसून येते. ही वस्तुस्थिती पाहता त्यांनी आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख हुसेन शेख मोहंमद, रा. ता.मालेगाव जि.नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालय, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२६३

निर्णय दिनांक : १७.०६.२००८

१ श्री. कानिफ मारुती माने, अहमदनगर : अपीलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी, अहमदनगर : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी, तथा निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर

त्रयस्थ पक्षः १) श्री. हिरामन भाऊसाहेब काळे

२) श्री. रविंद्र सुखदेव काळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. संभाजी नानाभाऊ साळे, जन माहिती अधिकारी तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी, अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ),अपिलार्थी श्री. कनिफ मारुती माने (यापुढे

त्यांना अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), व त्रयस्थ पक्ष श्री. हिरामन भाऊसाहेब काळे, श्री. रविंद्र सुखदेव काळे, (यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २२.०८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-२००६ या कालावधीतील रविंद्र सुखदेव काळे यांच्यावर भरली गेलेली चॅप्टर केस क्र. १३९३/२००५ अहमदनगर संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " चॅप्टर केस नं. १३९३/२००५ अ.नगर हि.काळे व रविंद्र सुखदेव काळे या दोन आरोपी होते परंतू आपण हिरामन भाऊसाहेब काळे व सुकाळे यांच्यावर चॅप्टर चालवली सुकाळे यांच्यावर कोनत्या निअमाखाली चॅप्टर चालवली व रविंद्र सुखदेव काळे यांच्यावर कुठल्या ही प्रकारची चॅप्टर केस केली नसुन रविंद्र सुखदेव काळे यांच्या वरील केस निकाली कसी व का काढली आपल्या चॅप्टर हजेरीत सहीत रविंद्र सुखदेव काळे हा उल्लेख नाही तरी आपण माहीती अधीकार निअमात निअमानुसार खरी माहिती दयावी."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१५.०९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना व्यक्तीशः हस्तांतरित केली.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम

१९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २९.०९.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दि. ०६.११.२००६ रोजी पारित करुन अपिलार्थीचे प्रथम अपील, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याने, फेटाळून लावले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०१.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, सादर केलेल्या अपील अर्जाचे नीटपणे वाचन न करता जन अपिलीय यांनी खोटानाटा निकाल दिल्याचे, नमुद केले आहे. त्यांची कागदपत्रे पूर्णपणे सत्य असतांनासुध्दा त्यांना न्याय मिळाला नाही, म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे अपील सादर केले असल्याचा त्यांनी या अपील अर्जामध्ये उल्लेख केलेला आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपील अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, श्री. हिरामण भाऊसाहेब काळे व श्री. रविंद्र सुखदेव काळे या दोघांच्यावरही चॅप्टर केस चालविण्यात आली, त्यावेळी हजेरी घेतांना दोघांनीही सहया केल्या असून त्यामध्ये रविंद्र सुखदेव काळे यांनी त्यांची सही ‘सुकाळे’ या नावासदृश्य केली असल्याचे दिसून येते , त्यामुळे अपिलार्थीने सुकाळे या व्यक्तीवर चॅप्टर केस

चालविली आहे, असा अंदाज केला, परंतु सुकाळे या नावाच्या व्यक्तीवर चॅप्टर केस चालविली गेली नाही, ही वस्तुस्थिती आहे व त्यामुळे त्यांनी त्यांच्याकडील दि. १५.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले आहे. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस व्यक्तीशः हस्तांतरित केले असून सदर पत्र मिळाल्याप्रित्यर्थ त्यांची पोचसही असलेल्या पत्राची प्रत त्यांनी आयोगास सादर केली, यावरुन अपिलार्थीस सदर माहिती दि. २७.९.२००६ रोजी मिळाल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे प्रश्नार्थक असे आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांना असे विचारले आहे की, आपल्या चॅप्टर हजेरीच्या सहीमध्ये रविंद्र सुखदेव काळे हा उल्लेख नाही, तर जन माहिती अधिकारी यांच्या मते रविंद्र सुखदेव काळे यांची सही 'सुकाळे' असल्यासारखी दिसते. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तीवादामध्ये तथ्यांश आहे याचबरोबर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे, जी खालीलप्रमाणे आहे.

**'माहिती' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये**

**सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.**

वरील व्याख्येचे अवलोकन करता, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती अपिलार्थीस ते देऊ शकणार नाहीत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत खुलासा व स्पष्टीकरण विचारण्याचे अधिकार नाहीत. येथे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने विचारलेली माहिती जशी उपलब्ध असेल त्या स्वरुपात ती अर्जदारास देणे अपेक्षित आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही करुन ही माहिती त्यांच्याकडे दि. १५.९.२००६ रोजी तयार करुन ठेवली होती, तथापि ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी दि. २७.९.२००६ रोजी व्यक्तीशः हजर झाले व त्यांनी ही माहिती प्राप्त करुन घेतली. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः मागितली असल्याचे दिसून येते, यावरुन या संपूर्ण घटनेच्या कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यशैलीमध्ये त्रूटी असल्याचे दिसून येत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती खुलासेवजा स्वरुपात पुरविली आहे, त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय अपिलार्थीच्या कागदपत्रांचे नीटपणे वाचन न करता, खोटेनाटे करुन दिला आहे, अशापैकी कोणतीही वस्तुस्थिती आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन

आढळून न आल्याने, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**१.अपील फेटाळण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १७.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कानिफ मारुती माने रा. हिंमतनगर, प्लॉट नं. ५७, नगर-औरंगाबाद रोड, अहमदनगर ता.जि.अहमदनगर.
२ जन माहिती अधिकारी तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११७१

निर्णय दिनांक : १७.०६.२००८

१ श्री. रामेश्वर गंदास पावरा, : अपीलार्थी
रा. बोराडी ता.शिरपूर
जि.धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रैतवादी
तथा तहसीलदार, शिरपूर,
जि. धुळे
२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपविभागीय अधिकारी, शिरपूर
जि. धुळे

प्रत्यक्षः जन माहिती अधिकारी : पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, शिरपूर, जि.धुळे
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, शिरपूर, जि.धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यैंत आली. सुनावणीच्या वेळी श्री. सुरेश रघुनाथ पाटील, (सध्या कार्यरत) जन माहिती अधिकारी तथा पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, शिरपूर,श्री.वेस्ता मागल्या वसावे (तत्कालीन) जन माहिती अधिकारी तथा पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, शिरपूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यैंत येईल) व श्री. शांतीलाल सापूर्डा सोनवणे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिरपूर (यापुढे त्यांना जन

अपिलीय अधिकारी असे संबोधण्यैंत येईल ) हे हजर आहेत, तरअपिलार्थी श्री. रामेश्वर गंदास पावरा (यापुढे त्यांना अपिलार्थी म्हणून संबोधण्यैंत येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०७.०४.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील स्वस्त धान्य दुकानासंदर्भात दि. १.१.२००० ते दि. ३१.१२.२००५ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> च बोराडी येथिल जंगल कामगार स्वस्त धान्य दुकानाचे (बी.पी.एल. व ए.पी.एल कार्ड धारकांचे कंझूमरचे झेराक्स प्रत व राकेल वाटपचे रजिस्टरचे झेराक्स प्रत मिळणेबाबत १) अंत्योदय अन्न योजना, २) विस्तारित अंत्योदय अन्न योजना, ३) केंद्रीय अन्नपुर्ण योजना, ४) द्वितीय अंत्योदय अन्न योजना, ५) तिसरी विस्तारीत अंत्योदय अन्न योजना चे नं. १ ते ५ या योजनाचे लाभार्थीची यादी सविस्तरपणे माहिती मिळणे.छ

सदर माहिती अपिलार्थीने टपालैंद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने सदर अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील कार्ड धारक असल्याचे नमुद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ६.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रैंतसाद देऊन त्यांनी मागितलेली माहितीसंदर्भात खुलासा सादर करण्यासाठी दि.१५.०५.२००६ रोजी उपस्थित राहण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयैंत उपस्थित राहण्याच्या वेळेचा उल्लेख केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे दि. १५.५.२००६ रोजी अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या स्वस्त धान्य दुकानदाराकडे उपलब्ध आहे, ते जन माहिती अधिकारी यांचे

कार्यालयैंत उपस्थित झाले होते, परंतु अपिलार्थी हे त्यांचे कार्यालयैंत उपस्थित झाले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १९.०५.२००६ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याचे व त्यांचे प्रथम अर्जास प्रैतसाद न मिळाल्याचा उल्लेख करुन, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.सदर अपील अर्ज अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी, शिरपूर जि.धुळे यांना उद्देशून केला आहे. या प्रकरणी उपविभागीय अधिकारी हे जन अपिलीय अधिकारी नसून तहसीलदार, शिरपूर हे जन अपिलीय अधिकारी आहेत. उपविभागीय अधिकारी, शिरपूर यांनी प्रथम अपिल अर्जावर कोणत्याही प्रङ्घारची कार्यवाही न करता सदर अर्ज त्यांचेकडे विनाकार्यवाही तसाच ठेवून दिल्याचे दिसून येते. सदर प्रकरणातील प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपिल अर्ज प्राप्त न झाल्याने त्यांचे अपील अर्जावर सुनावणी होऊ शकली नाही.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यैथत होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०९.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यांच्या युक्तीवादाप्रित्यर्थ त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपैंत

त्यांच्याकडील दि. २.५.२००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविले असून, त्यामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती पुरविल्याबद्दल त्यांना रु.१००००/- व प्रैतदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यैंत आला की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जासोबत मौ. न्यू बोराडी तालुका शिरपूर जिल्हा धुळे येथील ग्रामसेवक व सरपंच यांच्या सहीचा ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याचा दाखला सादर केला होता. त्यामध्ये त्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ९६००/- असल्याचे दाखविले , तथापि अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसून ते डॉक्टर व. मा.पाटील कषी तंत्रज्ञान विद्यालय, बोराडी येथे शिपाई या पदावर कार्यरत असून त्यांना दरमहा रु.२०००/- इतके वेतन संबंधित संस्थेकडून प्राप्त होत असते.जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानाप्रित्यर्थ त्यांच्याकडे डॉ.व.मा.पाटील कषी तंत्रज्ञान विद्यालय यांच्याकडून प्राप्त दि. २१.५.२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले. सदर पत्र त्यांना संबंधित विद्यालयाच्या अधीक्षकांनी दिल्याचे दिसून येते. यावरुन अपिलार्थी हे दारिद्रय-रेषेखालील व्यक्ती नसून, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासोबत खोटा पुरावा सादर केला होता, असे दिसून येत आहे. अपिलार्थीने हीच माहिती त्यांच्याकडे वेगळया अर्जाद्वारे मागितली असता, त्यांनी सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रु. ७५०/- इतके त्यांचे कार्यालयैंत भरण्याचे सूचित केल्यैंनंतर, अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे बनावट प्रमाणपत्र सादर करुन, त्यांचेकडून ही माहिती विनामूल्य प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला आहे. एवढे असूनही अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती समक्ष घेऊन जाण्याच्या सूचना त्यांनी दि.

१.७.२००६ रोजी दिल्या होत्या. दि. १६.५.२००६ ते १.७.२००६ या कालावधीमध्ये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे त्यांचे कार्यालयैंत कधीही गेले नाहीत. आज देखिल अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग करत असून संबंधित स्वस्त धान्य दुकानदारांकडे मोफत धान्याची मागणी करत असतात. या संदर्भात त्यांनी अपिलार्थीकडून संबंधित दुकानदारांना दिल्या गेलेल्या चिठ्ठयांची प्रत आयोगास दाखविली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असेही स्पष्ट केले की, अपिलार्थी हे वेळोवेळी माहितीचा अर्ज करत असतात व प्रत्येक अर्जावर त्यांची सही वेगवेगळया प्रङ्कारची असते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानाप्रित्यर्थ अपिलार्थीने त्यांच्याकडे वेगवेगळया अर्जाद्वारे केलेल्या अर्जांच्या प्रती आयोगास दाखविल्या व प्रत्येक अर्जावर त्यांनी वेगळी सही केली असल्याचे सप्रमाण सिध्द केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यैंत आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थी यांनी प्रत्येक वेळी वेगवेगळया सहया केल्याचे सप्रमाण सिध्द होत आहे. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावरील त्यांची सही, त्यांच्या मूळ अर्जावरील सही व प्रथम अपिल अर्जावरील सही यामध्ये फरक असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. तथापि अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केला आहे. सदर पुरावा डॉ.व.मा.पाटील कषी तंत्रज्ञान विद्यालयाच्या अधीक्षकाकडून प्राप्त झालेले दि. २१.५.२००८ रोजीचे पत्र होय. या पत्रातील मजकुरावरुन अपिलार्थी या विद्यालयामध्ये ९५-९६ या वर्षापासून शिपाई या पदावर कार्यरत असून त्यांना

विद्यालयैंतर्फे मासिक रु. दोन हजार इतके वेतन प्राप्त होत असल्याचे दिसून येत आहे व परिणामी अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या दाव्याचे खंडण करण्यासाठी आयोगासमोर अपिलार्थी उपस्थित नाहीत. अपिलार्थीने त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दारिद्रयरेषेखालील व्यक्तींसाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ द्वारे दिलेल्या सवलतींचा लाभ असद्हेतूने घैतला असल्याने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल, तथ्यहीन ठरत आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस जर त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आवश्यक असेल तर, त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यैंत येत आहे.अपिलार्थीने केलेला मूळ अर्ज, त्यावरील प्रथम अपील व आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल ते स्वतः दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द न झाल्याने, त्यांचे सदर अपिल फेटाळण्यायोग्य आहे, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशैंत् येथे असे नमुद करण्यैंत येते की, ग्रामसेवक व सरपंच, मौजे न्यू बोराडी, ता.शिरपूर जि.धुळे यांनी अपिलार्थीस दिलेले दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र पर्णतया अवैध ठरले असल्याने, सदर प्रमाणपत्र अपिलार्थीस अवैध मार्गाचा अवलंब करुन दिले गेले असल्याची शक्यता या प्रकरणी नाकारता येत नाही, हे पाहता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे व जिल्हा पोलीस अधिक्षक, धुळे यांना असे आदेशित करण्यैंत येते की, अपिलार्थी श्री. रामेश्वर गंदास पावरा यांना ग्रामसेवक व सरपंच, ग्रामपंचायत न्यू बोराडी, ता.शिरपूर जि.धुळे यांनी दिलेल्या दि. २४.११.२००० रोजीचे प्रमाणपत्र रद्द करुन, संबंधितांनी कोणत्याही कागदपत्रांची तपासणी न करता श्री. पावरा यांना दिलेल्या

प्रमाणपत्राबाबत सखोल चौकशी करावी व संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांनी सदर प्रमाणपत्र देण्याच्या कतीद्वारे त्यांच्या शासकीय सेवेमध्ये नितांत सचोटीचा अभाव सिध्द केल्याबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे अथवा इतर कायद्यान्वये यथायोग्य कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तदनंतर एङ्क महिन्याचे आत आपला अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यैंत येत आहे.

**आदेश**

१.अपील फेटाळण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/ जिल्हा पोलीस अधिक्षक धुळे यांनी संबंधित ग्रामसेवक व सरपंच, ग्रामपंचायत, न्यू.बोराडी ता. शिरपूर जि. धुळे यांचेवर त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या त्यांच्या दि. २४.११.२००० च्या दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत चौकशी करावी, व हे प्रमाणपत्र देण्यामध्ये संबंधित ग्रामसेवकाने दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील नितांत सचोटीच्या अभावाबाबत हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत यथायोग्य कारवाई करुन या संबंधीचा आपला अहवाल एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १७.०६.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामेश्वर गंदास पावरा,रा. बोराडी ता.शिरपूर जि.धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा पुरवठा निरीक्षक तहसील कार्यालय, शिरपूर जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, शिरपूर जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा पोलीस अधीक्षक, धुळे यांनी या प्रकरणी संबंधित सरपंच व ग्रामसेवक, न्यू.बोराडी यांनी अपिलार्थीस दि. २४.११.२००० रोजी श्री. रामेश्वर गणदास पावरा यांना दिलेल्या त्यांच्या दारिद्रयरेषेखाली प्रमाणपत्राची वैधता तपासून आवश्यक वाटल्यास संबंधितांवर प्रचलित नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११७२

निर्णय दिनांक : १७.०६.२००८

१ श्री.सैय्यद अली अंजुम रज्वी, : अपीलार्थी
जळगाव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जि.प.जळगाव
२ जन अपिलीय अधिकारी,
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगाव

प्रत्यक्षः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, वर्ग-२, शिक्षण विभाग,प्राथमिक जि.प. जळगाव
जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जळगाव
त्रयस्थ पक्ष : नासिर अहमद अ.हमीद शेख,उपशिक्षक, जि.प.उर्दू शाळा, म्हसावद ता.जि.जळगाव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सैय्यद अली अंजुम रज्वी (यापुढे त्यांना अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), श्री. जनार्दन रामचंद्र बोदडे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (प्राथमिक), जि.प.जळगाव (यापुढे

त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अनिल बाळाजी लांडगे,तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव, श्री. रावण शेनपडू शिरसाठ, सध्याचे उपशिक्षणाधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व त्रयस्थ पक्ष श्री. नासिर अहमद अ.हमीद शेख, उपशिक्षक,जि.प.ऊर्दू शाळा म्हसावद ता.जि.जळगाव(यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २७.०५.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमान्वये दिलेल्या माहितीसंदर्भात खालीलप्रमाणे एकूण ५ मुद्यांवर दि.२.५.२००६ रोजीची खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " १) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव यांचेकडील दि. २/६/२००५ ची मंजूर टिपणीची नक्कल
>
> २) शेख नासिर अ.हमीद या शिक्षकाची रद्द झालेल्या बदलीच्या प्रकरणात जि.प.सामान्य प्र.वि.मार्फत झालेल्या खातेचौकशी अंती काय निर्णय झाला ? चौकशी अहवालाची प्रत.
>
> ३) प्राथ. शिक्षकाने शासकीय किंवा कार्यलयीन कर्तव्याविषयी एखादया विरुध्द कार्यालयाची परवानगी न घेता खटला दाखल केल्यास त्याच्या विरुध्द कोणती कार्यवाही करता येते ? कोणत्या नियमानुसार ? दंडात्मक कार्यवाही काय होते ? अशा शिक्षकाला सेवेतून बडतर्फ किंवा निलंबित करता येते का ?

४) सदर बदली विषयी जि.प.सा.प्र.वि.मार्फत झालेल्या चौकशी अंती आपण कोणकोणत्या अधिकारी,कर्मचारी किंवा सदर शिक्षकाविरुध्द कार्यवाही केली ? काय कार्यवाही केली.

५) मी दिलेल्या तक्रारीवरुन सदर सहा शिक्षकांच्या एकतर्फी वर्गीकरणाचे संपुर्ण आदेश (दि. ७/६/०५) आपण रद्द केले किंवा कसे ? रद्द केले नसल्याचे कारण काय ?."

सदर माहिती अपिलार्थीने सर्वसाधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.- २३.०६.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ संदर्भात काही माहिती देऊन इतर माहिती ऑगस्ट अखेर देण्याचे आश्वासित केले. या आश्वासनानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत दि. ३.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २५.०८.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. या मध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २३.६.२००६ रोजीच्या पत्रात अर्धवट माहिती देण्यात आली तर त्यांनी दि. ३.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मुद्दा क्र. ३ ची दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे व मुद्दा क्र. १ ची माहिती दडवून ठेवल्याचे नमुद केले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.९.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संबंधीचे आपले आदेश दि. २९.९.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ ची माहिती अपिलार्थीस दि. १८.९.२००६ रोजी (अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी) समक्ष दिल्याचे नमुद करुन संबंधितांना समज दिली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.११.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमुद करुन, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये अनियमितता असल्याचे म्हटले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधितांना या प्रकरणी फक्त समज दिली असल्याचे, आयोगाचे निदर्शनास आणून संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे दंडनीय कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जात नमुद केलेल्या मुद्दा क्र. १ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत दिली नाही. ती त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या दिवशी म्हणजे ३ महिने २१ दिवस इतक्या विलंबाने दिलेली आहे.त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द जनहितार्थ याचिका दाखल करण्यासाठी हवी होती, तथापि संबंधितांनी वेळेत माहिती न दिल्याने त्यांना न्यायालयामध्ये जनहितार्थ याचिका दाखल करता आली नाही, त्यामुळे बेरोजगार डि.एड. पदविका धारण

करणाऱ्यांचे नुकसान झाले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे माहिती देण्यास लावलेल्या विलंबामुळे त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी दि. २३.६.२००६ व ३.८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे पुरविण्यात आलेली आहे. सदर माहिती दोन टप्प्यामध्ये का देण्यात आली, याचे कारण जन माहिती अधिकारी आयोगास सांगू शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २५.८.२००६ रोजीच्या अपिलावर दि. १८.९.२००६ रोजी सुनावणी घेऊन दि. २९.०९.२००६ रोजी आदेश पारित केले. सुनावणीच्या दिवशीच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या टिपणीची प्रत त्यांनी अपिलार्थीस व्यक्तीशः हस्तांतरित केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.५.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती बऱ्याच प्रमाणात प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी, अशा प्रकारची मागितलेली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे, जी खालीलप्रमाणे आहे.

**'माहिती' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.**

सदर व्याख्येचे अवलोकन करता अर्जदारास जन माहिती अधिकारी यांना त्यांनी केलेल्या कृतीबद्दल अथवा घेतलेल्या एखाद्या प्रशासकीय निर्णयाबाबत अर्जदारास कारणे कळविण्याची आवश्यकता नाही. तद्वतच अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे अपेक्षित केले आहेत, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका विश्वस्त म्हणून असून त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या माहितीचे जतन करुन तिची जेव्हा-जेव्हा मागणी करण्यात येईल, तेव्हा-तेव्हा ती संबंधितास अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अपेक्षित आहे. या प्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांच्याकडे दि. २.६.२००५ च्या मंजूर टिपणीची प्रत मागितली होता. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ३.८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे पुरविण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या माहितीवर सरळ माहिती देणे टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. कारण टिपणीची नक्कल मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी सदर टिपणी त्यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी समक्ष हजर रहाण्याचे दि. ३.८.२००६ रोजीच्या

पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले आहे, हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचा मुद्दा पुरेशा प्रमाणात सिध्द होत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी या मुद्यावर अपिलार्थीस चुकीचे उत्तर दिले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती मुद्दा क्र.१ व ३ च्या अनुषंगाने अर्धवट ठरत आहे. या माहितीशी पूरक माहितीची टिपणी त्यांनी अपिलार्थीस दि. १८.९.२००६ रोजी दिली. या टिपणीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अंतिमतः पुरेशी स्पष्ट माहिती अपिलार्थीस दि. १८.९.२००६ रोजी दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीला, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दोन टप्प्यात देण्याची गरज का वाटली, या प्रश्नाचे उत्तर आज आयोगासमोर झालेल्या सुनावणीच्या दिवशी देता आले नाही.अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, सदर माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देणे जन माहिती अधिकारी यांना फार क्लिष्ट अथवा अवघड होते, अशातील बाब येथे संभवत नाही. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः विलंबाने व अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द होत असल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत, असे दिसून येते.अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देणे, दिलेली माहिती अर्धवट असणे, अशा प्रकारच्या त्यांच्या हातून घडलेल्या वर्तनाने त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट झाला असल्याचे सिध्द होत आहे.सबब शिक्षण संचालक,पुणे यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे

आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.अपिलार्थीस आता संपूर्ण माहिती मिळाल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आह.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. शिक्षण संचालक,पुणे यांनी, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सैय्यद अली अंजुम रज्वी, प्लॉट क्र.१५, गणेशपूरी, इकरा कॉलेजरोड, मेहरुण, जळगाव-४२५ १३५.
२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वर्ग-२ शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपिल

अपिल क्रमांक २००७/रामाआ/अपिल/सिआर/१०७६

निर्णय दिनांक १८-०६-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. नारायण सखाराम दंतलवाड, इस्लामपूर, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, किनवट, जिल्हा नांदेड |

### <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. गुणवंत किशनराव टारपे, जन माहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नंदकिशोर वसंतराव नाईनवाड, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नारायण सखाराम दंतलवाड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००५ ते २००७ या कालावधी-तील त्यांच्या कार्यक्षेत्रातील इस्लामपूर सर्कलमधील सर्व गावाच्या कामाची माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> " २००५ ते २००६ व २००६ ते २००७ च्या कामाचा मंजूर खर्च व केलेला खर्चाची माहीती. इस्लामपूर सर्कलमधील गटनिहाय खर्च व हजेरीपत्रकातील झेरॉस्क प्रती. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात असून ती संकलीत करण्याचे काम चालू असल्याचे कळवून त्यांनी मागितलेली माहीती, त्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी जास्त कालावधी लागणार असल्याचे अवगत केले व तदनंतर दिनांक २२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटी त्यांना शुल्क रुपये ५२४० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या कडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-११-२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना विहित कालावधी मध्ये माहिती न दिल्यामुळे त्यांना दंड लावण्याविषयी जन अपिलीय अधिकारी यांच्या कडे विनंती करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०३-२००७ रोजी, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोचसही जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या पत्रावर असल्याचे दिसून येत आहे. या सहीखाली तारीख नाही.

तथापि हा निर्णय प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००७ रोजी व्दितीय अपिल केले होते. याची नोंदणी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०३-०४-२००७ रोजी झालेली आहे. या अपिल अर्जामध्ये, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती देण्याची टाळाटाळ केली, माहिती दिली नाही, अंदाजपत्रकाप्रमाणे कामे केली नाहीत, बोगस हजेरीपत्रक

भरुन कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला, यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करुन देखील उपयोग झाला नाही, असे म्हटले आहे. या कारणास्तव, त्यांनी या अर्जामध्ये आयोगास संबंधितांवर शास्तीची कारवाई करण्यास विनंती केली आहे. तसेच त्यांच्या प्रथम अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश निर्गमीत केले नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिल अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे त्यांनी, अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत प्रमाणात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले होते व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी काही वाढीव कालावधी लागेल याची त्यांना कल्पना देण्यात आली होती. तदनंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी शुल्क रुपये ५२४० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्यास सूचित केले, तथापि अपिलार्थीने सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात भरले नाही व हे पत्र त्यांना प्राप्त होण्यापूर्वीच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल करणे पसंत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपीलावर दिनांक २५-०१-२००७ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०३-२००७ रोजी विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीने, या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही, माहिती प्राप्त करुन घेण्याप्रीत्यर्थ अपिलार्थी त्यांच्या कार्यालयाकडे कधीही हजर झाले नाहीत. अपिलार्थीस माहिती अधिकार कायद्याचा

दुरुपयोग करण्याची सवय आहे. या कायद्यातील तरतुदींचा वापर करुन ते अधिका-यांकडून माहिती व्यक्तिशः मागत असतात, परंतु सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते कधीही कार्यालयात उपस्थित रहात नाहीत. अपिलार्थीबरोबर त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती अपिलार्थीस मिळाल्या असून त्याप्रीत्यर्थ त्यांनी आयोगास आवश्यक तो पुरावा सादर केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०७-११-२००६ रोजीच्या प्रथम अपीलावर त्यांनी दिनांक २५-०१-२००७ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर होते. अपिलार्थी हे त्यांना सुनावणीस उपस्थित राहण्याची विनंती करुनही ते गैरहजर राहिले आहेत. त्यांनी निर्णय देतेवेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यासाठी तयार होती, तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही उपस्थित न झाल्याने अपिलार्थीस माहिती दिनांक १६-०३-२००७ पर्यत उपलब्ध होऊ शकली नाही. दिनांक १६-०३-२००७ रोजी त्यांनी आपल्या कार्यालयातील शिपायामार्फत ती माहिती अपिलार्थीस दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. **माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असता सदर माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी ही अपिलार्थीची असते. त्याकरिता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे स्वतः हजर राहणे, (कोणीही प्रतिनिधी न पाठविता) जन माहिती**

**अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेणे, हे "व्यक्तिशः" या संज्ञेमध्ये अभिप्रेत आहे. याचबरोबर अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर होऊनही त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकली नाही तर त्यांच्या या कार्यालयाच्या प्रत्येक भेटीची नोंद त्यांनी संबंधीत कार्यालयाकडे व स्वतःकडे ठेवणे गरजेचे आहे.** उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही व्यक्तिशः उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद न मिळाल्याने, अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केले व याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०३-२००७ रोजी माहिती दिली व ही माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही देखील जन माहिती अधिकारी यांच्या कडे उपलब्ध आहे. अपिलार्थीच्या सही खाली त्यांनी तारीख लिहिलेली नाही, यावरुन ही माहिती त्यांनी अपिलार्थीस केंव्हा उपलब्ध करुन दिली याचा अर्थबोध होत नाही. सदर पत्रावरील दिनांक १६-०३-२००७ या तारखेवरुन ही माहिती अपिलार्थीस दिनांक १६-०३-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे गृहीत धरण्यात येत आहे. अपिलार्थीने व्दितीय अपिल अर्जात म्हटल्याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली, असे म्हटले आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत नाही, कारण अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात असल्याचे व ती संकलीत करण्यासाठी जादा कालावधी लागणार असल्याने त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कळविले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे शुल्क रुपये ५२४० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचेही त्यांनी अपिलार्थीस कळविले होते, त्यामुळे या घटनेच्या कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ

केल्याचे अथवा ती माहिती असद्हेतूने दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर दिनांक २५-०१-२००७ रोजी आपला निर्णय दिला आहे. या निर्णयाची प्रत अपिलार्थीस प्राप्त झाली किंवा कसे याची विचारणा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केली असता, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास दाखविली आहे. तथापि या वहीतील नोंदी अपूर्ण असल्याने अपिलार्थीस अपिल निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी खरोखरच दिला किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०३-१०-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३०-१०-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देण्यात आला, तो जरी चुकीचा असला तरी, अधिनियमातील विहित मुदतीत दिला असल्याचे दिसून येते. या काळामध्ये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणी बाबत जन माहिती अधिकारी हे अनभिज्ञ असल्याचे त्यांनी आयोगा-समोर कबूल केले आहे, हे पाहता उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याने आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )
दिनांक	१८-०६-२००८	राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. नारायण सखाराम दंतलवाड, इस्लामपूर, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२	जन माहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी किनवट, जिल्हा नांदेड या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०७७

निर्णय दिनांक १८-०६-२००८

श्री. बाबुशा मारोती नाईक, (सहशिक्षक), : अपिलार्थी
प्राथमिक आश्रम शाळा येडसी तांडा,
तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, भोजाजी नाईक
आश्रमशाळा येडसी तांडा, तालुका
कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष जिल्हा समाजकल्याण
अधिकारी, हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. बाबुशा मारोती नाईक, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. विठ्ठल शिवराम तोडकर, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, भोजाजी नाईक आश्रमशाळा येडसी तांडा, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल) व श्री. अशोक नामदेवराव गोडबोले, समाजकल्याण निरिक्षक, जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, हिंगोली यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या वेतनवाढी, सेवापुस्तिका, दिवाळी बोनस व मे २००४ ते जुलै २००४ या कालावधीतील पगाराबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. सन ९७-९८ चे दिवाळी बोनस का काढण्यात आले नाही.

२. मे २००४ ते जुलै २००४ चे वेतन का काढण्यात आले नाही ?

३. सन ९२-९३ पासून वेतनवाढी लावण्यात आल्या होत्या परंतू सर्व वेतनवाढी नोव्हेंबर २००४ मध्ये बंद का केल्या.

४. सेवा पुस्तीकेमध्ये वरिल तिन मुद्दयाची नोंद घेवून सेवापुस्तीकेची व्दितीय प्रत आजपर्यंत मला का देण्यात आली नाही.

५. सन १९८८ ते आतापर्यंत माझ्या वैद्यकीय रजा अर्जित रजा किती शिल्लक आहेत.

६. शासन निर्णयाप्रमाणे सातत्याने सेवा केल्यामुळे मला १२ वर्षानंतर दुसरी वेतनश्रेणी बंधनकारक आहे ते देण्यात आली काय त्याची कारणे कोणती.

७. सेवापुस्तीकेमध्ये वेतनवाढी मंजूर करुन त्याची सेवापुस्तिकेत नोंद घेतली का.

८. माझी वेतनश्रेणी ३२०० ते ४९०० असून आतापर्यंत ३२०० प्रमाणे वेतन काढण्यात येते त्याची नेमकी कारणे कोणती.

९. माझी नेमणूक अप्रशिक्षीत त्याचा ग्रेड ३२०० ते ४९०० असून माझी सेवा सातत्याने १८ वर्षे पूर्ण झाले असून मला कोणत्या कारणाने कायम करण्यात येत नाही त्याची नेमकी कारणे काय ?

१०. सिनारिटी प्रमाणे माझे नाव शिक्षकहजेरीपटावर का घेण्यात आले नाही.

वरील सर्व मुद्याची तात्काळ माहिती देण्याची सोय करावी हि विनंती."
अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या पत्राचे गचाळ हस्ताक्षरामुळे वाचन करता येत नाही. सदर पत्र त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात अपिलार्थीस लिहिलेले आहे असे त्यांनी सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. मात्र या अपिलासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये, जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस संपूर्ण व समाधानकारक माहिती देण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीच्या अपिल अर्जावर निर्णय घेण्याची ही पध्दत चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे दाखल

झालेल्या अपिलावर निर्णय घेतांना त्यांनी अर्जदार व संबंधीत जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून, ते नोंदवून, त्यावर आपला अंतीम निर्णय पारित करणे हे "अपिल ठरविणे" या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे याची त्यांनी भविष्यात नोंद घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, अपुरी, चुकीची व असमाधानकारक माहिती देऊन, त्यांची दिशाभूल केली असल्याने त्यांच्या वर तात्काळ कार्यवाही करुन नियमानुसार दंड लावण्याची आयोगास विनंती केली आहे. तसेच विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर यांचे आदेशपत्र असतांनाही समाजकल्याण अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे, त्यांनी या अपिल अर्जामध्ये म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना ज्या माहितीची आवश्यकता जन माहिती अधिकारी यांच्याकडून होती, ती त्यांना माहिती अधिकारी यांनी न देता, अपुरी व चुकीची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर-ही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही, त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कार्यवाही व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस योग्य ती माहिती दिलेली आहे व ही माहिती अपिलार्थीस दिल्याप्रीत्यर्थ त्यांची वेळोवेळी पोच घेतलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १५-०१-२००७ रोजीच्या अपिल अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याचे सूचित केले होते. त्यांनी जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्याकडील वेळोवेळी झालेल्या बैठकांमध्ये देखील अपिलार्थीस माहिती देण्याची सूचना दिली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती दिली नाही. अपिलार्थी हे प्राथमीक आश्रमशाळा येडशी तांडा, तालुका कळमनुरी येथे सह शिक्षक या पदावर कार्यरत होते. सह शिक्षक या पदावर कायमस्वरुपी नेमणूक होण्याकरिता किमान शैक्षणिक अर्हता डी. एड पास अशी आहे व डी. एड पास होण्याकरिता अपिलार्थीस ३ वेळा संधी दिली होती. तथापि अपिलार्थी हे डी. एड परीक्षा पास न होऊ शकल्याने त्यांच्या या शाळेत केलेल्या सह शिक्षक पदावरील नेमणुकीस समाजकल्याण विभागाने मान्यता दिली नाही. याबाबतीत त्यांना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, यांच्याकडून दिनांक १२-०७-२००७ रोजी पत्र देऊन त्यांना परीक्षेची संधी संपली असल्याचे अवगत केले आहे. एवढे असूनही एक खास बाब म्हणून अपिलार्थीस २००८-०९ या शैक्षणिक वर्षामध्ये डी. एड परीक्षा देण्यासाठी एक अतिरिक्त संधी देण्यात आली असून, ती परीक्षा पास झाल्यानंतर अपिलार्थीस नेमणुकीबाबत वेगळ्याने विचार करता येईल. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेले मुद्दे योग्य आहेत. अपिलार्थीस त्यांचा देय पगार व बोनस संस्थेने त्या कालावधीमध्ये देणे भाग होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही संस्थेने केलेली नाही. अशा प्रकारच्या विविध अनियमिततेमुळे सदर संस्थेच्या या शाळेची मान्यता काढून घेण्यासंबधाने त्यांनी संचालक, समाज कल्याण यांच्याकडे प्रस्ताव पाठविला असून, अद्यापपावेतो या प्रस्तावावर निर्णय झालेला नाही. वेळोवेळी झालेल्या अनियमिततेमुळे विभागीय समाजकल्याण अधिकारी लातूर यांनी २००७-०८

या आर्थिक वर्षामध्ये या संस्थेस काही दंड लावला होता. या दंडाची रक्कम त्यांनी शाळेस देण्यात येणा-या वार्षिक अनुदानातून वसूली देखील केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः त्यांच्या प्रथम अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या एकूण ९ मुद्दयांवर माहिती मागितली आहे, ती सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपात आहे. या अर्जाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबद्दल व कृतीबद्दल कारणे अपेक्षिली आहेत. अपिलार्थी हे भोजाजी नाईक तांडा आश्रमशाळा येथे सह शिक्षक या पदावर पूर्वी कार्यरत होते, तथापि आवश्यक त्या अटी पूर्ण न केल्यामुळे त्यांची सेवा सध्या प्रलंबीत ठेवण्यात आली आहे. ते सेवेमध्ये कार्यरत असतांना त्यांना देय असलेली वेतनवाढ, सेवापुस्तिका देण्यासाठी इत्यादी प्रश्नासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली आहे, जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने प्रश्न विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उत्तरे अथवा खुलासे देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे सिध्द होत आहे. या कारणास्तव अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय ठरत नाही. असे असले तरीही, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमधील अनुत्तरीत मुद्याबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी सहाय्य करण्याचे आयोगासमोर कबुल केले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस देय ठरत नाही व त्यामुळे अपिलार्थीचे अपिल

फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.  सबब खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १८-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबुशा मारोती नाईक, (सहशिक्षक), प्राथमिक आश्रम शाळा, येडशी तांडा, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, भोजाजी नाईक आश्रमशाळा येडसी तांडा, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०७८

निर्णय दिनांक १८-०६-२००८

श्री. स. नवाज स. खाजा, : अपिलार्थी
निवृत्त शिपाई नगर परिषद, कुंडलवाडी,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,
कुंडलवाडी, तालुका बिलोली,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय
आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. स. नवाज स. खाजा, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. सोमनाथ गुंजाळ, जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद हे हजर आहेत

तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पगारासंदर्भात दिनांक ०१-०१-१९८६ ते ३१-०३-१९८९ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> " मी आपल्या कार्यालयात शिपाई म्हणून काम करीत होतो. मी दि. ३१-३-८९ रोजी निवृत झालो. ह्यानंतर ४ थ्या आयोगाप्रमाणे दि. १-१-८६ ते ३१-३-८९ पर्यतचा ४ थ्या आयोगाप्रमाणे पगारीत वाढीव झालेली रक्कम रु. १११०३ /- चा बकाया मिळणे बाबत दि. २३-७-१९९९, दि. १५-७-२०००, दि. १६-४-२००१, दि. ६-१-२००४ ला आणि दि. ८-१०-२००५ ला अर्ज दिला, परंतु आजपावेतो मला बकायाची रक्कम मिळाली नाही. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः किंवा टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोठल्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन, दिनांक ३०-०९-२००६ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित करुन, त्यांना नियमानुसार

विहित मुदतीत माहिती देण्याची दक्षता घेण्यासंदर्भात सूचित केल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी अद्यापही संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना ४ थ्या वेतन आयोगाप्रमाणे वाढलेल्या पगाराची थकीत रक्कम रुपये १११०३ /- त्यांना मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितल्याप्रमाणे कोणतीही माहिती दिली नाही, तद्वतच त्यांच्या पगाराचा फरक रुपये १११०३ इतकी रक्कम त्यांना प्राप्त झाली नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. २३-७-१९९९, १५-७-२०००, १६-४-२००१, ६-१-२००४ आणि ७-१०-२००५ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली याची माहिती हवी आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांच्या दिनांक १०-०८-२००६ रोजीच्या अपिल अर्जावर, त्यांनी दिनांक ०७-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन दिनांक ३०-०९-२००६ रोजी आपले आदेश पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १२-०६-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांना निश्चितपणे जन माहिती

अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती हवी आहे, याचा स्पष्ट अर्थबोध होत नाही. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन म्हणून त्यांनी, त्यांना देय वेतनवाढीचा फरक रुपये ११९०३ मिळण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळ्या तारखांना अर्ज केले होते. परंतु सदर फरकाची रक्कम त्यांना प्राप्त झाली नाही असे म्हटले आहे. अपिलार्थीने आज आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेखित केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली याची माहिती त्यांना हवी आहे. अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमाव्दारे दाखल झालेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७ (१) प्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही करुन अपिलार्थीच्या मूळ अर्जावर त्यांना निर्णय कळविणे, अधिनियमातील तरतुदीनुसार भाग होते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर सुनावणी घेऊन त्यांच्याकडील दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या पत्राने आदेशीत केल्यानंतरही, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही किंवा यासंदर्भात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. या सर्व घटनेतील जन माहिती अधिकारी यांचे वर्तन हे कोणाही सुज्ञ नागरिकास उद्‌निग्न करणारे आहे. अपिलार्थीच्या मूळ अपिल अर्जावर निर्णय होऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न देणे, या त्यांच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीसाठी त्यांना आयोगातर्फे, आयोगाच्या दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळवूनही जन माहिती अधिकारी हे हजर नाहीत, हे येथे खेदाने नमूद करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही टप्प्यावर कशाही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद न देऊन व आयोगासमोरील सुनावणीस स्वतः अथवा इतर

कोणाही प्रतिनिधीला न पाठवून, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाची अवमानसदृष्य परिस्थिती निर्माण करुन ठेवली आहे. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित ठेवण्याचे कोणतेही कारण समर्थनीय असू शकत नाही असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिल अशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती

का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १८-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. स. नवाज स. खाजा, निवृत्त शिपाई, बुरुड गल्ली, नांदेड वेस, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११६९

निर्णय दिनांक १८-०६-२००८

श्री. नरेंद्र बारकु चौधरी, : अपिलार्थी
दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट,
तळमजला, राणाप्रताप चौक,
मनपासमोर, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता, सार्वजनिक
बांधकाम (यांत्रिकी), उपविभाग,
नंदूरबार, जिल्हा नंदूरबार

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक
बांधकाम विभाग, नंदूरबार, जिल्हा
नंदूरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. भाऊसाहेब रखमाजी शेळके, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम (यांत्रिकी), उपविभाग, नंदूरबार

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. राजेंद्र टिला पाटील, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदूरबार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकु चौधरी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००५ ते १५-०४-२००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामाबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" नंदुरबार सा. बां. यांत्रिकी उपविभागामध्ये शासकीय वाहने रिपेअरींग केले जातात का ?

शासकीय वाहने दुरुस्तीसाठी खाजगी गॅरेजमध्ये पाठविण्यात येतात का ? असल्यास कोण-कोणत्या गॅरेजमध्ये पाठविण्यात येतात त्यांची नावे, गॅरेज मालकाचे नाव व पत्ता.

सुटे स्पेअर पार्ट कोणत्या पुरवठादाराकडून खरेदी केली जातात त्यांचे नाव व पत्ते इ. माहिती,

शासकीय वाहन दुरुस्तीसाठी नंदुरबार सा. बां. यांत्रिकी उपविभागामधील कार्यशाळेत किती प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग आहे. त्यांचे नाव व पदबाबत माहिती.

वाहने दुरुस्ती करण्यात आल्यानंतर त्या वाहनांनी त्यांच्या क्षमते एवढे क्रेडिट शासनाला दिले का ? डेबिटनुसार शासनाला महसूल मिळाला का ? वाहनांची रिपेअरींग करतांना किंवा नविन सुटे भाग टाकतांना मंजुरी घेणे संबंधित अधिका-यांवर बंधनकारक आहे काय ? वाहनावर वर्षाला किती खर्च करण्याची आवश्यकता आहे ? याबाबत बंधन आहे काय ?

सन २००५ ते सन २००६ या वर्षात शासकीय वाहन रिपेअरींग व नवीन सुटे भाग खरेदीसाठी किती पैसा खर्च नंदुरबार सा. बां. यांत्रिकी उपविभागामार्फत करण्यात आला आदि माहिती. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर पत्र साध्या पोस्टाने पाठविले असून त्यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्याबाबतचा पुरावा सादर केला आहे. तथापि, या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०६-२००६ रोजी प्रथम अपील करुन, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, अपूर्ण माहिती दिल्याचे नमूद केले आहे, तसेच जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही, म्हणून त्यांना जास्तीत जास्त दंड करण्याची विनंती त्यांनी, या अपिल अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांना केली आहे.

या अपिल अर्जाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०७-२००६ रोजी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ३१-०७-२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना विहित मुदतीत व संपूर्ण माहिती दिली असल्याने अपिलार्थीचे अपिल अमान्य केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना विहित मुदतीत जी माहिती

दिली होती ती अपूर्ण असल्याचे नमूद करुन, सदर माहिती दिनांक २९-०८-२००६ पर्यत पूर्ण दिली नाही, त्यामुळे त्यांच्यावर नियमानुसार जास्तीत जास्त दंड करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून त्यांनी आयोगास उद्देशून त्यांच्याकडील दिनांक १०-०५-२००८ रोजीचे एक पत्र पाठविले आहे. या पत्रामध्ये त्यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना दिनांक २०-०२-२००७ रोजी उर्वरित माहिती प्रत्यक्षतः दाखविल्याचे नमूद केले आहे, व आयोगाकडे सुनावणीसाठी ते हजर राहू शकत नसल्याचे कळविले आहे. अपिलार्थी आज सुनावणीस अनुपस्थित असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांच्या दिनांक २०-०४-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पूर्णतः दिलेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पूर्ण स्वरुपात व विहित मुदतीत दिली असल्याने अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात यावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १९-०६-२००६ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर दिनांक २९-०७-२००६ रोजी सुनावणी घेऊन या सुनावणी संदर्भातील आदेश त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पारित केले आहेत. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपिल अमान्य केले असून त्यांच्या निर्णयाची कारणे त्यांच्या अपिल निर्णयामध्ये दिली आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना विचारलेली माहिती ब-याचशा प्रमाणात प्रश्नार्थक स्वरुपात आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०४-२००६ रोजीच्या अर्जास त्यांच्याकडील दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस पूर्ण माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने विचारलेल्या माहितीशी ही माहिती सुसंगत असल्याचे, सदर माहितीचे अवलोकन केल्यानंतर दिसून येत आहे. या घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल करतांना व आयोगाकडे व्दितीय अपिल करतांना वेगवेगळ्या टप्प्यावर विसंगत भूमिका घेतल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या कडे प्रथम अपिल करतांना त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत अपूर्ण माहिती दिली आहे असे म्हटले आहे, तर या वाक्याच्या दुस-या ओळीखाली जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही, म्हणून नियमानुसार जास्तीत जास्त दंड करावा, अशी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी केलेल्या व्दितीय अपिल अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, दिनांक २९-०८-२००६ पर्यंत पूर्ण माहिती दिली नसल्याने त्यांना जास्तीत जास्त दंड करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जामध्ये दिनांक ०१-०४-२००५ ते १५-०४-२००६ या कालावधीतील माहिती मागितली होती. तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यावेळेस भविष्यातील म्हणजे दिनांक २९-०८-२००६ पर्यंतची माहिती देणे हे तार्कीकदृष्ट्या देखील अशक्य आहे. आयोगाकडे

व्दितीय अपिल करतांना, जन माहिती अधिकारी यांनी अर्जात विहित केलेल्या कालावधीपेक्षा पुढील कालावधीच्या माहितीची अपिलार्थी यांनी अपेक्षा करणे चुकीचे आहे. अपिलार्थीच्या या कृतीचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी सुनावणीसाठी आयोगासमोर गैरहजर आहेत, त्यांनी आयोगास उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दिनांक १०-०५-२००८ रोजीच्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २०-०२-२००७ रोजी उर्वरित माहिती प्रत्यक्ष दाखविली असे नमूद केले आहे. मुळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दिली असल्यामुळे व अपिलार्थीने या घटनाक्रमाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर घेतलेल्या विसंगत भूमिकेमुळे अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १८-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकु चौधरी, दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट, तळमजला, राणाप्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम

(यांत्रिकी), उपविभाग, नंदूरबार, जिल्हा नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदूरबार, जिल्हा नंदूरबार या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपिल

अपिल क्रमांक २००७/रामाआ/अपिल/सिआर/११७४

निर्णय दिनांक १८-०६-२००८

श्री. उमाकांत प्रकाश केरकर, : अपिलार्थी
व्दारा – नंदकुमार किसन दरवडे, नेहरु
रोड, देना बँकेजवळ, मनमाड,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, मनमाड
नगरपरिषद कार्यालय, मनमाड,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय आयुक्त, नाशिक

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. उमाकांत प्रकाश केरकर, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. निवृत्ती मुरलीधर नागरे, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, मनमाड नगरपरिषद कार्यालय, मनमाड, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विठ्ठल तेजराव जरे, जन

अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्याकरिता त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रकरणासंदर्भात ०१-०१-८४ पासून ते त्यांना माहिती प्राप्त होईपर्यंतच्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

“ १. वरील दिलेल्या कालावधीत आपले कार्यालयात अनुकंपातत्वावर नियुक्ती करणे कामी कीती अर्ज / प्रकरणे आली त्यांची नांवे, आवक नंबर, दिनांक याची संपुर्ण माहिती संकलीत करुन कार्यालयीन टीपणीची १ प्रत साक्षांकीत करुन देण्यात यावी.

२. आलेल्या सर्व अर्जदारंची आपन प्रकरणे तयार केली आहेत काय ? असलेस त्या सर्व प्रकरणांच्या जोडलेल्या कागदपत्रांची जोडलेल्या कागदपत्रा-सह सर्व प्रकरणांची छायांकित फोटो कॉपीची १ प्रतीत सांक्षाकीत देण्यात यावी.

३. आपन जीतक्या अनुकंपा तत्वावरील नियुक्ती केली आहे त्या नियुक्ती साठी आपन कोणते निकष लावले आहे. त्याची कार्यालयीन टीपणीची १ प्रत साक्षांकीत करुन देण्यात यावी.

४. अनुकंपा तत्वावर नौकरी देणे कामी आपणाला अधिकार आहे किंवा कसे ? असलेस त्याबाबत सरकारी नियमावली व त्याबाबत वरीष्टांनी वेळोवेळी काढलेले आदेश व संबंधीत पत्र व्यवहार त्याची संपुर्ण कागद पत्रांची छायांकीत १ प्रत सांक्षाकीत करुन देण्यात यावी.

५. वर दिलेल्या मुदतीतील अनुकंपा तत्वावर नौकर भरती कामी शासनाकडून आलेली नियमावली, परीपत्रके व अजुन काहि असलेस त्याची माहिती संकलीत करुन १ प्रत फोटो कॉपी सांक्षाकीत करुन देण्यात यावी.

६. आपण आपल्या कार्यालयात अनुकंपा तत्वावर आलेल्या अर्जा बाबतची प्रतीक्षा यादी तयार केलेली आहे काय ? असलेस त्या यादीची १ सांक्षाकीत फोटो कॉपी देण्यात यावी.

७. आपण माझे कडुन अनुकंपा तत्वावर नियुक्ती करणे कामी सर्व लागणारे कागदपत्र घेऊन अद्याप पावेतो कोणती कर्यवाही केली त्याबाबतची कार्यालयीन टीपणीची साक्षांकीत प्रत देण्यात यावी.

८. अनुकंपा बाबत आपाकडे अधिकार नसले बाबत आपले कार्यालयातील आस्थापना विभागप्रमुख यांनी तोंडी स्वरुपात सांगीतले होते. त्यानुसार आपल्या कार्यालयाकडून कीती प्रकरणे मा. जिल्हा अधिकारी साहेब यांचेकडे कार्यवाही साठी पाठविली ? त्यांची नावे, जावक नंबर, दिनांक याची संपुर्ण माहिती संकलीत करुन कार्यालयीन टीपणीची १ प्रत साक्षांकीत करुन देण्यात यावी.

९. अनुकंपा बाबत आपनाकडे कीती प्रकरणे प्रलंबीत आहे ? कोणत्या कारणाने प्रलंबीत आहे त्याबाबत ची कारणांचा खुलासा संपुर्ण माहिती संकलीत करुन कार्यालयीन टीपणीची १ प्रत साक्षांकीत करुन देण्यात यावी.

१०. आपना कडे मा. जिल्हाधिकारी साो. यांचे पत्र क्र. मशा/कार्या.३/आस्था. १/(१)/३७४/२००२ नासिक दिनांक २४/६/२००२ चे पत्राअन्वये आपनकडुन त्याबाबत आपनाकडून कोणत्या प्रकारची कार्यवाही केली त्याबाबत केलेली कार्यालयीन टीपणीची १ प्रत सांक्षांकित करुन देण्यात यावी.

११. वरील मागीतलेली सर्व माहिती ही संकलीत करुन साक्षांकीत करुन देण्यात यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०४-२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०२-०६-२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी, अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस साक्षांकीत माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती साक्षांकीत करुन ती अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००६ रोजी पुरविली आहे.

तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००६ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती

अधिकारी यांनी त्यांना चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांच्या वर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी न्यायासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे दिनांक १४-०६-२००२ रोजी प्रथमतः अर्ज करुन त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिली होती. सदर अर्जावर काय कार्यवाही झाली हे जाणून घेण्याकरिता ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता, त्यांच्या अर्जाची प्रत त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाली नसल्याचे सांगण्यात आले. त्यांनी २००२ साली नगर परिषद कार्यालयाकडे त्यांच्या अर्जाची प्रत सादर केली असून देखील त्यांचे नांव अनुकंपाच्या यादीमध्ये आढळून येत नाही. जिल्हाधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या अपिलार्थीच्या सदर अर्जाची प्रत त्यांनी नगर परिषदेकडे दिनांक १५-०६-२००२ रोजी दिली आहे. मात्र त्यांचे नांव अनुकंपा यादीत त्यांना आढळले नाही. त्यांचा दिनांक १५-०६-२००२ चा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होऊन त्यावर कार्यवाही का झाली नाही, याची कारणे त्यांना हवी होती. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना चुकीची माहिती दिली व माहिती दडवून ठेवली आहे त्यामुळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कार्यवाही व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये निर्देशीत केलेला दिनांक १४-०६-२००२ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे उपलब्ध नसून याच विषयासंदर्भात अपिलार्थीने दिनांक १७-०५-२००३ रोजी केलेल्या अर्जावर त्यांनी दिनांक ३०-०१-२००४ रोजी अपिलार्थीस अंतीम निर्णय कळविला आहे. त्या निर्णयामध्ये अपिलार्थीची विनंती, ते अनुकंपा सवलतीस

पात्र होत नसल्याने, त्यांनी नाकारली असल्याचे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०७-०४-२००६ व १२-०६-२००६ रोजी दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०४-२००६ रोजीच्या अपिल अर्जावर त्यांनी दिनांक १८-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन, या सुनावणीवरील आदेश दिनांक ०२-०६-२००६ रोजी पारित केले. त्यांच्या मते जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली होती.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ११ मुद्यांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्यासाठी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रकरणासंदर्भात माहिती मागविली होती. अपिलार्थी यांच्या मते त्यांनी अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०६-२००२ रोजी, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केलेल्या अर्जाची प्रत दिली होती, तथापि या अर्जावर काहीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून झाली नाही तसेच त्यांच्या अर्जाची दखल देखील जन माहिती अधिकारी यांनी घेतली नसल्याने, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील प्रकरणाची माहिती मागविली आहे तर जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थीने जिल्हाधिकारी, नाशिक यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १४-०६-२००२ च्या अर्जाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीने सदर अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर केल्याबाबतचा पुरावा आयोगास योग्य वाटतो. यावरुन अपिलार्थीच्या दिनांक १४-०६-२००२ च्या अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून गहाळ झाली असल्याची शक्यता नाकारता

येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, सदर माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देणे देय ठरत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०४-२००६ रोजी त्यांच्या पत्राव्दारे एकूण ३६ जणांची त्यांच्या कार्यालयात अनुकंपा तत्वावर नेमणूक झाली असल्याचे कळविले. सदर माहिती त्यांच्याकडे तयार स्वरुपात उपलब्ध नव्हती, त्यांनी सध्याच्या कर्मचा-यांकडून ही माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३, ४ व ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अनुकंपा तत्वावरील नेमणुकीसंदर्भात वेळोवेळी जारी आदेशाच्या, परिपत्रकाच्या प्रती दिल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावरील आपला निर्णय अपिलार्थीस त्यांनी दिनांक ३०-०१-२००४ रोजी कळविला आहे व त्याची प्रत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-०४-२००६ रोजीच्या पत्राबरोबर दिली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे. याचबरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस दिनांक ०७-०४-२००६ व दिनांक १२-०६-२००६ रोजी माहिती पुरविली आहे, तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्व माहिती साक्षांकीत करुन दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी-पासून कोणतीही माहिती असद्‌हेतूने दडवून ठेवल्याचे किंवा ती अपिलार्थीस देण्यास टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द झालेले नाही, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास

अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये प्रतिसाद दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर त्यांनी, अपिलार्थीस उर्वरित माहिती देखील दिलेली आहे, हे पाहता संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीचा दिनांक १४-०६-२००६ रोजीचा अर्ज ज्या कर्मचा-याने गहाळ केला आहे, त्या कर्मचा-यावर जन माहिती अधिकारी यांनी आता प्रचलीत सेवा नियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीचा दिनांक १४-०६-२००६ रोजीचा अर्ज ज्या कर्मचा-याने गहाळ केला आहे, त्या कर्मचा-यावर जन माहिती अधिकारी अथवा सक्षम प्राधिकरणाने, प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तद्नंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १८-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उमाकांत प्रकाश केरकर, व्दारा – नंदकुमार किसन दरवडे, नेहरु रोड, देना बँकेजवळ, मनमाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, मनमाड नगरपरिषद कार्यालय, मनमाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपिल

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११७५

निर्णय दिनांक १८-०६-२००८

श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर, : अपिलार्थी
"शांताई", रामनगर, पिंपळनेर,
तालुका साक्री,
जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(ग्रामपंचायत विभाग), जिल्हा परिषद,
धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, धुळे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, धुळे

जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, धुळे

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अमर शिंदे, जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, धुळे

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मिलिंद धांडे, जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे पिंपळनेर येथील वाढीव गावठाणामध्ये केलेल्या अतिक्रमणाबाबत दिनांक २१-०३-२००० रोजीच्या व दिनांक १९-०४-२००० रोजी दिलेल्या नोटीसबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> " मौजे पिंपळनेर येथील वाढीव गावठाण स. नं. ६८६/अ, मधील नाल्याच्या प्रवाह मार्गात अतिक्रमणाने निवासी घराचे बांधकामास २१/३/२००० चे अर्जाने घेतलेली हारकत व दि. १९ एप्रिल २००० रोजी दिलेल्या वकिला-मार्फत नोटीसबाबत.
>
> माहितीच्या विषय (i) मध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. २१ मार्च २००० च्या हारकत अर्ज तथा २० एप्रिल २००० च्या नोटीशीअंती आपल्याकडून झालेल्या चौकशी व कार्यवाहीच्या संचिकेमधील संपूर्ण कागदपत्रांच्या नक्कला मिळणेबाबत. "

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे, त्यांच्या दिनांक २५-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा अर्ज ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, पिंपळनेर यांच्याकडे पाठवून दिला व त्याची प्रत अपिलार्थीस पाठविली. या पत्रामध्ये त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री व ग्रामविकास अधिकारी,

ग्रामपंचायत पिंपळनेर यांना, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्याचे निर्देशीत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०९-२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. सदर अपिल अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना उद्देशून केल्याचे दिसून येत आहे.

सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आज आयोगासमोर कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-११-२००६ रोजी व्दितीय अपिल केले आहे.

राज्य माहिती आयोगाकडे अपिल केल्यानंतर अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांचे दिनांक १०-११-२००६ चे पत्र प्राप्त झाले असून त्या पत्रामध्ये त्यांनी, अपिलार्थीचे अपिल निकाली काढले असल्याचे त्यांना कळविले आहे. सदर निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देता घेतला असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर सुनावणी प्रथम घेणे आयोगास गरजेचे वाटते. तेव्हा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या कडे केलेल्या या विषयावरील दिनांक ०६-०९-२००६ रोजीच्या अपीलावर त्यांनी हे

आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. सदर सुनावणीसंदर्भात त्यांनी अपिलार्थीस किमान १० दिवस पूर्व सुनावणी नोटीस देणे आवश्यक राहील. अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर सुनावणी-साठी होणारा संभाव्य विलंब आयोगातर्फे क्षमापित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थीस राज्य माहिती आयोगा-कडे व्दितीय अपिल करण्यास मुभा राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०६-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपीलावर हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सुनावणी घेऊन निर्णय घ्यावा.

३. प्रथम अपीलासाठी होणारा संभाव्य विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १८-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर, “शांताई”, रामनगर, पिंपळनेर, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यायलीन अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग,

जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११७६

निर्णय दिनांक : १९.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री.अतिक अहमद कमाल अहमद,<br>रा. मालेगाव जि.नाशिक. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा मुख्याध्यापक, मालेगाव हायस्कुल,<br>रौनकाबाद, मालेगाव, जि.नाशिक<br>२ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा सचिव, अंजुमन मोईनुत-तुलबा,<br>मालेगाव जि.नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. अतीक अहमद मो.शाबान, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मालेगाव हायस्कुल, रौनकाबाद, मालेगाव,जि.नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सरोज अहमद मो. मुस्तफा दुलार, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अंजुमन मोईनुत तुलबा, मालेगाव, जि.नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी, असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. अतिक अहमद कमाल अहमद (यापुढे त्यांना अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १०.७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शिक्षक भरतीचे संदर्भात केलेल्या अर्जाबाबत एकूण ६ मुद्यांवर २००५ ते २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" १) दि. ६.२.२००६ रोजी मा. आमदार श्री. शेख रशिद शेख शफि यांचे लेटर हेड वर जे शिक्षण अधिकारी यांनी स्टे ऑर्डर दिलेला होता. त्याची सर्टिफाय कॉपी मिळावी.

२) शिक्षण अधिकारी यांनी जो स्टे ऑर्डर रद्द केला आहे तर त्या रद्द केलेली ऑर्डरची सर्टिफाय कॉपी मिळावी.

३) तसेच दि. ४/७/२००६ रोजी शामनामा वर्तमान पत्रामध्ये जे जाहिरात निघाली आहे, त्यामध्ये शिक्षण उपसंचालकचे नाहरकत दिलेले आहे. तर त्या नाहरकत दाखलाची सर्टिफाय नक्कल मिळावी.

४) दिनांक ४/७/२००६ ची जाहिरात काढण्याचे अगोदर ऐम्पायमेन्ट एक्सचेंज कडून यादी मागविण्यात आली होती का ? जर मागविण्यात आली तर त्याची सर्टिफायन कॉपी मिळावी.

५) बाल प्रकल्प विभाग व समाज कल्याण विभागाकडून यादी मागविण्यात आली होती का ? जर असेल तर त्याची सर्टिफायन कॉपी मिळावे.

६) आपले हायस्कुल मध्ये स्पोटर्सचे साहित्य घेण्यात आले ते स्टॅन्र्डड स्पोटर्स मधुन घेण्यात आले आहे तरी किती रक्कमेचे स्पोर्टसचे साहित्य घेण्यात आला होता तसेच त्याची पूर्ण साहित्याची रक्कम

सदरील दुकान संगमेश्वर मालेगाव येथील मालकास आजपर्यंत का देण्यात आली नाही. याचा खुलासा देण्यात यावे."

अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्टाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.- १०.८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील एकूण ६ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १,३ व ६ च्या संदर्भात माहिती दिली आहे. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पूरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३०.०९.२००६ रोजी प्रथम अपिल सादर केले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र या संदर्भात त्यांनी अपिलार्थी यांना दि. २७.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकाराच्या नियंत्रणाखाली त्यांची संस्था येत नसल्याचे कळविले आहे. सदर संस्था अल्पसंख्यांकाची असल्यामुळे सदर संस्थेला माहितीचा अधिकार कायद्याच्या तरतुदी लागू नाहीत, असे त्यांचे म्हणणे असल्याचे या पत्रावरुन दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत.

“ The appeal against the respondent is not tenable in Law. The right to information Act, 2005 is not applicable to the respondent The Trust Anjuman Moinut Tulba Malegaon is running school and having

the Status of Minority. The Act is applicable to the Government institution. The present respondent does not fall on within the mischief of the said act.”

सदर पत्र या संस्थेचे सचिव यांनी संबंधित संस्थेचे सचिव या नात्याने अपिलार्थीस लिहिले असल्याचे दिसून येते. त्यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.११.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दा क्र. २,४ व ५ च्या संदर्भात माहिती देतांना कोणतेही अभिप्राय त्यांच्या दि. १०.८.२००६ रोजीच्या पत्रामध्ये व्यक्त केले नाहीत अथवा या संदर्भात त्यांनी कोणताही खुलासा केला नाही. त्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूरी माहिती पुरविली गेली असल्याचे सिध्द होत आहे. तसेच संबंधित संस्थेच्या सचिवांनी त्यांच्या दिनांक २७.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला निर्णय हा बेकायदेशीर असून, या संस्थेला शासनाचे अर्थसहाय्य मिळत असल्याने, या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत आहे. त्यामुळे त्यांनी आता उर्वरित माहिती संस्थेकडून विनामूल्य देण्याची व संबंधितांवर माहितीचा अधिकार अधिनियमाचे उल्लंघन केल्याने शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १०.७.२००६ रोजीच्या अर्जामध्ये विचारलेल्या माहिती संदर्भात त्यांच्याकडे जी कागदपत्रे उपलब्ध होती, ती त्यांनी त्यांच्याकडील दि. १०.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पुरविली. तथापि जी कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत ते ती अपिलार्थीस कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीस त्यांनी मुद्दा क्र. २,४ व ५ ची माहिती दिली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ मधील कथित स्टे रद्द करण्याचे शिक्षणाधिकारी यांचे आदेश त्यांना प्राप्त झाले नाहीत. मुद्दा क्र. ४ व ५ च्या संदर्भात त्यांनी असे सांगितले की, शिक्षक भरतीच्या दि. ४.७.२००६ ची जाहीरात देण्याअगोदर त्यांनी एम्लॉयमेंट एक्सचेंजकडून तसेच बालप्रकल्प विभाग व समाजकल्याण विभाग यांच्याकडून इच्छूक उमेदवारांची यादी मागविली होती. परंतु ती संबंधितांकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेल्या याद्यांच्या प्रती त्यांना पुरविता आल्या नाहीत. अशाप्रकारची मागणी त्यांच्या संस्थेच्या कार्यालयाकडून केली जाते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि.६.११.२००७ पासून कार्यरत असून प्रथम अपिलावरील निर्णय त्यांच्या आधीचे सचिव श्री. अर्शद हुसेन अन्सारी यांनी दिला होता.त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, त्यांच्या मते माहिती अधिकार अधिनियम त्यांच्या संस्थेस लागू होत आहे. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या संदर्भात केलेल्या त्यांच्या दि. २७.९.२००६ च्या पत्रातील भाष्याशी ते सहमत नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, प्रथमतः अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या एकूण ६ मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र. ६ वगळता उर्वरित ५ ही मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहेत.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मुद्दा क्र.६ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून "...पूर्ण साहित्याची रक्कम सदरील दुकान संगमेश्वर मालेगाव येथील मालकास आजपर्यंत का देण्यात आली नाही. याचा खुलासा देण्यात यावे." अशी खुलासेवजा माहिती मागितला आहे.अपिलार्थीच्या या मुद्यावरील माहिती 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते.माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबाबत अथवा कोणत्याही निर्णयाबाबत अर्जदारास कारणे अथवा खुलासे देणे अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस मुद्दा क्र. १ ते ५ या पाच मुद्यांवरील माहिती देय ठरते. या पैकी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र. १ ते ३ संदर्भात आवश्यक व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली असून मुद्दा क्र. २,४ व ५ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १०.८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे कोणतीही माहिती पुरविली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ संदर्भात शिक्षणाधिकारी यांनी स्टे ऑर्डर रद्द केल्याचे आदेश निर्गमित केल्याचे त्यांना माहिती नाही, असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. मुद्दा क्र. ४ व ५ च्या संदर्भात शिक्षक भरतीचे काम संबंधित

संस्थेकडून होत असल्याने या संदर्भातील माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही, असे त्यांनी सांगितले. जर ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने माहितीची मागणी करतेवेळी नव्हती, तर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित संस्थेस पाठवून ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना विनंती करुन त्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस देणे हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(i) मध्ये अभिप्रेत आहे. परंतु अशाप्रकारची कुठलीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी येथे केलेली नाही. संस्थेचे कार्यालय व मुख्याध्यापक यांचे कार्यालय हे एकाच इमारतीत असूनही त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्याकरिता संस्थेकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ च्या संदर्भात कोणतीही विचारणा/विनंती केली नाही. अथवा अपिलार्थीस माहिती देण्याच्यादृष्टीने कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. संबंधित शिक्षण संस्था व कनिष्ठ महाविद्यालय हे एकाच सार्वजनिक प्राधिकरणाचे दोन वेगवेगळे भाग असल्याने, आता जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ व ५ च्या संदर्भात माहिती त्यांना द्यावी लागेल.माहिती देण्यासाठी विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ७(६) अन्वये त्यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात देखिल वर म्हटल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या या अर्जाची प्रत संबंधित शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे पाठवून त्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी त्यांना विनंती करणे, त्यांना भाग होते, तथापि या मुद्यावर देखिल त्यांनी माहिती देण्यासाठी कोणत्याही प्रकारे प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध

करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. आता त्यांनी शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती हस्तगत करुन घेणे व त्याची प्रत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देणे त्यांना भाग आहे.

वरील घटनाक्रम पाहिला असता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जरी सरळ व साधी होती तरीही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्याच्या दृष्टीने कोणतेही सकारात्मक प्रयत्न कोणत्याही टप्प्यावर केल्याचे आयोगास आढळून येत नाहीत. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज शिक्षणाधिकारी व संबंधित संस्थेकडे पाठवून देऊन त्याची एक प्रत अपिलार्थीस देऊन अधिनियमातील कलम ६ (३)(i) प्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे होते. असे असूनही त्यांनी या तरतुदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही न करुन व अपिलार्थीस योग्य ते मार्गदर्शन न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे.

प्रसंगावशात् जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतांना त्यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांनी एम्लॉयमेंट एक्सचेंज, बालप्रकल्प व समाजकल्याण विभागाकडून इच्छुक उमेदवारांची यादी मागविली होती. तथापि संबंधित विभागाकडून इच्छुक उमेदवाराची यादी प्राप्त झाली नाही.जन माहिती अधिकारी यांच्या विधानावरुन संबंधित संस्थेने खरोखरीच संबंधित विभागाकडून इच्छुक उमेदवारांची यादी मागविली होती किंवा कसे याबाबत संदेह निर्माण होत असून या प्रकरणी शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या

या विधानाची व संबंधित संस्थेची या कालावधीतील नोकर/शिक्षक भरती प्रकरणाची सखोल  चौकशी करुन त्यावर योग्य ती कार्यवाही करावी.

जन अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णय पाहता त्यांची संस्था अल्पसंख्यांक असल्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम लागू नाही, असे त्यांच्या संस्थेच्या तत्कालीन सचिवांनी मत प्रदर्शित करुन व " The present respondent does not fall on within the mischief of the said act. " अशाप्रकारचे विधान करुन माहिती अधिकार अधिनियमाचा अवमान केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सदर संस्था ही शासन मान्यताप्राप्त व शासनाकडून अनुदान प्राप्त होणारी अशी संस्था आहे, अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहे व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील सर्व तरतुदी जशाच्यातश्या या संस्थेस लागू आहेत, याची नोंद संबंधित संस्थेच्या सचिवांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व अशाप्रकारची आयोगाचा उपमर्द करणारी भाषा त्यांनी येथून पुढे वापरु नये, अशी त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.त्यांच्या या विधानाची शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग यांनी यथायोग्यरित्या दखल घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आह.

## आदेश

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या मुद्दा क्र. २,४ व ५ च्या संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यपध्दतीबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १९.०६.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अतिक अहमद कमाल अहमद, ७५३, नवापूरा, गल्ली नं.११, मालेगाव जि. नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मालेगाव हायस्कुल व ज्यू कॉलेज,रौनकाबाद मालेगाव जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अंजुमन मोईनुत तुलबा, १६८/१, नयापूरा वॉर्ड, मालेगाव जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११७७

निर्णय दिनांक : १९.०६.२००८

१ श्रीमती भावना दगडूलाल प्रजापती : अपीलार्थी
रा. मालेगाव जि. नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा वरिष्ठ लिपीक,
आरोग्य विभाग,
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव
जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा आरोग्य अधिकारी,
मालेगाव महानगर पालिका, मालेगाव
जि.नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: वरिष्ठ लिपीक,आरोग्य विभाग, मालेगाव महानगरपालिका,मालेगाव जि.नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्रीमती भावना दगडूलाल प्रजापती (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुकलाल माधव सावळे, जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, आरोग्य विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

जि.नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. भरत बुधेसिंग वाघ, जन अपिलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १९.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदासाठी त्यांच्या कार्यालयात दि. १७.७.२००६ रोजी झालेल्या मुलाखतीसंदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " प्रयोगशाळा तंत्रज्ञांची दिनांक १७.६.२००६ रोजी घेतलेल्या मुलाखतींची माहिती मिळणेबाबत निवड झालेल्या उमेदवारांची व मला डावललेबाबतचे कारणांची व मार्कांची सविस्तर माहिती मिळणे तसेच निवड कोणत्या आधारावर केली याबाबत सविस्तर माहिती मिळणेबाबत."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०७.०७.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खालीलप्रमाणे माहिती दिली.

> " दिनांक १७.०६.२००६ रोजी प्रयोगशाळा तंत्रज्ञांची निवड शैक्षणिक पात्रता (B.Sc. DMLT) प्राप्त गुणांचे ७५% गुण अधिक लेखी चाचणीत प्राप्त गुण + मौखिक चाचणीत मिळालेले गुणांचे एकुणांचे आधारे ज्येष्ठतानुसार करण्यात आली.

सदर चाचणीत आपणास एकुण ६२१/- गुण प्राप्त झालेले आहे. आपल्या पेक्षा जास्त गुण मिळालेल्या गुणधारक उमेदवारांची निवड करण्यात आली ."

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.०८.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ४.९.२००६ रोजी सुनावणी घेतली व या संदर्भातील आपले आदेश दि. २५.९.२००६ रोजी पारित केले. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही निश्चित स्वरुपात आदेश दिलेले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०१.२००७ रोजी द्वितीय अपिल सादर केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उत्तर देण्यास टाळाटाळ केल्याचे नमुद करुन, जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या परीक्षेत त्यांचा तिसरा क्रमांक येऊनही त्यांनी दहाव्या क्रमांकाच्या उमेदवाराची निवड कशी केली याची माहिती त्यांना हवी असल्याचा मुद्दा या अपिलामध्ये उपस्थित केला आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदावरील नेमणूकीकरता अर्ज केला होता. या पदावर जन माहिती अधिकारी यांनी लेखी व तोंडी परीक्षा घेतली असता त्या लेखी परीक्षेत गुणानुक्रमे तिसऱ्या आल्या व तोंडी परीक्षेत देखिल त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली आहेत. तथापि

जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या दहा उमेदवारांच्या निवडीमध्ये देखिल त्यांना स्थान प्राप्त होऊ शकले नाही. या सर्व पात्रता धारण करुनही त्यांची निवड का होऊ शकली नाही, याबाबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती. सदर माहिती त्यांनी व्यक्तीशः मागवून देखिल जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांचे कार्यालयातील शिपायाकरवी त्यांचे दि. ७.७.२००६ रोजीचे चे पत्र दिले. तसेच त्यांनी १५ दिवसांचे आत माहिती मागवूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना २२ दिवस इतक्या विलंबाने दिली आहे. त्यांनी लेखी व तोंडी परिक्षेत कशाच्या आधारे गुण दिले गेले हे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत अवगत झाले नाही. त्यांना सदर मुलाखतीमधील इतर उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांची यादी पहावयाची आहे व त्यांना मुलाखतीमध्ये का डावलण्यात आले, याची त्यांना माहिती हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १९.०६.२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहिती संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दि. ०७.०७.२००६ रोजीच्या पत्राद्वारे आपली भूमिका स्पष्ट करुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(ङ) मधील तरतुदीन्वये अपिलार्थीस देण्यात आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १०.८.२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर त्यांनी दि. २५.९.२००६ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात आले होते व अपिलार्थीचे पेपर (उत्तरपत्रिका) अपिलार्थीस दाखविल्यास माहिती अधिकार

अधिनियम ८(ङ) चे उल्लंघन होत असल्याने,त्यांची मागणी त्यांनी फेटाळली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपात आहे. या अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदावर निवड होण्यापासून डावलले गेल्याबाबतची कारण विचारली आहेत आणि निवड कोणत्या आधारे केली, याबाबत सविस्तर माहिती विचारली आहे.अपिलार्थीने आयोगासमोर केलेल्या युक्तीवादावरुन अपिलार्थीस सविस्तर माहिती म्हणजे मुलाखतीस पात्र ठरविलेल्या सर्व उमेदवारांचे गुण व त्यांना तोंडी परीक्षेत मिळालेले गुण पहावयाचे असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये फक्त ‘सविस्तर माहिती’ असा उल्लेख केलेला आहे. अशाप्रकारच्या मोघम उल्लेखामुळे अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे, याचा जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अभिप्रेत असलेला अर्थबोध व्हावा, ही अपिलार्थीची अपेक्षा चुकीची आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यादृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०७.०७.२००६ रोजी दिलेले उत्तर आयोगास योग्य वाटते. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाकरिता डावलल्याची कारणे विचारली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कारणे विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ती पुरविणे अभिप्रेत नाहीत, हे अधिनियमातील कलम २(च) मधील ‘माहिती’ या

शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता दिसून येते, त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील या मुद्यावरील माहिती देय ठरत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नसल्याचे आयोगास अवगत केले आहे, अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीची त्यांना त्यांच्या प्रथम अर्जात नीट मांडणी करता न आल्याने त्यांचे समाधान होईल, अशी माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांना प्राप्त होऊ शकली नाही, असे येथे दिसून येत आहे.त्यांच्या युक्तीवादावरुन प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदासंबंधातील नस्तीची पहाणी त्यांनी केल्यास त्यांचे समाधान होऊ शकेल, असे आयोगास वाटते. अर्थात, याकरिता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळ्याने अर्ज करावा लागेल. याबाबत जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, अपिलार्थीचा अशाप्रकारचे अभिलेखे व नस्ती पहाणीबाबतचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यावर सात दिवसांचे आत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार निर्णय घेऊन अपिलार्थीस त्याप्रमाणे कळवावे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी समक्ष माहिती अपेक्षित केली असतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील शिपायाद्वारे ही माहिती पाठविली. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्या जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दोन वेळा त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी हजर झाल्या होत्या. तथापि या संदर्भातील कोणताही ठोस पुरावा त्या आयोगासमोर सादर करु शकल्या नाहीत. परंतु या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी या स्वतः माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही हजर झाल्या नाहीत, मात्र त्यांनी त्यांचे प्रतिनिधीस ही माहिती

घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात पाठविले होते, असे आयोगास सांगितले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार 'व्यक्तीशः' माहिती मागविणे याचा अर्थ अपिलार्थीने स्वतः संबंधित जन माहिती यांचे कार्यालयात उपस्थित राहून अपेक्षित माहिती हस्तगत करणे अथवा जर सदर माहिती त्यांना त्यावेळी प्राप्त झाली नाही तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते उपस्थित होते, याबाबत त्यांचे कार्यालयात नोंद करुन ठेवणे, असे होय. या प्रक्रियेमध्ये अपिलार्थी यांनी स्वतः व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहणे अभिप्रेत आहे. त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांचे प्रतिनिधीस पाठविणे हे 'व्यक्तीशः' या संज्ञेत अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीने जर व्यक्तीशः माहिती मागितली असेल तर तीच माहिती अपिलार्थीस प्राप्त होऊ शकेल परंतु त्यांच्या प्रतिनिधीला ती प्राप्त होऊ शकणार नाही. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना २२ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याचे आयोगासमोर त्यांच्या युक्तीवादामध्ये म्हटले आहे, तथापि हे विधान करतांना त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी अधिनियमातील त्यांना अनुज्ञेय कालावधी लक्षात घेतलेला नाही, तो लक्षात घेता, उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये योग्य तो प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचा हा मुद्दा फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचना लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या त्यांच्या प्रथम अर्जात नीटपणे केलेली नाही. त्यांनी आयोगासमोर उपस्थित केलेले सर्व

मुद्दे आयोगाकडून वरीलप्रमाणे फेटाळून लावण्यात येत असल्यामुळे, त्यांचे सदर अपिल फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९.०६.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती भावना दगडूलाल प्रजापती ६५३-ब, मोडक गल्ली, मालेगाव कॅम्प, मालेगाव जि. नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक,आरोग्य विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी,मालेगाव महानगर पालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११७८

निर्णय दिनांक : १९.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री.रविंद्र नंदलाल लढे,<br>जळगाव | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहादा, जि. नंदुरबार | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहादा, जि.नंदूरबार | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रविंद्र नंदलाल लढे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. प्रदिप जयंत पवार, जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहादा, जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. ललीत दत्तात्रय ठाकुर, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहादा, जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल)हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १०.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १९.१२.२००५ रोजी दिलेल्या अर्जाच्या चौकशी अहवालाबाबत खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" मी दि. १५/१२/२००५ रोजीचा अर्ज १९/१२/२००५ रोजी वि.का.शहादा येथे दिला होता. झेराक्स प्रत जोडली आहे. त्यात म्हटल्याप्रमाणे claim काढण्यासाठि तळोदा उ. वि.तुन रु.२००/- गोळा केले जातात या भ्रष्टाचाराची केलेली चौकशीचा अहवाल की प्रकरण दडपले गेले त्याचा तपशील"

अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. या बाबीमुळे अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३१.०८.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली गेली नाही अथवा या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार अपिलार्थीशी त्यांच्याकडून केला गेला नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१२.२००६ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपिल अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे नमुद करुन, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता

आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर सुनावणी घेतली नाही त्यामुळे त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल सादर करावे लागले, या अपिलाच्या सुनावणीला हजर रहाण्यासाठी त्यामुळे त्यांना एकूण २३२/- इतक्या रकमेचा नाहक भुर्दंड पडला आहे. या रकमेमध्ये जळगाव ते औरंगाबाद (येणे-जाणे) या प्रवासासाठी रु.२१२/- व औरंगाबाद बसस्थानकापासून आयोगाच्या कार्यालयापर्यंत येण्यासाठी रु.२०/-(येणे-जाणे) चा समावेश आहे. या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी आयोगाकडे रु.२३२/- इतक्या नुकसान भरपाईचा अर्ज सुनावणीच्या वेळी सादर केला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाला त्यावेळी ते याच पदावर कार्यरत होते, तथापि अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर लागलीच वैद्यकीय कारणास्तव ते रजेवर राहिल्यामुळे, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांना पुरविता आली नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ते पाच दिवसांचे आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर माहे डिसेंबर,२००७ पासून कार्यरत असून अपिलार्थीने प्रथम अपिल करतेवेळी श्री. परदेशी नावाचे अधिकारी कार्यरत होते. सध्या ते पुणे जिल्हयातील मंचर येथे कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी अपिलार्थीच्या अपिलावर सुनावणी का घेतली नाही, याची कारणे त्यांना अवगत नाहीत. त्यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केलेल्या लिपीकाचे स्पष्टीकरण विचारले व संबंधित लिपीकाचे स्पष्टीकरण त्यांना दि. १७.६.२००८ रोजी प्राप्त झाले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या

मूळ अर्जाद्वारे त्यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शहादा यांच्याकडे दि. १५.१२.२००५ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर त्यांनी नेमकी कोणती कार्यवाही केली या संदर्भात माहितीची मागणी केली आहे.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत साधे, सरळ व सोपे होते. अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जा-मध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या तक्रार अर्जावरील अंतीम निर्णय त्यांनी अपेक्षिला नव्हता, मात्र या संदर्भात झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित होत्या किंवा त्यांच्या पत्रावर जर कोणतीही कार्यवाही केली गेली नसेल तर, त्याबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित होती. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल त्यांच्या प्रथम अपिल अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील अनुक्रमे कलम ७(१) चा व कलम १९(६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील निष्क्रियता व कर्तव्य परायणतेचा अभाव पुरेपूर स्पष्ट केला आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीची पायमल्ली सार्वजनिक प्राधिकरणाकडून कशी केली जाते, याचे हे प्रकरण म्हणजे उत्तम नमुना ठरला आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व त्याद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन, स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. तसेच आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या तक्रार अर्जासंदर्भात त्यांच्या युक्तीवादामध्ये आवश्यक तो खुलासा केला आहे. अपिलार्थीच्या अर्जावर त्यांनी संबंधित लिपीकाचे

म्हणणे मागवून घेतले व संबंधित लिपीकाने दि. १७.६.२००८ रोजी म्हणजे आजच्या सुनावणीच्या दोन दिवस आधी त्यांचे म्हणणे सादर केले आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या दि. १५.१२.२००६ रोजीच्या अर्जानंतर या तक्रारीसंदर्भात त्यांच्या वरिष्ठांशी किंवा कनिष्ठांशी जो काही पत्रव्यवहार झाला, त्याच्या प्रती माहिती अपिलार्थीस पुरविणे सर्वसाधारण परिस्थितीत अपेक्षित होते. तथापि त्यांनी याबाबत अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही. या प्रकरणात अपिलार्थीच्या तक्रारीसंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सर्व प्रती त्यांना आता अपिलार्थीस, विहित मुदत व्यपगत झाल्याने, मोफत पुरवाव्या लागतील. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. तसेच व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मुंबई यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अशा प्रकारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई दोन महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगाकडे सादर करावा.

प्रसंगावशात् येथे आज सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांना झालेला खर्च रु.२३२/- इतकी नुकसान भरपाई त्यांना मंजूर करण्याची विनंती आयोगास केली आहे. या नुकसान भरपाईचा तपशील त्यांनी आज युक्तीवादामध्ये दिला आहे. उपरोक्त प्रकरणी त्यांना मूळ अर्जाद्वारे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रु. २३२/- इतका नाहक भुर्दंड पडल्याचे आयोग मान्य करत असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(८) (ख) प्रमाणे रु.२३२/- इतकी रक्कम नुकसान भरपाईपोटी जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसांचे आत द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित मुंबई यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई दोन महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगाकडे सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रु.२३२/-इतकी नुकसान भरपाई हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसांचे आत द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९.०६.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री.रविंद्र नंदलाल लढे,१६ गणेश कॉलनी, जळगाव-४२५ ००१.

२ जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहादा, जि. नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहादा, जि. नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड,मुंबई, वांद्रे (पूर्व), इंडियन ऑईलसमोर-४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११७९

निर्णय दिनांक : १९.०६.२००८

१ श्री. दौलत कचरु शेलार, : अपीलार्थी
रा. ओझर (मिग) ता.निफाड, जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी,
निफाड विभाग,निफाड, जि.नाशिक
२ जन अपिलीय अधिकारी,
तथा जिल्हाधिकारी, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपविभागीय अधिकारी, विभाग निफाड, जि.नाशिक
जन माहिती अधिकारीः अपर जिल्हाधिकारी, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. दौलत कचरु शेलार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. चंद्रशेखर संपतराव देशमुख, नायब तहसीलदार, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,विभाग निफाड जि.नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.२२.०५.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या आर.टी.एस /अपील २५/१९९६ दि. १९.१.१९९६ रोजीच्या अपिलावरील निर्णयासंदर्भात सन १९९६ ते २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" आपणाकडे मी दाखल केलेले आर. टी. एस./अपिल २५/१९९६ दि. १९/०१/१९९६ अन्वये मौजे ओझर येथील गट नं. १२१ मधील नोंद नं. ३९१७ व ४०११ या नोंदींना प्रथम स्थगिती व नंतर १०/०८/९६ रोजी रद्द चा आदेश देण्यात आलेला होता.

१) दि. २८/०१/२००० रोजी आर.टी.एस./अपिल २५/९६ नुसार स्थगिती किंवा रद्दपैकी कोणता आदेश कायम होता.

२) या आदेशाचा अंमलाचा कालावधी (दिनांकापासुन दिनांकापर्यंत)

३) या आदेशाचा भंग केलेला असल्यास संबंधीत कर्मचाऱ्याविरुध्द कोणत्या अधिकाऱ्याकडे तक्रार केली पाहिजे. त्यांचे नाव व हुद्दा "

अपिलार्थीने सदर माहिती पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी खालीलप्रमाणे उत्तर दिले.

" आपणास संदर्भिय अर्जाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, मौजे ओझर ता. निफाड येथील नोंद नं.३९१७ व ४०११ बाबत या कार्यालयात आरटीएस/अपील/२५/१९९६ चे अपील दाखल झाले होते. सदर अपिलाचा निर्णय गुणवत्तेनुसार देणेत आला आहे. सदर अपिलाचे निर्णयाविरुध्द म.अपर जिल्हाधिकारी,नासक यांचेकडेस अपील दाखल झालेले असून अद्याप अंतिम आदेश पारित झालेले नाहीत. त्यामुळे आपण संदर्भिय अर्जाद्वारे मागविलेली माहिती देता येत नाही. या कार्यालयाची संचिका प्राप्त झालेनंतर संदर्भिय अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आपणास देणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी. सबब आपला संदर्भिय अर्ज निकाली काढला असे. कळावे"

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १२.७.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जावर काहीही कार्यवाही केली नाही व माहिती देण्यास टाळाटाळ केली असे नमुद करुन, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर दि.०७.०८.२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंबंधीचे आपले आदेश दि. ७.८.२००६ रोजीच पारित केले. या अपील आदेशात त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.६.२००६ रोजी दिलेले उत्तर बरोबर असल्याचे व उर्वरित माहितीची संचिका त्यांचेकडे प्राप्त झाल्यावर माहिती देण्यात येईल, असे अभिप्राय देऊन अपिलार्थीचे अपिल फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.११.२००६ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपिल

अर्जामध्ये  त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती न देता त्यांचे अपिल फेटाळले, असे नमुद करुन त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ओझर येथील गट नं. १२१ मधील नोंदणी क्रमांक ३९१७ व ४०११ च्या तत्कालीन नोंदीची माहिती त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे हवी आहे. या संदर्भात दि. २८.१.२००० रोजी या नोंदीची तत्कालीन स्थिती काय होती, याची त्यांना माहिती हवी आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये, त्यांच्या कार्यालयातील संचिका या निर्णयाशी संबंधित अपिलासोबत अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे असल्याने अपिलार्थीस ही माहिती देण्यास नकार दिला. या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना सदर संचिका अपर आयुक्त, नाशिक यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन, ती अपिलार्थीस देता येणे शक्य आहे. आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांचे आत सदर माहिती अपिलार्थीस देता येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर नस्ती उपलब्ध नसल्याने त्यांना देता आली नाही व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दि. २२.५.२००६ रोजीच्या अर्जास त्यांच्याकडील दि. १६.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही ज्या नस्तीमध्ये उपलब्ध आहे, ती नस्ती आज रोजी अपर आयुक्त, नाशिक विभाग यांच्याकडे आहे. जन माहिती अधिकारी व अपर आयुक्त, नाशिक यांचे

कार्यालय हे एकाच प्राधिकरणाचे दोन वेगवेगळे भाग असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहिती त्या प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस पुरविणे माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे अभिप्रेत आहे किंवा अपिलार्थीने मागितलेली माहिती ही त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज ही माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे. त्या प्राधिकरणाकडे, अपिलार्थीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसांच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना अधिनियमातील कलम ६(३)(i)अन्वये भाग होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कृती न करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले, ही त्यांची कृती चुकीची आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाल्याने, जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ज्या नस्तीमध्ये उपलब्ध आहे, ती नस्ती संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. तसेच त्यांना असेही सूचित करण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी भविष्यात माहिती देण्यासाठी टाळाटाळ न करता प्रत्येक अर्जास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्रतिसाद देण्याची सतर्कता त्यांच्या कार्यशैलीमध्ये बाळगावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दौलत कचरु शेलार,महात्मा फुले चौक,ओझर (मिग) ता.निफाड, जि.नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,निफाड विभाग,निफाड, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११८१

निर्णय दिनांक : १९.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. खलील शेख शकील,<br>अंमळनेर, जि.जळगाव | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,<br>अंमळनेर, जि.जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा अधीक्षक,<br>भूमी अभिलेख, जळगाव | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. खलील शेख शकील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अशोक वामन अहिरराव, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, अंमळनेर, जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. शाम दत्तात्रय खामकर, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.१०.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी खरेदी केलेल्या अंमळनेर येथील जमिनीसंदर्भात  खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "१)म.सह.दुय्यम निबंधक, अमळनेर यांचेकडून सदर खरेदी खताचे एस.आर.आपले कार्यालयास प्राप्त झाले अथवा कसे याची माहिती मिळावी.
>
> २) म.सह.दुय्यम निबंधक अंमळनेर यांचेकडून खरेदी खताचे एस.आर.आपले कार्यालयास प्राप्त झाले नंतर किती दिवसात त्याची पूर्तता करणे आवश्यक असते याबद्दल आपले काही नियम असतील त्याची माहिती.
>
> ३) जास्त विलंबाबाबत शिस्त व अपील नियमानुसार कोणती कार्यवाही केली जाते याबद्दलची माहिती."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या माहितीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५.०८.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिल्याचे दिसून येते. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २९.०८.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.१०.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ३१.१०.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी त्यांच्या निर्णयासोबत

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. ५.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये कोणतीही माहिती कळविलेली नाही तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी सात दिवसांचे आत त्यांना आवश्यक असलेली माहिती तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडून घेऊन देण्याचे सांगितले नाही. त्यांनी अंमळनेर येथील सि.स.नं.१३९३ व १४१० या मिळकतीवर खरेदी केल्याप्रमाणे नाव दाखल करण्याबाबत अर्ज करुन त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने, त्यांनी दि. १०.७.२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियमाअन्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मागविली होती, असे नमुद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर केले आहे. या लेखी निवेदनामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात दि. ३१.१०.२००६ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. अधीक्षक भूमी अभिलेख, जळगाव यांनी त्यांच्या दि. ३१.१०.२००६ च्या आदेशामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.८.२००८ पर्यंत काहीही माहिती दिलेली नसतांना, शासकीय माहिती अधिकारी यांनी त्यांच्या त्यांनी दि.५.८.२००६ च्या पत्राने त्यांनी मागणी केलेली माहिती घेऊन जाण्याबाबत जो उल्लेख केलेला आहे , तो लबाडीचा आहे. जर प्रथम अपील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असती, तर तीच माहिती सुनावणीच्या वेळी त्यांना उपलब्ध करुन देता आली असती. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्यामुळेच, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या

आत घेऊन जावी, असे सांगितले होते. जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात माहिती उपलब्ध असतांना, त्यांचे मूळ अर्जामध्ये चुकीचे टाईप झालेल्या मुद्याचा त्यांनी उल्लेख करुन, अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले. प्रत्यक्षात सहायक दुय्यम निबंधक अंमळनेर यांच्याकडून मिळकतीचे दस्त जन माहिती अधिकारी यांना दि. ७.११.२००५ रोजी प्राप्त झाले होते. त्याप्रमाणे त्यांनी दि. ६.१२.२००५ पर्यंत मिळकत पत्रिका दुरुस्त करुन घेणे आवश्यक होते, परंतु तसे न करता दुय्यम निबंधक यांच्याकडून खरेदीखताची एस.आर. इकडील कार्यालयात प्राप्त झाल्यावर एक माह च्या आत त्याची पूर्तता होते, हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य नाही. तसेच त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ संदर्भात वरिष्ठ कार्यालयाच्या कक्षेतील बाब समजून त्यांना माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी टाळले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे व्यक्तीशः माहितीची मागणी करुन, ते ती माहिती घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात कधीही हजर झाले नाहीत. त्यामुळे सदर माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ५.८.२००६ च्या पत्रान्वये अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविण्यात आली. त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती पाठविल्यापृष्ठयर्थ त्यांच्या कार्यालयात दि. ५.८.२००६ च्या अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगची प्रत त्यांनी आयोगाकडे सादर केली आहे. यावरुन त्यांनी अपिलार्थीस दि. ५.८.२००६ रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दि. १३.१०.२००५ रोजी अमळनेर येथील सि.स.नं.१३९३ व १४१० पैकी काही जमीन खरेदी केली होती. या जमिनीच्या मालकीहक्काची नोंद घेण्यासाठी त्यांनी दि. १४.१०.२००५ रोजी सूची क्र. २ ची प्रत जोडून त्यांच्याकडे अर्ज केला होता. अपिलार्थीची मिळकतीची नोंद संबंधित मिळकत पत्रिकेवर दि. १.२.२००७ रोजी घेतलेली

आहे. सदर नोंद नियमाप्रमाणे त्यांच्याकडे अर्ज केल्यानंतर एक महिन्याचे आत घेणे त्यांना भाग होते. तथापि संबंधित परिरक्षण भूमापक यांच्याकडून विलंब झालेला आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना त्यांनी निर्णयात केलेले भाष्य सत्य आहे.जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ५.८.२००६ रोजी माहिती तयार होती व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दि. ५.८.२००६ रोजीच्या पत्राची प्रत त्यांच्या निर्णयासोबत अपिलार्थीस पाठविली. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये आयोगास पुढे असेही सांगितले की, त्यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी उपस्थित राहूनही रोजनाम्यावर सही करण्यास नकार देतात, अशा प्रकारचा अनुभव त्यांना या अपिलार्थी संदर्भात बऱ्याच वेळी आला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण तीन मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागिविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३०.१०.२००५ रोजी प्रथम अर्ज करतांना त्यासोबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे खरेदीखताची सहा.दुय्यम निबंधक, वर्ग-२ यांचेकडील सूची क्र.२ ची जोडली असल्याचे म्हटले आहे व या जमिनीवर मालकी हक्काची नोंद घेण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.१०.२००५ रोजी अर्ज केल्याचे त्यांच्या मूळ अर्जामध्ये म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या उत्तरामध्ये अपिलार्थीस या तारखेतील विसंगतीबाबत भाष्य केले आहे व अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे टाळले आहे, असे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दि. ५.८.२००६ रोजीच्या पत्रावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले असल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या

दि. ५.८.२००६ रोजीच्या पत्रावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले असल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ मध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे नियमांची मागणी केली आहे व हे नियमातील तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.५.८.२००६ रोजीच्या पत्रामध्ये कळविले आहेत. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या युक्तीवादामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दा क्र.२ च्या संदर्भातील युक्तीवाद आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र.३ द्वारे विलंबाबाबत शिस्त व अपील या नियमानुसार कोणती कारवाई केली जाते, याची माहिती मागितली आहे. या संदर्भात देखिल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.५.८.२००६ रोजीच्या पत्रामध्ये योग्य उत्तर दिल्याचे दिसून येते. फक्त त्यामध्ये त्यांनी, " शिक्षा ही बाब इकडील कार्यालयापेक्षा वरिष्ठ कार्यालयाशी संबंधित असून योग्य ती माहिती इकडील कार्यालय देऊ शकत नाही." असे अनावश्यक भाष्य त्या मुद्याबाबत केले आहे. हे वगळता सदर माहिती अपिलार्थीस तदतुदीप्रमाणे दिल्याचे दिसून येते. सदर भाष्य करतांना या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले, असे निःसंशयपणे सिध्द होत नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः माहितीची मागणी करुन, ते ही माहिती घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत,असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या उपस्थितीत आयोगास अवगत केले आहे.कोणत्याही अर्जदाराने ‘व्यक्तीशः’ माहितीची मागणी केल्यानंतर अर्जदाराने स्वतः होऊन, जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेणे,असा होतो.यामध्ये अर्जदाराने आपला प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाठविणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या प्रकरणी माहिती हस्तगत करुन घेण्यासाठीची संपूर्ण जबाबदारी अपिलार्थी यांची आहे. आयोगास

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित न राहता देखिल, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते, हे पाहता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगावशात् येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने खरेदी केलेल्या जमिनीसंदर्भातील नोंद त्यांचे नावे मिळकतपत्रिकेवर घेण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्याकडून विलंब झालेला आहे. संबंधित कर्मचाऱ्याने त्यांच्या कार्यशैलीमध्ये दर्शविलेल्या अशाप्रकारच्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबाबत व बेपर्वाइबाबत त्यांचेवर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची अधीक्षक, भूमी अभिलेख, जळगाव यांना शिफारस करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९.०६.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. खलील शेख शकील, कसाली मोहल्ला, मु.पो.ता.अमळनेर, जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,रेल्वेस्टेशन रोड, अमळनेर जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२६४

निर्णय दिनांक २०-०६-२००८

श्री. वसंत श्रीधर कानिटकर, : अपिलार्थी
मु. पो. ब्राम्हणवाडा, तालुका अकोले,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे – ३०
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा संचालक महाराष्ट्र राज्य
शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
पुणे – ३०

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप संचालक (प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – ३०

जन अपिलीय अधिकारी : सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – ३०

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. वसंत श्रीधर कानिटकर, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्रीमती रंजना रामभाऊ ठाकूर, जन

माहिती अधिकारी तथा उप संचालक (प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १९-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यापक विद्यालयामध्ये १९८७-८८ ते १९९७-९८ या कालावधीतील व्यवस्थापन कोट्यामध्ये किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला त्यांच्या यादीची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यापक विद्यालय मु. पो. कोतूळ ता. अकोले, जिल्हा अहमदनगर येथे असून सदर विद्यालय अल्पसंख्यांक मागासवर्गीय नवबौध्द समाजासाठी राखीव आहे. तरी या विद्यालयातील व्यवस्थापन कोटा भरण्यास आपली परवानगी होती आपले पत्र क्रमांक ३२४०/२००६ दि. १/८/२००६ नुसारच्या पत्रानुसार सदरील विद्यालयाची सन १९९६-९७-९८ ची यादी मिळावी. आपले माहितीकरता अध्यापक विद्यालये प्रवेश नियमावली व माहितीपत्रक नियम क्र. १२ नुसार आपले मार्फत माहिती मिळावी सोबत पुस्तिकेतील पान नं. – ६ ची झेरॉक्स प्रत ठेवली आहे. तसेच सदर विद्यालयातील व्यवस्थापन कोट्यातील सन १९८७-८८ ते सन १९९७-९८ अखेरच्या विद्यार्थ्यांच्या याद्या मिळाव्या. "

अपिलार्थीने त्यांच्या सदर माहितीसाठीच्या अर्जामध्ये माहिती व्यक्तिशः किंवा टपालाव्दारे हवी याबाबत काहीही म्हटलेले नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस संबंधीत अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य व सचिव हे अनुक्रमे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी असतात, आपण त्यांच्याकडून माहिती घ्यावी असे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यापक विद्यालय, कोतूळ, यांना देऊन त्यांना ८ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-१०-२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. अपिलार्थीने सदर अपिल अर्ज संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे केला. या अपिल अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास असे आणले की, संबंधीत प्राचार्याच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते गेले असता, संबंधीत प्राचार्य व सचिव यांनी शासनाच्या कोणत्याही खात्याचा पत्रव्यवहार त्यांच्याकडे होत नाही, असे त्यांना सांगून व उपमर्दकारक भाषा वापरुन त्यांना माहिती देण्यास नकार दिला आहे.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. मात्र, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील ०८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये दुसरे अपिल सक्षम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्याची सूचना दिली. त्याची प्रत त्यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांना देऊन अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे त्यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, संबंधीत अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य त्यांना कोणतीही माहिती देत नाहीत व माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेले असता त्यांना उपमर्दकारक भाषा वापरतात असे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही या अध्यापक विद्यालयाकडून हवी आहे. परंतु अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य व सचिव जे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी आहेत, ते त्यांच्याकडे माहिती मागण्यासाठी गेले असता त्यांनी त्यांना उपमर्दकारक भाषा वापरली व माहिती देण्याचे नाकारले, म्हणून त्यांना नाईलाजास्तव आयोगाकडे व्दितीय अपील करावे लागले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीने ज्या संस्थेसंदर्भात त्यांच्याकडे माहिती मागितली होती, ती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने, त्यांनी अपिलार्थीचा दिनांक १९-०९-२००६ रोजीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर, सदर माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे त्यांच्याकडे दिनांक २९-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविला व अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी त्यांना सूचित केले. अपिलार्थीने मागितलेली माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यापक विद्यालय, कोतूळ, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर या संस्थेशी संबंधीत होती. या संस्थेवर त्यांचे कोणत्याही प्रकारे नियंत्रण नाही, फक्त संस्थेची मान्यता काढून घेण्याकरिता त्यांच्या कार्यालयामार्फत शासनास प्रस्ताव सादर केला जातो. अपिलार्थीने ज्या कालावधीतील माहितीची मागणी केली आहे, त्या कालावधीमध्ये

झालेल्या शैक्षणिक प्रक्रियेशी त्यांच्या कार्यालयाचा कोणत्याही प्रकारे संबंध पोहोचत नव्हता. त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती, संबंधीत शिक्षण संस्थेचे प्राचार्य व संबंधित शिक्षणाधिकारी यांच्या कडे असणे अपेक्षित आहे. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती आता शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, अहमदनगर व शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस १० दिवसाच्या आत देण्यास त्या तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मुलतः त्यांचा माहितीसाठीचा अर्ज व त्यावरील अपिल अर्ज चुकीच्या प्राधिकरणाकडे केला आहे. उपरोक्त जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीचा प्रथम अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे पाठविला होता, मात्र अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे पाठविण्याऐवजी, त्यांच्याकडील दिनांक ०८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात दिलेले उत्तर योग्य नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने ज्या संस्थेसंदर्भात माहिती मागविली आहे, ती अल्पसंख्यांक संस्था असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर स्पष्ट केले आहे. अशा प्रकारच्या अल्पसंख्यांक संस्थेमध्ये १०० टक्के प्रवेश संबंधीत संस्थेचे व्यवस्थापन देते. व्यवस्थापनाने दिलेले प्रवेश, नियमाप्रमाणे आहेत किंवा कसे हे पाहण्याचे काम विभागीय शिक्षण उपसंचालक हे करत असतात त्यामुळे ही माहिती विभागीय उपसंचालकांकडे प्राप्त होऊ शकेल. अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे प्रथम अर्ज केला होता, त्यांनी जर सुरुवातीस अपिलार्थीचा अर्ज शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयाकडे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले असते तर, कदाचित अपिलार्थीला आयोगाकडे अपील करण्याची वेळ आली नसती. आता उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे कबूल केले

आहे. जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. सबब अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद<br>
दिनांक २०-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंत श्रीधर कानिटकर, मु. पो. ब्राम्हणवाडा, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप संचालक (प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – ३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – ३० यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२६५

निर्णय दिनांक २०-०६-२००८

श्री. जगदाळे निंबा मंगा, : अपिलार्थी
मु. पो. विरदेल, तालुका शिंदखेडा,
जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धुळे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, जवाहरलाल पंडितजी न्यू इंग्लिश स्कूल, शिरधाने (प्र. नेर), तालुका जिल्हा धुळे

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. जगदाळे निंबा मंगा, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. धनराज राघो बोरसे, जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, शिरधाने (प्र. नेर), (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. भगवान सदाशिव सुर्यवंशी, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९८८ ते १६-०२-२००६ या कालावधीतील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची शिक्षक मंजुरी व नेमणुकीसंदर्भात, जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. १९८८ नंतर नेमणूक झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची नेमणूक दिनांकासह, नावासह यादी व शिक्षक मंजुरी (अप्रुव्हल) ची कागदपत्रे - माहितीसाठी.

२. निंबा मंगा जगदाळे यांचे डुप्लीकेट सेवा पुस्तक - माहितीसाठी.

३. जाहिरात, जाहिरातीनुसार आलेले उमेदवार निवडण्यात आलेले उमेदवार, कोणत्या मुद्दयावर नेमणुक ती माहिती, संबंधीतांना नोकरीवर कायम करण्याचा विषयी माहिती."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे (मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, शिरधाने (प्र. नेर) ) उपलब्ध आहे, त्यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली.

जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे, अपिलार्थीस संबंधीत संस्थेकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने त्यांनी माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार परत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे याच माहितीकरिता दिनांक ०७-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी झाल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, संबंधीत संस्थेने त्यांना प्रथमतः दिशाभूल करणारे पत्र पाठविले, अपूर्ण व दिशाभूल करणारी कागदपत्रे देऊन, हेतूपुरःस्सर माहिती लपविण्याचे प्रयत्न केले असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना संबंधीत संस्थेच्या मुख्याध्यापकाने न पुरविता त्यांच्याशी दिशाभूल करणारा पत्रव्यवहार केला. मुख्याध्यापकाने त्यांना दिनांक २४-०३-२००६ रोजी लिहिलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीची मूळ व दुय्यम सेवा पुस्तिका त्यांनी नेल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांची शाळेतील शिक्षण सेवा ठराविक मुदतीची तात्पुरती व विना अनुदानित काळातील आहे ही दोन्ही कारणे वस्तुस्थितीस धरुन नाही. त्यांच्या मूळ व दुय्यम सेवापुस्तिका त्यांनी शाळेतून कधीही नेल्या नव्हत्या. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. या माहितीमध्ये त्यांच्या सेवापुस्तिकेची प्रत नाही व त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली जाहीरातीची प्रत त्यांना उपलब्ध झाली नसल्याने ती

त्यांना संस्थेकडून दिनांक १५-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेली माहिती, अपुरी आहे.

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या प्रकरणी ते स्वतः जन माहिती अधिकारी नसून, संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, शिरधाने (प्र. नेर) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्याकडील, अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांना दिनांक १२-०३-२००६ रोजी प्रथमतः प्राप्त झाला. या अर्जावर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २४-०३-२००६ रोजीच्या पत्राने प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्रत्यक्ष त्यांच्या कार्यालयाकडून घेऊन जाण्याचे सूचित केले. तदनंतर त्यांच्याकडील दिनांक १५-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीकडून या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५८ इतके त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन सदर माहिती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पुरविली. त्यांच्या या विधानाच्या पृष्ट्यर्थ त्यांनी आयोगास रजिस्टर्ड पोस्टाची पावती दाखविली.

अपिलार्थीच्या दिनांक ०७-०४-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे कोणताही युक्तिवाद नोंदविण्यात आला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, प्रथमतः

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील उपरोक्त प्रकरणी संबंधीत संस्थेचे मुख्याध्यापक व सचिव हे अनुक्रमे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी असतांना अपिलार्थीने प्रथम अर्ज व प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे केले. अपिलार्थीचा दिनांक १६-०२-२००६ रोजीचा प्रथम अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांनी, अधिनियमातील कलम ६ (३) (i) नुसार ५ दिवसाच्या आत संबंधीत मुख्याध्यापकाकडे पाठवून देणे भाग होते, तथापि त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे त्यांच्याकडे पाठविण्यासाठी ३२ दिवसांचा विलंब (अनुज्ञेय कालावधी पेक्षा) लावल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी या नात्याने अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अपील अर्जावर देखील त्यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, सदर माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीस आवश्यक असलेली व आता तयार केलेली संपूर्ण माहिती आयोगासमोर सादर केली असून, सदर माहिती सर्वसाधारणपणे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, संबंधीत संस्थेच्या मुख्याध्यापकाने त्यांना त्यांच्याकडील दिनांक १५-०४-२००६ रोजीच्या पत्राने पुरविलेली माहिती अपूर्ण आहे. या माहिती मध्ये त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत माहिती नव्हती. आज रोजी संबंधीत मुख्याध्यापकाने त्यांना देऊ केलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या डुप्लीकेट

सेवापुस्तिकेच्या झेरॉक्स प्रतीचा व अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या जाहिरातीच्या प्रतीचा समावेश आहे. याचा समावेश पूर्वी दिलेल्या कथित माहितीमध्ये नसल्याने मुख्याध्यापकाने अपिलार्थीस दिनांक १५-०४-२००६ रोजी प्रथमतः अपूर्ण माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमानुसार अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांना देणे भाग होते, तथापि या प्रकरणी तसे घडल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यावेळी अपिलार्थीस प्रथम माहिती देतेवेळी जेवढी माहिती त्यांच्याकडे होती तेवढी माहिती दिल्याचे आणि तदनंतर उर्वरित माहिती शोधून काढून ती अपिलार्थीस दिल्याचे आयोगास सांगितले. मुख्याध्यापकांची ही कृती बरोबर नसून त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत तरतुदीप्रमाणे प्रथमतःच संपूर्ण माहिती देणे भाग होते. त्यांच्याकडून या प्रकरणी अपिलार्थीस अपूर्ण माहिती देण्यासंदर्भात अशा प्रकारे घडलेल्या अनियमितते-बाबत आयोगातर्फे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे. त्यांनी, यापुढे भविष्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जांवर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये व तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. आज रोजी अपिलार्थीस मुख्याध्यापकाकडून उर्वरीत संपूर्ण माहिती व्यक्तिशः प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही वेगळ्याने आदेश देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **<u>आदेश</u>**

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२.	मुख्याध्यापक, जवाहरलाल पंडितजी न्यू इंग्लिश स्कूल, शिरधाने (प्र. नेर), तालुका जिल्हा धुळे यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. आयोगातर्फे उपरोक्त प्रकरणी त्यांच्याकडून घडलेल्या अनियमिततेस्तव दिलेल्या या ताकीदीची नोंद संबंधीत संस्थेच्या अध्यक्षांनी मुख्याध्यापकांच्या सेवापुस्तिकेत घ्यावी.

औरंगाबाद
दिनांक २०-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जगदाळे निंबा मंगा, मु. पो. विरदेल, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जवाहरलाल पंडितजी न्यू इंग्लिश स्कूल, शिरधाने (प्र. नेर), तालुका जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, शिरधाने बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित, जवाहरलाल पंडितजी न्यू इंग्लिश स्कूल, शिरधाने (प्र. नेर), तालुका जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२६७

निर्णय दिनांक २०-०६-२००८

श्री. चंद्रकांत भानुदास भदाणे, : अपिलार्थी
समर्थनगर, धुळे रोड, अमळनेर,
जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा चेअरमन / सेक्रेटरी, श्रम
साफल्य एज्युकेशन सोसायटी,
अमळनेर, जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. चंद्रकांत भानुदास भदाणे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुभाष दोधू भांडारकर, जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अमळनेर, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. सुभाष नथू बुवा, निरीक्षक,

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव, जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगाव यांचे प्रतिनिधी, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये चेअरमन / सेक्रेटरी, श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अमळनेर यांच्याकडे त्यांच्या संस्थेसंदर्भात खालील प्रमाणे एकूण ६ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

" १. आपल्या संस्थेने प्राचार्य रमाई शा. शि. महाविद्यालय अमळनेर या नांवे स्टेट बँकेत खाते ओपन केलेले आहे (खाते क्रं. ५२१२) सदर खाते सुरु करतेवेळी त्या खात्याच्या अधिकाराबाबत जो ठराव केलेला आहे. त्या ठरावाची प्रत व त्यासाठी जो अजिंडा पाठविलेला होता त्या अजिंड्याची प्रत मला हवी आहे.

२. सदर खाते आपण १५/०४/०२ पासून परत सदर खाते चालवण्याबाबत नविन ठराव करुन, सदर खाते चालवण्याबाबत जो ठराव केला आहे त्या ठरावाची प्रत व त्यासाठी काढलेल्या अजिंड्याची प्रत.

३. आपल्या संस्थेत सन १९९० पासून रमाई शा. शि. महाविद्यालयात प्र. प्राचार्य म्हणून नियुक्ती बाबत दरवर्षी वेळोवेळी जे ठराव केलेले आहेत. त्या ठरावाच्या प्रति व अजिंड्याच्या प्रति.

४. आपल्या संस्थेने समाजकार्य महाविद्यालयाच्या संदर्भात उच्च न्यायालय मुंबई (औरंगाबाद) खंडपीठ येथे दाखल केलेल्या तक्रारी संदर्भात दि. ८/१०/९५ या ठरावाव्दारे अधिकार दिलेला होता त्या ठरावाची प्रत व ठरावाचा अजिंड्याची प्रत.

५. आपल्या संस्थेच्या I.T.I. च्या कामासाठी (यंत्रसामुग्री खरेदी) आपण स्टेट बँकेतून कर्ज घेतलेले आहे. त्या कर्जासंबंधी केलेला ठराव व अजिंडा.

६. दि. २७/१२/०५ रोजी आपल्या संस्थेत जे सर्व काही ठराव झाले आहेत. त्या ठरावाच्या मंजुर झालेल्या प्रति व त्या संबंधीच्या प्रति व अजिंड्याच्या प्रति."

अपिलार्थीने सदर पत्र संबंधितांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले होते, तथापि हे पत्र संबंधीत शिक्षण संस्थेकडे प्राप्त झाले नसल्याचे संस्थेच्या अध्यक्षांनी आज आयोगासमोर सांगितले.

अपिलार्थीच्या या अर्जास, संबंधीत संस्थेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगाव यांच्याकडे दिनांक २७-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्या दिनांक २४-०४-२००६ रोजीच्या आदेशान्वये फेटाळून लावला.

संबंधीत संस्थेकडून व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, संबंधीत संस्थेचे चेअरमन / सेक्रेटरी व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी त्यांचे रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पाठविलेले पत्र स्विकृत केले नसल्याचे नमूद करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांना दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती मागितली होती, तथापि संबंधितांनी त्यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पाठविलेला अर्ज स्विकारण्यास नकार दिला. त्यांनी या अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, ती त्वरीत व विनामूल्य मिळावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली व संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांच्यावर शास्ती लावावी.

चेअरमन / सेक्रेटरी, श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अमळनेर श्री. सुभाष दोधू भांडारकर यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ दिनांक ०८-०२-२००६ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहितीची मागणी करत असतात व त्यांना ती वेळोवेळी पुरविली जाते. अपिलार्थी हे त्यांच्या संस्थेचे संचालक असून संस्थेची सर्व कागदपत्रे अंदाजे २००५ पर्यंत त्यांच्या ताब्यात होती. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ते आता विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थी या संस्थेमध्ये प्रभारी प्राचार्यपदी कार्यरत असतांना त्यांनी केलेल्या गैरव्यवहाराबद्दल त्यांच्यावर विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली होती. त्यांनी ते प्रभारी प्राचार्य असतांना केलेल्या गैरव्यवहाराबद्दल संबंधीत चौकशी अधिका-याचा चौकशी अहवाल त्यांना प्राप्त झाला असून त्यामध्ये अपिलार्थी हे दोषी आढळले आहेत.

त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ विषयी आवश्यक ते ज्ञान नसल्याने, त्यांच्या संस्थेने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अद्यापपावेतो नेमणूका केलेल्या नाहीत.

यावेळी अपिलार्थी यांनी असे सांगितले की, त्यांनी संस्थेच्या विरुध्द उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केला असून त्याचा निर्णय प्राचार्याच्या बाजुने लागल्याने, संस्थेने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, आयोगास जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत सादर करण्यात आली आहे. या निर्णयामध्ये सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी, या निर्णयामध्ये त्यांनी, ते जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नाहीत व त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहितीकरिताच ते जन अपिलीय अधिकारी म्हणून काम करु शकतात, असे कारण दर्शवून अपिलार्थीचे अपील फेटाळले असल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने आयोगासमोर सादर केलेल्या त्यांच्या दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाच्या प्रतीचे अवलोकन केले असता त्यावर १० रुपये किंमतीचे आवश्यक ते कोर्ट फी स्टॅम्प चिकटविलेले नाहीत, तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी १० रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प त्यांच्या मूळ अर्जावर चिकटविले होते. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरुन त्यांनी अशा प्रकारचे कोर्ट फी स्टॅम्प त्यांच्या अर्जावर चिकटविले नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने संबंधीत संस्थेकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे आहे त्यामुळे ही माहिती संस्थेने अपिलार्थीस देण्यास कोणताही प्रत्यावाय नसावा, तथापि उपरोक्त प्रकरणी श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अमळनेर या संस्थेने, माहिती अधिकार अधिनियमाची पावणे तीन वर्षे इतका प्रदीर्घ कालावधी व्यपगत होऊनही जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या नाहीत, हे विशेष आहे. चेअरमन, श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, यांनी आयोगास असे

अवगत केले की, त्यांना अद्याप शासनाकडून कोणतेही भरीव अर्थसहाय्य प्राप्त झाले नाही, मात्र आता नुकतेच शासनाकडून अर्थसहाय्य प्राप्त होत आहे. त्यांची संस्था धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी झालेली रजिस्टर्ड संस्था आहे. तेव्हा या प्रकरणी सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, संबंधीत संस्था, त्यांच्या कार्यालयामध्ये हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुका करील असे पहावे. अपिलार्थीने मागितलेली माहिती चेअरमन, श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अमळनेर यांनी ३० दिवसाच्या आत देण्याचे कबूल केले आहे, हे पाहता त्यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. आयोगाच्या सुनावणी च्या वेळेस अपिलार्थी यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या मूळ अर्जाची एक अतिरिक्त झेरॉक्स प्रत दिली गेली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे व खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अध्यक्ष, श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अमळनेर, जिल्हा जळगाव यांनी, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अध्यक्ष, श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अमळनेर, जिल्हा जळगाव यांनी, त्यांच्या कार्यालयाकरिता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुका हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत कराव्यात.

४. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगाव यांनी वरील आदेश क्रमांक २ व ३ चे अनुपालन होईल, असे पहावे.

औरंगाबाद
दिनांक २०-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत भानुदास भदाणे, समर्थनगर, कॉटन मार्केटसमोर, धुळे रोड, अमळनेर, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा चेअरमन / सेक्रेटरी, श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, चोपडा रोड, देवळी फाट्याजवळ, देवगाव-देवळी, अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, आंबेडकर मार्केट, जळगाव, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२६८

निर्णय दिनांक २०-०६-२००८

श्री. हेमचंद्र अवचित चौधरी, : अपिलार्थी
मनुश्री फेब्रिकेशन जवळ, विकास
कॉलनी, जामनेर रोड, भुसावळ

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,
फैजपूर, जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय
आयुक्त कार्यालय, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. महेंद्र रमेशराव पवार, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, फैजपूर, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. विठ्ठल तेजराव जरे, जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय

अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दगा पितांबर पोटे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, फैजपूर हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. श्री. हेमचंद्र अवचित चौधरी, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " अर्जदाराने वरील विषयावर दिनांक २/९/२००२ चा अर्ज मुख्याधिका-याकडे केला आहे. त्या अर्जाची २/९/२००२ ही तारीख २/९/२००५ दुरुस्त करावी असा अर्ज २८-२-२००६ रोजी दिला. या अर्जात दिलेल्या तक्रारीचे निवारण सत्वर व्हावे म्हणून २८/२/०६ रोजी नगराध्यक्षाकडे स्मरणपत्र दिले आहे. मुख्याधिका-याकडून त्या अर्जाचा निवाडा अर्जदाराला कळविला गेला नाही (१) तो निवाडा अर्जदाराला वाजवी मुदतीत आपले कडून मिळणार आहे काय ? (२) आणि मिळणार असेल तर आतापर्यंत विलंब लागण्याची कारणे काय ? ही माहीती अर्जदाराला मिळावी. "

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०९-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०२-०९-२००२ च्या अर्जाची दिनांक ०२-०९-२००५ अशी दुरुस्ती केल्याचे कळवून, अपिलार्थीच्या मूळ तक्रारीचे निवारण केल्यासंदर्भात अपिलार्थीस आवश्यक तो खुलासा केला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०९-२००६ रोजी प्रथम अपिल केले.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-१०-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ३०-१०-२००६ रोजी पारीत केले आहेत. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळल्याचे दिसून येत आहे. सदर अपिल फेटाळण्याची कारणे त्यांनी, त्यांच्या वरील निर्णया-मध्ये सविस्तरपणे नमूद केली आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना माहिती देण्याचे नाकारले, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली आहे किंवा नाही याची चौकशी करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने घरपट्टी आणि दिवाबत्ती करासंदर्भात त्यांच्या दिनांक ०२-०९-२००५ रोजीच्या अर्जाव्दारे तक्रार केली होती. या तक्रारीचे निवारण त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये केले आहे, तसेच या पत्रामध्ये

त्यांनी, अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विचारलेल्या माहितीसंदर्भातील माहिती देखील त्यांना पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर त्यांनी दिनांक २६-१०-२००६ रोजी आपले आदेश पारीत करुन, या आदेशाव्दारे अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मुलतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्दयावर माहिती मागितली होती. यापैकी पहिल्या मुद्दयाव्दारे त्यांनी, त्यांच्या दिनांक ०२-०९-२००५ रोजीच्या अर्जाचा निवाडा त्यांना वाजवी मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळणार आहे काय व दुस-या मुद्दयाव्दारे निवाडा मिळणार असेल तर आतापर्यत विलंब लागण्याची कारणे काय, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारल्याचे दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये ‘‘माहिती’’ या शब्दाची व्याख्या स्पष्ट केली असून ती खालील प्रमाणे आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

‘ ‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या

वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. ”

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांना विचारलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा अर्जाचा निवाडा त्यांना वाजवी मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळणार आहे काय व आतापर्यंत विलंब लागण्याची कारणे काय अशी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती व कारणे विचारली आहेत. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने प्रश्न विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रश्नांवर उत्तरे देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका ही एका विश्वास्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करुन ठेवणे व माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जांना आवश्यक ती माहिती पुरविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर त्यांनी अभिप्राय व्यक्त करणे किंवा त्यांच्या कोणत्याही निर्णयाबद्दल अथवा कार्यालयीन घडामोडीबाबत त्यांनी अपिलार्थीस कारणे अथवा खुलासा देणे या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही, हे पाहता मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही “माहिती” या शब्दाच्या अधिनियमामध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येशी कोणत्याही प्रकारे सुसंगत नसल्याने, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २०-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमचंद्र अवचित चौधरी, मनुश्री फेब्रिकेशन जवळ, विकास कॉलनी, जामनेर रोड, भुसावळ, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, फैजपूर, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले**

**(अपिल क्रमांक १३५१,१३५२,१३५३,१३५४,१३५५ व १३५६)**

**अपिल क्रमांक २००७/रामाआ/अपिल/सिआर/१३५१,१३५२,१३५३,१३५४,१३५५ व १३५६**

निर्णय दिनांक २१-०६-२००८

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा नायब तहसीलदार,
(पुरवठा),तहसील कार्यालय, हदगांव,जि.नांदेड
(अपिल क्रमांक १३५१ व १३५२)

२ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार,
(पुरवठा),तहसील कार्यालय, धर्माबाद,जि.नांदेड
(अपिल क्रमांक १३५३ व १३५४)

३ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार,
(पुरवठा),तहसील कार्यालय, भोकर,जि.नांदेड
(अपिल क्रमांक १३५५ व १३५६)

४ जन अपिलीय अधिकारी
तथा तहसीलदार,
हदगांव, जि.नांदेड
(अपिल क्रमांक १३५१ व १३५२)

५ जन अपिलीय अधिकारी
तथा तहसीलदार,
धर्माबाद, जि.नांदेड
(अपिल क्रमांक १३५३ व १३५४)

६ जन अपिलीय अधिकारी
तथा तहसीलदार,
भोकर, जि.नांदेड
(अपिल क्रमांक १३५५ व १३५६)

## निर्णय

वरील सहा प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २१.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रंगनाथ किसनराव मेंडके, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, (पुरवठा),तहसील कार्यालय, हदगांव,जि.नांदेड, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल), श्री. गंगाधर शिवलिंग रामोड, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, (पुरवठा),तहसील कार्यालय, धर्माबाद, जि.नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल), श्री.बाबुराव माधवराव परतवाड, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,(पुरवठा),तहसील कार्यालय, भोकर, जि.नांदेड आणि जन अपिलीय अधिकारी तथा प्रभारी तहसीलदार भोकर, जि.नांदेड (यापुढे त्यांना अनुक्रमे जन माहिती अधिकारी क्रमांक ३ व जन अपिलीय अधिकारी क्रमांक ३ असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगांव, जि.नांदेड, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद, जि.नांदेड, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांचेकडून दिनांक १४-०२-२००७ व दि. २१-०२-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी क्रमांक २ व ३ यांचेकडून दिनांक २०-११-२००६ रोजीच्या प्रत्येकी दोन स्वतंत्र अर्जाद्वारे, त्यांचे

कार्याक्षेत्रातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांना विविध कालावधीसाठी केलेल्या रॉकेलच्या नियतनाचा तपशील व इतर माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

१. १.१ जन माहिती अधिकारी क्रमांक १-प्रथम अर्ज दिनांक १४-०२-२००७ माहिती संबंधित कालावधी एप्रिल २००५ ते जानेवारी २००७ पर्यंत

"हदगांव तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते (१) राजेश्वर नामदेव पत्तेवार, परवाना क्रमांक ३८/९८ (२) गणेश ट्रेडींग कंपनी, प्रो.बालाजी रघुनाथ येमेवार, परवाना क्रमांक ३९/९८ (३) ओमप्रकाश नथमल काबरा परवाना क्रमांक ४०/९८ (४) गोविंद रघुनाथ येमेवार,परवाना क्रमांक ४२/९८ (५) दिगांबर दमकोंडवार केरोसीन पंप, हदगांव यांना शासनाकडून वितरण केलेल्या रॉकेलची महिनेवारी तपशील, वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच त्यांना संलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवानेधारक यांना वितरण केलेल्या रॉकेलचे वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच त्यांच्याकडून किरकोळ रॉकेल हॉकर्सना दिलेल्या पावत्यांच्या सत्यप्रती मिळणेबाबत. '

१.२ जन माहिती अधिकारी क्रमांक १- प्रथम अर्ज दिनांक २१-०२-२००७, माहिती संबंधित कालावधी मार्च २००३ ते जानेवारी २००७ पर्यंत

'मौजे चोरंबा ता.हदगांव येथील संयुक्त केरोसीन परवानेधारक मारोती काशिनाथ सुरनर, या संयुक्त परवानेधारकाचे केरोसीन वितरण, उचल व शिल्लक याबाबतची लेखी स्वरुपात सविस्तर माहिती मिळणेबाबत. तसेच त्यांनी वाटप केलेल्या केरोसीनच्या स्टॉक व वितरण रजिस्टरच्या सत्यप्रती मिळणेबाबत.'

२ जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांना दिनांक २०-११-२००६ रोजीच्या दोन वेगवेगळया अर्जान्वये एप्रिल २००५ ते ऑक्टोबर २००६ पर्यंतच्या कालावधीची वरील अनुक्रमांक १.१ प्रमाणे माहिती मागविण्यात आली.

सदर माहिती अनुक्रमे धर्माबाद तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते लालन्ना रामजी येमेवार, परवाना क्रमांक ६१/९८ व अर्धघाऊक रॉकेल विक्रेते मे.साईबाबा ट्रेडींग कंपनी, परवाना क्रमांक ६३/९८ यांचेशी संबंधित होती.

३ जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांना दिनांक २०-११-२००६ रोजीच्या दोन वेगवेगळया अर्जान्वये एप्रिल २००४ ते ऑक्टोबर २००६ पर्यंतच्या कालावधीची वरील अनुक्रमांक १.१ प्रमाणे माहिती मागविण्यात आली.

सदर माहिती अनुक्रमे भोकर तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते तुळशीराम गंगाराम पोकलवार, परवाना क्रमांक ३१/९८ व अर्धघाऊक रॉकेल विक्रेते मे.एकनाथ गुंडाप्पा महाजन, परवाना क्रमांक ३४/९८ यांचेशी संबंधित होती.

अपिलार्थीने सर्व अर्जातील माहिती साधारण टपालाद्वारे मागितली होती.

जन माहिती अधिकारी क्रमांक १, २ व ३ यांनी विहित मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थी यांनी संबधित जन अपीलीय अधिकारी क्र. १,२ व ३ यांचेकडे दिनांक ०२-०४-२००७, ११-०४-२००७, २४-०१-२००७, व १२-०२-२००७ अन्वये प्रत्येकी दोन अशी एकूण सहा प्रथम अपिल दाखल केली आहेत.

तथापि जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ व २ यांनी त्यांच्याकडे दाखल झालेल्या प्रथम अपिलासंदर्भात त्यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी क्रमांक ३ यांनी अपिलार्थीच्या दि. १२.२.२००७ रोजीच्या एकूण दोन प्रथम अपील

अर्जांवर दिनाक २९.०३.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारित केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ व २ यांचेकडून मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादामुळे व जन अपिलीय अधिकारी क्रमांक ३ यांच्याकडून मिळालेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.७.२००७ अन्वये दोन तर दि. १०.४.२००७ अन्वये एकूण चार, अशी एकूण सहा द्वितीय अपील दाखल केली आहेत.

अपिलार्थी यांनी सर्वसाधारणतः असा युक्तिवाद केला की, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी संबंधित जन अपिलीय अधिकाऱ्यांकडे विहित मुदतीत प्रथम अपील दाखल केली तथापि तहसिलदार धर्माबाद वगळता त्यांच्या अपिलावर कोणत्याही जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, मात्र तहसीलदार धर्माबाद यांनी दि. ३.१०.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि यापूर्वीच त्यांना संबंधित विक्रेत्यांकडून आवश्यक ती माहिती एप्रिल २००७ मध्ये प्राप्त झाली होती व यासंदर्भात त्यांनी त्यांच्या दि. ३.१०.२००७ च्या पत्राद्वारे तहसीलदार धर्माबाद यांना अवगतही केले होते. या अपील क्र. १३५३ व १३५४ शी संबंधित मूळ अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना आता प्राप्त झाली असून, त्याबाबतीत त्यांची काहीही तक्रार नाही. तहसीलदार भोकर यांच्याकडे केलेल्या दि. १२.२.२००७ रोजीच्या त्यांच्या दोन्ही अपिलांवर जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ यांनी दि. २९.५.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि सुनावणीस हजर राहण्याचे पत्र त्यांना दि. ३१.५.२००७ रोजी प्राप्त झाल्याने त्यांना या सुनावणीस हजर रहाता आले नाही.त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी त्यांना प्राप्त झालेले पोष्टाचे पाकीट दाखविले असता अपिलार्थीच्या या दाव्यामध्ये तथ्य असल्याचे आढळून आले. आपल्या

युक्तीवादाच्या शेवटी त्यांनी, त्यांच्या अपील क्र. १३५१,१३५२,१३५५ व १३५६ शी संबंधित मूळ अर्जातील माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले.

अपील क्रमांक १३५१ संदर्भात जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीचा अर्ज करते वेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देण्याची कारणे आजमितीस त्यांना सांगता येत नाहीत. तथापि अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती १५ दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

अपील क्रमांक १३५२ संदर्भात त्यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीच्या या दि. २१.२.२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दि. ३०.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी कळविले. अपिलार्थीने मागितलेली माहिती अर्धापूर तहसीलदार यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित असल्याने त्यांनी तहसीलदार अर्धापूर यांच्याकडे अपिलार्थीस अर्ज करण्याचे सूचित केले होते.

जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांनी अपील क्रमांक १३५३ व १३५४ या संदर्भात असा युक्तीवाद केला की,संबंधित अर्धघाऊक केरोसीन विक्रेत्यांनी अपिलार्थीस आता संपूर्ण माहिती परस्पर उपलब्ध करुन दिली आहे-

जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांचा अपील क्रमांक १३५५व १३५६ यासंदर्भात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोन्ही पदांचा पदभार सांभाळणारे उपस्थित जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांनी असा युक्तीवाद केला की,अपिलार्थीस सुनावणीसाठी हजर राहण्यासाठी दि. १५.३.२००७ रोजी पत्र पाठविले होते. त्यानंतर

त्यांच्याकडील दि. ३१.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दोन्ही अर्जासंदर्भात, त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून सदर माहितीची पृष्ठे २६०७ इतकी होत असल्याचे कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांचे हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले.

वरील घटनाक्रम, या सहा प्रकरणांमध्ये दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता, असे दिसून येते की, अपील क्र. १३५१ व १३५२ शी संबंधीत अपिलार्थीच्या दि. १४.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) चा भंग केला आहे. जन अपिलीय अधिकारी क्रमांक १, यांनी देखिल अपिलार्थीस त्यांना माहिती देण्यासंदर्भात दि. २.४.२००७ रोजीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती ही जरी काहीशी व्यापक स्वरुपाची असली, तरी ती माहिती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांना फार क्लिष्ट अथवा अवघड होते, अशातील बाब येथे संभवत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर त्यांनी कलम ७(१) नुसार माहिती देण्यापोटीचे शुल्क देखिल त्यांनी अपिलार्थीस न कळवून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची एकप्रकारे अशी उपेक्षा केली आहे. त्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत, यात शंका नाही. आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दि. १४.२.२००७

रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना १५ दिवसांचे आत देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आता विहित कालावधी व्यपगत झाला असल्याने, त्यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

अपील क्रमांक १३५२ च्या संदर्भातील अपिलार्थीच्या दि. २१.२.२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना दि. ३०.४.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते, या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती अर्धापूर तहसील कार्यालयाशी संबंधित असल्याने, ही माहिती अपिलार्थीस अर्धापूर तहसीलदार यांच्याकडे वेगळयाने अर्ज करुन प्राप्त करण्याचे सूचित केले आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, कोणत्याही अर्जदाराने मागितलेली माहिती जर संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी अर्जदाराचा मूळ माहितीसाठीचा अर्ज अथवा त्यातील भाग, अर्जदाराचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत संबंधित प्राधिकरणाकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ६(३)(त) प्रमाणे अभिप्रेत आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस दि. २१.२.२००७ रोजीच्या अर्जावर त्यांनी दि. २६.२.२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे भाग होते, तथापि येथेही अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करुन, अपिलार्थीस दोन महिने नऊ दिवस इतक्या विलंबाने, त्यांना अपेक्षित असलेली माहिती त्याच प्राधिकरणाचा एक भाग असलेल्या दुसऱ्या भागाकडून घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांची सदर कृती चुकीची आहे, जी कृती त्यांनी ५ दिवसांचे आत करणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे भाग होते, ती कृती करण्यास सुमारे दोन महिने नऊ दिवस इतका कालावधी त्यांनी घेतला. एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीचा अर्ज तहसीलदार अर्धापूर यांच्याकडे पाठविला नाही, ही बाब देखिल येथे प्रकर्षाने लक्षात येते. तहसीलदार, अर्धापूर व तहसीलदार, हदगाव हे शासनाच्या महसूल खात्याच्या एकाच

प्राधिकरणाचे दोन भाग असल्याने व आता बराच कालवधी व्यपगत झाला असल्याने या प्रकरणी देखिल जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दि. २१.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच २० दिवसांचे आत विनामूल्य द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपील क्र.१३५३ व १३५४ शी संबंधित मूळ माहितीसाठीचे दोन अर्ज अपिलार्थीने जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांच्याकडे दि. २०.११.२००६ रोजी केले होते, या दोन्ही अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी क्रमांक-२ यांच्याकडे दोन्ही प्रथम अर्जासंदर्भात दि. २४.१.२००७ रोजी प्रथम अर्जनिहाय दोन स्वतंत्र प्रथम अपीले केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.१०.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या प्रकरणी अपिलार्थीने परस्पर संबंधित घाऊक विक्रेत्यांकडून एप्रिल २००७ मध्ये माहिती प्राप्त करुन घेतल्यामुळे, या अपील अर्जाची सुनावणी झाल्याचे दिसून येत नाही. येथे देखिल संबंधित जन माहिती अधिकारी क्रमांक २ व जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ यांनी अपिलार्थीच्या दि. २०.११.२००६ रोजीच्या दोन्ही मूळ अर्जांकडे अक्षम्य दुर्लक्ष करुन त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे, याची आयोग सखेद नोंद घेत आहे. या प्रकरणी तहसीलदार,धर्माबाद, जे या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी आहेत, त्यांनी देखिल आपले कर्तव्य व्यवस्थितपणे पार न पाडून व अपिलार्थीच्या अपील अर्जावर ३० दिवसांच्या आत सुनावणी न घेऊन, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) चा भंग केला आहे, असे आयोगाचे मत आहे. आपल्या या कृतीद्वारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव पूर्णपणे स्पष्ट केल्याचे दिसून येते. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद

जिल्हाधिकारी, नांदेड यांनी घ्यावी, तद्वतच अपिलार्थीस त्यांच्या दि. २०.११.२००६ रोजीच्या अर्जास कोणत्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने, तसेच अपिलार्थीस आता जरी माहिती प्राप्त झाली असली तरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीचे कोणतेही बंधन जन माहिती अधिकारी यांनी पाळले नसल्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरले आहेत.

अपिलार्थीस त्यांनी दि. २०.११.२००६ रोजीच्या दोनही अर्जांद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना एप्रिल २००७ मध्ये परस्पर प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

अपील क्रमांक १३५५ व क्रमांक १३५६ शी संबंधित-जन माहिती अधिकारी क्रमांक ३ व जन अपिलीय अधिकारी क्रमांक ३ यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज व प्रथम अपिलाची पुरेपूर उपेक्षा केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप जरी मोठे असले तरी, जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांना संभाव्य माहितीसाठीच्या पृष्ठांची संख्या व ती देण्यासाठीचे शुल्क हे अपिलार्थीस विहित मुदतीत कळविणे फार जिकीरीचे काम होते, असे नाही. अपिलार्थीस दि.२०.११.२००६ रोजीच्या अर्जांना त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांच्या आत सदर माहिती त्यांना देण्यापोटीचे शुल्क त्यांनी कळविणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती विहीत मुदतीत केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क त्यांना ४३ दिवस इतक्या विलंबाने कळविले आहे.जन अपिलीय अधिकारी क्रमांक ३ यांनी देखिल त्यांच्या सुनावणीमध्ये अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीचा मुद्दा लक्षात घेतला नाही. दि. २९.३.२००७ रोजी अपिलार्थीच्या गैरहजेरीत त्यांच्या अपिलांवर सुनावणी घेऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती घेण्याचे त्यांनी अपिलार्थी यांना सूचित केले.माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास ३० दिवसांचे आत माहिती देण्याची एका विशिष्ट अशी मुदत घालून दिलेली आहे. विशिष्ट मुदतीत माहिती प्राप्त करुन घेणे, हा संबंधित अर्जदाराचा हक्क आहे व माहिती अधिकार अधिनियमाचे हेच वैशिष्टय आहे. तथापि या महत्त्वाच्या मुद्यांचा जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या दि. १२.२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निकाल देतांना विसर पडल्याचे येथे दिसून येत आहे. माहिती देण्यासाठी विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता ही माहिती अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य देणे भाग आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २०.११.२००६ रोजीच्या दोनही अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी क्रमांक १,२ व ३ यांनी अपिलार्थीच्या त्यांच्याकडे प्राप्त दोन्ही अर्जासंदर्भात, माहिती देण्यासाठी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त विलंब लावून, अपिलार्थीस माहिती न देऊन, आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन त्यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल), यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी नायब तहसीलदार, हदगाव, धर्माबाद व भोकर यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याचे आत करुन, तद्नंतर आपला अनुपालन अहवाल एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे द्वितीय अपील क्र. १३५१/०७,१३५२/०७,१३५३/०७,१३५४/०७,१३५५/०७ हु १३५६/०७ मान्य करण्यात येत आहेत.

आदेश

१) अपील क्र १३५१/०७, १३५२/०७, १३५३/०७, १३५४/०७, १३५५/०७ हु १३५६/०७ मान्य करण्यात येत आहेत.

२) जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १४.२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच, १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी, अपिलार्थीस त्यांच्या दि. २१.२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच, २० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

४) जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांनी, अपिलार्थीस त्यांच्या दि. २०.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच, १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

५) सचिव (महसूल), मुंबई यांनी, उपरोक्त प्रकरणातील संबंधित नायब तहसीलदार, हदगाव, नायब तहसीलदार, धर्माबाद व नायब तहसीलदार, भोकर यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याचे आत प्रशासकीय कारवाई

करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा

**औरंगाबाद**
**दिनांक : २१.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जिल्हाधिकारी, नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२६९

निर्णय दिनांक २३-०६-२००८

श्री. विवेक वसंत राजे, : अपिलार्थी
८, इशा अपार्टमेंट, भाविक नगर,
श्रीरंगनगर जवळ, गंगापूर रोड, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
भोसला मिलिटरी कॉलेज,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्या, भोसला मिलिटरी
कॉलेज, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, भोसला मिलिटरी कॉलेज, रामभूमी, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजेंद्र पोपटराव पाटील, अपिलार्थी श्री. विवेक वसंत राजे, यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. सिध्दार्थ बी. यावलकर, जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्या, भोसला मिलिटरी

कॉलेज, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, भोसला मिलिटरी कॉलेज, नाशिक हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधीत एकूण ५ मुद्दयावर सन १९८८ ते २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. १९८८ ते १९८९, १९८९ ते १९९०, १९९० ते १९९१, १९९१ ते १९९२, १९९२ ते १९९३ या काळात महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना अदा करण्यात आलेले एकूण वेतन किती, उपरोक्त काळात आपल्या आस्थापनावर असलेल्या अनुदानीत अथवा विना अनुदानीत विभागातील आपल्या महाविद्यालयातील प्रत्येक प्राध्यापकांला दरवर्षी देण्यात आलेले एकूण वेतन किती.

१९८८-८९ ते १९९२-९३ पर्यन्तची वेतन पत्रकांची छायांकित प्रत देण्यात यावी.

२. अ. भोसला महाविद्यालयातील एकूण शैक्षणिक विभाग किती या विभागांची नांवे, त्या विभागातील प्राध्यापकांची संख्या, त्या प्राध्यापकांचा कार्यभार किती.

ब. प्रत्येक विभागाची असलेली प्रवेश क्षमता किती,

क. त्या विभागांमध्ये कार्यरत असलेले अर्हता प्राप्त प्राध्यापकांची त्यांच्या अहर्ता सहित नांवे,

ङ अहर्ता नसलेले प्राध्यापक किती त्यांची नांवे

३. प्रत्येक प्राध्यापकांच्या प्रॉव्हीडंड फंड खात्यामध्ये दरवर्षी भरण्यात आलेली रक्कम व त्यावरील व्याजाची विनाअनुदान काळातील खातेधारकांची अंशदान तसेच त्यावरील व्याज याचे आगणन करणारे पत्रक देण्यांत यावेत.

४. महाविद्यालयाकडे प्रॉव्हीडंड फंड अंशदानावरील व्याजाची काही कर्मचा-यांची रक्कम पडुन होती काय असल्यास ती एकत्रित रक्कम केव्हा भरण्यात आली त्यांचा दिनांक व वर्ष नमुद करावा.

५. १९८८-१९८९, १९८९-१९९०, १९९०-१९९१, १९९१-१९९२, १९९२-१९९३ या काळात महाविद्यालयातील प्रत्येक प्राध्यापकाला दर महिना देय वेतन किती होते व देण्यांत आलेले वेतन किती होते. ”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, त्यांनी मागितलेल्या माहितीपोटीचे आवश्यक शुल्क रुपये १००० /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या शुल्कामध्ये त्यांनी टायपिंग चॉर्जेस् म्हणून रुपये ६०० इतक्या शुल्काची आकारणी केल्याचे दिसून येत आहे. सदर शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०४-१२-२००६ रोजी पावती क्रमांक ३१३३ अन्वये भरले. तदनंतर दिनांक १३-१२-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस यावेळी १६ पृष्ठांची माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्य या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती दिली व काही माहिती देण्याचे नाकारले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती देतांना योग्य प्रारुपात माहिती दिली नाही, तसेच जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ८ (त्र) अन्वये त्यांना काही माहिती देण्याचे नाकारले. प्राध्यापकांची अर्हता देण्याचे टाळले तसेच या महाविद्यालयातील मास कम्युनिकेशन व जर्नालिझम या संदर्भात त्यांना कोणतीही माहिती दिली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. ही माहिती देण्यासाठी त्यांच्याकडून अकारण दोन वेळेस रुपये २५० व रुपये १०० इतके शुल्क घेतले आहे, तसेच त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी लपवून ठेवल्याने सदर माहिती त्यांना विनामूल्य देण्यास आदेशीत करण्याचे व माहिती देण्यासाठी टाळाटाळ, दिशाभूल व खोटी / चुकीची माहिती देणा-या जन माहिती अधिका-यास अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती शिक्षा देण्याचे आदेश निर्गमीत करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राध्यापकांच्या वेतनासंदर्भात माहिती विचारली होती. सदर प्राध्यापकांचे वेतन हे शासनाकडून अनुदान स्वरुपात संबंधीत संस्थेला प्राप्त होत असल्याने अशी माहिती अधिनियमातील कलम ८ (त्र) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी नाकारणे अनुचित आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना दिलेल्या दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या माहिती मध्ये प्राध्यापकांना वेतनापोटी एकूण रुपये ४६,७२,०३४ इतके अनुदान देण्यात आल्याचे कळविले आहे व तितकेच अनुदान त्यांनी भविष्यनिर्वाह निधीमध्ये भरल्याचे या पत्रातील परिच्छेद क्रमांक ३ अन्वये त्यांना कळविले आहे, ही माहिती विसंगत आहे. यासाठी त्यांनी वेतन पुस्तकाच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांच्या कडे मागितल्या होत्या, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही माहिती त्यांना दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी प्रथम १००० रुपये भरुन घेऊन तदनंतर रुपये २५० इतकी रक्कम काढून घेऊन उर्वरीत रक्कम त्यांना मनीऑर्डरने परत केली व तदनंतर त्यांच्याकडील प्रथम अपिलाचा निर्णय देतांना पावती क्रमांक ३१३७ व्दारे परत रुपये १०० इतके शुल्क त्यांच्याकडून जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यापोटी घेतले. अशा प्रकारे त्यांना एकूण ३५० रुपयांचा नाहक भुर्दंड जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दिला. त्यांना आजपर्यंत प्राप्त झालेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या एकूण १७ इतकी आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही आज सुनावणीस गैरहजर आहेत. त्यांच्यातर्फे ॲड श्री. सिध्दार्थ यावलकर यांनी असा युक्तिवाद केला की, आज सुनावणीसाठी अपिलार्थी हे स्वतः हजर नसून त्यांचे प्रतिनिधी श्री. राजेंद्र पोपटराव पाटील हे हजर आहेत. अपिलार्थीच्या उपस्थित प्रतिनिधीस संबंधीत

संस्थेने कामावरुन काढून टाकले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या प्राध्यापकांच्या वेतनासंदर्भात त्यांना माहिती दिल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नाही. महाविद्यालयात प्रत्येक प्राध्यापक व कर्मचारी यांना मिळणारे वेतन, वेतनासंदर्भातील माहिती प्रत्येकाची स्वतःची खाजगी बाब असून अपिलार्थीस ही माहिती देय होणार नाही. अपिलार्थीने या संस्थेविरुध्द न्यायालयात दावा केला असल्याने अपिलार्थीस ही माहिती न्यायालयामार्फत उपलब्ध होऊ शकेल. अपिलार्थीचे अपील मान्य केल्याने कोणत्याही प्रकारचे जनहित साध्य होणार नसल्याचे त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या शेवटी प्रतिपादन केले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १४-११-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कडील दिनांक ३०-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस रुपये १००० इतके शुल्क या माहितीपोटी भरण्याचे सूचित केले. या शुल्कामध्ये त्यांनी ६०० रुपये इतके शुल्क, टंकलेखनाचे शुल्क म्हणून दाखविले आहे, ते चुकीचे आहे. माहिती अधिकार अधिनियमा-व्दारे माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी किती शुल्क आकारावे याचे विवेचन शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११-१०-२००५ रोजीच्या अधिसूचना क्रमांक आर.टी.आय.२००५/सीआर-३१५/०५/५ मध्ये केले आहे. अधिनियमातील कलम ७ (३) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस द्याव्या लागणा-या माहितीच्या पृष्ठांची अंदाजित संख्या व प्रती पृष्ठ दर यांचा हिशोब करुन त्याची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळवावयाची आहे, तथापि या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस निश्चितपणे किती पृष्ठांची माहिती देणे संभवत आहे त्याचा काहीही उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क प्राप्त

झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी दिनांक १३-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये जी कथित माहिती दिली, त्या माहितीचे अवलोकन करता मुद्दा क्रमांक १ अंशतः वगळता, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली उर्वरीत सर्व माहिती नाकारल्याचे दिसून येत आहे. जर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे अधिनियमाच्या कलम ८ (त्र) प्रमाणे नाकारावयाचे होते तर त्यांनी अपिलार्थीस रुपये १००० इतके शुल्क कसे कळविले हा प्रश्न या प्रकरणी अनुत्तरीत राहतो. त्यांच्या या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कोणत्या वर्षाची व कोणत्या विभागाची हवी आहे याचे स्पष्टीकरण अपिलार्थीकडून मागितले आहे. यासंदर्भात अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने त्यांना निश्चित कोणत्या कालावधीची माहिती हवी आहे याचा व कोणत्या विभागाची माहिती हवी आहे याचा उल्लेख त्यांनी त्यांच्या मूळ अर्जात केल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे अपिलार्थीस दिनांक १३-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे एक प्रकारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्यासाठी दिलेले उत्तर आहे, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले असता, या अपिलावर त्यांनी कोणतीही सुनावणी न घेता, त्यांच्या या अपिलासंदर्भात शुल्क रुपये १०० घेऊन दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती दिली. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी रुपये १०० इतक्या शुल्काची वसुली करणे, हे अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन नसल्याने ते सर्वथा अयोग्य आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी. या माहितीमध्ये, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, प्राध्यापकांच्या भविष्यनिर्वाह निधीमध्ये संस्थेने त्यांचा संपूर्ण पगार भरल्याचे दिसून येत आहे. सकृतदर्शनी ही माहिती देखील चुकीची आहे असे आयोगास वाटते.

याच पत्रामध्ये त्यांनी प्राध्यापकाला देण्यात आलेल्या वेतनाविषयी माहिती पाहिजे असल्यास संबंधीत प्राध्यापकांची परवानगी घेऊन देणे आवश्यक आहे असे म्हटले आहे. या मुद्दयावरील माहिती देतांना ती अधिनियमातील कलम ८ (त्र) नुसार अपिलार्थीस देण्याचे नाकारले. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, प्रत्येक संस्थेला प्राप्त होणारे अनुदान व प्रत्येक प्राध्यापकाला मिळणारे वेतन हे संबंधीत संस्थेने अधिनियमातील कलम ४ (२) अन्वये, स्वयंप्रेरणेने माहिती प्रसिध्द करावयाच्या माहितीचा भाग आहे. यातील कलम ४ (ख) (IX) व (X) अन्वये ही माहिती अपिलार्थीस देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यावाय नाही, याउलट ही माहिती संस्थेच्या वेबसाईटवर वा इतर मार्गाने प्रसिध्द करणे हे माहिती अधिकार अधिनियमान्वये संस्थेकडून अभिप्रेत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मागणीमध्ये संबंधीत प्राध्यापकांच्या भविष्यनिर्वाह निधीसंदर्भात माहिती विचारली आहे. भविष्य निर्वाह निधीमध्ये शासकीय कर्मचा-यांनी भरलेली रक्कम ही मात्र त्यांच्या वैयक्तीक माहितीचा भाग आहे. यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (त्र) चे निश्चितपणे उल्लंघन होईल असे आयोगास वाटते, ही माहिती देण्यामध्ये संबंधीत प्राध्यापकांच्या खाजगी बाबीमध्ये अगंतूक हस्तक्षेप होईल, असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे एम. एस्सी. संगणकशास्त्र या विभागाच्या विद्यार्थ्यांची संख्या दिल्याचे दिसून येत नाही, तसेच या विषयासाठी नेमणूक केलेल्या प्राध्यापकाची अर्हता देखील त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे सन १९८८-८९ ते १९९२-९३ या काळातील वेतनपत्रकांच्या छायाप्रती मागितल्या होत्या. या वेतन प्रत्रकातील भविष्यनिर्वाह निधीशी संबंधीत भाग वगळता उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे भाग आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ मधील माहिती, माहिती

अधिकार अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी ती भविष्यनिर्वाह निधी वगळता अपिलार्थीस देणे अधिनियमा-तील तरतुदीनुसार त्यांना भाग आहे. थोडक्यात अपिलार्थीने मागणी केलेल्या प्रत्येक प्राध्यापकांची भविष्यनिर्वाह निधीची, त्यांच्या वर्गणीची माहिती वगळता उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे भाग आहे. या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अवास्तव शुल्काची मागणी केली आहे, नंतर त्यांनी शुल्क भरुनही त्यांना माहिती नाकारली आहे. अपिलार्थीस माहिती नाकारल्याची त्यांनी दिलेली कारणे योग्य नाहीत, कारण प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांना मिळणारे वेतन हे स्वयंप्रेरणेने त्यांच्या संस्थेमार्फत प्रसिध्द करणे हे माहिती अधिकार अधिनियम मधील कलम ४ (b) (ix) प्रमाणे अनिवार्य आहे, या तरतुदीकडे जन माहिती अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्याचे आयोगास दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये असे स्पष्ट केले आहे की, त्यांना आजपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त १७ पृष्ठांची माहिती प्राप्त झालेली आहे. सदर पृष्ठांचे शुल्क रुपये ३४ इतके वगळता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून देण्यात येणा-या माहितीपोटी घेतलेली रक्कम रुपये ३१६ इतकी त्यांना ३ दिवसाच्या आत परत करावी व अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यातील प्राध्यापकांच्या भविष्यनिर्वाह निधीमधील वर्गणीशी संबंधीत भाग वगळता, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यात यावी असे आदेशीत करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस चुकीची, दिशाभूल करणारी व माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस

पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर अध्यक्ष स्था. व्य. समिती, भोसला मिलिटरी महाविद्यालय, नाशिक यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगास असे सांगितले की, या प्रकरणी अपिलार्थीने न्यायालयात दावा दाखल केला असल्याने अपिलार्थीस ही माहिती न्यायालयामार्फत उपलब्ध होऊ शकेल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी याचा कोणत्याही प्रकारे संबंध नसल्याने जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आज सुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या हरकती फेटाळून लावण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले अतिरिक्त शुल्क रुपये ३१६ हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत परत करावे.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर अध्यक्ष स्था. व्य. समिती, भोसला मिलिटरी महाविद्यालय, नाशिक यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २३-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विवेक वसंत राजे, ८, इशा अपार्टमेंट, भाविकनगर, श्रीरंगनगर जवळ, गंगापूर रोड, नाशिक.
२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, भोसला मिलिटरी कॉलेज, रामभूमी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्या, भोसला मिलिटरी कॉलेज, रामभूमी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ अध्यक्ष स्था. व्य. समिती, भोसला मिलिटरी महाविद्यालय, रामभूमी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२७०

निर्णय दिनांक २३-०६-२००८

श्री. किशोर भबुतमल शहा, : अपिलार्थी
२०+२९/३, गजानन, हौसिंग सोसायटी,
पार्वतीनगर, जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यालय अधीक्षक, जवाहर
वैद्यकीय संस्थानचे ए. सी. पी. एम.
वैद्यकीय महाविद्यालय, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, धुळे

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. मिलींद चितळे, उपप्राचार्य, ए. सी. पी. एम. वैद्यकीय महाविद्यालय, धुळे, ॲडव्होकेट श्री. एम. एस. कुलकर्णी व ॲड श्री. एस. एन. लवेकर, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, ए. सी. पी. एम. वैद्यकीय महाविद्यालय, धुळे, यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) श्री. शांताराम वसंतराव मुळे, जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, धुळे, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर श्री. किशोर भबुतमल शहा, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष डॉ. उल्हास पाटील हे गैरहजर आहेत.

आज रोजी आयोगापुढे अपिलार्थीने, या प्रकरणातील, उपरोक्त प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार दिनांक २१-०४-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील विचाराधीन आहे. या अपिलाची राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २३-०५-२००६ रोजी नोंद झालेली आहे.

या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थीने, त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या संस्थेमध्ये डॉ. उल्हास वासुदेव पाटील यांच्या नेमणुकीसंदर्भात, त्यांच्या संस्थेतर्फे चालविण्यात येणा-या आण्णासाहेब पाटील चुडामण पाटील मेमोरियल वैद्यकीय महाविद्यालयामध्ये डॉ. उल्हास पाटील यांना नेमणूक दिली आहे काय, दिली असल्यास नेमणुकीची तारीख, ज्या पदावर नेमणूक दिली ते पद, नोकरीचा कालावधी आणि नोकरी सोडून जाण्याची कारणे अशी माहिती त्यांच्या अर्जात मुद्दा क्रमांक १ व्दारे मागितली, तर मुद्दा क्रमांक २ मध्ये डॉ. उल्हास पाटील यांना या पदावरील सेवेकरिता प्रतिवर्षी किती पगार देण्यात आला त्या पगारपत्रकाची प्रत व त्यांना अनुभवाचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे किंवा कसे व दिले असल्यास, कोणत्या आधारावर त्यांना सदर प्रमाणपत्र देण्यात आले अशा प्रकारची माहिती विचारली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास असे अवगत करण्यात आले की, त्यांनी अपिलार्थीस

त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक ती माहिती पुरविली आहे. सदर पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांना उद्देशून लिहिले असून जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २४-११-२००६ रोजी केलेल्या प्रथम अपिलासंदर्भात सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००६ च्या पत्रातील सूचनांचे अनुपालन करण्यासंदर्भात दिले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील सर्वसाधारणपणे सर्व मुद्दयावरील माहितीचा या पत्रामध्ये समावेश असून याची एक प्रत अपिलार्थीस दिली गेली आहे. या पत्रातील मुद्दा क्रमांक २ चे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने डॉ. उल्हास पाटील यांच्या नेमणुकीच्या तारखेची मागणी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेली होती, तथापि या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस “१९९०” इतकीच माहिती दिली आहे. अपिलार्थीने निश्चित तारखेची मागणी केली असतांना अपिलार्थीस फक्त नेमणुकीचे वर्ष कळविण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती बरोबर नाही. त्यांनी अशा प्रकारे अपिलार्थीस पुरविलेली माहिती या मुद्दयासंदर्भात अपूर्ण ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, धुळे यांना दिलेल्या पत्राची प्रत अपिलार्थीस मिळाली किंवा कसे हे कळण्यास काही मार्ग नाही. कारण जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणी नोटिसीत नमूद करुनही त्यांच्याकडील जावक नोंदवहीची प्रत अथवा जावक नोंदवही पुराव्यादाखल सादर केलेली नाही. आजच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असे स्पष्ट करण्यात आले की, डॉ. उल्हास पाटील यांना त्यांच्या संस्थेत मानद प्राध्यापक म्हणून १९९० साली नेमणूक देण्यात आली होती व त्यांना

संस्थेकडे केलेल्या मानद प्राध्यापक पदावरील सेवेकरिता कोणताही पगार अथवा मानधन देण्यात आलेले नाही व त्याचबरोबर त्यांनी ही माहिती अपिलार्थीस कळविली आहे. श्री. पाटील यांच्या निश्चित नेमणुकीची तारीख ७ दिवसाच्या आत अवगत करुन देण्यास ते तयार आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दिनांक ०५-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पाठवावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-१२-२००५ च्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे, त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, यापुढे भविष्यात त्यांनी, त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये संपूर्ण माहिती द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (श्री. उल्हास पाटील यांच्या नेमणुकीच्या निश्चित

तारखेसह) त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २३-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किशोर भबुतमल शहा, २०+२९/३, गजानन हौसिंग सोसायटी, पार्वतीनगर, जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, जवाहर वैद्यकीय संस्थानचे ए. सी. पी. एम. वैद्यकीय महाविद्यालय, हुतात्मा शिरीषकुमार नगर, जवाहर सूत गिरणीसमोर, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२७१

निर्णय दिनांक २३-०६-२००८

१ श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे, : अपिलार्थी
१३९, गांधीनगर, धुळे रोड, नंदूरबार,
तालुका जिल्हा नंदूरबार
२ श्री. अशोक नामदेव पाटील,
१३९, गांधीनगर, धुळे रोड, नंदूरबार,
तालुका जिल्हा नंदूरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती,
साक्री, जिल्हा धुळे
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप अभियंता, लघुसिंचन
उपविभाग, पंचायत समिती, साक्री,
जिल्हा धुळे

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : कनिष्ठ सहाय्यक, लघुसिंचन उप विभाग, पंचायत समिती, साक्री, जिल्हा धुळे |
| | जन अपिलीय अधिकारी | : उप अभियंता, जिल्हा परिषद, लघु सिंचन उपविभाग, पंचायत समिती, साक्री, जिल्हा धुळे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. भास्कर लोटन सोनवणे, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ सहाय्यक, लघुसिंचन उप विभाग, पंचायत समिती, साक्री,

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्रशांतकुमार लोटन बेडसे, जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, लघु सिंचन उपविभाग, पंचायत समिती, साक्री, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी, श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे व श्री. अशोक नामदेव पाटील हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले असून, त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या अर्जाची कोणतीही दखल न घेतली गेल्यामुळे, त्यांनी दिनांक ३०-०८-२००६ रोजी उप अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतरही आणि अपिलात गेल्यानंतरही त्यांच्याकडून उत्तर आले नाही, त्यामुळे त्यांनी व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे हे अपील दाखल केल्याचे म्हटले आहे. या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून लघु सिंचन उपविभाग, पंचायत समिती, साक्री कार्यक्षेत्रात झालेल्या एकूण कामांची यादी, पैकी झालेल्या कामांची यादी, झालेल्या कामांच्या मोजमाप पुस्तिकांच्या छायांकीत प्रती अशी माहिती मागितली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक २२-०६-२००६ रोजीच्या अर्जाची कोणतीही दखल घेतली नाही, जी त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) अन्वये विहित मुदतीत म्हणजेच दिनांक २१-०७-२००६ रोजी अगर तत्पूर्वी घ्यावयाची होती. याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ३०-०८-२००६ रोजीच्या अपील अर्जावर देखील कोणतीही कारवाई केली नाही. मात्र, अपिलार्थीने दिनांक ०९-१०-२००६

रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांच्याकडील दिनांक ११-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती तयार करुन ठेवली आहे व ती माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडे दिनांक १६-१०-२००६ रोजी व्यक्तिशः हस्तांतरीत केली.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीपृष्ठ्यर्थ त्यांची आता कोणतीही तक्रार नाही व त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली असल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ११-१०-२००६ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर अपिलार्थी यांनी लिहून दिले आहे, हे पाहता आता अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. मात्र, जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेला माहिती अधिकार अधिनियमापोटीचा अनादर दुर्लक्षीत करुन चालणार नाही. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदींचा भंग करुन आपल्या कार्यशैली-तील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्टपणे सिध्द केला आहे, तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) अन्वये अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेऊन या प्रकरणी निःसंशयपणे भंग केल्याचेही सप्रमाण सिध्द होत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक २३-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे, १३९, गांधीनगर, धुळे रोड, नंदूरबार, तालुका जिल्हा नंदूरबार.

२ श्री. अशोक नामदेव पाटील, १३९, गांधीनगर, धुळे रोड, नंदूरबार, तालुका जिल्हा नंदूरबार.

३ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ सहाय्यक, लघुसिंचन उप विभाग, पंचायत समिती, साक्री, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, लघु सिंचन

उपविभाग, पंचायत समिती, साक्री, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३३७

निर्णय दिनांक २३-०६-२००८

| | | |
|---|---|---|
| | श्री. मोहनलाल मिन्होमल कुकरेजा,<br>विन्नी कलेक्शन, १२, गुरुकृपा बिल्डींग,<br>परबाई राजेंद्र कॉम्प्लेक्स, नाशिक रोड -<br>४२२ १०१ | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप आयुक्त, महानगरपालिका,<br>नाशिक | : |
| २ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, नगर रचना,<br>महानगरपालिका, नाशिक | : प्रतिवादी |
| ३ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा आयुक्त, महानगरपालिका,<br>नाशिक | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : उप आयुक्त, (अतिक्रमण विभाग),<br>महानगरपालिका, नाशिक |
| | जन माहिती अधिकारी | : कार्यकारी अभियंता, नगर रचना,<br>महानगरपालिका, नाशिक |
| | जन अपिलीय अधिकारी | : आयुक्त, महानगरपालिका, नाशिक |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहनलाल मिन्होमल कुकरेजा,

(यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. मुकूंद केरोपंत झिटे, जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, (अतिक्रमण विभाग), महानगरपालिका, नाशिक, श्री. ए. पी. मेश्राम, उप अभियंता, म. न. पा. नाशिक, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मोहन विश्वनाथ रानडे, कार्यकारी अभियंता (नियोजन), महानगरपालिका नाशिक, जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त महानगरपालिका नाशिक यांचे प्रतिनिधी, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष १) कालीमा जोसेफ दास, २) हर्षद नारायण पटेल हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी केलेल्या विविध अर्जांवर त्यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> I wish to know under "Right to information Act" that the above facts are true ? What steps have been taken by the NMC to remove unauthorized tapries ? By when will the said enroachment be removed ?

अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज अधिनियमाव्दारे विहित केलेल्या नमुन्यात भरला नसल्याने अपिलार्थीच्या प्रथम अर्जासंदर्भातील आवश्यक असलेला तपशील आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक १८-१०-२००६ रोजी पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जास यथायोग्य उत्तर १५ दिवसाच्या आत देण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे दोन्ही जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीस वेगवेगळ्या पत्रांव्दारे दिनांक ०७-११-२००६ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर उत्तर दिले आहे. सदर पत्राचे अवलोकन केले असता, दोन्ही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मोघम स्वरुपाचे उत्तर दिल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अपूर्ण माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, संबंधीत टपरीधारकांनी न्यायालयाकडे दाखल केलेल्या कागदपत्राप्रमाणे त्यांनी आपल्या ब्प-या टाकल्या नसून ते वेगळ्या जागेवर आपला व्यवसाय करीत आहेत. यासंदर्भात त्यांचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे गेल्या ५

वर्षापासून पत्रव्यवहार चालू असूनही अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली नाही. हर्षद नारायण पटेल या टपरीधारकाने १९९१ साली त्याची टपरी विकल्यानंतरही, आजही टपरीधारकाचे नाव म्हणून हर्षद नारायण पटेल महानगरपालिकेने दर्शविले आहे, तसेच श्रीमती कालिमा जोसेफ दास यांनी आपल्या टपरीची १९९५ साली विक्री करुनही अद्यापही, या टपरीच्या मालकी हक्काची नोंद त्यांच्याच नावाने आहे. या दोन्ही टपरीधारकांनी त्यांच्या टप-या विक्री करुनही या टप-यांचे मालकीधारक म्हणून त्यांची नावे मनपाने कायम ठेवली आहेत. यासंदर्भात त्यांनी दिनांक ०४-१२-२००२ रोजी जन माहिती अधिकारी यांना पत्र देखील लिहिले होते. या पत्रावर अद्यापही महानगरपालिकेचे त्यांना कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. श्रीमती कालिमा जोसेफ दास यांनी बनावट पुरावा दाखल करुनही न्यायालयाचा निकाल त्यांच्या बाजुने लागला. या प्रकरणात देखील त्यांनी महानगरपालिकेस पत्रव्यवहार केला असता त्यांना अद्यापही महानगरपालिकेचे उत्तर प्राप्त झाले नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

दोन्हीही जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक २८-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १८-१०-२००६ रोजी पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी दोन्ही जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत, त्यांच्या अर्जास योग्य ते उत्तर देण्यासाठी सूचित केले होते. अपिलार्थीचे दुकान एका खाजगी मिळकतीवरील इमारतीमध्ये

असून त्यांच्या दुकानासमोर काही टपरीधारकांनी १९९९ सालापूर्वीपासून अतिक्रमणे केली आहेत. अपिलार्थीच्या दुकानासमोर, टप-या असल्याचे अपिलार्थीने सदर दुकान खरेदी करण्यापूर्वी, अपिलार्थीस माहिती होते. सदर टपरी घटनेसंदर्भात महानगरपालिकेने कारवाई केली असता प्रथमतः न्यायालयाने कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन या टप-या काढण्याचे आदेश महानगरपालिकेस दिले. तदनंतर या टप-या काढण्यासाठी कायदेशीर प्रक्रीयेचा भाग म्हणून महानगरपालिकेने दिलेल्या नोटीशीवर संबंधीत टपरीधारकांनी परत न्यायालयाकडून स्थगिती आदेश प्राप्त करुन घेतले आहेत. आज रोजी सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या मुद्यावर माहिती मागितली आहे त्या सर्व मुद्दयांचा उहापोह न्यायालयाकडील निर्णयामध्ये होणे शक्य आहे. आजच्या सुनावणीच्या दिवशी सदर प्रकरण न्यायाप्रविष्ट आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा दिनांक २१-०७-२००६ रोजीचा अर्ज राज्य शासनाने दिनांक ११-१०-२००५ रोजी पारीत केलेल्या क्रमांक आरटीआय २००५/सी.आर.३१५/०५/५ च्या अधिनियमातील कलम ३ मधील तरतुदीप्रमाणे नाही. अपिलार्थीने सदर अर्ज तक्रार अर्जाच्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दहा रुपये किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटवून केलेला आहे. एवढे असूनही अपिलार्थीच्या या अर्जाचा विचार केला असता, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितलेल्या माहितीमध्ये, - त्यांनी या अर्जात नमूद केलेल्या बाबी सत्य आहेत काय, महानगर-पालिकेने अनधिकृत टप-या काढण्याकरिता कोणती कारवाई केली आहे, सदर अतिक्रमणे कधी दूर होतील अशा प्रकारच्या माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या अर्जामध्ये संबंधीत टपारीधारकांनी

कोर्टाची दिशाभूल केली, असे म्हटले आहे. या सर्व बाबी ख-या आहेत किंवा कसे याबाबत जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितले आहेत. अपिलार्थीच्या अर्जातील शेवटच्या परिच्छेदामध्ये ह्या टप-या कधी काढल्या जातील याची विचारणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या या प्रश्नांची सविस्तर उत्तरे न्यायालयाच्या निर्णयामधून त्यांना मिळू शकतील, कारण सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेले त्यांचे मत जन माहिती अधिकारी यांनी देणे हे माहिती अधिकार अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अर्जदाराने प्रश्न विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उत्तरे अथवा खुलासा देणे या प्रक्रीया अभिप्रेत नाही. त्यामुळे त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे विचारलेल्या या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, मात्र अपिलार्थीच्या, महानगरपालिकेने या टप-या काढण्याबाबत काय कारवाई केली या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. ही माहिती म्हणजे अपिलार्थीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेला पत्रव्यवहार व त्याच्या प्रती होय. अपिलार्थीस माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने त्यांना आता अपिलार्थीस ही माहिती मोफत द्यावी लागणार आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांनी अतिक्रमणासंदर्भात केलेल्या कार्यवाहीशी संबंधीत माहिती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संपूर्ण घटनाक्रमाच्या प्रथम टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांच्या दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन, त्यांनी आपल्या कार्यशैलीतील

कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये निर्णय घेणे हे त्यांचे कर्तव्य असून, त्यांनी या प्रकरणी आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून येत आहे. सबब आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपोटी महानगरपालिकेने अतिक्रमण काढल्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीशी संबंधीत माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, महानगरपालिका, नाशिक, यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास

तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २३-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहनलाल मिन्होमल कुकरेजा, विन्नी कलेक्शन, १२, गुरुकृपा बिल्डींग, परबाई राजेंद्र कॉम्प्लेक्स, नाशिक रोड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, (अतिक्रमण विभाग), महानगर पालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३३८

निर्णय दिनांक २३-०६-२००८

श्री. नामदेव पांडुरंग पाटील, : अपिलार्थी
गोखले एज्युकेशन सोसायटीज् कॉलेज
ऑफ एज्युकेशन, एस. टी. स्टॅडच्या
मागे, संगमनेर, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
कार्यालय सह संचालक (उच्च
शिक्षण), विभाग, ३, महापालिका मार्ग,
मुंबई – ४०० ००१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
कार्यालय सह संचालक (उच्च
शिक्षण), विभाग, ३, महापालिका मार्ग,
मुंबई – ४०० ००१

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी, सह संचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई – ४०० ००१

जन अपिलीय अधिकारी : सह संचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई – ४०० ००१

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नामदेव पांडुरंग पाटील, (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्रीमती ज्ञानदा मारुती कदम, जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण विभाग, मुंबई, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मधुकर साहेबराव आंधळे, जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०१-१९९६ ते १५-०१-२००२ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

a. Why no reply to my complaint letter (by Registered Post) dtd. 16/09/2005 (copy enclosed) has not been given till today.

b. Why no action has been taken till today, against the Management and Principal of S.K.Pant Walawalkar College of Education, Deogad, Dist. Sindhudurg for non compliance of Grievances committee decision of Mumbai University dtd 3 rd Sept., 2004, regarding my placement in selection Grade with designated Readership (Copy of the Grievances Committee decision enclosed). The principal has not taken any step to get sanctioned my placement in selection Grade, though I am eleigible for it from 1/08/1996 fas per V th pay commission Rules.

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या दिनांक ०२-०८-२००६ रोजीच्या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन,

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होऊ शकेल त्या प्राधिकरणाकडे, या पत्राव्दारे अपिलार्थीचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतरीत केला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य गोखले एज्युकेशन सोसायटीज् अध्यापक महाविद्यालय, संगमनेर यांच्याकडे दिनांक १८-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधीत संस्थेचे जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व संबंधीत संस्थेच्या प्रशासनाविरुध्द कारवाई करण्याचे आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे. तसेच या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सह संचालक उच्च शिक्षण हे अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे नियंत्रक असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमाप्रमाणे या महाविद्यालयाच्या कर्मचा-यांच्या, प्राध्यापकांच्या वेतन निश्चितीची जबाबदारी त्यांच्या-वर आहे. त्यांची वेतननिश्चिती संबंधीत संस्थेने अद्यापपावेतो न केल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, विना अनुदानित महाविद्यालयाच्या संदर्भातील आस्थापना विषयक बाबी जसे वेतननिश्चिती, रजा मंजूरी, नेमणूक इत्यादीवर त्यांचे काहीही नियंत्रण नाही. खाजगी विना अनुदानीत संस्थेच्या आस्थापना विषयक बाबी स्वतंत्रपणे संबंधीत महाविद्यालय व सदरील महाविद्यालय ज्या विद्यापीठाशी संलग्न असते त्या विभागाकडून हाताळल्या जातात.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संबंधीत संस्थेकडे सर्वसाधारण परिस्थितीत उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीचे प्रकरण विद्यापीठाच्या गा-हाणे समितीकडे त्यांनी सादर केले होते. या प्रकरणावर निर्णय देतांना त्यामध्ये संबंधीत संस्थेने अपिलार्थीस देय असलेली त्यांची सर्व देयके अदा करण्यासाठी श्री. एस. के. पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालय, देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग या महाविद्यालयाला आदेशीत केले आहे. तथापि त्याची अद्याप अंमल-बजावणी न झाल्याने अपिलार्थी यांनी न्यायालयाकडे धाव घेतली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता व अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक ०२-०८-२००६ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असून त्यांच्या दिनांक १६-०९-२००५ रोजीच्या अर्जास आजपर्यंत काहीही उत्तर का दिले गेले नाही व एस. के. पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालय, देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग यांच्या प्राचार्यावर व व्यवस्थापनावर अद्यापपर्यंत का कारवाई केली नाही याच्या माहितीची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांचे यावर असे म्हणणे आहे की, संबंधीत संस्थेवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याचे त्यांना मूळात प्रशासकीय अधिकारच नाहीत. संबंधित महाविद्यालय हे मुंबई विद्यापीठाशी संलग्न असल्यामुळे या संलग्नतेसंदर्भात विद्यापीठ, वेळ आली तर, अलाहिदा निर्णय घेऊ शकते. मुळात अपिलार्थीने मागणी केलेल्या विषयातील माहिती कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचा संभव नाही आणि त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे जी माहिती मागविली आहे ती पाहता ही माहिती अधिकार अधिनियमातील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येशी कोठल्याही प्रकारे सुसंगत असल्याचे दिसून येत नाही. अधिनियमातील ‘‘माहिती’’ या शब्दाची कलम २ (च) व्दारे स्पष्ट केलेली व्याख्या खालील प्रमाणे आहे.

<u>**कलम २ (च)**</u>

‘‘ ‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने,

प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. ''

वरील व्याख्येचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, या व्याख्येशी विसंगत असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका ही एका विश्वस्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करुन ठेवणे व माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्या कडे प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात संबंधितांना या माहितीतील आवश्यक ती माहिती पुरविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर त्यांनी अभिप्राय व्यक्त करणे किंवा त्यांच्या कोणत्याही निर्णयाबद्दल त्यांना अपिलार्थीस कारणे देणे त्यांना खुलासा करणे हे अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही, आणि अपिलार्थीने नेमकी अशाच प्रकारची मागणी जन माहिती अधिकारी यांचेकडे केली आहे. हे पाहता मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही ''माहिती'' या शब्दाच्या अधिनियमामध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निर्णयाप्रत आयोग आला आहे. त्यांना जर त्यांनी केलेल्या अर्जावर संबंधीत महाविद्यालयाने केलेल्या कारवाईची माहिती हवी असेल तर त्यांनी त्यांच्या प्रकरणातील संबंधीत महाविद्यालयामध्ये या विषयाशी संबंधीत नस्त्यांची पाहणी करण्यासाठी वेगळ्या अर्जाव्दारे मागणी केल्यास त्यांच्या शंकांचे निरासन होण्यास मदत होईल हे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक २३-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नामदेव पांडुरंग पाटील, गोखले एज्युकेशन सोसायटीज् कॉलेज ऑफ एज्युकेशन, एस. टी. स्टॅडच्या मागे, संगमनेर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सह संचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई – ४०० ००१ यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३७०

निर्णय दिनांक २३-०६-२००८

श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, : अपिलार्थी
तुळजाई, ४१, श्रीनगर कॉलनी,
उल्कानगरी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
महानगरपालिका आयुक्त,
औरंगाबाद महानगरपालिका,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहाय्यक संचालक, नगर रचना
विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. विष्णू गोपाळ वझे, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद (यापुढे

त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०७-२००४ ते ३१-०३-२००५ या कालावधीतील, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत खालील प्रमाणे साक्षांकीत माहिती मागितली होती.

"1. Layout plan of Sur. No. 61 (P) CTS 15735 Gakheda 20-7-04 & its commencement certificate.
2. Copy proposed bldg. plan parwara no 770 dated 31-3-05.
3. Copy of the application filed for proposed bldg. Constru. Sanctioned on 31-3-05. "

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, त्यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये त्यांना द्यावयाची माहिती प्रती प्रत रुपये २५ या दराने आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सुचविले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्याव्या लागणा-या माहितीच्या संभाव्य पृष्ठांची संख्या लिहिलेली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करता त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००७ रोजी प्रथम अपील करणे पसंत केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०७-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी

कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नसल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती दिल्याचे सूचित करुन अपिलार्थीने नमूद केलेल्या दिनांकाची द्यावयाच्या बांधकाम परवानगीच्या आदेश व नकाशाची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत असल्याचे म्हटले आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस रेखांकनाची छायांकीत प्रत याचबरोबर दिनांक / /२००७ रोजी देण्यात आली असे म्हटले आहे. या माहितीमध्ये त्यांनी निश्चित तारखेचा उल्लेख केला नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, त्यांना संपूर्ण माहिती मिळाली नाही व जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे ती साक्षांकीत करुन दिली नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाली असून त्यांनी मागितलेल्या एकूण ३ मुद्दयापैकी, तिस-या मुद्दयावरील माहिती अपूर्ण आहे व उर्वरीत २ मुद्यावरील माहिती, त्यांनी साक्षांकीत करुन मागितली असतांना देखील जन माहिती अधिकारी यांनी ती साक्षांकीत करुन दिली नसल्याचे म्हटले आहे. न्यायालयीन दाव्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना साक्षांकीत प्रतीची आवश्यकता आहे. या प्रकरणी जन माहिती

अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी प्रमाणे कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी, मुद्दा क्रमांक ३ च्या माहितीसंदर्भात दिनांक ३१-०३-२००५ च्या बांधकाम परवानगीची प्रत पुरविली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास त्यांनी विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी शुल्क रुपये २५ इतके प्रती प्रत त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते, तथापि अपिलार्थीने या रक्कमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात केला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने वरील परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्दयावर माहिती मागितली होती. मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती त्यांनी दिनांक २९-०८-२००७ रोजी दिलेली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ संदर्भात अपिलार्थीस त्यांनी चुकीची माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने या माहितीव्दारे प्रस्तावित इमारतीच्या बांधकामास परवानगी देण्यासाठी संबंधितांनी केलेल्या दिनांक ३१-०३-२००५ च्या अर्जाची प्रत मागितली होती. सर्वसाधारणपणे इमारतीच्या बांधकामास परवानगी देतांना करावयाच्या अर्जाबरोबर अर्जदारास शासकीय प्राधिकरणाकडे प्रस्तावित बांधकामाच्या नकाशाबरोबर सदर भूखंडाच्या मालकी हक्काची कागदपत्रे, संबंधीत भूखंडाचा नकाशा इत्यादी पूरक माहिती या अर्जासोबत सादर करावी लागते. अपिलार्थीने हीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे सांगितले. तथापि या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती दिल्याचे दिसून येत आहे. जन

माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात माहिती मिळाल्याचे अपिलार्थी यांनी कबूल केले आहे. तथापि या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना साक्षांकीत करुन हव्या आहेत. तशा त्या पुरविल्या नाहीत असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे व यादृष्टीने ही माहिती अपूर्ण असल्याचा अपिलार्थीचा दावा आयोग मान्य करत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता ही माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागण्याचा असा कोणताही प्रकार या प्रकरणी संभवत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहज उपलब्ध होती हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये संपूर्ण माहिती न देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास त्यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला असला तरी त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस फक्त माहिती पुरविण्याचा प्रती प्रत रुपये २५ असा दर कळविला आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस संभाव्य माहितीच्या पृष्ठांची संख्या व त्यांना भराव्या लागणा-या शुल्काची रक्कम कळविलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) अन्वये असा हिशोब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अनिवार्य आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी उपरोक्त प्रकरणी केलेली कार्यवाही ही त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे दर्शन घडवते, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात घेतलेल्या अशा प्रकारच्या भूमिकेबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, यापुढे भविष्यात त्यांनी त्यांच्याकडे माहिती अर्जासंदर्भात दाखल होणा-या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे

व विहित मुदतीत आवश्यक ती कार्यवाही करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने व या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीचा शुल्क भरण्या-संदर्भात कोणताही दोष न आढळल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ व्दारे विचारलेली माहिती साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात देखील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती संबंधीतांनी दिनांक ३१-०३-२००५ रोजीच्या बांधकाम परवानगीसाठी त्यांच्याकडे केलेला अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे यासह सर्व माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत (सर्व कागदपत्राच्या प्रती साक्षांकीत करुन) विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साक्षांकीत करुन, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	संबंधीत जन माहिती अधिकारी यांना, आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक	२३-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, तुळजाई, ४१, श्रीनगर कॉलनी, उल्कानगरी, औरंगाबाद.
२	जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३	जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२७२

निर्णय दिनांक : २४.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अरविंद हरजीवनदास पीठवा,<br>रा. पंचवटी, नाशिक-२. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा विभागीय अधिकारी,<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा आयुक्त,<br>नाशिक महानगर पालिका, नाशिक. | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,
नगर रचना विभाग,
नाशिक महानगरपालिका,नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. संजीव यशवंत पवार, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगररचना विभाग, महानगरपालिका, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. जुगनसिंग मोतीसींग ढाकरे,उपआयुक्त (प्र),महानगर पालिका,नाशिक,जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त महानगरपालिका, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. अरविंद हरजीवनदास पीठवा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.२३.०५.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून स.न. २९५अ मधील प्लॉट नं. ६६ मध्ये झालेल्या अनधिकृत बांधकामासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितली होती.

"१) राष्ट्रीय महामार्ग व मनपाच्या नियमानुसार जागा न सोडता रोडच्या हद्दीवर बांधकाम करुन त्या बांधकामाचा वापर करण्यासाठी रोडवर पायऱ्या उभारल्या असेल तर हया बाबत आपली हरकत नाही का व असेल तर आपले कार्यालय हयाबाबत कारवाई का करत नाही, याबाबत माहिती देणे.

२) बांधकामाचा पूर्णत्त्वाचा दाखला न घेता वीना परवाना करत असला तर आपल्या कार्यालयाला हरकत नाही का व आपण हा व्यवसाय का थांबवत नाही, हया बाबत माहिती देणे.

३) महानगर पालिका कीती वर्षापर्यंत वीना परवाना व्यवसाय व वापर करत असेल तरी दंडाची रक्कम अेकदाच वसुल करण्यात येते हयाबाबत खुलाशा करुन माहिती देणे

४) प्लानवर दीलेल्या मापा पेक्षा वोल कम्पांडन्डची भींत कीती मीटर पुढे बांधता येते व बांधकाम केले असेल तर हया बाबत आपल्या कार्यालयाना हरकत नाही का व असेल तर आपण कारवाई का करत नाही याबाबत माहिती देणे.

५) जागा मालकाना आपल्या जागेसमोर असलेल्या रोडचा वापर आपल्या स्वतःसाठी वापर करण्याचे अधिकार आहे का व हया बाबत आपली हरकत नाही का

६) नियमानुसार जागा न सोडता अनधिकृत बांधकाम केले असेल तर हया अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याची जबाबदारी कोणत्या विभागाची आहे त्या विभागाचे व अधिकारीचे नाव कळविणे.

७) मला आपल्या कार्यालयातुन माहितीच्या अधिकारात बील्डींग प्लानचा नकाशाची प्रत दीली होती व त्याकरीता १५५ शू.फी कोणत्या नियमानुसार घेतली हयाबाबत खुलाशा करणे.

८) मी आज पर्यंत पंचवटी विभागात हया अनधीकृत बांधकाम संदर्भात कीती अर्ज दीले व तरी आपण हया संर्दभात काय कारवाई केली कींवा का केली नाही हया बाबत माहिती देणे

९) मी आज पर्यंत माहितीच्या अधिकारात आपल्या कार्यालयात कीती अर्ज दीले व आपण कीती अर्जाचे उत्तर दीले हया बाबात खुलाशा करुन माहिती देणे

१०) महानगर पालिका कीती वर्षापर्यंत वीना परवाना व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन देते हया बाबत माहिती देणे

११) इमारतीचा पूर्णत्वाचा दाखला न घेता वीना परवाना दुकानाचा व्यवसाय थांबवीण्याचे अधिकार मनपाचे आहे का पोलीस कार्यालयाचे आहे हया बाबत माहिती देणे

१२) राष्ट्रीय महामार्गच्या मध्यभागापासुन कीती मीटर अंतर सोडुन सर्वीस रोड मनपानी बनवीला आहे व सर्वीस रोडची रुंद्यी कीती मीटर आहे व मनपाच्या शहरी हद्यीमध्ये या सर्वीस रोडचे मालकी हक्क कोणाचे आहे. मनपाचे की राष्ट्रीय महामार्गाचे

१३) हया अनधीकृत बांधकामासंदंभात मी ही पंचवटी अतिक्रमण विभागात ही १३/४/०६ रोजी अर्जासोबत पूर्तता जोडली असुन सुध्दा आजपर्यंत हया अनधीकृत बांधकामावर कुठलीही कारवाई का केली नाही. हयाबाबत खुलाशा करुन माहिती देणे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज विभागीय अधिकाऱ्यांस उद्देशून केला आहे. विभागीय अधिकाऱ्याकडून हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. २९.५.२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २१.०७.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १.०८.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २१.०८.२००६ रोजी पारित केले आहेत. या निर्णयामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

"कार्यकारी अभियंता, नगररचना तथा शासकीय जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती दिली असुन उर्वरित माहिती पैकी कायदयानुसार अपिलकर्त्यास त्यांच्या मूळ अर्जातील मुद्यांना अनुसरुन १५ दिवसांच्या आत यथायोग्य उत्तर देण्यात यावी. सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे."

जन अपिलीय अधिकारी यांच्या या वरील निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती पुरविण्याचा प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१०.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले असून, जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर देखिल त्यांना कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे नमुद करुन त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपील अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या प्लॉटवरील अनधिकृत बांधकामासंदर्भात त्यांच्याकडे माहिती विचारली होती त्या भूखंडास लागूनच अपिलार्थी यांचा भूखंड असून अपिलार्थी व त्यांच्या शेजारचे भूखंडमालक यांच्यामध्ये या भूखंडाच्या हद्दीबाबत वाद आहेत. सदरची बाब न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणी अपिलार्थीने वेगवेगळया माध्यमातून आतापर्यंत एकूण ६४ वेळा वेगळया अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि.२१.७.२००६ रोजीच्या अपील अर्जावर दि. १.८.२००६ रोजी सुनावणी घेऊन त्यासंदर्भात आपले आदेश दि. २१.८.२००६ रोजी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते

की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितली होती, त्यापैकी अपिलार्थीने मु.क्र.१ ते ५, मुद्दा क्र.१० व १३ अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये माहिती या शब्दाच्या व्याख्येमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे उत्तर देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. तरीही अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कागदपत्रांत उपलब्ध आहे, अशा कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावयाची आहेत. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलाथीस १ ते ५ च्या संदर्भात दिलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना सर्वसाधारण स्वरुपाचे उत्तर देऊन अपिलार्थीस खुलासा केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस मुद्दा क्र. ६ च्या संदर्भात अपिलार्थीने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याचे नाव जन माहिती अधिकारी यांना विचारले होते, तथापि त्यांनी या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांची नावे न कळवून या मुद्यावर अर्धवट दिल्याचे दिसून येते. मुद्दा क्र. ७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नकाशाच्या मापानुसार नियमानुसार शुल्क वसूल करण्यात येते, असे मोघम उत्तर दिले आहे. अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्यांच्याकडून शुल्क आकारणी करण्याच्या नियमाचा खुलासा मागितला होता, या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी महानगर पालिकेच्या संबंधित नियमाची प्रत अपिलार्थीस देणे सर्वसाधारण परिस्थितीत अपेक्षित होते. त्यामुळे आता अपिलार्थीस मुद्दा क्र. ७ च्या संदर्भातील अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या नियमांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. मुद्दा क्र ८ व ९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस महानगर पालिका अंतर्गत नगररचना विभाग व अतिक्रमण विभाग, मुख्य कार्यालय

राजीव गांधी भवन महानगरपालिका यांचेशी संपर्क साधण्याचे सूचित केले आहे.जन माहिती अधिकारी यांची सदर कृती चुकीची आहे. अपिलार्थीने या मुद्यावरील मागितलेली माहिती जर त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(i) अन्वये केलेल्या तरतुदींचा वापर करुन अपिलार्थीचा अर्ज संबंधित विभागाकडे पाठवून देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १० द्वारे जन माहिती अधिकारी यांनी महानगरपालिका किती वर्षापर्यंत विनापरवाना व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन देते.या प्रकारची माहिती मागविली आहे. खुद्द अपिलार्थीस यांचे उत्तर ठाऊक असल्याने, या मुद्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. कारण कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरण विनापरवाना प्रोत्साहन देत नाही, ही सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ बाब आहे. सदर माहिती विचारतांना अपिलार्थीने कोणताही विवेक बाळगला नसल्याचे आयोगास प्रतीत होत आहे.मुद्दा क्र. ११ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती बरोबर आहे. मुद्दा क्र. १२ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, मोजमाप घेतल्यानंतर मापाबाबत खुलासा देण्यात येईल, अशी अर्धवट माहिती दिली. दि. १.९.२००६ नंतर अपिलार्थीच्या या संदर्भात माहिती दिली किंवा कसे, अशी आयोगाने विचारणा केली असता, त्याचे जन माहिती अधिकारी यांनी नकारार्थी उत्तर दिले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित केला आहे. अशाप्रकारचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीस धरुन नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या मुद्यावर माहिती देणे अपेक्षित नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराचे वरील प्रमाणे पृथःकरण पाहता यामध्ये दोन बाबी प्रकर्षाने नजरेस येतात, त्यापैकी पहिली बाब म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये आवश्यक तो प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्याकडील दि. १.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील नियम क्रमांक ७(७) चा भंग केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस उशीराने माहिती पुरवून देखिल जन माहिती अधिकारी यांनी ती अर्धवट स्वरुपात अपिलार्थीस दिली. सदर माहिती अर्धवट स्वरुपात अपिलार्थीस दिली. सदर माहिती अर्धवट कशी दिली, त्याचे वरील परिच्छेदात पुरेशा प्रमाणात विवेचन करण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देणे व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर ती देणे, याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्रथमतः टाळाटाळ केली असा होतो.

वरील दोन परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व जी माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर अपिलार्थीस दिली गेली ती अर्धवट स्वरुपात दिल्याचे वरील परिच्छेदावरुन स्पष्ट झाले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीमध्ये त्यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले आहे.सबबआयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या

अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई दोन महिन्यांचे आत करुन आपला अनुपालन अहवाल एक महिन्याचे आत सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही काही माहिती द्यावयाची शिल्लक आहे. ज्या मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही माहिती द्यावयाची आहे, त्याचे वरील परिच्छेदामध्ये पुरेशा प्रमाणात स्पष्टीकरण केले आहे. अधिनियमातील विहित मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक व योग्य तो प्रतिसाद न दिल्याने अधिनियमातील कलम ७(६) नुसार त्यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल.

मुद्दा क्र. ८ व ९ च्या बाबत, अपिलार्थीने अर्ज केल्यापासून आता बराच कालावधी व्यपगत झाला असल्याने, जरी ही माहिती नगररचना विभाग व अतिक्रमण विभाग मुख्य कार्यालय, राजीव गांधी भवन महानगरपालिका यांच्याकडे असली तरी, सदर नगररचना विभाग व जन माहिती अधिकारी हे एकाच प्राधिकरणाचे दोन वेगवेगळे भाग असल्याने, या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

आयोगाकडे अपील करतांना अपिलार्थीने त्यांच्या दि. ५.१०.२००६ रोजीच्या द्वितीय अपील अर्जान्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलावर सुनावणी झाल्यानंतर देखिल त्यांनी अपिलार्थीस अद्यापपर्यंत माहिती मिळाली नसल्याचे विधान केले आहे, हे विधान सर्वस्वी चुकीचे असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सप्रमाण सिध्द केले आहे. अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांच्या घरी महानगरपालिकेच्या शिपायामार्फत दि. २.९.२००६ रोजी दिली गेलेली आहे. ही माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थी यांच्या घरातील छाया पिठवा या व्यक्तीने सही करुन ही माहिती प्राप्त झाल्याची

पोचसही दिलेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे विहित केलेल्या अर्जातील मुद्दा क्र. १० द्वारे विचारलेली माहिती ही अविवेकी स्वरुपाची आहे, याबाबत अपिलार्थीस समज देण्यात येत आहे.

विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी.

३. आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई दोन महिन्यांचे आत करुन आपला अनुपालन अहवाल एक महिन्याचे आत सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २४.०६.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अरविंद हरजीवनदास पीठवा, कृष्णनगर कॉलनी, प्लॉट नं. ६५, शक्तिीवजन काटा, शेराजी, पंचवटी, नाशिक-३.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगररचना, महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२७३

निर्णय दिनांक : २४.०६.२००८

१ श्री. महंमद शफी अकमलोद्दीन काझी : अपीलार्थी
रा. अमळनेर, जि.जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद,अमळनेर,
जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक.

त्रयस्थ पक्षः श्री. नथु बुधा न्हावी : त्रयस्थ पक्ष

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. महंमद शफी अ कमलोद्दीन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुखदेव रामभाऊ शेलार, प्र.कर निरीक्षक,जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,अमळनेर जि.जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. विठ्ठल तेजराव जरे, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात

येईल) हे हजर आहेत. तर त्रयस्थ पक्ष श्री. नथु बुधा न्हावी (यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.०९.०५.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अमळनेर येथील सि.स.नं.१४३५/५-ब संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

> " अमळनेर येथील सि.स.नं.१४३५/५ ब ही मिळकत श्री. नथु बुधा न्हावी यांनी दि. १८/१२/१९६८ रोजी खरेदीने घेतली होती आणि त्यांनी ती मिळकत दि. १४/५/१९८२ रोजी विक्री केली. (१) या १४ वर्षांचे कालावधीत आकारणी पत्रकाची नक्कल तसेच (२) नथू बुधा न्हावी यांनी आपले नांव दाखल करणेकामी दिलेल्या अर्जाची आणि (३) अर्जासोबत दिलेल्या मिळकतपत्रीकेची नक्कल मिळावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस "सि.स.नं.१४३५ मध्ये श्री. नथु बुधा न्हावी यांचे नांव न.पा. रेकार्डला नाही. यामुळे तुम्हास पुढील माहिती देता येत नाही," असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.०५.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती चुकीची कशी आहे, याबाबत स्पष्टीकरण देऊन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.६.२००६

रोजी सुनावणी होऊन त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात दि. १३.७.२००६ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांचेशी संबंधित माहिती पंधरा दिवसांचे आत पुरविण्याचे सूचित केले असून अपिलार्थीस उर्वरित माहिती सिटी सर्व्हे ऑफीसकडे मागणी करण्याचे सूचित केले आहे. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०८.२००६ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावर "विभागीय आयुक्त यांचे निकालपत्र ठरत नाही, तर समर्थनपत्र ठरते," असे अभिप्राय नमुद केले आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती न पुरविता टोलवाटोलवीचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अंमळनेर यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर घरपट्टीची आकारणीच्या पत्रकाच्या नक्कलेची मागणी केली होती. तथापि या मागणीशी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना घरपट्टीची वसूली त्यांच्या कार्यालयाकडून होत नसल्याचे कळविले. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी त्यांना दि. ४.८.२००६ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून दिलेले पत्र दाखविले, यावरुन त्यांनी तालुका निरीक्षक यांच्याकडे अशाप्रकारे विधान केल्याचे दिसून येते.त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे एकूण तीन पत्रिकांच्या नकला मागितल्या होत्या, त्यापैकी अपिलार्थीने

मागितलेल्या संबंधित मिळकतीबाबत १९६८ते १९८२ या १४ वर्षांच्या कालावधीमध्ये केलेल्या आकारणीपत्रकाच्या प्रती विशेष प्रयत्न करुन मिळविल्या असून ते त्या अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये श्री. नथु बुधा न्हावी यांचा मूळ अर्ज व अर्जासोबत जोडलेली मिळकतपत्रिकेची नक्कल त्यांचे कार्यालयामध्ये शोध घेऊनही ती माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही, अशाप्रकारचे अभिलेखे व कागदपत्रे जतन करण्याचा कालावधी पाच वर्षांचा असून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भातील माहिती त्यांच्या कार्यालयातून नष्ट केली गेली आहेत व हे ते शपथपत्रावर आयोगास लिहून देण्यात तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस दि. २७.५.२००६ रोजीच्या अपील अर्जावर दि. ३०.६.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ७.७.२००६ रोजी पारित कले आहेत, हे आदेश त्यांनी त्यांच्याकडील दि. १३.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. नथु बुधा न्हावी यांच्या दिनांक ८.१२.१९६८ रोजीच्या खरेदीने घेतलेल्या मिळकतीची दि. १४.५.१९८२ रोजी विक्री केली. या चौदा वर्षांच्या कालावधीतील आकारणीपत्रकाची नक्कल, नथु बुधा न्हावी यांनी दिलेला अर्ज व त्यासोबत जोडलेली मिळकतपत्रिका यांची माहिती अपिलार्थीस हवी आहे. यापैकी जन माहिती अधिकारी यांनी या मिळकतीवर १९६८ ते १९८२ या कालावधीत झालेल्या आकारणीपत्रकाचीप्रत अपिलार्थीस अपिलार्थीस आज सुनावणीचे वेळी आयोगाचे समक्ष पुरविली आहे. मात्र अपिलार्थीने त्यांनी सदर मिळकतीवर आपले नाव लावण्यासाठी केलेल्या अर्जाची व त्या संबंधीच्या सहपत्राची प्रत त्यांचेकडे सदर अभिलेखे शासकीय

कार्यालयातील ‘क’ वर्गामध्ये मोडत असल्याने व त्यांचे जतन करण्याचा कालावधी यापूर्वीच संपुष्टात आला असल्याने, अपिलार्थीस हे कागदपत्र पुरवून येत नसल्याचे आयोगासमोर सांगितले आहे. एकाच मिळकतीवर हक्कधारकाच्या नावात बदल करण्यासाठी निश्चितपणे कोणती पध्दत अवलंबिली जाते, याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केले, यामध्ये कोणत्याही नागरिकाने प्रथमतः मिळकत विकत घेतल्यानंतर त्यावर आपला हक्क स्पष्ट करण्यासाठी नगर भूमापन कार्यालयामध्ये जाऊन त्या मिळकतीवर आपल्या नावाची नोंद करुन घेणे गरजेचे असते. एकदा सिटी सर्व्हे कार्यालयातील रेकॉर्डमध्ये संबंधित मिळकत पत्रिकेवर नागरिकाच्या नावाची नोंद केली गेली, त्यानंतर अशा मिळकतपत्रिकेचा आधार घेऊन, सदर नागरिकाने संबंधित नगरपालिकेतील रेकॉर्डवरील संबंधित मालमत्तेवर त्यांच्या नावाची नोंद घेण्यासाठी वेगळ्याने अर्ज करावयाचा असतो. त्यामुळे सदर पध्दत पाहता अपिलार्थीने वरील अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना नगरपरिषदेच्या किंवा नगर भूमापन कार्यालयाकडून उपलब्ध होऊ शकेल, असे दिसते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अभिलेख्यांच्या ‘क’ या वर्गात मोडत असल्याने व ती नष्ट केली असल्याने ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येणे शक्य नसल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले. त्यामुळे अपिलार्थीस त्यांचे मुद्दा क्र. २ व ३ संदर्भातील माहिती आता त्यांना हवी असेल तर, त्याबाबत त्यांनी वेगळ्याने नगर भूमापन अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी. अपिलार्थीने मागितलेली माहिती विशेषतः संबंधित दोन मुद्यांवरील माहिती नगर परिषदेकडे उपलब्ध नव्हती तर अधिनियमाच्या कलम ६(३)(i) प्रमाणे त्याची प्रत तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालयाकडे पाठविणे अभिप्रेत होते, तथापि अशाप्रकारची कोणतीही कृती त्यांनी केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या

युक्तीवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांनी तालुका भूमि अभिलेख कार्यालयाकडे घरपटटीची आकारणी त्यांच्या कार्यालयाकडून केली जाते असे चुकीचे उत्तर दिले आहे. तसेच त्यांच्या माहितीसाठीच्या दि. ९.५.२००६ रोजीच्या मूळ अर्जास दि. १२.५.२००६ रोजी दिलेला प्रतिसाद पाहता त्यांनी या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात नकार दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या या घटनेतील सर्व टप्प्यावरील प्रक्रियेमध्ये दर्शविलेल्या त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाबद्दल त्यांना आता आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून येथून पुढे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने, त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महंमद शफी अकमलोद्दीन काझी, काझीवाडा, वाडी चौक, अमळनेर, मु.पो. ता.अमळनेर जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अमळनेर जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२७४

निर्णय दिनांक : २४.०६.२००८

१ श्री. मर्दानखा हैदरखा खान : अपीलार्थी
रा. अमळनेर, जि.जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद,अमळनेर,
जिल्हा जळगाव
२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. मर्दानखा हैदरखा खान, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुखदेव रामभाऊ शेलार, प्र.कर निरीक्षक,जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,अमळनेर जि.जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. विठ्ठल तेजराव जरे, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.२०.०५.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी आकारलेल्या पाणीपट्टी भरल्याबाबत एकूण ४ मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

" पाणीपट्टी मागणी कराचे सन २००६ ते २००७ चे रक्कम रु. १०८०/- चे बिल आपण पाठविले आहे. बिलाची झेरॉक्स प्रत सोबत दिली आहे. तरी आपलेकडून मला खालीलप्रमाणे माहितीची आवश्यकता आहे. यापूर्वी पाणीपट्टी ८०६/- रु. घेण्यात येत होती. ती आता रु. २७४/- ने वाढवून रु.१०८०/- मागणी करण्यात आलेली तरी वाढविणेचे कारण जसे.

१) नविन पंपींग स्टेशन निर्माण करण्यात आले आहे अथवा कसे ?

२) नविन पाईपलाईन टाकण्यात आली अथवा कसे ?

३) इलेक्ट्रीक बिलात अचानक वाढ झालेली आहे अथवा कसे ?

४) देखरेख खर्चात वाढ (कर्मचारींची संख्या) झालेली आहे अथवा कसे ?

५) नागरीकांच्या मुलभूत सेवा सुविधा मध्ये लोकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेचा समावेश होतो अथवा कसे आणि समावेश होत असल्यास स्वतंत्र पाणीपट्टी वसुल करणेचे कारण

६) दुधाचे उकवडयावाल्याने दोन दिवस खाडा केल्यानंतर झालेल्या खाडयाचे बिल तो स्वतः घेत नाही. आपणही त्याला खाडयाचे पैसे देत नाही. आपण मात्र नागरीकांना

दोन दिवसाआड पाण्याचा पुरवठा करतात म्हणजे ३६५ दिवसांऐवजी १२२ दिवसच पाण्याचा पुरवठा करतात असे असतांना १२२ दिवसाचे बिल न पाठविता ३६५ दिवसांची बिले देतात आणि बिल न भरल्यास नळ कनेक्शन तोडून टाकण्यात येईल म्हणून नोटीसा पाठवितात. याबद्दल आपले काही नियम असतील त्याची माहिती

७) ज्या नागरीकांना आर्थिक अडचणीमुळे नळ कनेक्शन घेता येत नाही अथवा ज्या नागरीकांना आपली स्वतःची घरे नाहीत जे झोपडपट्टीत राहतात त्यांना पाण्याचा पुरविठा करणेकामी सार्वजनिक नळाची व्यवस्था करण्यात आलेली आहे अथवा कसे याबद्दलची माहीती.

८) पाणीपट्टी वाढविणे पूर्वी नगर परिषदेने ठराव मंजूर केला असल्यास मंजूर ठरावाची नक्कल मिळावी."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०६.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील सर्व मुद्यांवर माहिती पुरविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.०६.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०७.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात त्यांनी आपले आदेश दि. २९.७.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे

त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०९.२००६ रोजी द्वितीय अपिल दाखल केले असून जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.७.२००६ रोजी दिलेले निर्णय चुकीचे असून सदर निर्णय निकालपत्र न म्हणता समर्थनपत्र म्हणता येईल, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे निर्णयाविरुध्द कोणाकडे द्वितीय अपील करावयाचे, याचा उल्लेख् ं त्यांच्या निर्णयामध्ये केला नसल्याचे नमुद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी आपले म्हणणे आयोगासमोर लेखी स्वरुपात सादर केले असून त्यामध्ये नमुद केलेले मुद्दे आज सुनावणीचे वेळी विचारात घेण्यात यावेत, अशी विनंती केली. अपिलार्थीच्या या निवेदनाचे अवलोकन करता, त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती चुकीचे आहे. तसेच त्यांचे लिहिणे लबाडीचे असल्याचे नमुद केले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचे आंधळे समर्थन केल्याने ते आयोगाकडे द्वितीय अपील करीत असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या या निवेदनामध्ये मागणी केलेल्या मुद्यांवर अमळनेर नगर परिषदेने घेतलेले निर्णय कसे त्यांच्यादृष्टीने चुकीचे आहेत, याचे सविस्तर विवेचन केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २०.५.२००६ रोजीच्या मूळ अर्जास अनुसरुन त्यांनी अपिलार्थीस दि. ७.६.२००६ रोजी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद अथवा अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १८.६.२००६ रोजीच्या अर्जावर त्यांनी दि. ११.७.२००६ रोजी

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २७.७.२००६ रोजी पारित केले आहेत. या अपील आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ८ मुद्यावर माहिती मागविली आहे. त्यातील मुद्दा क्र. ८ वगळता उर्वरित सर्व मुद्यांद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण मागून त्यांच्या निर्णयाची कारणे विचारली आहेत. त्यांना प्राप्त झालेल्या सन २००६-२००७ या कालावधीतील पाणीपट्टीच्या बीलासंदर्भात त्यांना हे प्रश्न विचारले असून त्यांनी या प्रश्नाद्वारे पाणीपट्टीचा दर जन माहिती अधिकारी यांनी का वाढवली आहे, याची कारणे विचारली आहेत व आयोगाकडे अपील अर्ज करतांना सदर निर्णय कसे चुकीचे आहेत, याची कारणमिमांसा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) द्वारे स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्यांतील मुद्दा क्र. ८ वगळता उर्वरित सातही मुद्यांद्वारे त्यांनी विचारलेली माहिती सुसंगत नाही.माहिती अधिकार अधिनियमाद्वारे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारणे अथवा त्यांच्या कोणत्याही निर्णयाची, कृतीचे समर्थन करणे अभिप्रेत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांची भूमिका एखाद्या विश्वस्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करुन ठेवणे व माहितीची मागणी ज्या प्रमाणे होईल, त्याप्रमाणे आपल्याकडील उपलब्ध माहिती त्यांनी अर्जदारास पुरविणे, या प्रमाणे त्यांचे कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने प्रश्न विचारुनदेखिल जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक

तो खुलासा करण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलार्थीस अमळनेर नगरपरिषदेने पाणीपट्टीच्या दरात वाढ केल्याचे कारण व त्याचे पुरेसे समर्थन हवे आहे. पाणीपट्टी किंवा इतर करात वाढ करणे हा मुद्दा पूर्णतः नगरपालिकेचा अधिकार असून या अधिकारांतर्गत अमळनेर नगरपरिषदेने पाणीपट्टी करात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकीय व्यवस्थेमध्ये संबंधितांनी घेतलेल्या निर्णयामध्ये अनावश्यक हस्तक्षेप करणे आयोग उचित समजत नाही. वरील सर्व कारणास्तव अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे. या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०७.२००६ रोजीच्या दिलेल्या निर्णयामध्ये अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळण्याच्या कारणांचा पुरेपूर उहापोह केला आहे. राज्य माहिती आयोग जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाशी सहमती दर्शवून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मर्दानखा हैदरखा खान, इस्लामपुरा, सूर्यवंशी बिल्डींगचे मागे, अमळनेर, मु.पो. ता.अमळनेर जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अमळनेर जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२०१

निर्णय दिनांक : २४.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शाहा महंमद युनुस अब्दुल वहाब<br>रा.ता.जि.जळगाव | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा शिक्षणाधिकारी,<br>ठाणे महानगरपालिका, ठाणे | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा आयुक्त, महानगरपालिका,<br>ठाणे. | | |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. चंद्रहास लिंबाजी मैंदाड, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी महानगरपालिका शिक्षण मंडळ,ठाणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. विजय रंगनाथ साळवे,वरिष्ठ लिपीक, जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त महानगरपालिका,ठाणे यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. शाह महंमद युनुस अब्दुल वहाब, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.०६.१२.२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे कार्यक्षेत्राशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे एकूण ६ मुद्यांवर मागविली होती.

९) शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी महाराष्ट्र टाईम्स (शहर आवृत्ती) दि. २.३.२००० मधील जाहिरात क्र.ठामपा/पीआरओ/२६९/९९-२०० दि. ०१.०२.२००० अन्वये उर्दू व हिंदी प्रा.शि. ची विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन किती पदे भरली होती व त्यावर कोणकोणाची नेमणुक केली होती ? त्यांना किती दिवस सेवा करु दिली ?

१०)शिक्षणाधिकारी आदेश जा.क्र.१६९६ दि. २९.१०.२००० अन्वये नियुक्ती तूर्त रद्द करण्यात आल्याचे कळविलेल्या शिक्षणसेवकांना प्रत्येकी मानधनाची रक्कम किती होते ? त्यापैकी किती लोकांना मानधनाची रक्कम अदा करण्यात आली व केंव्हा ?

११)ज्यांना मानधनाची रक्कम आदा करण्यात आलेली नाही त्याची काय कारणे आहेत ?

१२)या संदर्भात खालील स्वाक्षरीकाराने आपणास किती पत्रे/स्मरणपत्रे पाठविली ? त्यावर आपण काय कार्यवाही केली ? कार्यवाही केली नसल्यास कारणे? कोणकोण जबाबदार आहेत ? त्यांच्यावर कार्यवाही करणार किंवा नाही? काय?

१३)ज्यांना अद्याप मानधन आदा केलेले नाही त्यांना केंव्हा व्याजासह आदा करणार ?

१४) अपिलीय अधिकाऱ्यांचा पदनाम व संपूर्ण पत्ता."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.०३.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपीलाची दखल न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०६.२००६ रोजी द्वितीय अपिल दाखल केले.

या अर्जामध्ये त्यांनी माहितीचा विषय व स्वरुप या रकान्यात त्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती सोबत जोडल्या असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपीलामध्ये माहितीची विशिष्ट अशी मागणी न केल्याने अपिलार्थीच्या मूळ माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे गृहीत धरुन सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ०६.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. ८.२.२००६ रोजी पुरविली असून ही माहिती अपिलार्थीपासून दडविण्याचा किंवा ही माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जुन्या अभिलेख्यामधील असल्याने, सर्व

जुने अभिलेखे शोधून ही माहिती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात त्यांना अपिलार्थीकडून कोणतेही पत्र प्राप्त झाले नसल्याने, या मुद्यांवरील माहिती ते अपिलार्थीस देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, प्रथमतः अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात विचारलेली आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ८.२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथमतः या मुद्यांमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ सोडून उर्वरित सर्व माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत दिसून येत आहे. अपिलार्थी हे ठाणे शिक्षण मंडळाकडे शिक्षण सेवक या पदावर दि. ४.९.२००० ते २१.१०.२००० या कालावधीमध्ये कार्यरत होते. या कालावधीमध्ये त्यांना ठाणे महानगरपालिकेकडून कोणतेही मानधन प्राप्त न झाल्याने, या मानधनाच्या थकबाकीसंदर्भात त्यांनी ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडे बराच पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. अपिलार्थीने शिक्षणाधिकारी, शिक्षण मंडळ, ठाणे यांच्याशी केलेला हा पत्रव्यवहार रजिस्टर्ड पोस्टाने व अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींग या माध्यमातून केलेला असल्याचे दिसून येते. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ८.२.२००६ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. ४ च्या दिलेल्या उत्तर यावर आयोगाने विश्वास ठेवणे शक्य आहे. अपिलार्थीने या मुद्याद्वारे त्यांच्या स्वतःच्या थकबाकीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांचेकडे किती पत्रे/स्मरणपत्रे पाठविली, त्यावर जन माहिती अधिकारी यांनी काय

कार्यवाही केली, कार्यवाही केली नसल्यास कारणे, यास जबाबदार कोण, त्यांच्यावर कार्यवाही करणार किंवा नाही, अशी जन माहिती अधिकारी यांचेकडून उत्तरे व खुलासा मागणारी माहिती विचारली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या या मुद्यांतील त्यांच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, ही माहिती वगळता उर्वरित प्रश्नावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उत्तरे देणे अभिप्रेत नाही. मात्र अपिलार्थीच्या अर्जावर त्यांनी जो काही पत्रव्यवहार इतर प्राधिकरणाशी अथवा कार्यालयाशी केला असेल तर, त्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस या मुद्यांच्या संदर्भाने देणे भाग होते. परंतु मूळात अपिलार्थीचे मुद्दा क्र. ४ मध्ये उल्लेखिलेले अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाले नाहीत, असे त्यांनी अपिलार्थीस दि. ८.०२.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यावर सकृतदर्शनी कोणाचाही विश्वास बसणे शक्य नाही. जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगास अशी माहिती दिली की, अपिलार्थीने ज्या मानधनाच्या थकबाकीसाठी हा सर्व पत्रव्यवहार केला होता, त्या सर्व मानधनातील थकबाकी द्वारे रक्कम रु.४७३२/- इतकी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र क्र. २१७/०८ दि. २.५.२००८ रोजीच्या धनादेशाद्वारे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे व सदरचे पत्र अपिलार्थी यांनी स्वीकारले आहे. त्याबाबतची पोच त्यांचे कार्यालयात उपलब्ध असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. या सर्व बाबी पाहता, या प्रकरणी असा निष्कर्ष निघतो की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा विलंबाने व अर्धवट माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती जुन्या अभिलेख्यामधील असल्याने व ते अभिलेखे शोधण्यासाठी वेळ लागत असल्याचा त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केले आहे, त्यांचा हा युक्तीवाद आयोग मान्य करत नाही. त्यांनी अपिलार्थीस अपूरी व विलंबाने माहिती देऊन आपल्या

कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी अशाप्रकारच्या कार्यपध्दतीबद्दल आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांना असे सूचित करण्यात येते की, भविष्यात त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी.

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात माहिती देण्याचे संबंधाने जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी या विषयाच्या नस्तीचा त्यांच्या कार्यालयामध्ये परत एकदा शोध घेऊन अपिलार्थीस त्यांनी मुद्दा क्र. ४ द्वारे विचारलेल्या, त्यांच्या जन माहिती अधिकारी यांना लिहिलेल्या पत्राची व स्मरणपत्रांची संख्या, त्यावर केलेल्या कार्यवाहीशी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस मुद्दा क्र. ४ मधील उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याची आवश्यकता नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्यामूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य (एकूण पत्रांची संख्या, त्या पत्रासंदर्भात केलेला पत्रव्यवहार व त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या कामी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती इ.कागदपत्रांची माहिती) पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शाह महंमद युनूस अब्दुल वहाब, १०९/४, अक्सानगर, पटेल पिठाच्या गिरणी शेजारी, मेहरुण, जळगाव-४२५१३५

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळ, चंदनवाडी, पाचपाखडी, डॉ. अल्मेडा रोड, ठाणे-४०० ६०२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, ठाणे चंदनवाडी, पाचपाखडी, डॉ. अल्मेडा रोड, ठाणे-४०० ६०२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२१३

निर्णय दिनांक : २४.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. पद्माकर भावडू पाटील,<br>रा. जळगाव. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा नगररचनाकार,<br>जळगाव महानगरपालिका,<br>जळगाव.<br>२ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा उपआयुक्त (सा.प्र.),<br>जळगाव महानगरपालिका,<br>जळगाव. | : | प्रतिवादी |

**व**

| | | |
|---|---|---|
| १ श्री. एम.एच.खान<br>२ श्री. संजय लक्ष्मण नेमाडे<br>३ श्री. शशिकांत बोरोले<br>४ श्री. चंद्रकांत पुराणिक<br>५ श्री. उमाकांत चौधरी<br>६ श्री. अे. अे. शाह | : | त्रयथपक्ष |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. पद्माकर भावडू पाटील, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. देविसिंग हिलाल पाटील, जन माहिती अधिकारी

तथा नगररचनाकार, म.न.पा. जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) , श्री. रावसाहेब रंगनाथ काळे, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) महानगरपालिका, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थपक्ष श्री. संजय लक्ष्मण नेमाडे व इतर (यापुढे त्यांना त्रयस्थपक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.२१.०४.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" खाली दिलेल्या म.न.पा.मधील कर्मचाऱ्यांच्या मालकीच्या घरांची बांधकामाच्या प्लानची लघुत्तम (Redused) प्रत्येकी एक प्रत प्रत्येक प्रत उपआयुक्तांच्या सहीने प्रमाणीत असावी.

| | पत्ताः |
|---|---|
| १) श्री. एम.एच.खान-अतिक्रमण, निरीक्षक- | ९२,अक्सानगर, मेहरुण शिवार, |
| २)श्री. एस.एल.नेमाडे (न.र.)- | ३५० विठ्ठलपेठ, जळगाव |
| ३)श्री. शशीकांत बोरोले, अभियंता- | हाउसिंग सोसायटी,पिंप्राला रोडटच सूर्या हास्पीटल जवळ |
| ४)श्री. चंद्रकांत पुराणिक, स.अभियंता पाणीपुरवठा- | खानदेश मिलचाळ,उत्तरेकडील पहिलेच घर-पश्चिमबाजू- |
| ५) श्री. उमाकांत चौधरी, कर वसुली विभाग- | भिकमचंद जैननगर |
| ६) श्री. अे.अे. शाह आरोग्य विभाग- | अक्सानगर" |

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.०४.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये, "बांधकामाचे स्थान स्पष्ट करणारे सि.स.नं./स.नं., परवाना क्रमांक इत्यादी कागदपत्रे जोडली नसल्यामुळे प्रत देता येत नाही", असे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.०५.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०५.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात त्यांनी आपले आदेश दि. २१.०७.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविल्यास संबंधितांच्या वैयक्तिक सुरक्षिततेचा व Privacy चा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याचे नाकारले मात्र त्रयस्थ पक्षाच्या बांधकामाच्या परवानग्या अपिलार्थीस पुरविण्यासाठी त्यांनी या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०८.२००६ रोजी द्वितीय अपिल दाखल केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी ज्या नागरिकांच्या स्वतःच्या राहत्या घराचे इमारतीचे संदर्भात माहितीची मागणी केली आहे, त्यापैकी तिघेजण महानगरपालिकेमध्ये अतिक्रमण काढणाऱ्या विभागात कार्यरत आहेत. त्यामुळे मनपाकडून त्यांनी मागितलेली माहिती देण्यासंदर्भात हेतूपुरस्सर काही कार्यवाही झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुन त्याचा काहीही उपयोग झालेला

नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करतांना त्यांनी जिल्हाधिकारी, जळगाव यांना उद्देशून लिहिलेल्या एका अर्जाची प्रत सोबत जोडली होती. या अर्जामध्ये त्यांनी मनपा कर्मचाऱ्यांनी, जे स्वतः अनधिकृत बांधकामे पाडणारे आहेत, त्यांनी स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करुन अनधिकृत बांधकामे केली आहेत, असे नमुद करुन त्यांनी अर्जासोबत त्रयस्थ पक्षाच्या अनधिकृत बांधकामाची पक्षनिहाय अभिप्राय/माहिती त्यांनी सोबतच्या कोष्टकामध्ये जोडला आहे. त्रयस्थ पक्षाने त्यांच्या निवासस्थानी निश्चितपणे त्यांच्या मते अनधिकृत केलेले बांधकाम कोणते याचा खुलासा त्यांनी या अर्जामध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेला आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रत्येक अर्जाचे उत्तर देण्याचे टाळले असून त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्याशी बराच पत्रव्यवहार करावा लागला, यामध्ये त्यांना मानसिक त्रास झाला. त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाच्या राहत्या घराच्या बांधकामासंदर्भात माहिती विचारली आहे, त्यातील काही कर्मचारी हे मनपातर्फे अनधिकृत बांधकामे पाडणाऱ्या विभागातील आहेत. ते अनधिकृत बांधकामे पाडणाऱ्या विभागात काम करतात, स्वतःच्या निवासस्थानी मात्र त्यांनी अनधिकृत बांधकामे केली आहेत. स्वतःच्या बांधकामाच्या तपशीलाची माहिती त्यांनी जिल्हाधिकारी यांना त्यांच्याकडील दि. ७.११.२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेली नाही. संबंधित त्रयस्थ पक्ष जळगाव शहरातील अतिक्रमणे काढून त्यांच्याकडून पैसे खाऊन भ्रष्टाचार करत असतात. त्यामुळे या प्रकरणी त्यांना न्याय मिळावा, त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई व्हावी, अशी विनंती त्यांनी आयोगास शेवटी त्यांच्या युक्तीवादामध्ये केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या वेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. या पदावर ते दि. १९.१२.२००७ पासून कार्यरत आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१.७.२००६ च्या निर्णयामध्ये दिलेल्या त्रयस्थ पक्षाच्या बांधकामाच्या परवानगीच्या प्रती दि. २६.५.२००८ रोजी पुरविल्या आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमुद केलेल्या जागांना त्यांनी भेटी दिल्या असून ही सर्व बांधकामे अंदाजे २० ते २५ वर्षे इतकी जुनी असून ती सर्व बांधकामे गावठाण क्षेत्रामध्ये आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २१.०४.२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दि.२६.०५.२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि.२१.७.२००६ रोजी पारित करुन या आदेशाद्वारे अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाचे बांधकाम परवानग्या उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

त्रयस्थ पक्षाच्या वतीने श्री. संजय लक्ष्मण नेमाडे या त्रयस्थ पक्षाच्या प्रतिनिधीने युक्तीवाद केला की, ते सध्या महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात शाखा अभियंता या पदावर कार्यरत आहे. ते स्वतः राहत असलेले त्यांचे निवासस्थान हे गावठाण क्षेत्रात असून सदर मिळकत वडिलोपार्जित असून तिचे बांधकाम बरेच जुने असलयाने व त्यावेळी ग्रामपंचायत असल्याने महानगरपालिका अस्तित्त्वात नसल्याने त्यावेळचे बांधकाम नकाशे आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये उपस्थित केलेल्या Privacy व सुरक्षितता या मुद्याशी ते सहमत असून अपिलार्थीस त्यांना ही माहिती देतांना त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकेल, असे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या सहा त्रयस्थ पक्षासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, यातील सर्व जण महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, या कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी अतिक्रमण विभागात कार्यरत असून सामान्य नागरिकांनी केलेली बांधकामे पाडतांना ते जो नियम लक्षात घेत असतात,तेच नियम त्यांनी केलेल्या स्वतःच्या बांधकामासाठीसुध्दा लावले पाहिजेत, परंतु जळगाव महानगरपालिका क्षेत्रामध्ये याच्या विरुध्द परिस्थिती असून मनपा कर्मचाऱ्यांनी केलेली अनधिकृत बांधकामे मनपाकडून पाडण्यात येत नाहीत. या संदर्भात दै. लोकमतच्या दि. ६.२.२००६ रोजीच्या आवृत्तीमध्ये 'मनपा कर्मचाऱ्यांचे अतिक्रमणाकडे दुर्लक्ष' या शीर्षकाखाली एक बातमी प्रसिध्द झाली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन त्यांनी जिल्हाधिकारी, जळगाव यांना उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दि. ७.११.२००५ रोजीच्य पत्राची प्रत पाठविली आहे. या पत्रासोबत त्यांनी पाठविलेल्या तक्त्यातील वरील सहा त्रयस्थ पक्षाच्या निवासस्थानामध्ये कोणत्या प्रकारचे अनधिकृत बांधकामे केली आहेत, याचा उल्लेख केला आहे. या प्रकरणी त्रयस्थपक्षाने अपिलार्थीस माहिती देण्याकरिता आक्षेप नोंदवून त्यांचे राहते निवासस्थानाचा मंजूर नकाशा, सदर बांधकामे जुनी व ग्रामपंचायत काळातील असल्याने या बांधकामांच्या नकाशाच्या प्रती त्यांना उपलब्ध होत नसल्याचे त्यांच्या युक्तीवादामध्ये नमुद केले आहे. याही पेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्यांच्या खाजगी बाबीचा व सुरक्षिततेचा मुद्दा त्यांनी आयोगासमोर मांडला. अपिलार्थीस त्यांच्या निवासस्थानाच्या बांधकामाचे नकाशे दिल्यास त्यांच्या खाजगी बाबतीत हस्तक्षेप केल्यासारखे व त्यांच्या सुरक्षिततेसारखे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम निर्णयामध्ये दिलेला निर्णय हा या ठिकाणी योग्य

वाटतो. आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या दि. ७.११.२००५ रोजीच्या जिल्हाधिकारी, जळगाव यांना दिलेल्या अर्जामध्ये जी बांधकामे अनधिकृत म्हणून दाखविली आहेत, त्या सर्व बांधकामांच्या स्थळांना भेटी देऊन अपिलार्थीने म्हटल्याप्रमाणे सदर बांधकामे खरोखरीच अनधिकृत आहेत किंवा कसे, याची तपासणी करावी व त्यावर आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी व सदर कार्यवाही केल्यानंतर, जन माहिती अधिकारी यांनी लिखित स्वरुपात त्यांचे अभिप्राय मनपाच्या अभिलेखात नमुद करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती दिल्याने अधिनियमातील कलम ८(ञ) व (छ)चा भंग होणार असल्याने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरविण्याचा घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो, मात्र त्रयस्थ पक्षाने केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत अपिलार्थीने केलेल्या तक्रारीचे निराकरणही जन माहिती अधिकारी यांनी तत्परतेने करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१.अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २४.०६.२००८** — **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पद्माकर भावडू पाटील, ५१, वाघुळदेनगर, भिकमचंद जैननगरजवळ, जळगाव ४२५ ००१

२ जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, महानगरपालिका, जळगाव-४२५००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त महानगरपालिका, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२००

निर्णय दिनांक : २४.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रामकृष्ण दगडू नेटके,<br>रा. जळगाव. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा गट विकास अधिकारी (प्रशासन),<br>विकास शाखा,विभागीय आयुक्त कार्यालय,<br>नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा उपआयुक्त (आस्थापना),<br>विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय,<br>नाशिक. | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रामकृष्ण दगडू नेटके (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रविंद्र रामसिंह परदेशी, जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (प्रशासन), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) , श्री. नारायण बबन धुमाळ, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (आस्थापना) विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.२२.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी वर्ग-३ वरिष्ठ सहायक व लिपीक या पदासाठी दि. २७.११.२००५ व १९.०२.२००६ रोजी घेतलेल्या परीक्षेसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" दोन्ही परिक्षांचे किती गुणदान झाले बाबत खात्री करणेकामी
उत्तरपत्रिकेच्या झेरॉक्स प्रती मिळाव्यात."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.०८.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस "गुणानुक्रम फक्त उत्तीर्ण कर्मचाऱ्यांनाच देण्यात येत असल्याने इतरांना गुण कळविण्याबाबत शासनाचे आदेश नसल्याने, आपल्या विनंतीचा विचार करता येत नाही", असे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.०८.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०९.२००६ रोजीच्या सुनावणीमध्ये ठरल्याप्रमाणे त्यांच्या कडील दि. ५.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी दि. २७.११.२००५ व १९.२.२००६ रोजी घेतलेल्या परीक्षेत त्यांना प्राप्त झालेल्या गुणांचा प्रश्ननिहाय तपशील कळविला. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०१.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. यामध्ये त्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाने त्यांना पूर्ण माहिती उपलब्ध करुन न देता दिशाभूल करणारी त्रोटक

व अपूर्ण माहिती देऊन मूळविषयापासून त्यांनी वंचित ठेवले आहे. तसेच त्यांना देण्यात आलेल्या चुकीच्या माहितीबाबत योग्य ते आदेश देण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात घेतलेल्या परीक्षेमध्ये स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेल्या उत्तरपत्रिका त्यांनी पुरविल्या नाहीत. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून त्यांना गुणपत्रिका प्राप्त झाली असून, सदर गुणपत्रिकाबाबत त्यांना शंका असल्याने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती म्हणजेच त्यांच्या हस्ताक्षरातील उत्तरपत्रिकांच्या प्रती त्यांना हव्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, शासनाच्या ग्राम विकास विभागाचे पत्र क्र.परिक्षा-१०९१/प्र.क्र.३७०/९२,दि.२१.४.९२ मधील सूचनांनुसार विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी घेतलेली परीक्षा ही स्पर्धात्मक परीक्षा असल्यामुळे उमेदवारांना विषयवार गुण कळवावयाचे नव्हते, तथापि उत्तीर्ण उमेदवारांना गुणानुक्रम व एकूण गुण कळवावेत, अशा आशयाच्या सूचना प्राप्त झाल्या असल्याने, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी उत्तरपत्रिकेच्या प्रती दिल्या नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २४.८.२००६ च्या अपील अर्जावर त्यांनी निर्णय घेऊन अपिलार्थीस त्यांना दोन्ही परीक्षेमध्ये मिळालेल्या प्रश्ननिहाय गुण त्यांच्याकडील दि. ५.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे कार्यालयाने घेतलेल्या स्पर्धात्मक विभागीय परीक्षेमध्ये

त्यांनी दिलेल्या उत्तरपत्रिकेच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली. या विषयावर राज्य माहिती आयोगाकडे वेळोवेळी अनेक अपिलार्थीकडून अशाप्रकारचे माहितीच्या मागणी संदर्भात प्राप्त द्वितीय अपीलांवर सुनावण्या झालेल्या आहेत. तसेच केंद्रीय माहिती आयोग व इतर राज्य माहिती आयोगाकडे देखिल याच प्रकारच्या माहिती संदर्भात वेळोवेळी आदेश निर्गमित केले असून सदर उत्तरपत्रिका प्राप्त करुन घेणे हा अपिलार्थीचा हक्क नसल्याचे, नमुद करण्यात आले आहे.

अशाच एका प्रकरणी मा. केंद्रीय माहिती आयोगाने कु. ट्रेसा वि. केरळ पोस्टल सर्कल यांच्या प्रकरणात दिलेला निर्णय येथे संदर्भादाखल देण्यात येत आहे.

Ms. Treesa Irish-vs-C P I O Kerala Postal Circle, the Central Information Commission also upheld the orders of respondents declining to supply photocopy of an evaluated answer-sheet of the appellant with the observations-

"We, as a Commission, are not satisfied that the larger public interest justifies the disclosure of the information sought for by the appellant to direct that the CPIO to comply with the request of the appellant and as a matter of fact we are of the opinion that furnishing copies of the evaluated answer papers would be against public interest as has been rightly opined by the appellate authority that supply of a copy of the evaluated answer paper would compromise the fairness and impartiality of the selection process."

अपिलार्थीच्या उत्तरपत्रिकेचे संबंधित परीक्षकाने त्यांच्या दृष्टीने केलेले मूल्यमापन असते व अशाप्रकारचे विविध उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन त्यांच्या पातळीवर करुन ते सदर उत्तरपत्रिका योग्य त्या प्राधिकरणाकडे देत असतात. असे करीत असतांना संबंधित परीक्षक व परिक्षा घेणाऱ्या प्राधिकरण यांच्यामध्ये विश्वासाश्रीत संबंध प्रस्थापित झालेले असते. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या विनंतीप्रमाणे उत्तरपत्रिकांच्या प्रती

द्यावयाच्या झाल्यास अशाप्रकारच्या विश्वासाश्रित संबंधाला तडा जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती ही फक्त त्यांच्या उपयोगाकरिता मागितलेली असल्याने, त्यांना माहिती पुरविल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नाही. या सर्व कारणास्तव अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय होत नाही, सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामकृष्ण दगडू नेटके,कनिष्ठ सहायक, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (प्रशासन), नाशिक विभागीय आयुक्त कार्यालय,(विकास शाखा) नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, (विकास शाखा) नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११८५

निर्णय दिनांक २५-०६-२००८

श्री. पाटील प्रशांत लुका, : अपिलार्थी
प्लॉट नं. ४०, व्दारकानगर, अमळनेर,
तालुका अंमळनेर, जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विशेष जिल्हा समाजकल्याण
अधिकारी, जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण
अधिकारी, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. पाटील प्रशांत लुका, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. जितेंद्र रमेश वळवी, जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जळगाव, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. लक्ष्मीकांत ब. महाजन, जन

अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३०-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३-२००४ या कालावधीशी संबंधीत त्यांना प्राप्त न झालेल्या शिष्यवृत्तीबाबत काही माहिती मागितली होती. या अर्जामध्ये त्यांनी, रमाई शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमळनेर यांच्या प्राचार्यांनी शिष्यवृत्ती वाटप केल्यासंबंधीची जी वाटप विवरणपत्रे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केली होती, या शिष्यवृत्ती वाटप केलेल्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रतीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. तथापि अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीखाली केलेल्या या अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही.

अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याच प्रकारची सुनावणी घेतली गेली नाही व यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला गेला नाही, असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

या सर्व प्रकारानंतर अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

उपरोक्त प्रकरणी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात सहज उपलब्ध नव्हती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संबंधीत महाविद्यालयाशी संबंधीत असल्यामुळे

अपिलार्थीने या माहितीची संबंधीत महाविद्यालयाकडून अपेक्षा करणे योग्य होईल. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्याने, अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या शिष्यवृत्तीच्या पावत्या त्यांच्या कार्यालयाकडे सादर करणे अभिप्रेत नव्हते. तथापि शिष्यवृत्ती वाटपासंबंधी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीसंदर्भात चौकशी चालू असल्याने त्यांच्या कार्यालयामधील कर्मचा-यांनी ही माहिती संबंधीत महाविद्यालया-कडून प्राप्त करुन घेतली आहे व ती अपिलार्थीस आता त्यांच्याकडील दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या पत्र क्रमांक ९०६ अन्वये रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. सदर माहिती अपिलार्थीने अपेक्षित केलेली माहिती असून, अपिलार्थीने आयोगासमोर ही माहिती त्यांना उशिरा प्राप्त झाली एवढेच म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने त्यांना अपेक्षित असलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होऊ शकेल अशा प्राधिकरणाकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली नाही, असे जरी असले तरी अशा प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) अन्वये कार्यवाही करुन - अपिलार्थीचा अर्ज संबंधीत महाविद्यालयाकडे पाठवून, त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे जरुरीचे होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थी यांचा मूळ अर्ज त्यांच्या कडे विनाकार्यवाही तसाच ठेऊन दिला. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीने त्यांनी अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जाची अक्षम्य उपेक्षा करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. परिणामी ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, सचिव (सामाजिक न्याय) यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-०३-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेण्याची कारणे विचारली असता अपिलार्थीचा सदर अपील अर्ज त्यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील संबंधीत लिपिकाने सादर न केल्याने त्यांनी ही सुनावणी घेतली नाही, असे आयोगास सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी असे सूचित करण्यात येते की, त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे दाखल होणा-या अपील अर्जासंदर्भात करावयाची कार्यवाही ही विहित मुदतीत होईल याची दक्षता घ्यावी. त्यांच्या कार्यालयामध्ये अशा प्रकारच्या प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर वेळेत निर्णय होऊन त्यांचा निपटारा वेळेत होईल यादृष्टीने त्यांनी आपल्या प्रशासनाची फेररचना करावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याने व सदर माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात वेगळ्याने आदेश नाहीत.

**जन माहिती अधिकारी यांनी, आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली होती त्यावेळी श्री. बी. व्ही. शिंदे नावाचे अधिकारी कार्यरत होते, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जावर माहिती देण्यासंदर्भात त्यांनी कार्यवाही करणे जरुरी होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही. सध्या ते विभागीय समाजकल्याण अधिकारी (जात प्रमाणपत्र पडताळणी समिती), नाशिक येथे कार्यरत आहेत.**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (सामाजिक न्याय) यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २५-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पाटील प्रशांत लुका, प्लॉट नं. ४०, व्दारकानगर, अमळनेर, तालुका अंमळनेर, जिल्हा जळगाव.
२ जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११८७

निर्णय दिनांक २५-०६-२००८

श्री. रमेश काशिराम पाटील, : अपिलार्थी
मु. पो. चिंचपुरे, तालुका पाचोरा,
जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा ग्रामविकास अधिकारी
(ग्रामसेवक), ग्रामपंचायत, चिंचपुरे,
तालुका पाचोरा, जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पाचोरा,
जिल्हा जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रमेश काशिराम पाटील, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रविंद्र दत्तात्रय चौधरी, जन माहिती

अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, चिंचपुरे, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मधुकर काशिराम वाघ, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाचोरा, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३-०४ या कालावधीशी संबंधीत स्वजलधारा योजना व यशवंत ग्राम अभियान अंतर्गत त्यांनी केलेल्या कामाची २ मुद्यावर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ सन २००३-२००४ मध्ये झालेल्या स्वजलधारा योजना अंतर्गत संपूर्ण माहिती व अहवाल मिळणेबाबत ते पुढील प्रमाणे (१) उदभव विहीर खोदणारे / किन्हा कशा प्रकारे खोदली त्याचे नाव व त्याचे बिल / किन्हा व्हाचर (२) पंपिंग मशिन खोदून घेतला त्याचे बिलाची झेरॉक्स (३) उंच टाकीचे काम कोणाला दिली त्याचे बिले / हौचर / त्यांचे नाव (३) रायझींग मेन ३९५० मिटरचे बिले याची झेरॉक्स (४) चेक डॅम ३० मिटर लांबीचे याची बिलाची झेराक्स (५) यादील खर्च कशा प्रकारे झाला आहे त्या इगतवारी (६) विज कनेक्शन खर्चाची डिमांड नोट याची झेरॉक्स तसेच सन २००३ व २००४ मध्ये झालेल्या संपूर्ण कामाचे बिले / हौचर / त्या पिरेडचे प्रोसेडीग बुकाची झेरॉक्स इ. देणे (ह्या सर्वाची सही शिक्याची प्रत मूळ दस्तावरुन झेरॉक्स केलेली देणे).
>
> सन २००४/२००५ या वर्षातील झालेले यशवंत ग्रामअभियान मार्फत झालेली कामे पुढील प्रमाणे (१) शाळेचे वाल कंपाऊंड बद्दल माहीती त्यावरील झालेला खर्च उदा. डबर फोडणे, सिमेंट खरेदी, विटा खरेदी, आसारी खरेदी / खडी सेंट्रींग बिम, पिलर, कॉक्रिट, वाळू खरेदी, विटकाम मजूरी, बिम

ओतणे / जे जे झालेले काम असेल त्या करणाराचे नाव / बिले / हौचर / प्रोसीडींग बुकाची झेरॉक्स, अशा प्रकारे संपूर्ण माहितीचा अहवाल पाठविणे (मूळ दस्तावरुन झेरॉक्स केलेली सही शिक्याची नक्कल देणे) उदा. काम करणाराचे बिले / अगर हौचर / त्याचे नांवे / त्या काळातील झालेल्या कामाबद्दल प्रोसेडींग बुकाची झेरॉक्स अशा पध्दतीने संपूर्ण माहिती पाठविणे) (ह्या संपूर्ण माहीती मूळ दस्तावरुन झेरॉक्स केलेली सही शिक्याची नक्कल देणे)"

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे नसल्याने त्यांनी सदर माहिती ज्या प्राधिकरणाकडे होती त्यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक ०१-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा अर्ज पाठवून दिला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले असल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

तथापि, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे किंवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याशी सरळ संबंधीत अशी मुद्दा क्रमांक २ व्दारे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांनी दिनांक ०३-११-२००६ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरीत केली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक ती पोच दिली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१२-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जलस्वराज्य योजनेची माहिती दिली नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी व्दितीय अपील करतांना त्यांच्या हातून जलस्वराज्य योजनेसंदर्भात चुकीने माहिती मागितली गेली आहे. वास्तवात त्यांना स्वजलधारा योजनेसंदर्भात माहिती हवी होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती दिली, मात्र मुद्दा क्रमांक १ ची माहिती दिली नाही. अपिलार्थी यांना अद्यापही स्वजलधारा योजने-संदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांच्या गावामध्ये (मौजे चिंचपुरे) राज्य शासनाने राबविलेली स्वजलधारा योजना ही त्यावर भरपूर खर्च होऊनही अद्याप पाणीपुरवठा नसल्याने ती पूर्णतः फसली असून अद्यापही पाणीपुरवठ्यासंदर्भात त्यांच्या गावात कोठल्याही प्रकारच्या सोयी झालेल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जामध्ये स्वजलधारा योजना व यशवंत ग्रामसमृध्दी योजना या २ योजनांची माहिती मागितली होती. त्यापैकी यशवंत योजनांची माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-११-२००६ रोजी पुरविली तसेच स्वजलधारा योजनांची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार कार्यवाही केली आहे व अपिलार्थीचा अर्ज या मुद्दयावरील माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविला आहे. सदर माहिती

सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांच्याकडे उपलब्ध असते, त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून घोषित केलेले नाही. अपिलार्थीने मागितलेली या प्राधिकरणाशी संबंधीत असलेली माहिती, संबधीत सचिवांनी आज रोजी तयार केली असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ११-०६-२००८ पासून कार्यरत असून, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी का घेतली नाही यासंदर्भात ते काहीही माहिती देऊ शकत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही दोन प्राधिकरणांशी संबंधीत होती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कार्यवाही करुन अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबधीत प्राधिकरणाकडे, सचिव ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांच्याकडे पाठविली. अपिलार्थीच्या अर्जातील जी माहिती त्यांच्याशी प्रत्यक्षपणे संबंधीत होती अशी माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-११-२००६ रोजी दिली. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस ही माहिती दिनांक २४-१०-२००६ रोजी अथवा तत्पूर्वी मिळणे क्रमप्राप्त होते, तथापि त्यांनी त्यांच्याशी संबंधीत असलेली माहिती देखील अपिलार्थीस देण्यासाठी एकूण ९ दिवसांचा विलंब लावल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या युक्तिवादामध्ये असे स्पष्ट केले आहे की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी स्वजलधारा योजनेची संबंधीत माहिती सचिव ग्रामीण पाणीपुवठा व स्वच्छता समिती यांच्याशी संबंधीत होती. सदर सचिव जन माहिती अधिकारी या पदावर नियुक्त केले गेले नाहीत. सदर पदावरील मूळ नेमणूक

ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसभा घेऊन ग्रामस्थाच्या ठरावाव्दारे केलेली असते. संबंधीत सचिवावर ग्रामसेवकाचे नियंत्रण असते, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून दीर्घकाळ वंचित ठेवल्याबद्दल जरी प्रत्यक्षात सचिव, पाणीपुरवठा हे जबाबदार असले तरी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी या नात्याने संबंधीत ग्रामसेवकाची होती, हा मुद्दा येथे ग्राह्य धरण्यात येत असून, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्याकरिता संबंधीत ग्रामसेवक जबाबदार असल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. सुनावणीच्या दिवशी जन माहिती अधिकारी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-१०-२००६ रोजी त्यांना अपेक्षित असलेल्या माहिती पोटीचे शुल्क रुपये २५१ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्यास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला मूळ अर्ज व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ते शुल्क कळविण्याची तारीख लक्षात घेता, अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. मात्र या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून २५१ रुपये इतके शुल्क प्राप्त करुन घेतले असल्याचे सुनावणीमध्ये उघड झाले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना द्यावयाच्या माहितीपोटीचे रुपये २५१ इतके शुल्क त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत परत करावे, तसेच अपिलार्थीने मूळ माहितीच्या अर्जामध्ये मागितलेली स्वजलधारा योजनेशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून दीर्घकाळ वंचित ठेऊन व अधिनियमा-व्दारे विहित केलेली मुदत टळून गेल्यानंतर अपिलार्थीकडून रुपये २५१ इतके शुल्क प्राप्त करुन घेऊन त्यांना सशुल्क माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या या कृतीने त्यांनी स्वतःला माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. या प्रकरणी असे दिसून येते की, जर संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची वेळेवर सुनावणी घेतली असती तर अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी राज्य माहिती आयोगाकडे धाव घेण्याची गरज पडली नसती. संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केला आहे व त्यांच्या या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाई सिध्द केली आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या या अशा प्रकारच्या वर्तनाची दखल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करतांना त्यांना आवश्यक असलेली माहिती म्हणून

वेगळ्या माहितीचा उल्लेख त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये केला आहे. तथापि तो चुकीने झाला आहे असे त्यांचे सुनावणीच्या युक्तिवादाच्या वेळी म्हणणे पडले. त्यांना अशी समज देण्यात येते की, त्यांनी येथून पुढे राज्य माहिती आयोगाकडे अपील करतांना सतर्क राहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरीत माहिती, हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २५-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रमेश काशिराम पाटील, मु. पो. चिंचपुरे, तालुका पाचोरा, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी (ग्रामसेवक), ग्रामपंचायत, चिंचपुरे, तालुका पाचोरा, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाचोरा, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११८८

निर्णय दिनांक २५-०६-२००८

श्री. सुभाष महारु लिंगायत, : अपिलार्थी
व्दारा- पोलीस मोटर परिवहन विभाग,
जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा पोलीस अधीक्षक कार्यालय,
जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक,
जळगाव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), जळगाव

जन अपिलीय अधिकारी : पोलीस अधीक्षक, जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुभाष महारु लिंगायत व त्यांचे

प्रतिनिधी श्री. भगवान शंकर मराठे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अनिल लुकडूजी जगताप, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), जळगाव, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जळगाव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३०-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते २००५ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. दि. १७/१२/२००३ रोजी सहा. पोलीस निरीक्षक, निंभोरा पो. स्टे. (श्री. साळवे साहेब) यांचे आठवडा डायरीची नक्कल.

२. पो. शि. ४४७, भालचंद्र गुलाबरावा पाटील यांचे दि. १७/१२/२००३ चे नोटबुकाची नक्कल.

३. श्री. सुभाष महारु लिंगायत यांचे विरुध्द दि. १४/०५/२००० ते दि. २८/१२/ २००३ या कालावधीत आलेल्या तक्रारी संदर्भात रजिस्टरची नक्कल.

४. पो. शि. ४४७, श्री. भालचंद्र गुलाबराव पाटील यांचे विरुध्द फैजपूर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्याच्या खबरीची नक्कल व गुन्ह्याचे काय डिस्पोजल झाले याबाबतची नक्कल.

५. पो. शि. ४४७, श्री. भालचंद्र गुलाबराव पाटील यांचे विरुध्द पाठविलेल्या चॅप्टर केसची नक्कल.

६. पो. शि. ४४७, श्री. भालचंद्र गुलाबराव पाटील यांचे विरुध्द पकड वारंट निघाले होते. त्याबाबत वारंट रजिस्टरचा उतारा व वारंट कोणास बचावण्यास दिले त्याबाबत माहीतीचे कागदपत्र.

७. श्री. सुभाष महारु लिंगायत यांना कमांडो कोर्सला पाठविल्याबाबत सेवापुस्तकातील नोंद व वरिष्ठांच्या आदेशाची नक्कल.

८. दि. १७/१२/२००३ रोजीचा निंभोरा पोलीस ठाण्यातील सरकारी वाहनातील लॉगबुकचा उतारा.

९. दि. १७/१२/२००३ रोजी निंभोरा पोलीस ठाण्यातील सरकारी वाहन ज्या अधिका-यांनी वापरले त्यांचे नोटबुक/पेट्रोल बुकाचा उतारा.

१०. दि. १७/१२/२००३ रोजी सदरचे वाहन वापरणारे अम्मलदार बाहेरगावी वाहनासह नोंद करुन गेल्याबाबत ठाणे दैनंदिनीचा उतारा.

११. पो. शि. ४४७, श्री. भालचंद्र गुलाबराव पाटील यांनी दि. १७/१२/२००३ रोजी मुक्ताईनगर येथे जातांना ड्युटी पास घेतला असल्यास त्याची नक्कल, तसेच एस. टी. वारंट घेतले असल्यास त्याची नक्कल.

१२. पो. शि. ४४७, श्री. भालचंद्र गुलाबराव पाटील व इतर कर्मचारी हे दि. १७/१२/२००३ रोजी निंभोरा येथून मुक्ताईनगर येथे गेले व परत आले त्याबाबत पोलीस ठाणे दैनंदिनीत केलेल्या नोंदीचा उतारा व त्यांनी दि. १७/१२/२००३ चे प्रवासभत्ते बिल आकारले असल्यास त्याची नक्कल.

१३. वरील कर्मचा-यांना दि. १७/१२/२००३ रोजी म. उपविभागीय पोलीस अधिकारी मुक्ताईनगर यांच्या कार्यालयात हजर रहाण्याबाबत दिलेल्या आदेशाची नक्कल.

१४. दि. १०/११/२००२ व दि. २७/११/२००३ रोजी श्री. लक्ष्मणराव मनुरे यांनी श्री. सुभाष महारु लिंगायत यांचे विरुध्द दिलेल्या अर्जाबाबत आवक किंवा अर्ज बारीनिशीत नोंद केल्याबद्दलची नक्कल.

१५. तसेच सहा. पोलीस निरीक्षक, निंभोरा श्री. साळवे साहेब यांच्या दि. १०/११/२००३ व दि. २७/११/२००३ च्या दैनंदिनीचा उतारा.

१६. पो. शि. ७३७ रविद्र दला माळी यांनी श्री. सुभाष महारु लिंगायत यांचे विरुध्द दिलेल्या लेखी रिपोर्टाची आवक रजिष्टर नोंदीचा उतारा.

१७. श्री. मनुरे हे अशोक गिरधर कोळी व भास्कर धोंडू कोळी यांना दारु बंदीच्या गुन्ह्यात जामिनदार राहीले असल्याबाबतचा दाखला.''

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे किंवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना कोणतीही माहिती दिली नाही अथवा त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांचे अपील फेटाळले असा त्यावर अर्थ घेऊन त्यांनी हे अपील राज्य माहिती आयोगाकडे केल्याचे दिसत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना जाणूनबुजून माहिती पुरविली नसल्याने त्यांच्यावर दंडनीय कारवाई करावी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा जाणुनबुजून त्यांच्या अपिलाचा निर्णय न देऊन त्यांनी माहिती अधिका-यास पाठीशी घातले आहे त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचा शासनाकडे अहवाल सादर करावा व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी अशी त्यांनी या अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ३०-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुनही त्यांच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही, अथवा त्यांच्याशी यासंदर्भात कोठलाही पत्रव्यवहार केला नाही, त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्या कडून विनामूल्य प्राप्त व्हावी व संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडाची / शिस्तभंगाची कारवाई व्हावी व संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द त्यांनी या प्रकरणी अपील सुनावणी न घेतल्याबद्दल शासनाकडे अहवाल पाठवावा.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक १२-०७-२००७ पासून कार्यरत असून अपिलार्थीने माहितीचा अर्ज दाखल करतेवेळी श्री. डी. जे. सोनार नावाचे पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत होते. सध्या त्यांना शासकीय सेवेतून काढून टाकण्यात आले आहे. त्यांच्या कडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन त्यांना असे आढळले आहे की, मुळात अपिलार्थीने माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर दहा रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प डकविले

नव्हते, संबंधीत अपिलार्थी हे त्यांच्याकडील मोटर परिवहन कार्यालयात “वाहनचालक” या पदावर कार्यरत असून त्यांच्यावर त्यांच्या वर्तणुकीमुळे खात्यामार्फत विभागीय चौकशी होऊन त्यांच्या वेतनवाढी स्थगित करण्याचे आदेश दिले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांच्याविरुध्दच्या विभागीय चौकशीच्या कार्यालयीन प्रक्रियेमधील चौकशी अहवालाची एक प्रत अपिलार्थीस दिली आहे. या अहवालाच्या प्रतीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा समावेश आहे. सदर चौकशी दिनांक १६-०३-२००४ रोजी पूर्ण झालेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०५-२००८ रोजी देऊ केली होती, तथापि अपिलार्थीने सदर माहिती घेण्याचे नाकारले, त्यांच्या या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी स्टेशन डायरीची प्रत आयोगास दाखविली, यावरुन आयोगास त्यांच्या म्हणण्यात तथ्य असल्याचे आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०५-२००६ रोजीच्या अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जावर दहा रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकविले नव्हते. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता या म्हणण्यामध्ये तथ्य असल्याचे दिसून येत आहे. तत्कालीन जन माहिती अधिका-याला आता सेवेतून कमी करण्यात आल्याने त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती का दिली नाही, यावर कोणतीही माहिती अथवा स्पष्टीकरण आता उपलब्ध होऊ शकत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगास सादर केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये सदर अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात, त्यांच्याच मुख्यालयी कार्यरत असूनही त्यांनी या अर्जासंबंधी त्यांना, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना केलेल्या कथित अपिलासंदर्भात काहीही अवगत केले नसल्याचे नमूद केले आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थी जरी सार्वजनिक प्राधिकरणाचा एक भाग असले तरी त्यांना माहिती अधिकार अधिनियमान्वये त्या प्राधिकरणाकडे कोणतीही माहिती मागण्याचा हक्क आहे, अशा प्रकारे अर्ज केल्यासंदर्भात अथवा त्यावर अपील केल्यानंतर त्यासंदर्भात त्यांनी सबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना अवगत करुन देणे हे अपिलार्थी यांचे कर्तव्य किंवा जबाबदारीही नाही, मात्र जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये प्राप्त होणा-या माहिती अधिकार अधिनियमाखालील प्रत्येक अर्जावर व अपिलावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये निश्चित प्रकारची कार्यवाही केली पाहिजे अशी अधिनियमामध्ये तरतूद आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या निवेदनामध्ये अपिलार्थीवर जन माहिती अधिकारी यांनी केलेले हे दोषारोपण आयोग फेटाळून लावत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती तर दिली नाही, व संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन त्यांच्यावरही कडी केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन त्यांनी अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केला आहे, असे निःसंशयपणे सिध्द होत आहे. याव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची दखल सचिव (गृह) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी युक्तिवादामध्ये

स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे त्यांना देण्यासाठी तयार आहे व ते सदर माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील काही मुद्दयांवर (मुद्दा क्रमांक २, ३ व १६ च्या संदर्भातील) माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगासमोर स्पष्ट केले. या मुद्दयांबाबत त्यांना असे सूचित करण्यात येते की, या मुद्दयासंदर्भातील माहितीचा शोध त्यांनी आपल्या कार्यालयामध्ये हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत कसोशीने घ्यावा व एवढे करुनही जर सदर माहिती उपलब्ध झाली नाही तर या मुद्यांवरील माहितीशी संबंधीत अभिलेख्याचे जतन करण्यासाठी जबाबदार असलेल्या कर्मचा-यावर, आवश्यक ती प्रशासकीय कारवाई त्यांनी करावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जास दहा रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकविले नव्हते, हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यापूर्वी अपिलार्थीकडून दहा रुपये किंमतीचा विहित कोर्ट फी स्टॅम्प त्यांच्या प्रथम अर्जावर डकवून घ्यावा अथवा त्यांना दहा रुपये इतके शुल्क अपिलार्थी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाने तिकिटाच्या खर्चापोटी प्राप्त करुन घ्यावेत.

अपिलार्थीच्या अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल न घेऊन जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरले आहेत, परंतु आता संबंधीत जन माहिती अधिकारी हे शासकीय सेवेत नसल्याने त्यांच्यावर आता कोणतीही कारवाई करता येणार नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस

माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे जे संबंधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविण्यासाठीच्या विलंबाबाबत या प्रकरणाशी संबधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणासंबंधाने सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडून दहा रुपये इतक्या कोर्ट स्टॅम्पच्या फीची रक्कम प्राप्त करुन घेऊन, तदनंतर ही माहिती पूर्णतः, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहकारी कर्मचारी / अधिकारी यांनी

अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २५-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष महारु लिंगायत, व्दारा- पोलीस मोटर परिवहन विभाग, जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, (गृह), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११९६

निर्णय दिनांक २५-०६-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सेगजी हुरजी गावीत,<br>मु. पो. नेहरुनगर, नवापूर, तालुका<br>नवापूर, जिल्हा नंदूरबार | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप प्रादेशिक व्यवस्थापक, (आ. वि. म.), नवापूर, जिल्हा नंदूरबार | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप प्रादेशिक कार्यालय, (आ. वि. म.), नवापूर, जिल्हा नंदूरबार | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | उप प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, उप प्रादेशिक कार्यालय, नवापूर, तालुका नवापूर, जिल्हा नंदूरबार |
| | जन अपिलीय अधिकारी | : | प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य |

सहकारी आदिवासी विकास महामंडळ
मर्यादित, प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार,
जिल्हा नंदूरबार

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सेगजी हुरजी गावीत, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. पोपटराव शंकर साळुंके, जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नवापूर, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. संभाजी राघोबा कोळपे, जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नंदुरबार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या वेतनासंदर्भात व इतर बाबींसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“१. माहे ऑक्टोबर २००३ मासिक वेतन कपात रक्कम माहे सप्टेबर २००६ मासिक वेतन कपातबाबत.

२. वर्ष १९९९ पासून वार्षिक वेतनवाढ प्रलंबीत ठेवल्याबाबत.

३. हेडक्वॉटर बाहेर औषध उपचार परवानगी प्रलंबीत ठेवल्याबाबत.

१. वर्णन- माहे ऑक्टोम्बर व माहे सप्टेम्बर २००६ या मासिक वेतनतून माझे येणे नसतांना रक्कम कपात केली आहे. ती रक्कम कोणत्या खाती जमा घेतली त्याची सविस्तर माहिती.

२. वर्णन- वर्ष १९९९ पासून वार्षिक वेतनवाढ प्रलंम्बीत ठेवलेली आहे. प्रलंम्बीत ठेवण्याची सविस्तर कारणे.

३. वर्णन- हेडक्वॉर्टर बाहेर औषध उपचार घेण्यासाठी, परवानगीपत्र प्रलंम्बात ठेवल्याबाबत सविस्तर माहिती. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-११-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे किंवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जास उद्देशून त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०६-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे दिसून येते. अशाच प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात दिल्याचे आढळून येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपील अर्ज त्यांनी दिनांक २९-१२-२००६ रोजी लिहिलेला असून या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना मुदत संपल्यानंतर माहिती दिली व सदर माहिती संभ्रम करणारी व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद करुन, त्यांना मानसिक त्रास देण्याच्या हेतूने त्यांनी माहिती मागविलेल्या विषयातील बाबी प्रलंबीत ठेवल्या असल्याचे नमूद केले आहे व या कारणामुळे संबंधितांवर प्रशासकीय / दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या वेतनातून २ वेळेस अकारण कपात करण्यात आली आहे, तसेच त्यांना १९९९ सालापासून वार्षिक वेतनवाढ जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. मुख्यालयाबाहेरील औषधोपचारासाठीचा त्यांनी पाठविलेला प्रस्ताव जन माहिती अधिकारी यांनी ९ महिने त्यांच्या कार्यालयाकडे वीनाकार्यवाही प्रलंबीत ठेवला होता. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीचे समर्थन करणारी, अशी कृती का केली यासंबंधातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित होती. तथापि विहित मुदतीत ही माहिती त्यांना मिळाली नसून आता त्यांना देय असलेल्या रक्कमा संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दामहून प्रलंबीत ठेवल्या गेल्या होत्या.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत कार्यवाही त्यांनी अनुक्रमे दिनांक २८-०४-२००८ रोजी व दिनांक २३-०६-२००८ रोजी केली

असून अपिलार्थीच्या मासिक वेतनातून दोनदा कपात केली असल्याचा अपिलार्थीचा मुद्दा त्यांना मान्य आहे. अपिलार्थीकडून चारदा कपात करुन घेतलेल्या रकमेचा ताळमेळ घालून उर्वरित रक्कम दिनांक ३०-०६-२००८ पर्यंत त्यांना परत करण्यात येईल. अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-११-२००६ रोजीच्या पत्राने प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १८-११-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक ०६-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्ज करतांना कोणत्याही विशेष स्वरुपाची माहिती, जी माहिती अधिकार अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे, अशी मागितली असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक १ व्दारे त्यांच्या मासिक वेतनातून कपात करण्यात आलेली रक्कम कोणत्या खाती जमा केली अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे, तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनीही अपिलार्थीस अनुक्रमे दिनांक २२-११-२००६ व ०६-१२-२००६ रोजीच्या दिलेल्या पत्रामध्ये या माहितीचा उल्लेख केला नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस, त्यांनी, मूळ अर्जासंदर्भात दोन्ही अधिका-यांनी अपिलार्थीस त्यांच्या या पत्राव्दारे त्यांच्या निर्णयाचे व चुकीचे समर्थन करणारी कारणमीमांसा दिल्याचे येथे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक २ मध्ये त्यांची १९९९ पासूनची वार्षिक वेतनवाढ प्रलंबीत ठेवण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे कारणे विचारली आहेत. अधिनियमातील कलम २

(च) मध्ये ‘‘माहिती’’ या शब्दाची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे जी खालील प्रमाणे आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

‘‘ ‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. ’’

वरील व्याख्येचे अवलोकन करता, अपिलार्थीने मुद्दा क्रमांक २ व्दारे मागणी केलेली माहिती, या व्याख्येशी विसंगत असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका ही एका विश्वस्ताची असून, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करुन ठेवणे व माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात संबंधितांना या माहितीतील आवश्यक ती माहिती पुरविणे, हे त्यांचे कर्तव्य आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर त्यांनी अभिप्राय व्यक्त करणे किंवा त्यांच्या कोणत्याही निर्णयाबद्दल त्यांना अपिलार्थीस कारणे देणे, त्यांना खुलासा करणे हे अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही, आणि अपिलार्थीने नेमकी अशाच प्रकारची मागणी जन माहिती अधिकारी यांचेकडे केली आहे, हे पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती येथे अवैध ठरत आहे. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देणे अपेक्षित नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ३ चे अवलोकन केले असता, त्यांनी

मागितलेल्या माहिती पैकी औषधोपचार घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता, सदर प्रस्ताव जन माहिती अधिकारी यांच्याकडे बराच काळ प्रलंबीत राहिला असल्याचे दिसून येत आहे. तेव्हा अपिलार्थीस या मुद्दयासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या पाठविलेल्या मूळ प्रस्तावावर संबंधीत इतर अधिका-यांशी केलेल्या / वरिष्ठ अधिका-यांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पुरविणे आवश्यक होते. मुद्दा क्रमांक १ व ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना नेमके त्यांच्या कडून कोणती कार्यवाही अपेक्षित आहे, याची सूचना त्यांना आज सुनावणीमध्ये प्रत्यक्ष देण्यात आली आहे व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधीत माहिती त्यांनी ३ दिवसाच्या आत देण्याचे मान्य केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक २२-११-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस असे अवगत करुन दिले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत माहिती मागण्याचा नियम हा जनतेसाठी आहे, अपिलार्थी हे शासनाकडील नियमित सेवेतील कर्मचारी आहेत, त्यामुळे त्यांनी अशा प्रकारची मागणी साध्या पत्राव्दारे करावयास हवी होती, तथापि याबाबत अपिलार्थीने तसे केलेले नाही. जन माहिती अधिकारी यांची, अपिलार्थी हे शासकीय सेवेतील कर्मचारी असल्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींचा लाभ घेणे अनुज्ञेय नाही, ही धारणा चुकीची आहे, कारण शासकीय कर्मचारी हा भारताचा नागरिक असतो व अधिनियमातील कलम ३ प्रमाणे प्रत्येक भारतीय नागरिकास माहिती मागण्याचा हक्क आहे, ही बाब त्यांनी येथून पुढे लक्षात ठेवावी व अशा प्रकारे चुकीचे अभिप्राय त्यांनी त्यांच्या अधिनियमाशी संबंधीत पत्रव्यवहारातून व्यक्त करु नयेत, अशी सक्त ताकीद त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने संदर्भिय अर्जाव्दारे त्यांच्या ३ ही मुद्दयावरील

गा-हाणे आयोगासमोर मांडले, तथापि २ मुद्दयावरील गा-हाण्याचा निपटारा अंतीमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून झाला असून, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ संदर्भात त्यांनी दिनांक ३०-०६-२००८ पर्यत अंतीमतः कार्यवाही करण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता उपरोक्त परिच्छेदात वर्णिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधीत असलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्या लागतील. अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, यापुढे त्यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधीत माहिती, हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २५-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सेगजी हुरजी गावीत, मु. पो. नेहरुनगर, नवापूर, तालुका नवापूर, जिल्हा नंदूरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, उप प्रादेशिक कार्यालय, नवापूर, तालुका नवापूर, जिल्हा नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार, जिल्हा नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११९७

निर्णय दिनांक २५-०६-२००८

श्री. प्रभाकर मंगा कंखरे, : अपिलार्थी
हौसिंग सोसायटी पोलीस लाईन,
६/३, शाहूनगर, जळगाव, जिल्हा
जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
पोलीस अधीक्षक कार्यालय,
जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
पोलीस अधीक्षक कार्यालय,
जळगाव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), जळगाव

जन अपिलीय अधिकारी : पोलीस अधीक्षक, जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रभाकर मंगा कंखरे, (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अनिल लुकडूजी जगताप, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), जळगाव, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जळगाव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते २००६ या कालावधीतील त्यांच्या सेवाविषयक कागदपत्रांच्याबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. पोकॉ/२०४ प्रभाकर मंगा कंखरे यांना आपल्या कार्यालयाचे आदेश क्र. ५६/विचौ/९२७/२००० दि. २३/१०/२००० नुसार एक वेतनवाढ ४ वर्षासाठी स्थगित केल्याच्या प्रकरणातील दोषारोपपत्र किंवा कारणे दाखवा नोटीस, तद्‌अनुषंगाने झालेली चौकशी, चौकशी समाकलन अहवाल, कारणे दाखवा नोटीस व शिक्षेच्या आदेशाची प्रत संबंधीत कसूरदारास पुरविल्याबद्दलच्या पोहोचसह आदेशाची प्रत, इत्याती कागदपत्रांच्या सत्यप्रती पुरवाव्यात.

२. माहे मे २००४ ते माहे जुलै २००६ पर्यतच्या माझ्या मासिक पगाराच्या वेतन देयकाच्या सत्यप्रती.

३. माझ्या सेवापटाची सत्यप्रत. ”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपैकी काही माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मे २००४ ते ऑक्टोबर २००४ या कालावधीतील वेतन देयकाच्या सत्यप्रती त्याना नंतर पुरविण्याचे पोलीस उप अधीक्षक यांनी अपिलार्थीस आश्वासित केले आहे. (या प्रती अपिलार्थीस आता दिनांक २०-०५-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये आयागासमोर कबूल केले आहे.)

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व ती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असून, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याची व अपिलीय प्राधिकरण यांचा शासनाकडे अहवाल सादर करण्या-विषयी विनंती केली आहे. तसेच त्यांना आता उर्वरीत माहिती विनामूल्य देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करण्याची देखील त्यांनी या अर्जामध्ये विनंती

करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या शारीरिक व मानसिक त्रासाबद्दल, त्यांना रुपये २००० भरपाई व टपाल खर्च रुपये ५०० असे एकूण २५०० इतकी नुकसान-भरपाई देण्याची शेवटी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक २०-०५-२००८ रोजी मिळाली असून या प्रकरणी त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागला या सर्व प्रकरणामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लंघन झाले असल्याने या प्रकरणी ते जबाबदार आहेत त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०८-२००६ रोजीच्या अर्जास अनुसरुन त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०९-२००६ रोजी पत्राव्दारे काही माहिती पुरविली आहे व उर्वरीत माहिती अपिलार्थीस शोधून काढून नंतर पुरविण्यात येईल असे या पत्रामध्ये त्यांनी आश्वासीत केले होते. तदनंतर उर्वरीत कागदपत्रांच्या नकला शोधून काढून उर्वरीत संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक २०-०५-२००८ रोजी हस्तांतरीत केली. सदर माहिती विनामूल्य देण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०८-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, मात्र या अर्जाव्दारे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती जन अपिलीय अधिका-याकडून अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. अपिलार्थीने

जन माहिती अधिकारी यांच्या कडे मुद्दा क्रमांक १ व्दारे चौकशी अहवाल, कारणे दाखवा नोटीशीच्या आदेशाच्या प्रती, मुद्दा क्रमांक दोन व्दारे मासिक पगार वेतन देयकाच्या प्रती व मुद्दा क्रमांक तीन व्दारे त्यांच्या स्वतःच्या सेवापटाची सत्यप्रत अशा एकूण ३ मुद्दयावर माहिती मागविली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या दिनांक १८-०९-२००६ रोजीच्या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ३ चा समावेश नव्हता. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ३ चे अवलोकन करता, सदर माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविणे हे काम फार क्लिष्ट स्वरुपाचे होते किंवा अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती, अशातली कोणतीही बाब येथे संभवत नाही. केवळ जन माहिती अधिकारी यांच्या इच्छाशक्तीचा अभाव याच बाबीमुळेच त्यांनी अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत पुरविली नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी कळविलेल्या मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत देखील त्यांनी दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे देखिल अर्धवट माहिती पुरविली होती. या माहितीमध्ये मे २००४ ते ऑक्टोबर २००४ या कालावधीतील वेतन देयकाच्या सत्यप्रतींचा समावेश नव्हता. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याची इच्छा असा अथवा नसो अधिनियमातील कलम ३ च्या तरतुदीप्रमाणे माहिती मागणे हा अपिलार्थीचा मूलभूत हक्क आहे व त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही करणे हे जन माहिती अधिकारी यांचे आद्य कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी एकूण २ टप्प्यामध्ये दिल्याचे दिसून येत आहे. याबाबत मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत अर्धवट माहिती जन

माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे व येथे देखील जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतः ही माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील एकूण ३ मुद्दयापैकी, मुद्दा क्रमांक २ मधील अंशतः, मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधीत संपूर्ण माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे दिनांक २०-०५-२००८ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अपिलार्थीस जरी त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आता पुरविली गेली असली तरी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात अधिनियमातील विहित तरतुदीच्या कलमांचा केलेला भंग या प्रकरणी लक्षात घेणे आवश्यक आहे. अपिलार्थीस सर्वसाधारण परिस्थितीत जी माहिती दिनांक २१-०९-२००६ रोजी अथवा तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांनी देणे देय होते, ती माहिती त्यांनी अपिलार्थीस अंदाजे २ वर्षे ४ महिने इतक्या विलंबाने पुरविली आहे. इतक्या उशिराने अपिलार्थीस माहिती पुरविणे याचा अर्थ अपिलार्थीस ती न पुरविणे असाच होतो. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे जे संबंधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक व कर्मचारी यांनी आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या कारवाईस पात्र ठरविले आहे. उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना सेवेतून कमी केले असल्याची माहिती उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दिली आहे, त्यामुळे आता ही कारवाई संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे तत्कालीन सहाय्यक व कर्मचारी यांच्यावर जिल्हा पोलीस अधीक्षक यांना करावी लागेल.

सबब जिल्हा पोलीस अधीक्षक, जळगाव यांना असे आदेशीत करण्यात येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने उपरोक्त प्रकरणी मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात सहाय्य करणारे त्यांचे सर्व जबाबदार कर्मचारी / अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत उर्वरीत माहिती आता त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी. तसेच अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या नुकसानभरपाई संदर्भात त्यांनी आयोगाकडे कोणताही पुरावा सादर न केल्याने अपिलार्थीस कोणतीही नुकसानभरपाई देय ठरत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत उर्वरीत माहिती आता त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हा पोलीस अधीक्षक जळगाव यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले सर्व कर्मचारी / अधिकारी, ज्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी

म्हणून समजावे अशी तरतूद आहे, अशा सर्वांवर हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक २५-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रभाकर मंगा कंखरे, हौसिंग सोसायटी पोलीस लाईन, ६/३, शाहूनगर, जळगाव, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११९८

निर्णय दिनांक २५-०६-२००८

श्री. यशवंत महारु पवार, : अपिलार्थी
अध्यक्ष, महाराष्ट्र आदिवासी ठाकूर
जमात सेवा मंडळ, ९ विद्युत कॉलनी,
शिवाजीनगर, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा अनुसूचित जमाती जात दाखले
पडताळणी समिती, आग्रा रोड,
नाशिक – ०२

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अनुसूचित जमाती जात दाखले
पडताळणी समिती, आग्रा रोड,
नाशिक – ०२

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : उप संचालक अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. दामोदर मोहनराव ठाकूर, अपिलार्थी श्री. यशवंत महारु पवार यांचे प्रतिनिधी, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. प्रकाश शेनफडू वाणी, जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्रीमती सुरेखा अरविंद शेवाळे, जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ठाकूर जातीचे दाखले पडताळणीच्या निकालास होणा-या विलंबाबाबत सन २००३ ते २००६ या कालावधी-तील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"अ) ठाकुर व महादेव कोळी अनु-जमातीची तपासणी समितीकडे तपासणी-साठी मिळालेल्या अर्जाची विहीत नोंदवहीत वरील मुदतीत केलेल्या नोंदीची झेरॉक्स प्रत (आलेल्या व निकालांच्या तारखेसह) आणि प्रत्येक प्रकरणाचे निकालाच्या शे-यासह कृपया संघटनेस मिळावी.

ब) अर्जातील माहितीची व दस्ताऐवजांची छाननी करुन लेखी पुराव्याबाबत समाधान झाल्याने अपण कोणत्याही प्रकारणांमध्ये उमेदवारांना सुनावणीस न बोलविता मेरीटच्या प्रोसीडींग तयार करुन किती लोकांना वैधता पत्रे दिली हे कृपया कळवावे.

क) प्रकरणांचे निकाल लावण्या पुर्वी वरील कालावधीत किती लोकांना वैधता पत्रे दिली हे कृपया कळवावे.

ड) प्रकारनांचे निकाल लावण्या पुर्वी वरील कालावधीत कीती लोकांना चौकशीचे कामासाठी मुलाखतीस बोलाविण्यात आले व त्या कामी उमेदवारांनी कु. माधुरी पाटीलचे दाव्यातील निर्णयात तपासनी समीतीने घालुन दिलेल्या कार्याल पध्दतीतील कलम ६ प्रमाणे ज्या

लोकांनी सुनावणीची संधी मागतली होती. त्यांचा तपशिलही कृपया संख्यात्मक व नावे आणि पत्यासह कळवावे.

इ) वरील कालावधीत वैधता नाकरलेल्या सर्व उमेदवारांची नावे, पत्ते, कृपया कळवितांना त्यांचे जातीचे दाखले खोटे असल्या बाबत ढोबळ मनाने कोणते मुख्य पुरावे प्राप्त झाले आहेत. तेही कळविण्यात यावे. म्हणजे सभासदत्वाचा संघटनेस फेरविचार करिता येईल.”

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास आढळून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भात प्रस्ताव सादर केल्यानंतर साधारणतः ६ महिन्याच्या आत या प्रस्तावावर जन माहिती अधिकारी यांनी उचित कार्यवाही करणे अपेक्षित आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्राची प्रकरणे गेल्या काही वर्षामध्ये प्रचंड प्रमाणात प्रलंबीत आहेत. १९९५ सालापर्यत त्यांना अशा प्रकारची वैधता प्रमाणपत्रे सहज उपलब्ध होत होती, तथापि २००५ सालापासून त्यांच्या जमातीस अद्यापपर्यंत प्रमाणपत्रे दिली गेली नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी एखादा प्रस्ताव नामंजूर केल्यास त्याच्यामागची कारणे जाणून घेण्याची त्यांची इच्छा आहे. घटनेने त्यांना दिलेल्या सोयीसवलतींचा फायदा घेण्यापासून जन माहिती अधिकारी यांनी विनाकारण वंचित ठेवले असल्याने या प्रकरणी त्यांना न्याय मिळावा अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्यातर्फे अपिलार्थीच्या मूळ अर्जास अनुसरुन माहिती दिली गेली नाही व त्यांच्या अपिलावर सुनावणी झाली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे प्रथम माहितीसाठी-च्या अर्जावर व तदनंतर त्यांच्या अपील अर्जासंदर्भात कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची अक्षम्य उपेक्षा केली आहे. अशा प्रकारच्या माहिती मिळण्यासाठीच्या प्राप्त अर्जावर काय कार्यवाही करावयाची असते याची माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ मध्ये पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ हा लागूच नसावा की काय अशा आविर्भावात त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाबाबत याप्रकरणी दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होत आहे. आज रोजी आयोगास जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांनी आयोगास उद्देशून एक पत्र दिले आहे, या पत्रामध्ये त्यांनी या प्रकरणातील स्थिती स्पष्ट केली आहे. यावरुन असे दिसून येते की, संबंधीत समितीकडे कर्मचारीवर्ग अपुरा असून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी मोठ्या स्वरुपाचा होता. समितीचे कामकाज अर्धन्यायिक स्वरुपाचे असून समितीसमोर आलेल्या प्रत्येक प्रकरणावर यथायोग्यरित्या निर्णय घेतला जातो व सदर निर्णय संबंधितांना कळविल्यानंतर नस्ती बंद केली जाते. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अवास्तव व अवाजवी असल्याने व तपासणीत अपिलार्थीने ज्या स्वरुपात माहिती मागितली आहे त्या स्वरुपात ती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविणे शक्य झाले नाही. नाशिक समितीच्या कार्यक्षेत्रात २००१ पूर्वी नाशिक व औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व जिल्हे होते. या जिल्ह्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्रे तपासणीचे काम समितीमार्फत केले जाते होते. साधारणतः ८ ते १० हजार प्रकरणे दरवर्षी त्यांना प्राप्त होत असतात. या त्वरेने प्रकरणे निकाली काढण्यात येत असतात. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही "ठाकूर" या जमाती संदर्भातील असून त्यांच्या कार्यालयात अशा प्रकारची जातनिहाय माहिती ठेवली जात नाही. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक २२-०९-२००५ नुसार ठाकूर जमातीच्या प्रकरणांची संख्यात्मक माहिती दिली होती. सदर माहिती प्राप्त झाल्याचा कबुलीजबाब अपिलार्थीने दिनांक २२-०९-२००५ रोजी दिला होता व या जबाबावरुन मा. लोक आयुक्तांनी त्यांची तक्रार दप्तरी दाखल केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक अ ते इ च्या संदर्भात त्यांनी खालील प्रमाणे माहिती आयोगास दिली आहे.

“अ.  या कार्यालयात जात पडताळणीसाठी प्राप्त होणा-या प्रकरणांची नोंद एकत्रीत रित्या करण्यात येते त्यासाठी जात निहाय रजिस्टर ठेवलेले नाहीत तसेच “ठाकूर” व “महादेव कोळी” जमातीसाठी वेगळे रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही याशिवाय अर्जदारास सदर माहिती देण्यापुर्वी संबंधीत उमेदवारांचे संमती घेणे आवश्यक आहे.  प्रकरणांची संख्या पाहता अर्जदार यांची माहितीची मागणी अवास्तव आहे.

ब.  समितीचे कामकाज अर्धन्यायिक स्वरुपाचे असुन शैक्षणीक, सेवा विषयक निवडणुक आदि विषयी प्राप्त प्रकरणे निर्णयासाठी समितीसमोर आल्यानंतर कोणत्या प्रकरणांत सुनावणी घेऊन निर्णय द्यावा व कोणती प्रकरणे गुणवत्तेनुसार निर्णयीत करावी या बाबतचे पुर्ण अधिकार समितीला आहे त्यासाठी निश्चित नियमावली नाही सन २००३ ते २००६ पर्यंत समितीने दरवर्षी साधारण सहा हजार ते आठ हजार प्रकरणे वैध करुन निर्गमीत केली आहेत.

क.  वर नमूद केल्याप्रमाणे या समिती मार्फत वैधता प्रमाणपत्रे निर्गमीत करण्यात आली आहेत.  समितीकडे प्राप्त प्रकरणे कु. माधुरी पाटील विरुध्द अप्पर आयुक्त ठाणे व इतर या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेले मार्गदर्शन आदेश व निर्देशानुसार प्रकरणांची तपासणी केली जाते.  ज्या प्रकरणात सुनावणी घेणे आवश्यक आहे अशी समितीची खात्री झाली तर अशाच प्रकरणांत संबंधीतांना सुनावणीसाठी बोलविण्यात येते.  समितीचे कामकाज अर्धन्यायिक स्वरुपाचे असल्याने समितीला सुनावणी घेण्याचा अधिकार आहे.

ङ  माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियम क्रमांक ११ मधील तरतुदीनुसार संबधीत उमेदवारांची नाव व पत्ते देण्यासंबंधी त्यांची संमती घेणे

आवश्यक आहे. उमेदवारांची कागदपत्रे सुनावणीत मिळालेली माहिती वंशावळ, बोलीभाषा, परंपरा रुढी इ. सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करुन समिती वैध / अवैधते संबंधी निर्णय घेते. जी प्रकरणे अवैध ठरली आहेत त्याबाबतची कारणमिमांसा अवैध आदेशात नमुद करण्यात येते दावा अवैध होण्याचे विशिष्ट कारण नसुन संपूर्ण प्रकरणाचा एकत्रित विचार करुन समिती निर्णय घेते."

जन माहिती अधिकारी यांनी केलेला वरील खुलासा जसे जात वैधता प्रमाणपत्रे देण्याकरिता त्यांनी निश्चितपणे केलेली पध्दती, समितीचे अर्धन्यायिक स्वरुप व त्यांच्याकडे उपलब्ध असलेला अपुरा कर्मचारीवर्ग पाहता तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे मोघम स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास वर सादर केलेल्या खुलाशाने त्यांचा हेतू साध्य होऊ शकेल असे वाटते. अपिलार्थीस निश्चितपणे जी माहिती हवी आहे, ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत नस्त्यांची तपासणी केल्यास मिळू शकेल. याकरिता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळ्याने अर्ज करावा लागेल. तेव्हा अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होण्यासाठी, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे, आवश्यक ते अभिलेख तपासणीसाठी, भेटीसाठी एक निश्चित कार्यक्रम आखावा व त्याप्रमाणे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे संबंधीत अभिलेखे तपासणीची मागणी करावी. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीचा अशा प्रकारचा तपासणीचा अर्ज त्यांच्याकडे ज्या ज्या वेळी त्यांच्याकडे प्राप्त होईल त्या त्या वेळी त्या अर्जाची प्राधान्याने दखल घेऊन कोणत्याही परिस्थितीत ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या कार्यक्रमा-प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी

आपल्या कार्यालयातील सर्व संबंधीत अभिलेखे त्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

प्रसंगावशात उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी-च्या प्रथम अर्जावर आपला कोणताही निर्णय न कळवून व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब संबंधीत जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमान्वये दाखल होणा-या अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केला असून त्याव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व बेपर्वाई सिध्द केली आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची यथायोग्यरित्या दखल सचिव (सामाजिक न्याय) यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक २५-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. यशवंत महारु पवार, अध्यक्ष, महाराष्ट्र आदिवासी ठाकूर जमात सेवा मंडळ, ९ विद्युत कॉलनी, शिवाजीनगर, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२१०

निर्णय दिनांक : २६.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. एकबाल अहमद मोहमंद साबीर,<br>रा.मालेगाव जि.नाशिक | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा कार्यासन अधिकारी,<br>नगर विकास विभाग,<br>मंत्रालय,मुंबई-३२<br>२ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा उपसचिव,<br>नगर विकास विभाग,<br>मंत्रालय,मुंबई-३२ | : | प्रतिवादी |

**व**

| | | |
|---|---|---|
| **१** श्री. महादू नथू पगारे<br>**२** श्री. मनोहर त्र्यंबक अहिरे | : | त्रयस्थ पक्ष |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. एकबाल अहमद मोहंमद साबीर, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्रीमती चित्रा शहाजी पाटोदेकर, जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. लायकअल्ली मो. शरीफ चौधरी, जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री.महादू नथू पगारे व श्री. मनोहर त्र्यंबक अहिरे (यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) तसेच अपिलार्थीचे सहायक श्री. अरिफ अंज्जुम महम्मद शफी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.२७.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मालेगाव महानगरपालिका कार्यालयातील कर्मचारी श्री. महादू नथू पगारे व श्री. मनोहर त्रंबक अहिरे यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्राबाबत दि. २३.७.२००४ ते २६.९.२००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"१) म.कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मा. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांना पाठविलेले पत्र क्र. १२३४ दि. १२/७/२००६ रोजीचे पत्राची व त्यासोबत दिलेल्या कागदपत्रांची साक्षांकित छायांकित नक्कल द्यावी.

२) म.न.पा. मालगांव आस्थापना जा.क्र.९८८ दि. २६.७.२००६ रोजीचे नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेले पत्र व त्यासोबत सादर केलेले कागदपत्रांची प्रमाणित नक्कल देण्यात यावी.

३)..... दोन्ही अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र मान्यताप्राप्त संस्थेचे (National Trade Certificate) नसल्याचे कळविले आहे........ याचे कारण काय याचा सविस्तर खुलासा मा. आयुक्त, म.न.पा. मालेगाव यांचेकडून उपलब्ध करुन त्यांची

प्रमाणित छायांकित प्रत मिळणेस विनंती आहे. तसेच सदरचे कृत्य हे कायदेशीर आहे किंवा कसे याचा लेखी खुलासा होणेस विनंती आहे.

३.१)...... त्या प्रमाणपत्राची (National Trade Certificate) प्रमाणित नक्कल म.न.पा. मालेगाव यांचेकडून प्राप्त करुन देण्यात यावी.

३.२)....... म.न.पा. कार्यालयावर राजकीय दबाव आहे का ? या बाबत सविस्तर लेखी खुलासा व त्या संबंधी लेखी आदेशांची प्रमाणित छायांकित नक्कल म.न.पा., मालेगाव यांचेकडून प्राप्त करुन देण्यात यावी. तसेच म.न.पा. आयुक्त यांचेकडून चुक झाली असल्यास त्याची लगेच दुरुस्ती करण्यात यावी व त्याची प्रमाणित नक्कल प्राप्त करुन देण्यात यावी.

३.३)......... मा. सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक : १८/औप्रसं/२००४/९०३७ दि. २६/०७/२००४ ने वरील दोन्ही अधिकाऱ्यांचे यांचे प्रमाणपत्र मान्यता प्राप्त संस्थेचे (National Trade Certificate) नसल्याचे आपणास कळविले आहे, त्या पत्राची प्रमाणित छायांकित प्रत

आपणाकडे योग्य ती कायदेशीर कार्यवाहीसाठी व माहिती साठी यासोबत सादर करीत आहे.

४) वरील प्रकरणी मी आपणाकडे वेळोवेळी फिर्याद दाखल केलेली आहे त्यावर आजपर्यंत काय कार्यवाही करण्यात आली याचा लेखी खुलासा होणेस विनंती आहे "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने केलेल्या मागणीसंदर्भात आयुक्त,मालेगाव महानगरपालिका यांच्याकडून सविस्तर अहवाल/स्पष्टीकरण मागवून, त्यांच्याकडून माहिती प्राप्त होताच,आपणास तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले. तसेच अपिलार्थीच्या या अर्जाची मूळ प्रत त्यांनी आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांच्याकडे कार्यवाहीसाठी पाठविली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.१५.११.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी आपिलार्थीचा दि. १५.११.२००६ रोजीचा मूळ अपील अर्ज त्यांचेकडील दि.०७.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त,मालेगाव महानगरपालिका यांच्याकडे पाठविला.यानंतर अपिलार्थी व नगर विकास विभाग यांच्यामध्ये बऱ्याच प्रकारचा उलटसुलट पत्रव्यवहार झाल्याचे,आज आयोगासमोर सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भातील निर्णय त्यांना

संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कळविला गेला नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ३, ७(१) व ७(३) चा भंग केला असल्याने त्यांचेवर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारचा निर्णय न दिल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व त्यांच्या मूळ अर्जानुसार मागणी केलेली प्रत त्यांना विनामूल्य पुरविण्याचे आयोगातर्फे आदेश व्हावेत, अशी त्यांनी विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आता विनामूल्य हवी असून, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासंदर्भात त्यांचे कर्तव्य नीटपणे पार न पाडल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) नुसार कार्यवाही करण्यात यावी. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २७.९.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने, त्यांनी सदर माहिती ज्या प्राधिकरणाच्या प्रत्यक्षतः ताब्यात आहे, त्यांच्याकडे म्हणजे आयुक्त मालेगाव महानगरपालिका यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज दि. १९.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविला. तसेच अपिलार्थीच्या याच

विषयावरील त्यांच्याकडे वेळोवेळी प्राप्त झालेल्या काही तक्रारीसंदर्भात त्यांनी मालेगाव महानगरपालिकेला कळवून अपिलार्थीस माहिती देण्याचे निर्देश दिलेले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मूळ अपील अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी श्री. पुराडउपाध्ये या नावाचे अधिकारी कार्यरत होते. सध्या ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी या अपील अर्जावर कार्यवाही न करण्याची कारणे त्यांना माहित नाहीत.

त्रयस्थ पक्षातील श्री. महादू नथू पगारे यांनी असा युक्तीवाद केला की, ते मालेगाव महानगरपालिकेतून दि. २९.२.२००८ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून, आज रोजी सुनावणीस उपस्थित असलेले अपिलार्थी यांचे सहायक श्री. आरिफ अंज्जुम महंम्मद शफी यांनी, या प्रकरणात, त्यांच्याकडे हे प्रकरण मिटविण्यासाठी एक लाख रुपये इतक्या रकमेची मागणी केली होती. त्यांनी अपिलार्थीच्या मदतीने या माहितीसाठी अशी मागणी केली होती.

दुसरे त्रयस्थ पक्ष श्री. मनोहर त्र्यंबक अहिरे यांनी असा युक्तीवाद केला आहे की, अपिलार्थीचे सहायक श्री. आरिफ अंज्जुम महम्मद शफी हे अशाप्रकारची माहितीची मागणी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसंदर्भात वेगवेगळया अर्जदारांमार्फत वेगवेगळया अर्जान्वये करत असतात. त्यांच्या मनपाकडे दाखल केलेल्या पदविका प्रमाणपत्राची प्रत अपिलार्थीस देण्यास त्यांचा आक्षेप आहे. त्रयस्थ पक्षाने केलेला हा युक्तीवाद अपिलार्थीचे सहायक श्री. आरिफ अंज्जुम महम्मद शफी यांनी अमान्य केला.

त्रयस्थ पक्षाने त्यांच्या पदविका प्रमाणपत्राच्या प्रती अपिलार्थीस देण्यासंदर्भात आयोगाकडे आक्षेप नोंदविला आहे. तथापि त्रयस्थ पक्षाने मालेगाव महानगरपालिकेकडे सादर केलेल्या त्यांच्या शैक्षणिक पात्रतेसंदर्भातील सदर प्रमाणपत्रे व तत्सम माहिती सादर

केली आहे. सदर माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची आहे. कारण ही प्रमाणपत्रे अर्जदार ज्या-ज्या ठिकाणी नोकरीस अथवा अन्य कारणासाठी अर्ज करतात त्या-त्या वेळी ही त्यांची ही प्रमाणपत्रे सादर केली जातात, तसेच या प्रमाणपत्रांच्या आधारे त्यांना शासकीय/निमशासकीय पदावर नियुक्ती मिळत असते. त्यांना मनपाकडून त्यांच्या या पदावरील सेवेप्रित्यर्थ (संबंधित प्राधिकरणाकडून) दरमहा प्राप्त होणारे नियमित वेतन, महानगरपालिकेच्या नियमित उत्पन्नातून दिले जात असल्याने, ही माहिती त्रयस्थपक्षाची खाजगी अशी बाब राहत नाही. या माहितीचे, सदर माहितीस ती मालेगाव महानगरपालिकेकडे असल्याने व सदर माहितीत गोपनीय ठेवावी अशी कोणतीही बाब नसल्याने, सार्वजनिक स्वरुप प्राप्त झाले आहे, हे पाहता त्रयस्थ पक्षाचा हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची प्राथमिक कर्तव्ये अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पार न पाडल्याचे दिसून येते. त्याचबरोबर अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असताना, त्यांनी या मुद्यांवर आयुक्त, मालेगाव मनपा यांच्याकडे माहिती मागण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी या मुद्याद्वारे त्यांना नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे आयुक्त,मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांना पाठविलेल्या विशिष्ट पत्राची प्रत मागितली होती. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात असल्याने, या पत्राची प्रत अपिलार्थीस देण्यात त्यांना अडचण नव्हती. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे आयुक्त, महानगरपालिका,मालेगाव यांनी प्रशासकीय स्वरुपात घेतलेल्या निर्णयासंदर्भात त्यांचे

अभिप्राय देऊन त्यांची कारणे विचारली आहेत. तसेच आयुक्त,महानगरपालिका यांच्या या निर्णयासंदर्भातील त्यांचे कृत्य कायदेशीर आहे किंवा कसे, याचा लेखी खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे, जी खालीलप्रमाणे आहे.

**'माहिती' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.**

वरील व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येईल की,अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीबाबत कोणताही खुलासा अथवा अभिप्राय विचारण्याचे अधिकार त्यांना नाहीत.या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांची भूमिका एका विश्वस्ताची असल्याचे व त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करुन ठेवून ती अर्जदारांना पुरविण्यास ते जबाबदार असल्याचे दिसून येते. या माहितीतील निर्णय, परिपत्रके यातील सदर निर्णय का घेतला, तो कायदेशीर आहे किंवा कसे व इतर प्रकारचे अभिप्राय अर्जदारांनी जन माहिती अधिकारी यांना विचारणे व अर्जदारास त्यांनी उत्तरे देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. ३ संदर्भात कोणतीही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत

नाही. मात्र मुद्दा क्र. ३ (१) मध्ये अपिलार्थीने मागितलेल्या प्रमाणपत्राच्या प्रमाणित नकला त्यांना अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देणे भाग आहे. मुद्दा क्र. ३(२) अन्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहितीही अवास्तव व अवाजवी असल्याचे दिसून येते, किंबहुना ही माहिती मागताना अपिलार्थीने कोणताही विवेक बाळगला नसल्याचे स्पष्ट होते. यामध्ये म.न.पा. कार्यालयावर राजकीय दबाव आहे का, याबाबत सविस्तर लेखी खुलासा व त्यासंबंधी लेखी आदेशांची प्रमाणित छायांकित नक्कल उपलब्ध करुन द्यावी व आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, यांच्याकडून चुक झाली असल्यास, त्याची लगेच दुरुस्ती करण्यात यावी, अशाप्रकारची माहिती मागितली आहे. या मुद्यामध्ये देखिल अपिलार्थीने आयुक्तांकडून चुक झाली असल्याचे नमुद करुन, सदर चुक दुरुस्त करुन सुधारित माहिती मागितल्याचे दिसून येते. अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी उपलब्ध नसणार हे उघड आहे. त्यामुळे या मुद्यावर देखिल अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय ठरत नाही. या माहितीतील मुद्दा क्र. ३.३ संदर्भात अपिलार्थीने त्यांच्याकडील उपलब्ध असलेली काही कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांना योग्य त्या कायदेशीर कार्यवाहीसाठी व माहितीसाठी सादर करण्यात येत आहे, असे म्हटले आहे. यामध्ये अपिलार्थीने कोणत्याही माहितीची मागणी केलेली नाही, त्यामुळे या मुद्यावर आयोगाचे कोणतेही अभिप्राय नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे उपस्थित केलेल्या मुद्दा क्र. ४ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी दाखल केलेल्या फिर्यादीवर त्यांच्याकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागितली आहे. या संदर्भात अपिलार्थीकडून प्राप्त झालेल्या कथित फिर्यादीची छायाप्रत त्यांनी या अर्जासोबत जोडल्याचे म्हटले आहे. सदर प्रत/प्रती जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्या असल्याने त्यांनी या तक्रारी/पत्रासंदर्भात सर्व संबंधितांकडे विचाराधीन विषयावर केलेल्या पत्रव्यवहाराच्या सर्व

प्रती त्यांनी अपिलार्थीस आता माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे पुरवाव्या लागतील.

उपरोक्त प्रकरणी अधिनियमाद्वारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा कालावधी व्यपगत झाला असल्याने, अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार सदर माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता विनामूल्य पुरवावी लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे अधिनियमाच्या तरतुदीनुसार अपेक्षित प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अपिलावर त्यांनी, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन, त्यांचे म्हणणे नोंदवून त्यावर स्वतंत्रपणे आपले निर्णय देणे हा अधिनियमाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे, याची त्यांनी भविष्यात नोंद घ्यावी. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगास असे सांगितले की, जन अपिलीय अधिकारी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या अपिलावर कुठल्याही प्रकारे निर्णय घेत नाहीत, मात्र अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे पाठवून देतात. अपिलार्थीच्या अपील अर्जावर अधिनियमाच्या विहित पध्दतीप्रमाणे सर्व संबंधितांकडे पत्र पाठविणे, सदर प्रकरणात त्यांचे म्हणणे ऐकून, ते नोंदवून त्यावर आपला स्वतंत्र निर्णय घेणे व तो लेखी स्वरुपात पारित करणे, अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहेत. त्यामुळे येथून पुढे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपील अर्जावर स्वतःच्या जबाबदारीवर त्यांनी निर्णय घेऊन तो निर्णय अपिलार्थीस पाठवून, सदर निर्णय अपिलार्थीस मान्य नसेल, तर ते राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतात,असे कळविणे आवश्यक आहे,याची त्यांनी नोंद घ्यावी व अशाप्रकारचे निर्णय घेण्याचे त्यांनी इतःपर टाळू नये, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या

मूळ अर्जाचे वरीलप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२,३(१) व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी आज झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्‌हेतूने टाळाटाळ केली असल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळून आले नाही. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीविषयी आवश्यक ते ज्ञान त्यांच्याकडे नसल्याने त्यांनी मालेगाव महानगरपालिकेशी अनावश्यक पत्रव्यवहार करुन, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाद्वारे प्राप्त होणाऱ्या अर्जांवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे निर्णय न देऊन अधिनियमातील कलम १९(६) चा भंग करुन आपले कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. याची नोंद सचिव (नगर विकास) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२,३(१) व ४ संदर्भात संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६.०६.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एकबाल अहमद मोहमंद साबीर, रा. मालेगाव, स.नं. ५७, प्लॉट नं. ३५, टी.एम.हायस्कुल समोर, नया इस्लामपुरा, जि.नाशिक-४२३ २०३.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८३

निर्णय दिनांक : २६.०६.२००८

१ श्री. गोपालरेड्डी पि.कोनरेड्डी कोटावाड, : अपीलार्थी
रा. धर्माबाद जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, धर्माबाद
जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गोपालरेड्डी पि. कोनरेड्डी कोटावाड, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सोमनाथ वसंत पोटरे,जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,धर्माबाद,जि.नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्रीमती अनिता शंकर भालेराव, नायब तहसीलदार, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १५.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

> "१) जा.क्र.धनपा/टे-७/२००६/१९९१ ध न पा अन्वये दि. १२/१०/०६ कार्यालयीन संदर्भानुसार दि.१६/१०/०६या अपील मूळ अर्जावर मुद्या नबंर १ ते ६ नमूद केल्या-प्रमाणे मला न्याय देऊन प्रस्तुत मिळकती मौजे बाळापूर घर क्र. १-७४२, ९-६२२, प्लाट क्र.१-९४६ (१-९३६ जुने क्र. ३-१७५) दोन जुने मातीचे घरे व दोन मोकळी जागा (प्लाटस) असून या प्रलंबित अर्जाचे सर्दंभ दि.०९/०२/०४ अन्वये अपीलकर्ता :- श्री. गोपालरेड्डी पि.कोनरेड्डी कोटावाड हया नावाने वरील मिळकतीचे नाव परिवर्तन मंझुर करणे संबंधी सविस्तर माहिती देणे अन्यथा (२) विषय क्रमांक महाराष्ट जमीन महसूल अधिनियम १९६६ प्रमाणे करावयाचे नगर परिषद व औद्योगिक नगर विकास मुख्याधिकारी अक्ट प्रमाणे श्रीमान देवकर शिरीष कुमार साहेब नगर परिषद प्रशासक ता.धर्माबाद स्थरावरील आपल्या अधिकार क्षेत्रात नसल्याने प्रस्तुत मीळकतीचे नाव परिवर्तन मंझुर न केल्यास आदेश प्राप्त साक्षांकित प्रतचे न्याय देऊन सविस्तर माहिती देणे आदेश किंवा रध्द करणे याची माहिती देणे. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ९.३.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १६.४.२००७ रोजीचा पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस सात दिवसांचे आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.२९.०३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १७.०५.२००८ रोजी प्राप्त झाली असून सदर माहिती विलंबाने दिल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्याकडे उपलब्ध होती, ते कर्मचारी एक महिना विनापरवानगी गैरहजर होते व तसेच या कालावधीमध्ये धर्माबाद नगरपरिषदेच्या निवडणूका चालू होत्या. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना

विलंब लागला. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे, याचा अर्थबोध झाला नाही. म्हणून त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष बोलावून त्यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याबाबत विचारणा केली व त्यानंतर अपिलार्थी यांनी निश्चित कागदपत्रांची मागणी केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. १७.०५.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः हस्तांतरित केली. अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. १२.१०.२००६ व १६.१०.२००६ रोजी अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती मागितली आहे, त्यापैकी दि. १२.१०.२००६ च्या अर्ज त्यांच्या कार्यालयात आढळून आला नाही. अपिलार्थीच्या दि. १६.१०.२००६ रोजीच्या मूळ अर्जानुसार नगरपरिषदेने त्यातील सहा मुद्यांवर केलेल्या कार्यवाही संदर्भात, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १७.५.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांचे नाव परिवर्तनाचे एक प्रकरण त्यांच्या कार्यालयाकडे प्रलंबित असून या संदर्भातील कागदपत्रे अपिलार्थीस आवश्यक असून त्यांनी दि. १७.५.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ९.३.२००७ रोजीच्या अपील अर्जावर दिनांक १६.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. यामध्ये अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांनी सात दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जामध्ये त्यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीची मागणी अत्यंत ढोबळ स्वरुपात व

अनाकलनीय पध्दतीने मांडणी केल्याचे दिसून येते. एकंदरीत अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची विचारणा केली असता, सर्वसाधारणपणे अपिलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. बाळापूर येथील घर क्र. १-७४२, १-६२२, प्लॉट क्र. १-९३६, १-९४६, दोन जुनी मातीची घरे व दोन मोकळे प्लॉट असून या मिळकती अपिलार्थी यांचे नावाने नाव परिवर्तन करण्यासंबंधाने सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची माहिती किंवा महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ प्रमाणे प्रस्तुत मालमत्तेचे नाव परिवर्तन मंजूर न केल्याच्या संबंधित आदेशाच्या प्रती मागितल्याचे दिसून येते, थोडक्यात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे नाव परिवर्तनासंदर्भात वेळोवेळी केलेल्या अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना अपेक्षित असल्याचा अंदाज या अर्जावरुन काढण्यात येतो. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दि. १७.५.२००८ रोजीच्या माहितीचे अवलोकन केले असता त्यातील माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज दि. १२.१०.२००६ व १६.१०.२००६ अन्वये विचारलेल्या सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरवली असल्याचे दिसून येते. या माहितीमध्ये अपिलार्थीच्या नावपरिवर्तनाच्या प्रकरणासंदर्भाच्या कागदपत्रांचा समावेश आहे. या माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झाले आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे, तथापि या माहितीचे अवलोकन करता ही त्यांच्या मूळ अर्जास फारशी सुसंगत असल्याचे आढळून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे प्राप्त करुन घेण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियमाचा वापर केल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांचे आता म्हणणे असे आहे की, सदर माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने प्राप्त झाली असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. अपिलार्थीने मूलतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीची मांडणी त्यांनी व्यवस्थितपणे

केली नाही. त्यांना निश्‍चितपणे कोणती माहिती अपेक्षित होती याचा उल्लेख त्यांनी या अर्जामध्ये केला नाही. तरीही अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा एकूण सूर बघून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.५.२००८ रोजी माहिती पुरविलेली आहे. जन माहिती अधिकारी यांना, अशाप्रकारची कृती या पूर्वीच करुन अपिलार्थीस माहिती देण्यापोटी घेतलेला विलंब टाळणे शक्य होते. तथापि अशाप्रकारची कार्यवाही न केल्याने त्यांनी आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, यापुढे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. मूलतः अपिलार्थीस निश्‍चित कोणती माहिती आवश्यक आहे याचा अपिलार्थीच्या मूळ अर्जात व आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातदेखिल स्पष्ट उल्लेख केला नसल्याने, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१.अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोपालरेड्डी कोनरेड्डी कोठावाड,रा. धर्माबाद जि.नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धर्माबाद जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२११

निर्णय दिनांक : २६.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. ईश्वरदास रामदास चौधरी,<br>रा.निंभोरा ता. रावेर, जि.जळगाव | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत,निंभोरा<br>ता. रावेर, जि. जळगाव<br>२ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, रावेर,<br>जि.जळगाव | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. ईश्वरदास रामदास चौधरी, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री.रुपचंद सोमा बाविस्कर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री. भगवान काळू भोई, सध्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, निंभोरा ता.रावेर जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. देविदास महादू देवरे, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रावेर जि.जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०१.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ४.१०.२००३ रोजी संबंधितांनी अपिलार्थीच्या मौजे. निंभोरा येथील ग.नं. ७३२ च्या केलेल्या पंचनाम्याच्या प्रतीची मागणी केली होती.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.२४.११.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ७.१२.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त होऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, संबंधित जन माहिती अधिकारी हे जाणीवपूर्वक माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते रेणूका शिक्षण प्रसारक संस्था, मौ.निंभोरा ता.रावेर जि.जळगाव या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असून या शिक्षण संस्थेची मौ.निंभोरा येथे ग.नं.७३२ मध्ये माध्यमिक शाळा असून या शाळेच्या इमारतीला जोडून मोठे क्रिडांगण आहे. दि.

४.१०.२००३ रोजी त्यांच्या संस्थेच्या मिळकतीच्या हद्दीमध्ये विनापरवानगी गेटचे कुलूप तोडून अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, निंभोरा ता.रावेर यांनी अनधिकृतपणे घुसून या जागेचा ताबा घेतला आहे. संबंधितांच्या अनधिकृत घुसखोरीबाबत त्यांनी न्यायालयामध्ये दावा दाखल केला असून, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती या प्रकरणी पुरावा म्हणून न्यायालयात सादर करण्यासाठी आवश्यक आहे. त्याच्या दि. १.९.२००६ रोजीच्या अर्जास त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.१२.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडील कागदपत्रांमध्ये आढळत नसल्याचे कळविले. त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीविषयी त्यांनी पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्षांकडे दि. १५.९.२००६ रोजी विचारणा केली असता, त्यावर अध्यक्षांकडून प्राप्त झालेल्या दि. १५.१२.२००६ रोजीच्या उत्तरावरुन त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती त्यांच्याकडे आढळ होत नसल्याचे कळविले आहे.अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, मौ. निंभोरा ता. रावेर यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थी त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दोन वेळेस त्यांचे कार्यालयात उपस्थित झाले होते, तथापि त्यांना स्वच्छता समिती अध्यक्षांकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २४.११.२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दि. ७.१२.२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी

जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,या प्रकरणी असे दिसून येते की,अपिलार्थीने मागितलेली माहिती अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, निंभोरा यांच्याकडे उपलब्ध आहे. खुद्द अध्यक्षांनीच अपिलार्थीच्या जमिनीत कथित घुसखोरी केली असल्याने व या संदर्भातील अपिलार्थीने दाखल केलेला दावा आता न्यायालयामध्ये प्रलंबित असल्याने, या माहितीची (पंचनाम्याची) प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याची टाळाटाळ करुन, सदर प्रत आढळ होत नाही, असे म्हणत आहेत. ग्रामपंचायत स्तरावर ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात नेमली गेलेली ही समिती ग्राम प्रशासन विभागाचा एक महत्त्वाचा भाग आहे. संबंधित समितीवर गट विकास अधिकारी यांचे नियंत्रण असते. अशाप्रकारच्या समितीच्या अध्यक्षांची निवड ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये घेतलेल्या ठरावाद्वारे केली जाते. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती आढळ होत नाही, हे म्हणणे आयोगास संयुक्तिक वाटत नाही, तेव्हा ही माहिती त्यांनी समितीच्या अध्यक्षांकडून हस्तगत करुन ती तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या प्रकरणी आवश्यक वाटल्यास त्यांनी स्थानिक पोलीस यंत्रणेचे सहाय्य घ्यावे. जर अपिलार्थीने मागितलेली माहिती खरोखरीच संबंधितांकडे उपलब्ध नसेल तर कागदपत्र गहाळ केल्यासंदर्भात संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यासंबंधी ग्रामसेवकाने विचार करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित मुदतीत योग्य तो प्रतिसाद न दिल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. कारण अपिलार्थीस जी माहिती दि. ३१.०९.२००६ रोजी

अथवा तत्पूर्वी मिळणे अभिप्रेत होते, ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १९.१२.२००६ रोजी म्हणजेच एकूण ऐंशी दिवस इतक्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. अशाप्रकारे अपिलार्थीस अधिनियमातील अनुज्ञेय कालावधीपेक्षा ७९ दिवस इतक्या विलंबाने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी ग्रामसेवक, निंभोरा यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील अशा प्रकारच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे

आत करुन, आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ईश्वरदास रामदास चौधरी,रा.निंभोरा ता. रावेर, जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक,ग्रामपंचायत निंभोरा ता.रावेर, जि. जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रावेर, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ पोलीस अधीक्षक, जळगाव यांना देऊन सूचित करण्यात येते की, ग्रामसेवक,ग्रामपंचायत निंभोरा यांनी या प्रकरणी पोलीसांची मदत मागितली असता, ती नियमानुसार त्वरित देण्यात यावी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२१२

निर्णय दिनांक : २६.०६.२००८

१ श्री. विजय दोधा पाटील, : अपीलार्थी
रा.पळासखेडे, ता.भडगाव,जि.जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुसिंचन विभाग,
जिल्हा परिषद,जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगाव

प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी : सहायक कार्यकारी अभियंता,
लघुसिंचन विभाग,
जि.प.जळगाव

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
लघुसिंचन विभाग,
जि.प.जळगाव

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. गंगाधर वेडू जोशी,वरिष्ठ सहायक, जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जि.प.जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. हेमकांत

आत्माराम पवार, शाखा अभियंता, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. विजय दोधा पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ५.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जाची सुनावणी आता घेण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २२.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये मौजे पळासखेडे ता.भडगाव पाझरतलावाच्या बेकायदेशीर बांधकाम प्रकरणी काय कार्यवाही केली या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. सदर माहिती देताना अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडील नस्तीमधील दि. २४.८.२००६ रोजीच्या पत्राचा संदर्भ दिलेला आहे. या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, मूळात या प्रकरणी अपिलार्थीने जळगाव येथे लोकशाही दिनी दि. ३१.३.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे भडगाव येथील पाझर तलावाचे नियोजित जागेत होत नसल्याप्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले असून, त्यामध्ये संबंधित दोषी अभियंत्यांची खातेचौकशी सुरु करुन खर्च वसूल करण्याची कारवाई सुरु केली आहे, असे म्हटले आहे.अपिलार्थी यांच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. २२.९.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीशी संबंधित माहिती व कागदपत्रांच्या नकला त्यांना हव्या असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन

माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही किंवा अपिलार्थीशी या बाबत त्यांनी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला दिसून येत नाही.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांना राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील लेखी निवेदन हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी  दोघेही आज सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. त्यांच्या या अनुपस्थितीची आयोगातर्फे गंभीर दखल घेतली गेली असून, येथून पुढे राज्य माहिती आयोगाकडील सुनावणीस त्यांनी विनापरवानगी गैरहजर राहण्याचे टाळावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीने याच विषयावर लोकशाहीदिनी केलेल्या तक्रारीवर त्यांच्या कार्यालयाने कार्यवाही करुन त्यांच्याकडील दि. ३.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दिलेली आहे. त्यांच्या दि. ३.११.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, असे दिसून येते की, सदर पत्र कार्यकारी अभियंता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जळगाव यांच्या दि. २९.१०.२००७ रोजीच्या वसूली आदेशासंदर्भात केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील आहे. या पत्राची प्रत कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे असे म्हणणे आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ३.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे, त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियमान्वये त्यांच्याकडे केलेल्या अपील अर्जावर त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे अपिलार्थीचे म्हणणे चुकीचे आहे. आयोगास उपलब्ध करुन

देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांचा हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे, कारण कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ३.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती ही वेगळया संदर्भातील असून या माहितीमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीतील फक्त पहिल्या मुद्यावरील अंशतः माहितीचा समावेश होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सर्व कागदपत्राच्या नकला, दोषी अधिकाऱ्यांची नावे व खर्च झालेल्या रकमेची वसूली व प्रशासकीय कारवाई/फौजदारी गुन्हा यासंदर्भातील माहितीची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केली आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जाच्या संदर्भात कार्यकारी अभियंता यांच्या दि. ३.११.२००७ रोजीच्या पत्रामध्ये उल्लेख नाही. तसेच या पत्रामध्ये अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील फक्त एका मुद्यातील काही भाग सोडल्यास, उर्वरित माहितीचा समावेश नाही. सबब त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती अर्धवट ठरते. त्यामुळे अपिलार्थीस माहिती दिली आहे असे गृहीत धरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कृती न करण्याच्या त्यांच्या कृतीचे समर्थन होऊ शकत नाही. माहिती अधिकार अधिनियमाद्वारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दाखल झालेल्या प्रथम अर्जावर व अपील अर्जावर स्वतंत्रपणे कार्यवाही करावी, हे अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. आज रोजी आयोगाकडे सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत अशी माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सादर केली आहे.

अशाप्रकारची माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची उपेक्षा करुन, त्यावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही न करुन, स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपासून त्यांना कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/-(पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे सादर न झाल्यास हे आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.तसेच त्यांना पुढे असेही आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

तद्ववतच, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाईचे दर्शन घडविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेऊन, त्यांच्या या कृतीद्वारे कलम १९(६) चा भंग केला आहे, असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची सचिव (जलसंपदा) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याचा अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७(६)

नुसार अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५०/- याप्रमाणे एकूण रुपये २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६.०६.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजय दोधा पाटील,रा. पळसखेडे, ता. भडगाव, जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग,जिल्हा परिषद जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग,जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११९९

निर्णय दिनांक : २६.०६.२००८

१ श्री. कुरैशी अब्दुल सलाम नुरुजहोदा : अपीलार्थी
रा. मालेगाव, जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा कक्ष अधिकारी,
नगर विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपसचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्रीमती माधुरी मुकुंद गावडे, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. लायकअल्ली महमंद शरीफ चौधरी, जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. कुरैशी अब्दुल सलाम नुरुजहोदा, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.२५.०८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दरवर्षी जैन धर्मियांचे पयुर्षण पर्वानिमित्त कत्तलखाना व मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याबद्दल नगर विकास विभागाच्या आदेशाबद्दल दि. ७.९.२००४ ते २५.८.२००६ या कालावधीतील एकूण १३ मुद्यांवरील खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

> "नगर विकास विभाग आदेश क्रमांकः संकीर्ण-१०२००४/प्र.क्र./नवि-२० दिनांक ७ सप्टेंबर, २००४ ला अनुसरुन
>
> १) सदरच्या आदेशात नमुद आहे की, वरील कारणास्तव कत्तल खाने व मास विक्री दुकाने बंद ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सबब त्या शासन निर्णयाची प्रमाणित नक्कल मिळणेस विनंती आहे.
>
> २) वरील विषयाबाबत कोणी प्रस्ताव मांडला याचा खुलासा करावा व त्या प्रस्ताव अर्जाची प्रमाणित नक्कल देण्यात यावी.
>
> ३) सदरचे निर्णय घेण्यापुर्वी मास विक्रेते अगर त्यांची संस्था किंवा संबंधीत लोकांचे जबाबदार इसमांकडून विचारविनिमय करण्यात आले किंवा कसे याचा लेखी खुलासा करावा. करण्यात आला असल्यास कोणाबरोबर चर्चा करण्यात आली त्यांची नावे देण्यात यावी.
>
> ४) सदरचे निर्णय कोणत्या कायद्याचे कोणत्या नियमाप्रमाणे घेण्यात आला याचा लेखी खुलासा करणेत यावा.

५) महाराष्ट्र राज्यात मास विक्रीपासून लाखो लोकांचे उपजिविकेचे साधन आहे व त्यांचा रोजंदारीचा धंदा आहे. सदरच्या निर्णयामुळे त्यांच्यावर उपासमारचे प्रसंग येतात, त्याबाबत शासनाने त्यांना काय सुविधा उपलब्ध केली आहे.

६) तसेच या बाबत महाराष्ट्र शासनाने अगर केंद्र शासनाचे काही कायदा केलेला आहे किंवा कसे याचा लेखी खुलासा होणेस विनंती आहे.

७) महाराष्ट्रात या व्यवसायापासून किती लोकांना रोजगार उपलब्ध होतो याचा लेखी खुलासा होणेस विनंती आहे. तसेच सदरच्या निर्णयामुळे त्यांचे परिणाम किती लोकांवर होतो याचा लेखी खुलासा व्हावा.

८) सदरचे बंद मुळे, केंद्र शासनाचे, महाराष्ट्र शासनाचे व स्थानिक संस्था (नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हा परिषद इ.इ.) चे किती रुपयांचे आर्थिक नुकसान होते याचा लेखी खुलासा व्हावा.

९) केंद्र शासनाने अगर महाराष्ट्र शासनाने जाहिर केल्याप्रमाणे वर्षातून एकूण किती दिवस व कोणकोत्या दिवशी जनावरांचे स्लॉटर व बिफ व मटन विक्री बंद ठेवण्यात येते?

१०) केंद्र शासनाचे अगर महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार लागोपाठ दोन दिवस जनावरांचे स्लॉटर व बिफ/मटन

विक्री बंद ठेवणे योग्य आह किंवा कसे याचा लेखी खुलासा होणेस विनंती आहे.

११) भारत देशाचे स्वतंत्र दिन व गोकुळ अष्टमी या दिवशीही जनावरांचे स्लॉटर व बीफ/मटन विक्री बंद ठेवणे बंधनकारक आहे का याचा लेखी खुलासा होणेस विनंती आहे.

१२) भारत देशाचे स्वतंत्र दिन (१५-८-२००६) व गोकुळ अष्टमी (१६-८-२००६) या दिवशीही जनावरांचे स्लॉटर व बीफ/मटन विक्री बंद ठेवणेबाबत मालेगाव महानगरपालिकेने बुचर्स लोकांना नोटीस काढली होती ती योग्य आहे किंवा कसे याचा लेखी खुलासा होणेस विनंती आहे.

१३) मुस्लीम बांधवांच्या सणाच्या दिवशी शासनाने मास मटण विक्री व जनावरांचे कत्तल वर बंदी केलेला देशातील इतर बांधवांचे सण आल्यास अशा वेळी शासनाचे काय धोरण आहे याचा लेखी खुलासा होणेस विनंती आहे. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. ९.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय

अधिकारी यांनी दि. ३.११.२००६ रोजी सुनावणी ठेवल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते तथापि या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी कोणता निर्णय दिला याबाबतची कागदपत्रे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडेही नाहीत, यावरुन ही सुनावणी झाली नसल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम २० प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्याचे व जन अपिलीय अधिकारी यांच्यावरही आवश्यक ती कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी निवेदन हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मूळ अर्ज करते वेळी त्या या पदावर कार्यरत नव्हत्या. त्यावेळी श्री. उ.ना.पाटील नावाचे कक्ष अधिकारी या पदावर कार्यरत होते. ते सध्या मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद का दिला नाही, याची कारणे त्यांना आता सांगता येत नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या खात्याकडे उपलब्ध नसते. शासनाने अभिलेखे निपटारा प्रकरणी केलेल्या अभियानात त्यांच्या खात्यातील सर्व जुने अभिलेखे नष्ट करण्यात आले असल्याने अपिलार्थीने मागितलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली बव्हंशी माहिती ही पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाशी संबंधित असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा हा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत पदुम विभागाकडे हस्तांतरित करावयास हवा होता, तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे ज्या विषयासंदर्भात माहिती मागितली आहे, त्या विषयासंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडे असतात.त्यांचा विभाग फक्त पदुम विभागाच्या आदेशाची अंमल बजावणी करिता जबाबदार असतो. त्यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील, मुद्दा क्र. १ व २ वगळता उर्वरित माहिती पदुम विभागाकडे असण्याची शक्यता आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने दरवर्षी जैन धर्मियांच्या ‘पयुर्षण’ दिनी नियमित कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याबाबत, शासनाचे निश्‍चितपणे धोरण काय आहे, या विषयीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे.अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील १३ मुद्यांच्या माहितीचे अवलोकन करता मुद्दा क्र. १,२ ,४ व ९ वगळता उर्वरित नऊ ही मुद्यांवरील माहिती अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासेवजा स्वरुपात अपेक्षिली आहे. जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये स्पष्ट केलेल्या ‘माहिती’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम

२ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे, जी खालीलप्रमाणे आहे.

**" 'माहिती' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."**

वरील व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियम,२००५ अन्वये कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकाराखाली खुलासा, त्यांची मते अथवा त्यांचे अभिप्राय मागणे या प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अभिप्रेत नाही. अर्जदाराने प्रश्न विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्याचे उत्तर देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीमध्ये समाविष्ट नाही. माहिती अधिकार अधिनियमान्वये जन माहिती अधिकारी यांची भूमिका एका विश्वस्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करुन ठेवणे व अधिनियमाद्वारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जास अनुसरुन माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत अर्जदारास माहिती पुरविण्याबाबत निर्णय घेणे, हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस वरील चार मुद्दे वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. आता, जरी ही माहिती पदुम विभागाशी संबंधित असली, तरी अपिलार्थीस

जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, हे पाहता व अपिलार्थीचा मूळ अर्ज व आजची सुनावणी या मधील व्यपगत झालेला मोठा कालावधी पाहता, ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरवणे भाग आहे, असे आयोगाचे मत आहे. आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती पदुम विभागाकडून प्राप्त करुन घेऊन, ती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत पुरविण्याचे मान्य केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२,४ व ९ शी संबंधित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अर्जाकडे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी पूर्णतः दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या या अर्जावर कोणतीही कार्यवाही न करुन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाइ स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (नगर विकास), यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइबद्दल त्यांच्यावर हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत : मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२,४ व ९ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (नगर विकास) यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कुरैशी अब्दुल सलाम नुरुजहोदा, स.नं.१५२, प्लॉ.नं.२७,नयापुरा,मालेगाव,जि.नाशिक-४२३ २०३

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३३९

निर्णय दिनांक २७-०६-२००८

श्री. मनिष सुरजमल जाखेटे, : अपिलार्थी
जमनबाई मेमोरियल हॉस्पिटल,
वाडीभोकर रोड, नेहरु चौक, देवपूर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. लि.
(एम. एस. ई. डी.), धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, एम. एस. ई.
डी. कंपनी लि. धुळे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग, धुळे

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मनिष सुरजमल जाखेटे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. शामराव बाळकृष्ण चव्हाण, जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग, धुळे, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) खाली दाखल केलेले दिनांक २५-०१-२००७ रोजीचे व्दितीय अपील आज विचाराधीन आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये, वीज नियामक आयोगाने मिटरची चाचणी करुन घेण्यासाठी वीज वितरण कंपनी व्यतिरिक्त मान्यता दिलेल्या अन्य यंत्रणांची (एजन्सी) ची संपूर्ण, त्यांच्या पत्त्यासहीत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा त्यांनी यासंदभात, अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही व आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या व प्रथम अपील अर्जावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही व त्याचा परिपाक म्हणून अपिलार्थीस राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपील करणे भाग पडले असे आयोगास सांगितले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, थकबाकी बिलापोटी सरासरी रक्कम घेण्याबाबत त्यांनी उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी याच्याकडे दिनांक १६-०९-२००६ रोजी प्रथम अर्ज केला होता. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या वीज मिटरची चाचणी करण्याची विद्युत वितरण कंपनीला विनंती केली होती. त्यानंतर त्यांचे इलेक्ट्रॉनिक मिटर विद्युत कंपनीमार्फत दिनांक २८-१०-२००६ रोजी काढण्यात आले व दिनांक १०-११-२००६ रोजी त्यांना या मिटरच्या चाचणी करिता बोलाविण्यात आले. या मिटरची चाचणी अपिलार्थीच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिका-यांनी केली असता त्यामध्ये मिटरचा टर्मिनल बॉक्स जळाला असल्यामुळे हे मिटर तपासता येत नाही असा निष्कर्ष महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अधिका-यांनी काढला. तदनंतर म्हणजे दिनांक २८-१०-२००६ रोजी सदर मिटर काढले व दुसरे नवीन मिटर त्याच दिवशी बसविले. अपिलार्थीस महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतर्फे प्राप्त झालेल्या वीज बीलामध्ये अचानक दुपटीने वाढ झाल्याने त्यांनी मिटर चाचणीची विनंती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला केली होती. बराच कालावधी होऊनही त्यांच्या तक्रारीची दखल न घेतली गेल्यामुळे त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कडे वरील माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १७-०६-२००८ रोजी त्यांना प्राप्त झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या माहिती मध्ये असे म्हटले आहे की, वीज नियामक आयोगाने मिटरची चाचणी करुन घेण्या-करिता वीज वितरण कंपनी व्यतिरिक्त कोणाही एजन्सीला चाचणी करण्याकरिता मान्यता दिलेली नाही, तसेच दिनांक १६-१२-२००६ रोजी कार्यकारी अभियंता यांच्या दालनात झालेल्या चर्चेनुसार त्यांनी उपस्थित

केलेल्या सर्व मुद्दयांवर सविस्तर चर्चा होऊन या बद्दलची माहिती त्यांना देण्यात आली आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या वरील माहितीवरुन असे दिसून येईल की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना देणे सहज सुलभ होते. एवढे असूनही, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीसाठीच्या प्रथम अर्जास त्यांना अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या या संबंधाने त्यांनी केलेल्या दिनांक ३०-११-२००६ च्या अपील अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल न घेऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केला आहे व या कृतीव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव पुरेपूर स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ०६-११-२००६ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या नजरेस आल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस कार्यकारी अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१२-२००६ रोजी बोलावून घेतले होते व त्यावेळी झालेल्या चर्चेनुसार अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती तोंडी स्वरुपात देण्यात आलेली होती, तथापि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जावर लिखीत स्वरुपात माहिती देण्याचा अपिलार्थीचा अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडे तसाच विनाकार्यवाही पडून राहिला. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाशी आयोग सहमत नाही. माहिती अधिकार अधिनियमाव्दारे अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांनी ज्या स्वरुपात मागितली होती त्या स्वरुपात त्यांना देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. “माहिती देणे” या प्रक्रियेमध्ये तोंडी

माहिती देणे वा अपिलार्थीस त्यांच्या माहितीबद्दल स्पष्टीकरण देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी नव्याने सुरु झाली असल्याने जन अपिलीय अधिकारी यांना अपील अर्जावर काय कार्यवाही करावयाची हे अवगत नसल्याने त्यांना अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी अथवा इतर निर्णय देणे शक्य झाले नाही असेही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले. तथापि जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे पटण्यासारखे नाही, कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज करतेवेळी कायदा अंमलात येऊन जवळ जवळ ११ महिने इतका कालावधी व्यपगत झाला होता. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीचे आवश्यक ते ज्ञान नव्हते हा युक्तिवाद त्याचे संबंधित प्राधिकरणामध्ये असलेले जबाबदार स्थान पाहता आयोग मान्य करत नाही. या कायद्याची अधिसूचना ऑक्टोबर २००५ पुर्वीच निर्गमीत झाली होती. या कायद्याचे या जबाबदार अधिका-यांना असलेले अज्ञान हे कारण, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील कृतीचे समर्थन ठरु शकत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार न करुन व त्याव्दारे त्यांची अक्षम्य उपेक्षा करुन व त्यांना कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापासून वंचित ठेवल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या वर्तनाने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. आज रोजी सुनावणीस जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित नाहीत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये

२५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली असल्याने, त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी

काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

औरंगाबाद
दिनांक २७-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनिष सुरजमल जाखेटे, जमनबाई मेमोरियल हॉस्पिटल, वाडीभोकर रोड, नेहरु चौक, देवपूर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग, साक्री रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पुर्व), मुंबई – ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३४०

निर्णय दिनांक २७-०६-२००८

श्री. प्रविण शंकरराव थोरात, : अपिलार्थी
मु. पो. पिंपळनेर (रामनगर),
तालुका साक्री, जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक
विभाग, नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रविण शंकरराव थोरात, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. राहूल नारायण चौधरी, जन माहिती अधिकारी तथा प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शिवाजी देवराम पाटील,

शिक्षण उपनिरीक्षक, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांचे प्रतिनिधी, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष श्री. के. जे. पाटील हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कागदपत्राशी संबंधीत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री. के. जे. पाटील - साक्री, जि- धुळे यांना पुरस्कार मिळाल्यापासून ते आजपर्यंत केलेल्या नंदुरबार जिल्ह्यातील शिक्षक / कर्मचा-यांच्या चौकशी समितीवर काम केल्याची माहिती सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार मिळावी. ”

आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री. के. जे. पाटील साक्री जि. धुळे यांना पुरस्कार मिळाल्यापासून ते आजपर्यंत केलेल्या नंदुरबार जिल्ह्यातील शाळांच्या चौकशी समितीवर काम केल्याचा तक्ता.

| अ.क्र. | वर्ष | ज्या शिक्षक / कर्मचा-यांवर चौकशी समिती नियुक्त झाली त्याचे पूर्ण नांव | संस्थेचे संपूर्ण नाव व पत्ता | ज्या शाळेत शिक्षक काम करत होता त्या शाळेचे नाव व पत्ता | चौकशी समितीचा निर्णय व निष्कर्ष | संस्थेने दिलेली शिक्षा व दिनांक (टर्मीनेट केल्याचा दिनांक) |
|---|---|---|---|---|---|---|

अपिलार्थीने सदर माहिती U. P. C. व्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन श्री. के. जे. पाटील आदर्श

शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक यांनी नंदुरबार जिल्ह्यातील कोणत्याही चौकशी समितीवर काम केलेले नाही, असे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रामध्ये जरी त्यांच्या दिनांक ०८-१२-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची झेरॉक्स प्रत सादर केली असली तरी त्यांनी प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचे दिनांक १५-०१-२००७ अन्वये प्रथम अपील केले असून हे अपील त्यांना दिनांक १८-०१-२००७ रोजी प्राप्त झाले आहे.

अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०२-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि सदरची सुनावणी झाली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना चुकीची माहिती पुरविली व माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे नमूद करुन, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न

केल्याने ते सदर अपील आयोगाकडे सादर करत असल्याचे म्हटले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने विचारलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले, तथापि त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना विलंबाने माहिती पुरविण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६ फेब्रुवारी २००७ च्या पत्रामध्ये दिलेली माहिती कशी चुकीची आहे हे आयोगाने विचारले असता, अपिलार्थीने आयोगास असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चौकशी समितीचा निर्णय व निष्कर्ष - सेवा समाप्ती - असे कळविले आहे. वास्तविक चौकशी समितीचा निर्णय जास्तीत जास्त जबर शिक्षा (मेजर पेनाल्टी) असा आहे. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती त्यांना चुकीची वाटत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक २६-०२-२००७ रोजी पुरविली असून सदर माहिती सत्य आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अर्जावर दिनांक १३-०२-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि जन माहिती अधिकारी सदर सुनावणीस हजर न राहिल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी, जन माहिती, व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-११-२००६ रोजी श्री. के. जे. पाटील यांनी कोणकोणत्या चौकशी समित्यावर काम केले, सदर समितीने काढलेले निष्कर्ष, संबंधीत व्यक्ती इ. संदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००६ रोजी श्री. के. जे. पाटील यांनी अशा प्रकारच्या कोणत्याही समितीवर काम केले नसल्याची माहिती अपिलार्थीस कळविली, तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००७ रोजी अपील केल्यानंतर याच जन माहिती अधिका-याने त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस श्री. के. जे. पाटील यांनी ज्या समितीवर काम केले आहे त्याची व सदर समितीने काढलेल्या निष्कर्षाची अपिलार्थीने मूळ अर्जात विचारणा केल्याप्रमाणे माहिती पुरविली आहे. आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथमतः चुकीची माहिती दिली असे आयोगासमोर स्पष्ट केले. अपिलार्थीचे हे म्हणणे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००६ व दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या दोन पत्रातील विसंगतीवर आधारित आहे. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कडून दोन वेळेस प्राप्त झालेली माहिती चुकीची असल्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. यावेळी अपिलार्थीने समितीने काढलेले निष्कर्ष हे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीचे कळविले असल्याचा त्यांच्या युक्तिवादामध्ये उल्लेख आहे. संबंधीत चौकशीच्या कथित निष्कर्षाचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे दिसून येते की, विचाराधीन चौकशी समितीने " यांना दोषी ठरवून जास्तीत जास्त जबर शिक्षा (मेजर पेनाल्टी) शिफारस करत आहे " असे म्हटल्याचे दिसते. यावरुन या चौकशी समितीने

कोणताही निष्कर्ष काढला नसून त्यांनी संबंधीत प्राधिकरणाकडे जास्तीत जास्त जबर शिक्षेची शिफारस केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चौकशी समितीचा निर्णय व निष्कर्ष या सदराखाली "सेवासमाप्ती" असे नमूद केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली ही माहिती काहीशा प्रमाणात सदोष असल्याचे दिसून येते, कारण चौकशी समितीच्या निर्णयामध्ये "सेवा समाप्ती" या शब्दाचा कोठेही वापर केलेला नाही अथवा अशी शिफारसही केलेली नाही. अर्थात ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही असद्हेतूने चुकीची दिली असे दिसून येत नाही, अशा त-हेने अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये मांडलेल्या "चुकीची माहिती" या मुद्दयांचे निराकरण होत असून, त्यांच्या युक्तिवादानी आज रोजी मांडलेला "त्यांना सदर माहिती उशीरा मिळाली " हा मुद्दा शिल्लक राहतो, या मुद्दयाचा विचार करता असे दिसून येते की, अपिलार्थीस जी माहिती दिनांक २१-१२-२००६ रोजी प्राप्त होणे अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये अपेक्षित होते, ती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना एकूण ६५ दिवसांचा विलंब लागला. अर्थात याबाबत अपिलार्थीने त्यांनी जरी प्रथमतः अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा ७ दिवसांचा विलंबाने माहिती दिली तरी ही माहिती चुकीची असल्याचे नंतर सिध्द झाल्याने अपिलार्थीस ही माहिती मिळाली नाही असे गृहीत धरण्यात येत आहे. थोडक्यात, अपिलार्थीस त्यांनी आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडून एकूण ६५ दिवसांचा विलंब लावला आहे हे दिसून येत आहे. सदर विलंब ज्या जन माहिती अधिका-याने लावला आहे ते श्री. एल. डी. ठाकूर हे नियत वयोमनानुसार दिनांक ३१-०५-२००७ रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आता करता येणार नाही. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्या कडून आवश्यक ती माहिती

मिळाली आहे व सदर माहिती अपिलार्थीस जरी चुकीची वाटत असली तरी या मुद्दयावर आयोगाने वरील परिच्छेदात पुरेशा प्रमाणात ऊहापोह केला असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक २७-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रविण शंकरराव थोरात, मु. पो. पिंपळनेर (रामनगर), तालुका साक्री, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३४१

निर्णय दिनांक २७-०६-२००८

श्री. शेख नसीर बेगाजी, : अपिलार्थी
३३, सावली सोसायटी, गुलमोहर रोड,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता, सार्वजनिक
बांधकाम उपविभाग, घोडेगाव, तालुका
आंबेगाव, जिल्हा पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक
बांधकाम मंडळ, पुणे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख नसीर बेगाजी, (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. दत्तात्रय यशवंत पाटील, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत ०१ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ आपल्या उपविभागातील शाखा अभियंता देशमुख शाखा अभियंता जाधव एस. बी. शेलार, श्री. मूळूक यांच्या शाखे अंतर्गत झालेल्या कामांची व खर्चाची माहिती तसेच किरकोळ व विशेष दुरुस्तीवर झालेल्या खर्चाची माहिती मिळणेबाबत. ”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घोडेगाव यांच्याकडे केला होता. या प्रकरणी प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे हे होते, त्यामुळे संबंधीत उप अभियंता यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे यांच्याकडे पाठवून देणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे भाग होते, तथापि अशा प्रकारची कृती संबंधीत उप अभियंता यांनी केली नसल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन " नियमानुसार माहिती अधिका-यांनी अर्जदारास तात्काळ / माहिती सदरची निशुल्क पुरविण्याचे आदेश देऊन अपील निकाली काढण्यात आले" असा निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांच्या या निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना निश्चित अशी मुदत घालून दिली नसल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०९-२००६ रोजी पोस्टाव्दारे माहिती पाठविल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. त्यांच्या या विधानापृष्ट्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली. तथापि सदर माहितीचे टपाल अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना आदेश देऊनही, त्यांना माहिती न पुरविल्याबद्दल, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होऊन त्यांना विनामूल्य माहिती मिळण्याचे आदेश मिळण्याची, आयोगास विनंती केली, याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली कथित माहिती अद्यापही त्यांना प्राप्त झाली नाही, ती त्यांना विनामूल्य व त्वरित मिळावी, तसेच संबधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपीलाची सुनावणी झाल्यानंतर, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पोस्टाने पाठविली, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येऊ नये, यापुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः चुकीच्या प्राधिकरणाकडे, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी अर्ज केला होता. अपिलार्थीने सदर अर्ज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे, जे या प्रकरणी प्रत्यक्ष माहिती अधिकारी आहेत त्यांच्याकडे न करता संबंधीत उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घोडेगाव यांच्याकडे केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत प्राधिकरणाकडे नसल्यास त्यांनी काय कार्यवाही करावयाची याचे स्पष्ट विवेचन अधिनियमातील ६ (३) (एक) मध्ये केलेले आहे. संबंधीत उप अभियंता यांनी सदर अर्ज, कार्यकारी अभियंता जे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत त्यांच्या कडे पाठविणे या कलमातील तरतुदीप्रमाणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता त्यांच्याकडे सदर अर्ज विना कार्यवाही ठेऊन

दिला. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती मागितली आहे, याची कल्पना जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात झालेल्या सुनावणीचे पत्र त्यांना प्राप्त होण्याच्या वेळेस झाली, तदनंतर सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेनुसार त्यांनी दिनांक २९-०९-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. जी माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस दिनांक १०-०७-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे भाग होते ती माहिती त्यांना अशा प्रकारे एकूण ८१ दिवसाच्या विलंबाने प्राप्त झाली आहे. या विलंबाचे समर्थन करणारा कोणताही पुरावा अथवा या संदर्भातील कागदपत्रे आयोगास कोणत्याही पक्षाकडून उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. त्यामुळे हा विलंब निश्चितपणे असमर्थनीय आहे असे आयोगास सप्रमाण वाटते. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना या कामी सहाय्य करणारे त्यांचे सर्व कर्मचारी / अधिकारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे, हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती देण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक व कर्मचारी हे निश्चितपणे जबाबदार ठरत आहेत असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय एकूण ८१ दिवस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे सिध्द होत असल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करुन घेण्यासही पात्र ठरत आहेत. सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन

माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सहाय्यक यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी आता अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाचे आत विनामूल्य माहिती पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाचे आत विनामूल्य माहिती पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २७-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख नसीर बेगाजी, ३३, सावली सोसायटी, गुलमोहर रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११८३

निर्णय दिनांक ३०-०६-२००८

श्री. पुरुषोत्तम रामनिवास तापडे, : अपिलार्थी
१, शुक्रवार पेठ, पांच कंदील, मालेगाव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा इमारत पर्यवेक्षक, मालेगाव
महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा नगररचनाकार, मालेगाव
महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. पुरुषोत्तम रामनिवास तापडे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. महेश नामदेव गांगुर्डे, जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. राजेंद्र काशिनाथ बाविस्कर, जन अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार, मालेगाव

महानगरपालिका, मालेगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

अपिलार्थीने दिनांक ०३-१०-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये केलेले अपील येथे विचाराधीन आहे. या अपील अर्जावर अपिलार्थीने दिनांक २५-०९-२००६ अशी तारीख दर्शविलेली असून या अपिलाची नोंदणी मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०३-१०-२००६ रोजी झालेली आहे. अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील क्रमांक ६०८/०६-०७ च्या संदर्भात दिनांक १४-०८-२००६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार, जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली नसल्याने केले आहे. या प्रकरणामध्ये अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या प्रथम अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००६ या कालावधीतील, दिनांक ०५-०६-२००६ रोजी सोमवार वॉर्ड सिटी सर्व्हे नंबर २३३ ही इमारत पाडतांना अतिक्रमण विभागाचे / पालिकेचे किती कर्मचारी हजर होते त्यांचे नांव व हुद्दयासह यादी अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीस माहिती नाकारतांना त्यांनी माहिती नाकारण्याची कारणे या पत्रात उध्दृत केली नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या आदेशान्वये, अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०८-२००६ रोजी ही माहिती द्यावयाची होती, तथापि त्यांनी ही माहिती दिनांक ०५-१०-२००६ रोजी अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०५-१०-२००६ रोजी प्राप्त झालेली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या कडून जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही विलंबाने माहिती प्राप्त झाली. सदर यादी त्यांना न्यायालयीन कामासाठी हवी होती. ही यादी त्यांना वेळेत प्राप्त न झाल्याने त्यांच्या न्यायालयीन कामास ६ महिने खोळंबा झाला व या प्रकरणी त्यांना आर्थिक व मानसिक नुकसानीस सामोरे जावे लागले. त्यांच्या या झालेल्या नुकसानीस संबंधीत जन माहिती अधिकारी हे जबाबदार आहेत व त्यांच्यावर खातेनिहाय चौकशीची कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ०३-०३-२००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीने अर्ज करतेवेळी श्री. महादू नथू पगारे, नावाचे अधिकारी कार्यरत होते. नियत वयोमानानुसार ते आता दिनांक २९-०२-२००८ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अत्यंत साधी व सोप्या स्वरुपाची होती. सदर माहिती अपिलार्थीस त्यांनी अर्ज केल्यानंतर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देणे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना सहज शक्य होते, तथापि त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीस सदर माहिती नाकारतांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (८) नुसार ही माहिती नाकारण्याची कारणे अपिलार्थीस कळविणे आवश्यक होते, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस

माहिती नाकारतांना अशा प्रकारची कारणे कळविली नाहीत, इतकेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०८-२००६ रोजी अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे आदेशित करुन देखील त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-१०-२००६ रोजी म्हणजेच ४३ दिवसाच्या विलंबाने ही माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणातील प्रत्येक टप्प्यावरील वर्तन पाहता, त्यांना मुळात अपिलार्थीस माहिती द्यावयाची होती किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे, या अशा प्रकारच्या वर्तणुकीमुळे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर सर्व प्रथम माहिती देण्यास टाळाटाळ केली व नंतर जी माहिती दिली ती विलंबाने दिली. हे पाहता, त्यांनी या प्रकरणी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तणुकीबद्दल आयुक्त, महानगर पालिका, मालेगाव यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीने माहिती देण्यासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता माहिती दिली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव यांनी, उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ३०-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पुरुषोत्तम रामनिवास तापडे, १, शुक्रवार पेठ, पांच कंदील, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११८४

निर्णय दिनांक ३०-०६-२००८

श्री. विवेक नारायण पाटील, : अपिलार्थी
संपादक, सा. पूर्व खान्देश, बाहेरपुरा,
राजे संभाजी चौक, अमळनेर,
जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, :
तालुका कृषि कार्यालय, धरणगाव
जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी,
धरणगाव, जिल्हा जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विवेक नारायण पाटील, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी,

तालुका कृषि कार्यालय, धरणगाव व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धरणगाव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००४ ते २००६ या कालावधीतील गारखेडी नालामध्ये पुलाजवळील सिमेंट बांधाच्या बांधकामासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ धरणगांव तालुक्यातील धानोरा जवळील गारखेडी नाला मध्ये पुलाजवळ सिमेंट, बांध बांधण्यात आलेला असून त्या बांधचे इस्टीमेंट नकला व मजूरांच्या हजेरी बुकाच्या नकला मिळणेसाठी माहिती अधिकार २००५ नुसार अर्ज. ”

अपिलार्थीने सदर माहिती रजिष्टर पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना खालील प्रमाणे उत्तर दिले आहे.

“ त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, या कार्यालयात कर्मचा-यांची संख्या फारच कमी आहेत. त्यामुळे अपूरे मनुष्यमुळे आपणास सदर प्रकरणी नकला देणे शक्य होणार नाही. तरी कृपया आपण या कार्यालयात समक्ष येवून सदर दप्तराची पाहनी करुन घ्यावी, हे आपलेसाठी अग्रेषित. ”

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना मूळ अर्ज दिल्यानंतर, दिनांक २६-०६-२००६ रोजी विनंती पत्र देऊनही कोणत्याही प्रकारे माहिती दिली नाही व जाणुनबुजून माहिती नाकारली व ती देण्यास टाळाटाळ केली, त्याचबरोबर दप्तर पाहण्यासाठी त्यांच्या कार्यालयात जाऊनही प्रत्यक्षात दप्तर पाहू दिले नाही. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय दिला नाही व त्यांना न्याय दिला नाही, त्यामुळे संबंधीत जबाबदार अधिका-यांना कलम २० प्रमाणे दिनांक २९-०५-२००६ पासून प्रत्येक दिवसाला रुपये २५० इतकी शास्ती लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे व याचबरोबर त्यांनी या व्दितीय अपील अर्जामधील आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातर्फे दिनांक १३-०६-२००८ रोजी दूरध्वनीव्दारे सूचना देऊनही ( ही सूचना श्री. घोडके, कृषि सहाय्यक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धरणगांव यांना दिली होती ) ते आज रोजी सुनावणीस गैरहजर राहिले आहेत, याची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक २९-०५-२००६ रोजी, त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळण्याकरिता प्रथमतः जन माहिती अधिकारी यांना अर्ज केला होता. त्यांच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना दिनांक १२-०६-२००६ व दिनांक ०४-०७-२००६ रोजी पत्र पाठवून त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन दप्तराची पाहणी करुन घ्यावी, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रानुसार अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेले असता दप्तराचे गठ्ठे उतरविण्यासाठी कर्मचारी नाहीत त्यामुळे दिनांक १५-०८-२००६ नंतर अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात येण्याचे त्यांनी सूचित केले. त्यानुसा दिनांक १६-०८-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी भेटले असता, त्यांनी दप्तरातील नकला त्यांच्याकडे नाहीत व दप्तरही नाही, असे सांगून अपिलार्थीस कार्यालय अधीक्षक श्री. व्यवहारे यांना भेटण्यासाठी त्यांना सूचित केले. श्री. व्यवहारे यांनी देखील कर्मचारी नाही, आपणांस नकला देता येत नाही व पाहण्यासाठी सुध्दा मिळणार नाहीत, असे त्यांना सांगून त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात झालेल्या या प्रकारामुळे त्यांनी दिनांक १८-०८-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, त्यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कर्तव्यात कसूर करुन, त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्यामुळे संबंधितांवर कलम २० प्रमाणे कारवाई व्हावी, त्यांनी मागणी केलेली मूळ माहिती त्यांना एक वर्षानंतर दिनांक १८-०६-२००७ रोजी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली, त्यांना आवश्यक ती माहिती आता प्राप्त झाली आहे. सदर माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी

अशा प्रकारे टाळाटाळ केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदी प्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती त्यांनी आयोगास या युक्तिवादाच्या शेवटी केली.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जी माहिती मागितली आहे तिचे स्वरुप व व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात होती असे सकृतदर्शनी दिसून येत नाही, तसेच ही माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील उपलब्ध साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार होती, अशातली कोणतीही बाब संभवत असल्याचे येथे दिसून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी कशा प्रकारे टाळाटाळ केली, हे त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये व आयोगास सादर करण्यात आलेल्या त्यांच्या पत्रामध्ये स्पष्ट केले आहे, यावरुन असे दिसून येते की, त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस माहिती न देण्याकरिता कर्मचारीवर्गाची संख्या हे कारण पुढे केले, तदनंतर माहिती ज्या दप्तरामध्ये उपलब्ध आहे ते दप्तर उतरवण्यासाठी कर्मचारी नाहीत, हे कारण सांगून अपिलार्थीस कार्यालय अधीक्षकाकडे पाठविले तर कार्यालय अधीक्षक यांनी यावरही कडी करुन माहिती देण्यासाठी व पाहण्यासाठी दप्तर उपलब्ध करुन देण्याचे नाकारले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी सुरुवातीपासूनच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण नकारात्मक भूमिका घेतली असल्याचे दिसून येते, किंबहुना अपिलार्थीस ही माहिती द्यावयाची नाही, असा त्यांनी पण केला असावा असा संदेह उत्पन्न होण्याइतपत त्यांनी परिस्थिती निर्माण केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने ज्या कामासंदर्भात माहिती मागविली होती, त्या कामाची पुढे चौकशी होऊन शासनास झालेल्या रुपये ३६८३० इतक्या रक्कमेची जबाबदारी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्यावर निश्चित करण्यात आली. जन माहिती अधिकारी यांचे सहाय्यक श्री. ए. डी. चौधरी जे कृषि सहाय्यक या पदावर त्यावेळी कार्यरत होते, ते

कार्यालय अधीक्षकाचे जवळचे नातेवाईक असल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक २६-०५-२००६ रोजीच्या अर्जामध्ये म्हटले आहे. अपिलार्थीने केलेल्या या विधानाचे खंडण करण्यासाठी, जन माहिती अधिकारी किंवा जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही आयोगाने पूर्वसूचना देऊनही कोणीही उपस्थित नाहीत. सदर रक्कम शासकीय कोषागारात संबंधितांनी भरल्याबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या पत्रान्वये अध्यक्ष, विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे पाठविलेल्या अहवालावरुन दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारल्यानंतर त्यांच्यावर या प्रकरणी रुपये ३६८३० इतक्या रक्कमेची जबाबदारी निश्चित होते या घटनाक्रमामुळे जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतुतः टाळाटाळ केली असे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न पुरवून तसेच अपिलार्थी वेळोवेळी त्यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेले असता, सदर माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात टाळाटाळ करुन, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे.

सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा, त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक १८-०६-२००७ रोजी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ३०-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विवेक नारायण पाटील, संपादक, सा. पूर्व खान्देश, बाहेरपुरा, राजे संभाजी चौक, अमळनेर, जिल्हा जळगाव.
२ जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय धरणगाव, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धरणगाव, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ निर्णय नस्ती.